पुणे मराठी ग्रंथालय
कादंबरी
क्र. ४८०



# भूवरील स्वर्ग.

१४७२१

अगदीं स्वतंत्र नवीन कादंबरी.

014721

लेखक.

रा. द. ग. आगाशे.

सन १९११ इ.

किंमत १। रुपाया.



( श्री समर्थ रघुनाथ महाराज प्रसन्न. )

# भूवरील स्वर्ग.

अगदीं स्वतंत्र नवीन कादंबरी.

लेखक,

रा० दत्तात्रय गणेश आगाशे " तेजचंद्र,
जन्मसाफल्य, मानवी प्रपंच " इत्यादिकांचे कर्ते.

हें पुस्तक,

रा. दत्तात्रय मोरेश्वर देव यांनीं
वाई येथें दामोदर लक्ष्मण लेले यांच्या ' मोदवृत्त
छापखान्यांत छापून वाई येथें घ. नं. ८८८
पेठ धर्मपुरी याठिकाणीं
प्रसिद्ध केलें.

सन १९११.

किंमत १। रुपाया.

ह्या पुस्तकासंबंधीं सर्व प्रकारचे हक्क लेखकानें आपल्याकडे ठेविले आहेत.

॥ श्रीगणेशायनमः ॥

॥ श्रीसद्गुरु रघुनाथ महाराज कीं जय ॥

# भूवरील स्वर्ग.

## प्रकरण १ लें.

ज्येष्ठ आषाढाचे दिवस! वसंत ऋतू संपून ग्रीष्म ऋतूचा बहुतेक अंमल संपत आलेला! चैत्र वैशाखांतील सूर्यप्रकाशाच्या प्रखरतेनें संतप्त झाल्याकारणानें भूदेवीचे डोळे मेघवर्षावाकडे वेधून राहिलेले! ज्येष्ठा-मूळीयाची अमावास्या निघून जाऊन आषाढमासाचा वद्य पक्ष सुरूं झाला तरी मेघराजाचें दर्शनही नाहीं! पतिवियोगाचें दुःख असह्य होऊन एखाद्या पतिव्रता स्त्रीला ज्याप्रमाणें औदासीन्य प्राप्त होतें आणि फार दिवस अंतरलेल्या पतीच्या संगतीबद्दल उत्कंठा उत्पन्न होऊन ती साध्वीव्रतपर प्रमदा अलंकारांचा त्याग करून, मोठ्या उदासीनतेनें परंतु प्रेमयुक्त उत्सुकतेनें पतिचिंतनांत गर्क होऊन गेलेली असतांना जशी दिसते त्याप्रमाणेंच या समयीं धरणीदेवीचें स्वरूप दृश्यमान् होत होतें. गत वर्षाचा हिवाळा सुरूं झाल्यापासून पुन्हां मृग-नक्षत्रास आरंभ होईपर्यंतचा वियोगकाल लोटल्यानंतरही घना-घनाचा समागम होत नाहीं असें पाहून धरित्री खट्टू झाल्यासारखी दिसत होती. गहू, हरबरा, रब्बी वगैरे धान्यांचीं पिकें काढून घेऊन जमिनी नांगरून तयार करून ठेवून जलसिंचनाची मार्गप्रतीक्षा करीत बसलेल्या शेतकऱ्यांचीं तोंडें ज्येष्ठ आणि आषाढ हे महिने कोरडे ठण-ठणीत गेलेले पाहून पराकाष्ठेचीं सुकून गेलीं होतीं.

मृगपंचकानें सर्वस्वी निराशा केली. मघापंचक सुरूं झालें. आतां तरी परमेश्वरकृपेनें पाऊस पडून गाईगुरांना चारा होईल, व शेवटचीं धान्यें तरी पदरांत पडतील; निदान हस्तनक्षत्रानें अखेर बहार केली तर पिण्या-करितां पाण्याचा तरी तोटा पडणार नाहीं अशी लोकांना मोठी आशा

लागून राहिली होती. पैसेकरी लोक आपल्या जवळच्या धनसंचयाच्या आधारावर फारसे हवालदील झाले नव्हते; इतकेंच नव्हे तर द्रव्यसंपन्नतेच्या प्रसादामुळें उन्मत्त झालेले धनिक सावकार व्याजाचा दर फुगेल या अटकळीनें मनांत अवर्षणास कांहींसा दुवाच देत होते. व्यापारांत पैका कमवून गबर झालेले द्रव्याभिलाषी व्यापारी दुष्काळामध्यें धान्याची व त्याबरोबरच इतर जिनसांची महर्गता होऊन आपणास बरीच किफायत होईल अशा अनुमानानें बरेचसे आनंदीतच झाले होते. सोनें, चांदी, मोतीं वगैरे खरेदी करणारे सराफ लोक गरीबगुरीबांच्या जिनसा पानसा आतां बाजारांत सवलतीनें विकत घेऊन ठेवण्यास सांपडतील अशा अदमासानें अंतःकरणांत थोडेसे हुरळले होते. पृथ्वीमातेची सेवाचाकरी करून सालोसाल देशाच्या सांपत्तिक स्थितीची कांहीं तरी वाढ करणारे शेतकरी, हातावर उदरनिर्वाह चालविणारा मध्यमस्थितींतील जनसमुदाय, शारीरीक काबाडकष्ट करून पोट भरणारे मजूरदार; निराधार, निराश्रित, अनाथ, दुर्दैवाच्या सपाट्यांत सांपडलेले अंध, पंगु, लुले वगैरे परावलंबनीय दीनदुबळे अशा लोकांच्या अंतःकरणाचा धीर सुटून त्यांचें चित्त मात्र परमेश्वराचा धावा करण्यांत गढून गेलें होतें. विपत्काळीं अनाथाच्या कार्यास साहाय्य करणाऱ्या परमेश्वरावर संकट निवारणार्थ भार घालण्याकरितां कांहीं लोकांनीं शंकराच्या पिंडीवर पाण्याची संतत-धार चालूं ठेविली होती. कोणीं कोणीं त्या दयाघन विश्वपालकास आळविण्याकरितां भजनाचा तडाका लावून हरिनामाचा गजर उसळून दिला होता वेदार्थ प्रतिपादन करणाऱ्या धार्मिक जनांनीं पर्जन्यसूक्तें जपण्याचा आणि आपत्काल निरसनार्थ अनुष्ठानें करण्याचा धुमाकूळ उडवून दिला होता. जो तो आपापल्यापरीनें करुणाकर परमात्म्याची करुणा भाकीत होता; तरी पण कोणाच्याही भिडेस, भक्तीस, आणि स्तुतीस भीक न घालतां रसनायकानें आपली क्रोधवृत्ति जशीच्या तशीच कायम ठेविली. चित्रानक्षत्र लागून पंधरा दिवस झाले तरी घनरसाचा एक बिंदुही अवनीतलावर पडला नाहीं. सर्वत्र दुष्काळाचें स्वरूप प्राप्त झालें. चोहोंकडे हाहाकार उडून राहिला. लोक अगदीं हवालदील होऊन गेले. आंतून जठरानल पेटलेला आणि बाहेरून चंडकिरण तप्त

झालेला. अशा या दुहेरी तापाग्नीनें होरपळून जाऊन लोक पटापट प्राण टाकावयास लागले. चाऱ्याच्या अभावामुळें जनावरांच्या देहाचे नुसते सापळे बनून तीं पटापट जीव सोडूं लागलीं.

अशाप्रकारें सर्व शूरसेन प्रांतभर काळानें आपलें उग्र रूप प्रकट केलें. परंतु, त्यांतल्यात्यांत देदिकोठ शहरांतील लोकांस तो दुष्काळ पराकाष्ठेचा जाचक झाला. या शहरांत धारणीचें मानच नुसतें कडकून राहिलें होतें असें नाहीं. येथच्या नगरवासीयांना पाण्याची देखील मोठी पंचाईत पडली होती. शहरामध्यें घरोघरीं विहिरी, आड वगैरेंची सोय होती. परंतु, सूर्याच्या प्रखर किरणांनीं वारिशोषणाचा सपाटा चालविला असल्यानें आड व विहिरी अगदीं शुष्क होण्याच्या बेतास आल्या होत्या.

देदिकोठ हें शहर टुमदार असून वैराटी नदीच्या कांठीं वसलेलें होतें. त्याची पूर्व पश्चिम लांबी सुमारें एक योजन असून दक्षिणोत्तर रुंदी अदमासें एक कोश होती. हा गांव चांगला सुधारलेला असून येथील लोकसंख्येचें मान जवळ जवळ एक लाखापर्यंत होतें. हवापाण्याच्या दृष्टीनें विचार केला असतां या पत्तनावर निसर्ग देवतेची चांगली कृपा होती. या शहराच्या भोंवती बरीच झाडी व त्या पलीकडे जवळच साधारण उंचीचे डोंगर असल्या कारणानें येथील हवा आरोग्यकारक, मानवणारी व शक्तिवर्धक होती. या ग्रामाच्या उत्तरेला शुद्ध जीवनानें परिपूर्ण अशी वैराटी नांवांची सरिता पश्चिमेकडून पूर्वेकडे वाहत होती. या नदीचें पाणी पिण्याला मोठें मधुर असून हलकें व अतिशय पाचक होतें. तें नेहमीं इतकें स्वच्छ व पांढरें दिसें कीं, रंगाची तुलना करून पाहणारास वैराटी ह्मणजे दुसरी जन्हुतनयाच आहे कीं काय असा भास होत असे. आपल्या तीर्थस्नानानें मनुष्यकृत दुरिताचें हरण करून, त्रिविध तापानें तप्त झालेल्या प्रापंचिकाच्या मनाचा परिताप निववून, त्याच्या चित्तास शांति देणाऱ्या स्वर्गतरंगिणीच्या दुग्धवर्णाशीं बरोबरी करून तिची धाकटी बहीण शोभणारी ही दुसरी देवापगा पवित्रपणांत ही जान्हवीच्या तोडीचीच होती. देदिकोठचे शहरनिवासी वैराटीस तीर्थाच्या दृष्टीनें फार महत्वाची मानीत, तिची प्रतिमा करून पुजीत, तिला नवस करीत व आपदा प्राप्त झाली असतां तन्निवारणार्थ तिची

स्तोत्रें करीत, इतकेंच नव्हे तर लांबलांबचे लोकही देदिकोठास पुण्यवान् क्षेत्र समजून वैराटीच्या स्नानाकरितां हरहमेष यात्रा करीत असत. गांवांतील प्रजाजन व यात्रेकरू यांच्या सोईकरितां या निम्नगेला ठिकठिकाणीं सुबक घाट बांधलेले असून त्या ठिकाणीं आपल्या दर्शनानें पतिताला मुक्ति देणाऱ्या जगदीश्वरानें लिंगरूपानें कित्येक देवळांतून अक्षय्य वसती केली होती. त्रिविधतापानें परितप्त झालेल्या संसारी जनांस या वैराटीच्या घाटावर येऊन सांबाचें दर्शन घेतलें ह्मणजे क्षणभर कृतार्थ झालेसें वाटत असे.

आपल्या वैभवानें जलनिधिनृपतीच्या पट्टराणीशीं साम्य पावणारी ही वैराटी जीवनामृतानें नेहमीं दुथडी भरून चालावयाची. पर्जन्य काळांत तर तिच्या वैभवाचा पूर्ण अभ्युदय होऊन तिचें पात्र पराकाष्ठेचें विस्तीर्ण बनून रहावयाचें. परंतु, सांप्रतच्या अनिष्ट काळीं तें इतकें शुष्क होऊन गेलें होतें कीं, त्यांतील खडकावर लोकसमुदाय खुशाल जाऊन बसत असत.

या वैराटीच्या तटाकीं जशीं पुष्कळ देवळें होतीं त्याप्रमाणेंच पाण्याच्या ओघापासून कांहीं अंतरावर दगडी धर्मशाळा बांधलेल्या असून ठिकठिकाणीं मोठालें पार बांधलेले होते. कांहीं कांहीं पार अगदीं मोडकळीस आले होते. जे ओटे चांगल्या स्थितींत होते त्यांच्या मध्यभागीं कांहींतून अश्वत्थ, कोठें कोठें न्यग्रोध व क्वचित् स्थलीं पिंपरण्या अशा प्रकारचीं झाडें लाविलीं होतीं. यांतून ज्या वृक्षांचा विस्तार मोठा होता त्यांच्या छायेखालीं आराम घेण्याकरितां प्रवासी, बैरागी, किंवा कोणी यात्रेकरी कांहीं काळ वास्तव्य करीत असत.

एके दिवशीं तिसराप्रहराच्या सुमारास यांपैकीं एका भव्य पारावर माणसांची फार गर्दी जमलेली दिसली. पाराच्या मध्यभागीं कांहींतरी चित्ताकर्षक देखावा असून तो पाहण्याकरितां लोकांची त्याच्या सभोंवतीं मंडलाकार दाटी झाली असावी असें लांबून पाहणाराचें अनुमान होत होतें. तो देखावा काय असावा ? त्या ठिकाणीं गारोड्याचा खेळबीळ तर चालला नव्हताना ? कोणा माथेफिरूच्या निरर्गल प्रलापानें करमणूक करण्याकरितां तर मंडळींचा थवा जुळला नव्हताना ? एखाद्या

वेड्याच्या वेडगळ लीलांनीं तर ती जागा माणसांनीं गजबजून टाकली नव्हतीना ?

त्या ठिकाणीं अशांतला कांहींएक प्रकार नव्हता. त्या पाराच्या मध्यभागीं स्थित असलेल्या वडाच्या बुंध्याशीं एका तीन चार हात दुपट्यावर सरासरी दीड पावणेदोन वर्षांचें एक तान्हें पोर पडलें असून त्याच्याबद्दलची वाटाघाट करण्यांत भोंवतीं जमलेली मंडळी गढून राहिली होती. तें बालक कोणाचें असावें, तें तशा उघड्या जागीं कसें आलें असावें; त्या ठिकाणीं तें केव्हांपासून असावें अशाबद्दल निरनिराळ्या येणारा जाणारांचे अनेक तर्क निघाले; पण त्याबद्दल निश्चित असें कांहींच ठरेना. कसेंही असलें तरी त्या अर्भकाचें संरक्षण होणें इष्ट आहे असें वाटल्यामुळें कांहीं कोंवळ्या अंतःकरणाचें लोक त्याच्याबद्दलचा खर्च सोसण्यास तयार झाले. पण उपयोग काय ? बाल्यावस्थेंत बालाचें संगोपन करण्याच्या कामीं पैक्यापेक्षां प्रेमाचें महत्व अधिक आहे. शैशवदशेंत शिशूची यथास्थितपणें तैनात संभाळण्यास त्याच्या शुश्रूषेस असणाऱ्या माणसांच्या हृदयांत स्वाभाविक जिव्हाळा असणें अगदीं जरूर आहे. अशा प्रकारचा निसर्गदत्त स्नेहरस एका मातेवांचून अन्य कोणत्या जागीं सांपडणार ? तेथें जमलेल्या माणसांतून जो तो त्या शिशुकाबद्दल भूतदयाप्रेरित अशी कळवळ तोंडानें व्यक्त करून दाखवी; पण त्या पोरक्या पोरास उचलून घेऊन जाण्याचा धीर कोणी करीना. मग अशा निराधार स्थितींत पडून उघड्या हवेंतील गारठ्यानें त्या तान्हुल्याचा अंत होणार काय ? रात्रीच्या प्रहरीं तें ठिकाण निर्जन बनल्यानंतर एखाद्या रात्रि–जागराच्या तडाक्यांत तो बालक सांपडणार काय ? कोल्ह्यालांडग्यांच्या भक्षस्थानीं पडून त्या शिशूच्या आयुष्याचा शेवट लागणार काय ? छे छे ! अशाकरितां तो किशोर या मर्त्य जगतांत जन्मास आलेला नव्हता ? सृष्टीक्रमाच्या रहाटगाडग्यानुसार केवळ जन्ममरणाच्या हप्तयांची पूर्णता करण्याकरितां त्याचें मनुष्ययोनींत जनन झालें नव्हतें. मानवजातींत अवतीर्ण होऊन प्रपंचाची यातायात मागें लागली असतांना अंगावर येऊन आदळणाऱ्या शोकमोहाच्या चपेट्यास तिळभरही न डगमगता सात्विक, राजस आणि तामस अशा प्रकारच्या

त्रिगुणसंपत्तीनें युक्त राहूनही मनुष्याला चारही पुरुषार्थ कसें साधितां येतात हें जगाच्या निदर्शनास आणून देण्याकरितां परमेष्ठीनें या भाग्यवान् बालकास नरजन्मांत मुद्दाम उत्पन्न केलें होतें. त्याचा आयुष्यक्रम जनतेला अनुकरणीय व्हावा असा ईश्वरी संकेत असल्यामुळें त्याचें रक्षण करण्याकरितां धावून येण्याची अंतःप्रेरणा त्याच नगरांतील एका वृद्ध गृहस्थास झाली. पारावर जमलेल्या घोळक्यांतील सर्व मंडळी त्या तान्हुल्याच्या स्वीकाराविषयीं साशंक होऊन राहिली आहेत अशा समयास एक वृद्ध गृहस्थ त्या ठिकाणीं प्राप्त झाला. घोळक्यांतील मंडळींना हातानें बाजूस सारून तो त्या बालकासन्निध गेला. आपण आपल्या घरीं गप्पा गोष्टी करीत बसलों असतांना त्या मुलाविषयीं आपण जी लोकवार्ता ऐकली ती अक्षरशः खरी आहे असें त्याच्या प्रत्यक्ष दर्शनानें कळून आल्यानंतर त्या म्हाताऱ्या मनुष्यास मोठें समाधान वाटलें. त्याच्या हृदयांत त्या बालाबद्दल थोडेसें प्रेम उत्पन्न होऊन त्यानें त्याला उचलूनही घेतलें, आणि अगदीं बारकाईनें तो त्या अर्भकाचें निरीक्षण करूं लागला.

हा वृद्ध गृहस्थ त्याच क्षेत्रांतील घरंदाज व सुखवस्तु असल्याकारणानें तेथें गोळा झालेल्या मंडळींतून पुष्कळजण त्याला चांगला ओळखीत होते. तो त्या छोकऱ्यास फार न्याहाळून पाहत आहेसें बघून कांहींजणांनीं त्यास जिज्ञासापूर्वक कांहीं प्रश्न करून पाहिले; कांहीं टवाळांनीं त्याला कुत्सित बुद्धीनें थोडे सवाल टाकले; कांहीं वाचाटांनीं आपापसांतच प्रश्नोत्तरें करून त्या म्हाताऱ्याच्या कृतीची टर चालविली.

तो म्हातारा जगाचा त्रिविधपणा जाणत असल्यानें त्यानें जनाच्या चेष्टेकडे पूर्णपणें दुर्लक्ष केलें. कोणाच्याच बोलण्यास कांहींएक उत्तर न करितां तो सर्वांनाच उद्देशून सामान्यतः म्हणाला " हिंदुधर्माप्रमाणें या मुलाचे कान टोचलेले आहेत; याच्या हातांत काळ्या डोंगळ्याच्या मनगऱ्या आहेत; याच्या पायांत वाळें आहेत; या सर्व लक्षणावरून हा पोर जातीचा हिंदु आहे यांत संशयच नाहीं. आतां त्याच्या गळ्यांत असलेला ताईत रुप्याचा आहे त्यावरून तो हिंदुंतील एखाद्या हीन जातीचा असावा अशी शंका येण्याचा संभव आहे. त्याच्या स्वरूपावरून तो उच्चवर्णीतील असावा असाही तर्क होत आहे. परंतु,

नुसत्या कल्पनांनीं याच्याबद्दल ठाम असा सिद्धांत ठरणें मुष्किलीचें आहे. उच्चजातीच्या दरिद्री माणसांच्या पोराबाळांना सुद्धां तांब्याचे वाळे व रुप्याचे ताईत घालण्याचा प्रघात आहे आणि ब्राह्मणेतरांच्या बालकांत सुस्वरूपता हा गुणही दृष्टीस पडतो; तेव्हां नुसत्या अनुमानधपक्यानें या पोरग्याची जात निश्चित होणार नाहीं हें खरें. कसेंही असलें तरी या अनाथ मुलास नेण्याबद्दल कोणाची आडकाठी नसेल तर मी यास घेऊन जातों. तो आणखी कांहीं मोठा होईपर्यंत मी त्याला ब्राह्मणजातीचा समजूनच जर त्याचें लालन पालन केलें तर मला धार्मिक प्रतिबंध होण्याचा संभव नाहीं; पुढचें पुढें पाहता येईल. ” असें बोलून लोकांच्या तोंडाकडे नजर फेकीत फेकीत तो म्हातारा त्या पोरास दुपट्यांत गुंडाळूं लागला. भोंवतालच्या मंडळींतून त्या गोष्टीस सर्वानुमतानें अनुकूलताच आहे असें त्यांच्या भाषणावरून समजून येताक्षणींच म्हाताऱ्यानें त्या बालकांस उचलून दोन्हीं हातांत घेतलें आणि तो तडक आपल्या घरीं चालता झाला.

---

## प्रकरण २ रें.

कांहींतरी ईश्वरी योजनेच्या योगानें अंतःकरण करुणरसानें परिप्लुत होऊन ज्या वृद्ध गृहस्थानें त्या पारावर टाकलेल्या पोरक्या लेकरास उचलून त्याचें लालनपालन करण्याकरितां आपल्या घरीं नेलें तो मनुष्य वयानें साठीच्या घरास पोंचलेला होता. वयाच्या मानानें तो विशेष उतारदशेंतला दिसत नसे. अंगापिंडानें तो मोठाड असून त्याच्या दंडावर, कोपरावर, छातीवर, कर्णावर केश पुष्कळ होते. त्याच्या मिशा कल्लेदार असून दाढी दाट व चरचरीत असे. त्याचें कपाळ विस्तीर्ण असून नाक सरळ होतें. त्याचे डोळे मोठे असून आंतील बुबुळांचा रंग पूर्णपणें घारा नव्हता, तरीपण पाहणाराच्या नेत्रास त्याच्यावर हिरवट रंगाची झांक दिसून येत असे.

जिव्हा, तळहात, पायाचे तळवे अशासारख्या कांहीं ठराविक जागा खेरीज करून शरीराच्या अवयवांवर ठिकठिकाणीं पुष्कळ केंस असणें हें

भाग्याचें लक्षण मानतात. त्याप्रमाणें हा काकासाहेब ह्या नांवाचा वृद्ध मनुष्य सांपत्तीक दृष्टीनें खरोखरीच भाग्यवान् होता. काकासाहेबांची श्रीमंती अगदीं कुबेरासारखी किंवा एखाद्या जहागीरदारासारखी नव्हती; तरी पण कोणत्याही गोष्टीची ददात न ठेवतां निःकाळजीपणानें सुखानें काळक्रमणा करण्यासारखी त्याची स्थिती होती. त्याच्याजवळ थोडा-बहुत दागदागीना होता; पण त्याच्या धनसंपन्नतेच्या मानानें मोठ-मोठ्या संस्थानिक व जहागीरदारांत त्याचें वजन मात्र पराकाष्ठेचें असे. त्यानें जहागीरदार होण्याचें मनांत आणलें असतें तर धनाढ्य लोकांच्या साहाय्यानें, प्रेमानें व मित्रत्वानें त्यानें आपणाः स्वतःहाला एका दिव-साच्या अवधींतच चांगलें गब्बर बनवून टाकलें असतें. पण त्याला तशी इच्छा राहिली नव्हती. त्याच्या मनाची उमेद खचून गेली होती. प्रेम-रसाचें आद्य बीज संततीप्राप्ति तिचा काकासाहेबांच्या ठिकाणीं बहुतेक अभावच असल्यामुळें तो आपल्यामनांत उत्साहहीन झाला होता. इत-केंच नव्हे तर पुत्रप्राप्तीची साधारण निराशाच वाटावयास लागली अस-ल्यानें त्याला जवळ असलेल्या जिनगानीबद्दलही मोठासा आनंद वाटत नव्हता.

पुत्रप्राप्तीच्या हौसेनें त्यानें एकंदर तीन बायका केल्या. त्यांतील पहिल्या दोन वांझपणा न फेडतांच मरून गेल्या. तिसरें कुटुंब अद्यापपर्यंत हयात होतें; पण त्यापासून संतती उत्पन्न होण्याची फारशी आशा राहिली नव्हती. काकासाहेब हा थोडा कामप्राधान्य वृत्तींतील माणूस असल्यानें तीन विवाहित पत्न्या वरूनही त्यानें आणखी एक अंगवस्त्र स्वतःच्या घरीं कायमचें बाळगून ठेविलेंच होतें. या उपवस्त्राचें नांव सौमिनी असें असून काकांच्या त्रितीय भार्येचें नांव भामिनी होतें. सौमिनी व भामिनी या दोघी किंवा निदान सौमिनी तरी फारच चांगल्या मनमिळाऊ स्वभा-वाची, पोक्त विचाराची व उदार अंतःकरणाची असल्या कारणानें काकांच्या घरांत घरगुती कचकच किंवा प्रापांचिक अस्वस्थता यांची पीडा नसे. काकाना गुरेंढोरें बाळगण्याचा नाद असल्यानें त्यांच्या गोठ्याला मोठमोठ्या गाई, म्हशी वगैरे जनावरें हरहमेश दुभती असत. सोन्याचा घास खावा; दुधादह्याच्या चरव्या रिकाम्या कराव्या, उत्तम

प्रकारचीं वस्त्रें परिधान करावी, दागदागीन्यांनीं देह शृंगारावा आणि खुशाल आळ्याला पाय लावून पडावें अशाप्रकारच्या अवस्थेनें काकासाहेबांच्या घरावर मेहेरनजर ठेविलेली होती; पण सगळेंच मुसळ केरांत ! दृष्टिरहित अंधाला ज्याप्रमाणें सर्व सृष्टी शून्य भासते त्याप्रमाणें प्रजाहीनत्वामुळें काकासाहेबास स्वतःचें घर ओस दिसत होतें. बुबुळ नसलेला नेत्र, फलरहित वृक्ष, कमळिणीवांचून असलेलें सरोवर आणि निरक्षर असा सौंदर्यसंपन्न ब्राह्मण हीं ज्याप्रमाणें निस्तेज दिसतात तद्वतच निपुत्रिकपणामुळें काकासाहेबाला सर्व संसार निःस्सार असा वाटूं लागला होता.

पुष्कळ स्नेही सोबत्यांनीं व बैठकींतल्या मंडळींनीं काकांची ही अंतर्व्यथा जाणून एखादा दत्तक घेण्याबद्दल त्यास व्यंगोक्तीनें सुचविलें होतें. तेव्हांपासून काकांच्या मनांतही तो विचार घोळत होता. अखेर त्याच विचारास स्फुरण चढून काकांनीं हा पारावरचा दिव्य कुमार आपल्या घरीं सांभाळण्यास आणून ठेविला.

ज्याची कांहींच माहिती नाहीं असा हा मातापितारहित मुलगा घरीं आणल्यानंतर एके दिवशीं शुभ शकुन पाहून काकांनीं त्याचें नांव धर्मपाल असें ठेविलें. त्या मुलास दूध पाजणें, जेऊं घालणें, त्याचें अंगडें टोपडें करणें वगैरे सर्व गोष्टी बहुतेक सौमिनीच करीत असे. भामिनीलाही तो धर्मपाल आवडत नसे असें नाहीं. परंतु, स्वतःस पुत्रैश्वर्याची दुर्मिळता झाली असल्याच्या योगानेंच आपल्यावर हा परपुत्रस्वीकारण्याचा प्रसंग ओढवला या जाणिवीनें भामिनीच्या मनांतील स्नेहरसाच्या शुद्धपणांत नैराश्यताजनित औदासीन्याची कालवाकालव झाली होती. या कारणानें भामिनी धर्मपालाच्या तैनातीबद्दल थोडीशी चालढकल करी इतकेंच कायतें.

शुक्लपक्षांतील चंद्राप्रमाणें हा धर्मपाळ हलके हलके मोठा व्हावयास लागला. त्याचें पांचवें वर्ष संपून त्याला साहावें वर्ष लागलें, तेव्हां काकांच्या मनांत प्रेमापेक्षां चिंतेचेंच प्राबल्य जास्त झालें. आणखी वर्ष दोनवर्षें गेलीं ह्मणजे धर्मपालाचा व्रतबंध करावयास पाहिजे. परंतु, त्याच्या जातीबद्दलचा उलगडा करण्यास कांहीं मार्ग नसल्यानें काकासाहेब भलत्याच

फिकिरींत पडले. अशा प्रकारच्या अवस्थेंत पडलेल्या मुलाची जात कोणती धरावी याचा शास्त्रार्थ ठरवून घेण्याकरितां काकांनीं तज्ञ विद्वानांची मसलत घेतली. पण, सयुक्ततेच्या दृष्टीनें कोणीही शास्त्रज्ञ कायम असा कांहींच निकाल सांगेना आणि केवळ शास्त्रसारांशावर सांगितलेला निकाल काकांच्या मनास पटेना. अशा प्रकारचा हा गुंतागुंतीचा प्रश्न उपस्थित झाला असतांना जें कोडें शास्त्रास अवघड भासलें, जें युक्तीस भानगडीचें दिसलें, विद्वत्तेस अचिंत्य वाटलें तें कोडें धर्मपालाच्या गळ्यांत बालपणापासून असलेल्या एका निर्जीव अशा रुप्याच्या ताइतानें उकलून दाखविलें.

एके दिवशीं सुप्रभातीं स्नानसंध्या, देवपूजा उरकून काकासाहेब लडिवाळपणानें धर्मपालाबरोबर कांहीं पोरखेळ खेळत बसले असतां धर्मपालाच्या गळ्यांतील ताईत काकांच्या जानव्यांत अडकला. ताईत निघण्याकरितां धर्मपाल बालिशपणानें हिसकाहिसक करावयास लागला. तेव्हां त्याच्या हिसड्यानें आपलें यज्ञोपवीत तुटेल असें वाटून काकांनीं त्याला दाबून धरिलें आणि जानव्याचे तिढे सोडण्यास सोपें जावें म्हणून त्याची निवीती करून काका तो गुंता काढावयास लागले. काकांनीं ज्या पदरास जरा हिसका दिला तो पदर ताइताच्या एका टोकाच्या आंतल्या अंगास शिरला होता. काकांच्या ओढाओढीनें जानव्याचा पदर तुटावा किंवा तो तसाच सुरक्षित सुटावा; पण तसें न होता त्या जोरानें पदराबरोबर त्या तायताचेंच एक टोपण उपसून खालीं पडलें. तें टोपण एका हातांत उचलून घेऊन काका ताइताकडे एक डोळा किंचित् मिटून पाहतात तों त्यांत कांहीं भरलेलें असावें असें त्यांना वाटलें. दाभण, सुई वगैरे टोंकदार वस्तूंनीं ताईतांतील जिन्नस उकरून काढावा तर तो जिन्नस घायाळ होईल; खेरीज मोडका ताईत पुन्हा सगळा नीट केलाच पाहिजे. अशा विचारानें काकांनीं त्या पोराच्या गळ्यांतून ताईत काढला आणि कांहीं हत्यारानें तो उकलून पाहिला. त्या तायतांत कागदाची एक गुंडाळी सांपडली. या गुंडाळींत कांहीं अंगाराबिंगारा असेल अशी कल्पना करीत त्यांनीं ती गुंडाळी उलगडली तों त्यांत कांहींएक भरलेलें नसून त्या कागदावर अशीं अक्षरें लिहिलेलीं

काकांच्या दृष्टीस पडलीं:— " हा पोर जातीचा शुद्ध ब्राह्मण आहे. " हीं अक्षरें वाचून काकांच्या मनाला कितीतरी आनंद वाटला असेल बरें ? मृत्यूच्या दारांत पडलेल्या रोग्याच्या तोंडांत ऐनवेळीं अमृतबिंदु पडावा किंवा भुकेनें व्याकुळ झालेल्या क्षुधितापुढें क्षीराब्धीनें अकस्मात येऊन उभें रहावें ह्मणजे त्यांना जो संतोष वाटेल त्याप्रमाचणें त्या चिठ्ठींतील अक्षरें वाचतांच काकांचें अंतःकरण प्रमोदरसानें भरून राहिलें. त्यांना एकप्रकारची आंतल्याआंत उमेद चढली. लागलीच त्यांनीं तो मजकूर सौमिनी व भामिनी यांना कळविला. त्यांनाहीं याबद्दल अत्यंत समाधान वाटलें. काकासाहेब वरचेवर ती चिठ्ठी उघडून पुन्हा पुन्हा तीं अक्षरें वाचीत आणि तिची घडी करतां करतां वात्सल्ययुक्त नजरेनें धर्मपालाच्या मुखाकडे अवलोकन करीत. असा कांहीं काळ घालवून काका आपल्या घरांतून बाहेर गेले आणि त्यांनीं कांहीं विद्वान, कांहीं भिक्षुक, कांहीं शास्त्री व कांहीं ओळखींतले सभ्य लोक यांना त्याच दिवशीं भोजनास येण्याचें निमंत्रण दिलें. घरीं परत आल्यावर त्यांनीं तो मजकूर घरांत कळविला. दुपारीं सर्व मंडळींचा भोजनसमारंभ उरकून पानसुपारी चालली असतां काकांनीं ती चिठ्ठी सर्वांना दाखवून त्या ताईताची सर्व हकीगत त्यांना निवेदन केली. तो वृत्तांत ऐकून जेवणास आलेल्या सर्व मंडळींना मोठें आश्चर्य वाटलें. ताईतांत तशा मजकुराची चिठ्ठी घालून ठेवणाऱ्या मनुष्याच्या धोरणाची कोणी कोणी तारीफ करूं लागले. त्या दिवसांतील अनावृष्टीच्या योगानें झालेल्या महर्गतेमुळें अन्नास मोताद होऊनच धर्मपालाचा कोणी निराधार अबलेनें त्याग केला असावा असेंही कोणी कोणी उद्गार काढूं लागले. कांहींजण धर्मपालाच्या संरक्षणाद्दल काकासाहेबांची स्तुति करूं लागले. अशाप्रकारें भाषणें चाललीं असतां काकांनीं धर्मपालाचा व्रतबंध लवकरच करण्याविषयींचा आपला विचार बाहेर बोलून दाखविला. तो सर्वांस पसंत होऊन धर्मपालास सातवें वर्ष लागतांच काकांनीं मौंजीबंधनाचा समारंभ पारही पाडला. धर्मपालाविषयीं काकांच्या मनांत वसत असलेलें पुत्र प्रेम, त्याच्या प्रीत्यर्थ होत असलेला खर्च, त्याच्या विद्येविषयींची कळकळ, त्याच्या दागदागीन्यांची व कपड्यालत्यांची

होत असलेली संजागणा हीं पाहून गांवांतील लोकांना काकासाहेब धर्मपालास ओटच्यांत घेऊन आपल्या जिनगीचा वारस करणार असें निश्चितपणें वाटावयास लागलें आणि अखेर लोकांचा तो तर्क खरा ठरला.

---

# प्रकरण ३ रें.

धर्मपालास द्विजत्व प्राप्त झाल्यानंतर काकासाहेबांनीं त्यास ब्राह्मणाचा सर्व नित्यविधि पढविला. धर्मपालास शिक्षण कोणत्याप्रकारचें द्यावें, त्याला गृहस्थ करून तो मोठा हुद्देदार होईल अशातऱ्हेनें त्याचा अभ्यासक्रम चालवावा किंवा त्याला वैदिकविद्यामृत पाजून घनापाठी पंडित बनवावा याबिषयीं विचार करून काकांनीं आपल्या मनाशीं असें ठरविलें कीं, विद्यमानकाळीं प्रचलित असलेली विद्या अवगत असणें अवश्य आहे ह्मणून व पौराणिक ज्ञान प्राप्त करून घेणें श्रेयस्कर आहे एतदर्थ धर्मपालाला दोन्ही प्रकारचें शिक्षण देणें इष्ट आहे. हा दुहेरी मतलब शाळांमधून पाठवून साधावयाचा नाहीं. अशा समजुतीनें काकासाहेबांनीं स्वतः घरच्या घरीं आपणच शिक्षक होऊन धर्मपालास आपला विद्यार्थी बनविलें.

काकासाहेब त्याला ज्या गोष्टी समजावून सांगीत त्यांचें त्वरित आकलन करण्यांत धर्मपालाच्या बुद्धीचें जें वैलक्षण्य दिसलें तें ध्यानांत घेऊन काका त्याच्यावर फारच प्रसन्न होत. काका आपल्या माहितीप्रमाणें पोथ्यापुराणांतील, इतिहासांतील व इतरही दंतकथांतील कांहीं वेचक कथानकें त्याला तोंडानेंच सांगीत आणि लागलीच धर्मपाल त्याचा सारांश आपल्या मुखानें वदत असे. त्यामुळें त्याच्या कुशाग्र बुद्धीचें काकांना जास्तच कौतुक वाटे.

अशा तऱ्हेचा क्रम सुरू होऊन बरींच वर्षें लोटलीं. काकांच्या जवळील ज्ञानाची पुंजी संपली तेव्हां धर्मपाळास कोणा तरी दुसऱ्या गुरूच्या ताब्यांत द्यावें असा विचार काकांच्या मनांत घोळूं लागला. पण तो सिद्धीस जाण्याच्या मार्गांत एक नसतीच अडचण उद्भवली. पूर्वजन्मीं

जेवढी विद्या दिली असेल तेवढीच पुढील जन्मीं प्राप्त व्हावयाची हा सिद्धांत सार्थ करण्याकरितांच कीं काय कोण जाणें काकांच्या शरीरप्रकृतींत कांहीं जबरदस्त दोष उत्पन्न होऊन ते आंथरूण धरून बसले. स्वतःचेंच स्वास्थ्य मोडल्यानंतर काकांचें लक्ष्य अन्य व्यवस्थेकडे कितपत लागणार ? त्यांना आपल्या तब्बेतीखेरीज कांहीं सुचेनासें झालें आणि धर्मपालाचा अभ्यासक्रम तितकाच थांबला.

यावेळीं धर्मपालास तेरावें वर्ष लागलें होतें. काका आपल्या दोन्ही स्त्रियांसह धर्मपालावर जी ममता शब्दांनीं व कृतीनें दाखवीत त्यामुळें धर्मपालासही भामिनी, सौमिनी व काका हे आपले आईबाप आहेत याबद्दल शंका येण्याचें कारणच नव्हतें. तोही तेवढ्याशा अल्लड वयांत देखील त्यांच्याशीं खऱ्या पुत्रधर्मानेंच वागे. काकांच्या आजारपणांत तो त्यांची यथास्थित शुश्रूषा करी व अक्षय्य त्यांच्या शय्येसन्निध हुषारीनें बसलेला असे.

पुष्कळ औषधोपचार केले तरी काकांच्या व्याधींत मागचें पाऊल ह्मणून पडेना. पाऊणशेंच्या जवळ येऊन पोंचलेलें वय; ह्मातारपणचें दुखणें; तेव्हां आतां आपला मोठासा भरंवसा नाहीं असें वाटून काकांना काळजी उत्पन्न झाली. पितृऋणांतून मुक्त होण्याकरितां, श्राद्धादि कर्में करून पितरांना खुष करण्याकरितां, आपल्याला मोक्षाचें द्वार खुलें राहण्याकरितां व आपल्या वंशाची पुढें वृद्धी होण्याकरितां अवश्य असलेल्या कुलदीपकाच्या ठिकाणीं आतां धर्मपालास शास्त्राज्ञेप्रमाणें स्थापून आपल्या डोळयादेखत त्याचा विवाह करून टाकावा असा विचार काकांनीं स्वतःशीं ठरवून टाकला.

काकांबरोबर गप्पागोष्टी करण्यास जी चार चौघं मंडळी नित्य येण्याचा परिपाठ असे त्यांत आबाजीनाईक या नांवाचा एक गृहस्थ असे. हे नाईक चांगलें कुलशील संपन्न होतें; परंतु, स्थितीनें दरिद्री होते. कांहीं तरी शारीरिक मेहनत करून ते आपल्या कुटुंबाची कशीतरी गुजराण करीत. या नाईकांचा स्वभाव मात्र मोठा आनंदी असे. दुसऱ्या दिवसाचे तांदुळ घरांत नसले तरी नाइकांच्या चेहऱ्यावर हिरमुसेपणाची छाया देखील दिसावयाची नाहीं. तो काकांच्याकडे हरहमेष येई व काका

त्याची घरगुती स्थिती ओळखून हस्तें परहस्तें त्यास बराच हातभार लावीत; या कारणामुळें त्याचा काकांशीं विशेष परिचय होता. आपण केलेल्या उपकाराबद्दल काका स्वमुखानें कधीं उच्चारही काढीत नसत. तरी स्वतःच्या कृतज्ञतेच्या योगानेंच आबाजीनाईक आपणाला मिंधे समजून काकांचा कोणताही शब्द कधीं खालीं पडूं देत नसत.

या आबाजी नाईकास आठ नऊवर्षांची अशी एक कन्या होती. तिचें नांव सुनीति असें होतें. ही मुलगी धर्मपालास करून घ्यावी अशी योजना करून काकांनीं नाईकाजवळ शब्द टाकला. धर्मपालास काका पुत्राप्रमाणें लेखतात तरी अद्याप तो यथाशास्त्र व यथान्याय त्यांचा पुत्र झाला नाहीं ही गोष्ट नाईक जाणत होते. तेव्हां धर्मपालास काका मांडीवर घेऊन आपला वारस बनवितील तर आपण सुनीती धर्मपालास देण्यास मनापासून खुषी आहों असें नाइकांनीं सांगितलें. नाइकांचें ह्मणणें योग्य आहे असें वाटून काकांनीं धर्मपालास ओट्यांत घेतले. काकांची प्रकृति बरीच नादुरस्त असल्यामुळें दत्तविधानाच्या समारंभाचा फारसा पुकारा न करितां दोन तीन शास्त्री व एक दोन याज्ञिककर्मी लोक बोलावून आणून आबाजीनाइकासमक्ष शास्त्रोक्त विधीनें काकांनीं धर्मपालाच्या मुखांत शर्करा घातली.

हा दत्तविधानाचा प्रकार पाहून धर्मपालास थोडेसें वाईटच वाटलें. काका व भामिनी हे आपले आईबाप झाले त्यावरून त्यापूर्वी तें आपले आईबाप नव्हते असें ध्यानांत येऊन त्याचा थोडासा चित्तक्षोभच झाला. आपले जननीजनक कोण व त्यांची वाट काय हें समजून घेण्याबद्दल धर्मपालास हुरहुर लागून राहिली. आपली जिज्ञासा तृप्त करण्याकरितां त्यानें त्यासंबंधाचा सर्व खुलासा एकांतामध्यें सौमिनीस विचारला. सौमिनीनें त्याला त्याचें त्या वेळेपर्यंतचें सर्व जन्मादारभ्य चरित्र सांगितलें. सौमिनीच्या तोंडून आपलें वृत्त समजल्यावर त्याला बरेंच समाधान वाटलें. वास्तविक पाहतां आपल्या मातापितरांचा गूढपणा समजल्यावर त्यांचा थांग लावण्याचा विचार मनांत उचंबळून जाऊन अष्टावक्राप्रमाणें धर्मपालानें अस्वस्थ होऊन पित्याच्या शोधास लागावयास पाहिजे होतें. परंतु, त्यांचा कांहींच सुगावा माहीत नसल्यानें, किंवा ते जिवंत

असतील असा भरंवसाही नसल्यामुळें तो अगदीं स्वस्थ राहिला. आईबाप व मुलेंबाळें यांच्या परस्पर संबंधानुसार एकमेकांच्या मनांत स्वभावतःच आपत्यप्रेम आणि पितृवात्सल्य हीं वास्तव्य करीत असणें सृष्टिधर्मानुसार वाजवी आहे. परंतु, कोणत्याही प्रकारचें प्रेम सहवासजन्य असल्याकारणानें धर्मपालाच्या अंतःकरणांत जन्मदात्या आईबापाबद्दल निःसीम जिव्हाळा असणें दुरापास्तच होतें. दीड वर्षाच्या वयापासून ज्यांचा लळा लागलेला होता त्यांच्या प्रत्यक्ष सहवासांत आणि मात्र-पित्रतुल्य संगोपनांत धर्मपालाचा तो विचार तितकाच थांबून तो पूर्ववत् स्वस्थ चित्तानें आपल्या मालकीच्या गृहांत काल क्रमीत राहिला.

आबाजीनाईकांच्या अटीप्रमाणें धर्मपाल काकांचा पुत्र झाल्यानंतर सुनीतीचा धर्मपालाशीं विवाह झाला. नाईकांची गरिबी असल्यामुळें लग्नाचा दोहींकडला बहुतेक खर्च काकांनींच केला. काकांची शरीरप्रकृति नादुरुस्त होती, तरी त्यांतल्यात्यांत शक्य ती हौस पुरविण्यांत काकांनीं कांहींएक कसूर होऊं दिली नाहीं.

धर्मपाल व सुनीति हा जोडा एकमेकाला अगदीं साजेसा होता. विवाह-कालीं धर्मपालाचें वय तेरा वर्षांचें असून सुनीतीचें वय आठ नऊ वर्षांचें होतें. दोघेही रंगानें गोरे आणि नाकाडोळ्यानें ठसउशीत होते. एव-ढ्याशा वयांत धर्मपालानें विद्या शिकतांना जसें बुद्धिचातुर्य दाखविलें त्याप्रमाणेंच सुनीतीनेंही किरकोळ घरकृत्यें करण्यांतच कां होईना पण फार हुशारी दाखविली. ती मोठी चणचणीत पोरगी होती. पोरवयांत आईबापांच्या मांडीवर लोळून चैनींत बेगुमानपणानें दिवस घालविण्याच्या काळांत सासरी जाऊन राहण्याचा प्रसंग आला तरी ती आबाजीनाइकाची चिमु-कली कन्या सासरीं वावरत असतांना नेहमीं उल्हासीत, आनंदी आणि समाधानी दिसे. पुत्राच्या जागीं स्वीकारलेला धर्मपाल आणि स्नुषेच्या ठायीं स्वीकारलेली कन्यका सूनीती यांच्याकडे पाहून काकासाहेबास परम संतोष वाटे. परंतु, या संतोषाचा उपभोग फार दिवस घेणें काकांच्या नशीबीं नव्हतें. त्यांना जडलेला कफाचा विकार असाध्य झाला आणि लग्न झाल्यानंतर सरासरी एक वर्षांतच काकांनीं आपली इहलोकची यात्रा संपविली.

---

# प्रकरण ४ थें.

ज्ञानवान आणि त्रिकालज्ञ अशा महाजनांनीं शक्य तेवढ्या सरळ व सुलभ रीतीनें सृष्टीची उत्पत्ति, स्थिति आणि लय या विषयींच्या सिद्धांतांचें स्पष्टीकरण करण्याची पराकाष्ठा करून ठेविली आहे तरी, ज्यांचें रहस्य समजण्याला मनुष्याच्या कल्पनेची गति कुंठीतच होते त्यांच्या सत्यासत्यतेबद्दल शंकाकुशंका घेत न बसतां पंडितवरांच्या वेदांतपर मतांचा निष्कर्ष काढला असतां मनुष्याला काय किंवा अन्य प्राण्याला काय मरणानंतर कोणतीतरी एक अवस्था प्राप्त होत असली पाहिजे असें कबूल करणें भाग पडतें. इहलोकीं धारण केलेला नाशवंत देह पंचत्व पावल्यानंतर प्राण्याच्या अविनाशी तत्वास प्राप्त होणारी अवस्था कोणत्याही प्रकारची असली तरी तिच्यांतील सुखदुःखाचा विशेषसा संबंध मागें जिवंत असलेल्या माणसांच्या बऱ्यावाइटाशीं जडवितां येत नाहीं. असें असून एकाच्या मृत्यूबद्दल त्याचें इष्टमित्र, स्नेहीसोबती, आप्तवर्ग शोक करितांना दृष्टीस पडतात याचें कारण परलोकवासी मनुष्याची दुःखदावस्था हें नव्हे. जो तो मनुष्य दुसऱ्याच्या प्राणहानीबद्दल जो विलाप करितो असें आपणास वाटतें तो वस्तुतः त्याच्या स्वतःबद्दलच असतो. काकासाहेबांना वार्धक्य प्राप्त होऊन त्यांच्या अंगावर कृतांताच्या पांढऱ्या शुभ्र निशाणाची छाया झळकूं लागल्यानंतर कालानें त्यांच्यावर झडप घातली यांत फारसें वावगें कांहीं झालें नाहीं; तरीपण त्यांच्या हानीबद्दल घरांतील सर्व लहान थोरास अत्यंत वाईट वाटलें. वास्तविक पाहतां काकांच्या मृत्यूनें त्यांचें जगांतील अस्तित्व नष्ट होण्यापलीकडे अन्य कांहीं घडलें नाहीं. त्यांनीं आपल्याबरोबर घरांतील कोणतीही वस्तु नेली नाहीं. ते जसें उघडें आले तसेच चालते झाले. परंतु, त्यांच्या अस्तित्वामुळें जो निःकाळजीपणा वास्तव्य करीत होता त्याचा अंत होऊन जी एक नवीन जबाबदारी अंगावर येऊन पडली, जो पाठिंबा नाहींसा झाला, जो आधार तुटला, ज्या प्रेमाचा लय झाला त्याबद्दल खंत वाटून भामिनी

सौमिनी, धर्मपाल व सुनीति या सर्वांच्या अंतःकरणास कमीजास्त प्रमाणानें बरीच तळमळ लागली.

धर्मपालाचा विद्याभ्यास बेताबाताचाच झाला होता. एखाद्याच्या पदरीं राहून चाकरी करावी तर कामाकाजाची त्याला विशेष माहिती नव्हती. काकांनीं कमावून ठेवलेल्या मिळकतीवरच खर्च भागवावा तर सांठविलेली पुंजी संपून गेल्यावर पुढें पंचाईत पडेल अशा समजुतीनें भामिनी आपल्या ताब्यांतील दागदागिना धर्मपालाच्या स्वाधीन करण्यास नाखुष होती. कोणाचें कर्ज काढून स्वतःच्या उमेदीवरच दोन पैसे मिळविण्याचा उद्योग करावा तर एवढ्याशा पोरास कर्जाऊ पैसे देतो कोण ? अंगावर सर्व प्रपंचभार तर येऊन पडलेला ! अशा प्रकारचा पेंच येऊन पडला असतांना धर्मपाल अगदीं गांगरून गेला. काकांच्या उत्पन्नांतून येणारा पैका भामिनीच्या हातांत पडे. भामिनी जर उत्तम स्वभावाची असती तर काकांच्या पश्चात धर्मपालास पोट भरण्याची फारशी अडचण पडली नसती. काकांचा जीवात्मा होता तोंपावेतों भामिनीचें खरें स्वरूप कोणाच्या निदर्शनास आलें नाहीं. काकांच्या हयातींत घरामध्यें त्यांचा सर्वत्र दरारा असे; त्या कारणानें भामिनीचें त्यांच्यापुढें कांहीं चालत नसे. काकांचा वचक होता तोंपावेतों भामिनीचें अंतरंग दडून राहिलें होतें. परंतु, काकांच्या मृत्यूमुळें आतां सर्व अधिकार भामिनीच्या हातांत आल्यानें तिचें सत्य स्वरूप बाहेर पडलें. वरून वरून पाहिलें असतां वृंदावन ज्याप्रमाणें दृष्टीला मोहक व मधुर भासतें त्याप्रमाणें प्रसंग येईपर्यंत बाह्यांगीं नम्र व सद्गुणी दिसणाऱ्या भामिनीच्या अंतःकरणांत काळकूट भरून ठेविलेलें आहे असें अनुभवांतीं प्रत्ययास आलें. तिच्या मनांत विपरीत भावना उत्पन्न होऊन ती धर्मपाल व सुनीति यांचा दुःस्वास करूं लागली. सुनीतिसारख्या शहाण्या व चणचणीत मुलीला कनवाळूपणानें वागवून सासूसुनेच्या प्रेमाची वाढ करण्याचें सोडून देऊन तिनें त्या अज्ञान पोरीस गांजण्याचा क्रम सुरू केला. सुनीतीच्या माहेरच्या दरिद्रतेबद्दल तिला वरचेवर टोचून बोलावें; तिच्या भिकारड्या वडिलांच्या नांवाचा नेहमीं उद्धार करावा; तिला वरचेवर शिव्या द्याव्या; अभद्र भाषणें घालून पाडून बोलावीं; तिला पोटभर खावयासच देऊं

नये; तिच्यावर चोरून खाल्ल्याचे आळच घ्यावेत आणि प्रसंगोपात तिचे गालही खुडावे. अशाप्रकारें त्या अधिकारारूढ भामिनीनें सुनीतीला अगदीं चरकी धरिलें. सुनीती पोरवयी होती तरी ती अल्पबुद्धि मात्र नव्हती. सासुबाईच्या बोलण्यांतील भावार्थ तिच्या ध्यानांत चट्कन् येत असे. पण मुळूमुळूं रडून स्वतःचेच नेत्र लाल करून घेण्यापलीकडे ती काय करणार? एखाद्या दिवशीं भामिनीनें शिव्यांची अगदीं घनवृष्टी केली ह्मणजे ती बिचारी पोर आपल्याशींच घुमारा घालून उपाशी बसे. पूर्व वयांत क्षुधा काय अगदीं प्रज्वलीत असावयाची असें जाणून सौमिनी सुनीतीची कशी तरी समजूत घालून ती चार घास खाईल असें करी.

घरांतील हा सर्व प्रकार धर्मपालाच्या ध्यानांत येत असे. परंतु, तो त्यांत एक चकार शब्दही बोलत नसे. घरांतील प्रापंचीक गोष्टी फार नाजुक असतात; त्यांतून आपण अद्यापपर्यंत घातलेल्या अन्नाचें आणि सांगितल्या कामाचें; अशांत बायकोच्या कैवारार्थ आपण कांहीं भाषण केलें तर तेवढेंच निमित्त होईल अशा पोक्त समजुतीनें धर्मपाल सर्व गोष्टी नुसत्या साक्षीरूपानें अवलोकन करीत असे.

कुलीन स्त्रीच्या सुखदुःखाचें स्थान ह्मटलें ह्मणजे काय तो तिचा एक पती. पतीजवळच कायते स्त्रीनें आपलें सर्व हृदय उकलावयाचें. परंतु, ही गोष्ट प्रौढ व जाणत्या जोडप्यास लागू ? शास्त्रविहित संस्कारांनीं आपला विवाह झाला त्यावरून आपलें परस्परांचें नातें काय हें लौकीकांतील तसल्याच अन्य व्यवहारावरून जाणण्यावांचून दंपत्यसंबंधाचा लवलेशही ज्या स्थितींत समजणार नाहीं अशा स्थितींत असलेली सुनीति आपल्या भ्रताराजवळ गाऱ्हाणें काय सांगणार ? आणि तशा अवस्थेंत धर्मपाल आपण होऊन तरी आपल्या धर्मपत्नीच्या दुःखाची दाद काय घेणार ? अजाणपणीं लग्न झालेल्या कन्यकेला सासरच्या माणसांनीं जीवकींप्राण करून वागविलें तरी देखील जोंपर्यंत पतिगृहाबद्दल अभिमान उत्पन्न झाला नाहीं तोंपर्यंत विवाहीत अल्लड मुलींचा सर्व ओढा माहेरच्या माणसांकडेच असावयाचा. आपल्या सासुरवासाबद्दलची सर्व तकरार माहेरीं कळवावी तर त्या धोरणी भामिनीनें सुनीतीस माहेरीं धाडण्याचें

मुळींच बंद केलें होतें. पोरीला माहेरपणास पाठवीत नाहींत त्याबद्दल उगीच वाद माजवीत न बसतां आबाजीनाईक पडतापक्ष घेऊन आपणच लेकीच्या घरीं मधून मधून येत किंवा तिच्या आईस कधीं कधीं विहिणीच्या भेटीस पाठवून लेकीची भेट करवीत.

सासरच्या घरीं आईची किंवा बापाची भेट झाली ह्मणजे सुनीतीस थोडीशी उमेद वाटे; पण त्यांच्याबरोबर सुखदुःखाच्या गोष्टी बोलण्याची मात्र तिला बिलकूल सवड सांपडत नसे. कारण, माहेरचें कोणीही मनुष्य आलें तरी भामिनी आपली त्या ठिकाणीं हजर असावयाचीच. असा प्रकार चालूं असतांना सुनीतिबद्दल थोडीतरी कळकळ व्यक्त करून तिला पोटाशीं धरून तिचें सांत्वन करणारा एका सौमिनीवांचून अन्य कोणताही प्राणी समर्थ नव्हता. सौमिनी तिच्याशीं मृदुपणानें बोले, तिच्याबद्दल दिलगिरी दाखवी, तिला धीर देई आणि आपल्याकडून होईल तेवढ्यारीतीनें तिची जपणूक करी; यामुळें सुनीतीला सौमिनीच आपली मायबहीण आहेसें वाटे.

भामिनीनें आपल्या पत्नीचे धिंडवडे चालविले आहेत असें धर्मपाल आपल्या डोळ्यांनीं रोजच्यारोज पाहात होता तरी त्याबद्दल सुनीति अगदीं निरपराध आहे असें जाणून तो स्वतःचें समाधान करून घेत असे. पण हें समाधान फार दिवस टिकलें नाहीं. तो मनांतल्या मनांत अत्यंत कष्टी होऊन खंगत चालला. उमेदवारीच्या वयांत खाऊन पिऊन गलेलठ्ठ असावयाचे; पण बालपणांतच चिंतेनें पाठपुरावा केल्यामुळें एखाद्या झाडाप्रमाणें धर्मपालाचा शरीरवृक्ष भिरडत चालला. आपण अद्याप एका कवडीचीही कमाई करीत नाहीं; आपले जन्मदाते कोण याचा पत्ता नाहीं; कोणी हाताशीं धरील अशा कोणा दयावंताचा आसरा नाहीं; आपण स्वतः व आपली बायको यांच्याबद्दलची तूषित लागतें ह्मणून भामिनीचीं उणीं उत्तरें व बोचक शब्द नेहमीं सहन करावयाचे; बायकोच्या माहेरच्या मंडळीकडे आशेनें दृष्टि फेकावी तर श्वशुरांच्या घरांत अठराविश्वे दारिद्र्य शिरलेलें; अशा प्रकारच्या विचारांनीं धर्मपालाचें अंतःकरण व्यापून टाकिलें. समवयस्क स्नेहीसोबत्यांत मिसळावयाचें देखील त्यानें सोडून दिलें. तो प्रहराच्या प्रहर

एकांतात बसून काढी. आपण आपलें व आपल्या कुटुंबाचें पोट भरण्यास देखील असमर्थ आहों याबद्दल वैषम्य वाटून तो स्वतःवरच क्रुद्ध होई आणि ज्यानें करुणायुक्त होऊन धर्मबुद्धीनें आपणास घरीं आणलें ह्मणूनच आपण आतांपर्यंत जिवंत राहिलों त्या काकासाहेबांची मूर्ती डोळ्यापुढें आणून तो एखाद्या विगतधवा अबलेप्रमाणें अश्रुपात करून भूलिंगावर आसुवांचा एकसारखा अभिषेक चालवी. दुःखवेगानें अंतःकरण भरून जाऊन हृदयांत कडकडून उद्भवलेला उद्वेगाचा उपशम अश्रुपातानें झाल्यानंतर तो अगदीं मलुल होई आणि जोंपावेतों प्रत्येक गोष्टींत आपल्याला भामिनीवर अवलंबून राहणें प्राप्त आहे तोंपावेतों आपल्या दत्तक मातेनें आपल्याला व आपल्या बायकोला आगीच्या लोळांत लोटलें तरी सर्वार्थसाधन जें मौन त्याचेंच अवलंबन करून सर्व व्याप सोसावयाचे असा निश्चय ठरवून तो एकांताचा त्याग करीत असे.

---

# प्रकरण ५ वें.

मनुष्याचें शरीर हें अन्नमय आहे. मेलेलें अन्नच कां होईना, पण तें निःकाळजीपणानें पोटांत जाईल तर मनुष्य फार तर कोडगा होईल. परंतु, शरीरपोषणास अवश्य असलेल्या अन्नरसानें देह धष्टपुष्ट राहण्यास अडचण पडणार नाहीं. कोटगेपणाची शरम आणि मानसिक काळजी यांचें मात्र तशा स्थितींतील मनुष्याच्या ठिकाणीं वास्तव्य कामाचें नाहीं. अंतर्व्यथेनें मनुष्याचें मन झुरत असेल तर सत्वस्थ अन्न खाऊनही तें अंगीं लागावयाचें नाहीं. उत्तम प्रकारचा चारा घालून वाघापुढें बांधलेल्या बकऱ्याप्रमाणेंच मनस्तापानें भाजणाऱ्या माणसाची अवस्था व्हावयाची. धर्मपालास तर दुहेरी मारा सहन करावा लागत होता. त्याला सात्विक अन्नही पुरेसें मिळत नसे आणि मानसिक चिंतेनें तर त्याला घेरून टाकलें होते. अशा प्रकारच्या या दुहेरी हल्ल्यानें आपण अगदीं खंगत चाललों असें त्याच्या ध्यानांत येऊन तो स्वतःच्या अस्तित्वाबद्दल देखील निराश होऊं लागला. धर्मपालाची ही सर्व स्थिती सौमिनीच्या लक्षांत आली. सहज बोलतां बोलतां

ओघाओघानें भामिनीजवळ हा विषय काढावा आणि तिच्या मनांत आपत्यप्रेमाची जागृति करून तिला धर्मपालाबद्दल कांहीं कींव आली तर पहावी अशा समजुतीनें सौमिनी एके दिवशीं भामिनीस ह्मणाली " खरें तें खरें आणि खोटें तें खोटें. आगीशिवाय कड नाहीं आणि मायेशिवाय रड नाहीं. काकांच्यासारखा अपवादक असा पुरुष एखादाच सांपडावयाचा " या भाषणाचा भामिनीवर भलताच परिणाम झाला. सौमिनीचा झोक ओळखून भामिनी जरा तुसडेपणानेंच बोलली " तुमचा रोख काय आहे तो मीं ओळखला. तुमच्या मनांत मी आपल्या जवळचें आहे नाहीं तें धर्मपालाच्या हवाली करावें आणि मोकळें व्हावें. तुह्मी धर्मपालाचा कैवार घेऊन बोलतां हें मला समजतें. ह्मणे असा पुरुष एखादाच सांपडावयाचा. अहो; पुरुषांची गोष्ट वेगळी आणखी बायकांची वेगळी. ब्रह्मज्ञान सांगायला सगळयांना येतें; पण गळपाशीं येऊन ठेपलें ह्मणजे सगळें नामानिराळें राहतात. उद्या पोरानें मला लाथा मारून बाहेर हाकलून दिलें ह्मणजे मग पोळपाट लाटणें सुधारण्यावांचून सोय आहे कां कांहीं मला ? सौमिनीबाई ! हातचें टाकून दुसऱ्याच्या कबजांत जाणारी मी बायको नव्हें बरें. "

भामिनीचा असा हा टाकेतोडीचा जबाब ऐकून सौमिनी अशांत न होता सरळपणानें सांगू लागली " तुह्मी ह्मणता तें खरें; पण तुह्मी धर्मपालास जाणत नाहीं. त्याच्याविषयीं तुह्मी भलतीच कल्पना धरीत आहां. माता आणि पुत्र यांच्या बाबतींत पुत्राच्या मातृप्रेमापेक्षां मातेच्या पुत्रप्रेमाला अधिक किंमत देतात. परंतु; धर्मपालाची गोष्ट तशी नाहीं. त्याला बालपणापासून आपलाच लळा असल्यानें तो तुह्माला सख्या आईहून रतिमात्र देखील कमी समजत नाहीं. आणखी मी ह्मणतें तुह्माला तरी दुसरीं कोण पोरेंबाळें आहेत ? "

सौमिनीच्या बोलण्यानें जास्तच रागावून भामिनी ह्मणाली " आह्माला पोरेंबाळें असतीं तर हें दुसऱ्याचें घरीं आणण्याचें कारणच नव्हतें. धर्मपाल मला अगदीं खऱ्या आईप्रमाणें मानतो यांत त्याचा माझ्यावर लोभ आहे असें कां तुह्मी समजतां ? तसें नाहीं बरें. अहो, हा सारा माझ्या द्रव्यावरचा लोभ. ' असतील शितें तर मिळ-

तील भुतें. ' तुह्माला आतां तो डोळ्यांत घातला तरी खुपायाचा नाहीं असा वाटतो. पण बायको जरा मोठी होऊन नवऱ्याशीं गुलगुल गोष्टी करायला लागली ह्मणजे मग समजेल त्याचें खरें स्वरूप काय आहे तें ? तेव्हां आपलें आधीपासूनच सावध असावें यांत शहाणपणा नाहीं कां ? "

भामिनीच्या मनांत जवळच्या पैक्याखेरीज अन्य कांहीं विचार बलवत्तर नाहींसें ताडून सौमिनी स्पष्टपणानें ह्मणाली " तुह्मी आगाऊ इतकी खबरदारी घ्यायला धर्मपाल कांहीं आतां कोणी चोर नाहीं. तो धरून आणलेला असला तरी जाहीररीतीनें व शास्त्राच्या संमतीनें तुमचा मुलगा झाला आहे. काकासाहेबांच्या मालमत्तेवर तुमच्यापेक्षां त्याचा हक्क काकणभर जास्तच आहे. मग तुह्मी माझा पैका, माझें द्रव्य असा अभिमान काय आधारावर भोगता. द्रव्याची कमाई काकांखेरीज कोणींच केलेली नाहीं. "

सौमिनीच्या तोंडून हे वरील शब्द जरा वेगळया धोरणाचे निघालेले ऐकताच भामिनी अधिकच खवळली आणि थोड्या क्रोधानें बोलली "यांत तुह्मी जास्त काय सांगता ? पैसे मिळवावयाला बायका कां नाहींतर कोठें जात असतात ? द्रव्यसंपादन पुरुषांनींच करावयाचे. माझ्याजवळची चीजवस्त घरांतच मिळविलेली असली तरी ती धर्मपालाच्या पदरांत टाकण्याबद्दल मात्र मरतांना मला हुकूम नाहीं देऊन ठेवला. मीच चुकते आहे; तुह्मां सर्वांचीं ताटें मीं निमूटपणें सजीवतें हीच चूक आहे. आयतें खायला मिळतें ह्मणून हें शहाणपण तुह्माला सुचायला लागलें. फुकटचें अन्न तुह्मांला स्वस्थ कोठलें बसूं द्यायला. "

भामिनीचे उद्दामपणाचे उद्गार कानीं पडताच सौमिनीही बेताल होऊन बोलली " अन्न–अन्न ह्मणून वरचेवर खाणें काय बाहेर काढता हलकटासारख्या त्या ? तुह्मी आह्मांला जेवायला घालता यांत कांहीं तुमचे मोठे उपकार नाहींत. धर्मपाल फार नम्र, विनयी आणि अज्ञान आहे. त्याला कोणी पाठीराखा नाहीं ह्मणून तुमच्या या साऱ्या वल्गना आहेत. त्याला कोणी सल्लागार मिळाला ह्मणजे दोहींसांज जेवण्यापलीकडे तुमचा कांहीं कारभार उरायचा नाहीं. "

हा जबाब कानीं पडतांच भामिनी रागानें लाल झाली. आणि डोळे

गरगर फिरवीत आवेशानें ह्मणाली "पाठीराखा मिळायला कशाला पाहिजे ? तुह्मी आहातना सल्लागार ? चांगला सल्ला देऊन आतां काय करायचें असेल तें करा मलाही पहावयाचेंच आहे. तुह्मी आणि तो धर्मपाल यांचीं कांहीं तरी खलबतें होऊनच आज तुह्मीं माझ्याशीं पट्टीला बसून भांडण चालविलें आहेत. एकंदर भावार्थ लक्षांत आला आहे माझ्या; तुमच्या हातांत असेल तें एकदा कराच तुह्मी. मग मी नुसत्या पोटगीची धनीण आहे का साऱ्या घरादाराची मालकीण आहे याचा तरी उलगडा होईल एकदां."

असें बोलून भामिनी फणकऱ्यासरशीं तेथून उठून घरांत चालती झाली. त्या दोघींचें हें सर्व भाषण धर्मपाल माडीवरून ऐकत होता. पण त्यानें आपलें व्रत कायम राखिलें होतें. दाराच्या आड सहज उभे राहून सुनीतीही हा संवाद ऐकत होती. सासूबाई कांहीं तरी वांकडे बोलत आहेत आणि सौमिनी आपल्या भ्रताराच्या वतीनें भांडत आहे एवढें जाणण्याशिवाय तिला त्या वादाचा मथितार्थ समजत नव्हता.

सौमिनीशीं जो झगडा झाला तो भामिनीच्या मनाला लागून राहिला. एका घरांत नांदावयाचें तेव्हां भांड्याला भांडें लागावयाचेंच अशी समजूत करून घेऊन चालढकल न करितां भामिनीनें आपल्या मनांत त्याच विषयांचें चर्वितचर्वण चालविलें. दोन चार दिवस तसेच कुढेपणांत घालवून तिनें दागदागीना लांबविण्याची योजना आरंभिली. या कामीं आपल्याला सुद्धां कोणा पुरुष मनुष्याचा आधार पाहिजे असें वाटून तशा धोरणानें ती आपल्या ओळखीच्या माणसांत तशा पुरुषाची निवड करूं लागली. आणि माणिकबोवा या नांवाचा एक गृहस्थ या कामीं आपल्यास साहाय्य करील असें ठरवून त्याच्याशीं कारस्थान जमविण्याच्या बुद्धीनें ती आपस्वार्थी व अदूरदर्शी भामिनी त्या गृहस्थाची गांठ घेण्याकरितां त्याच्या घरीं जा ये करूं लागली.

हा माणीकबोवा नांवाचा इसम भामिनीचा शेजारी नव्हता. तो त्याच गांवचा रहिवासी होता. भामिनीच्या घरापासून त्याचें बिऱ्हाड बरेंच दूर होतें. काकांच्या कारकीर्दींत माणिकबोवा धर्मपालाच्या गृहीं कधीं कधीं येत जात असत. काकांशीं त्याचा विशेष घरोबा नव्हता. तरी

पण त्याची भेट झाली असतां काकांना प्रेम वाटून दोघांचे चार विनोदपर शब्द झाल्याशिवाय राहत नसत. त्या दोघांत नडींनुडीच्या प्रसंगीं द्रव्याची कांहीं देवघेवही होत असे.

भामिनीनें या माणिकबोवासच पसंत केलें यांत तिचें थोडेंसें अंतस्थ धोरण होतें. काका निपुत्रिक असल्यानें ते एखादा दत्तक घेणार आहेत अशा कुणकुणीवरून या माणिकबुवानें आपला एक मुलगा दत्तक घेण्याबद्दल काकांच्याजवळ पांचचार वेळ गोष्ट काढली होती. काकांच्याजवळ जडजवाहीर काय आहे याची माणीकबोवास बरोबर कल्पना होती. काकांच्या पश्चात ती जिनगानी चोरापोरींच जाणार तेव्हां मुलाच्या दत्तविधानानें काकांची जिनगी आपल्या पदरांत पडली तर उत्तम होईल अशा हेतूनें माणिकबोवानें काकांची पुढें पुढें बहुतप्रकारें आर्जवं केलीं; पण काकांनीं त्याला रुकार दिला नाहीं. इतकेंच नव्हे तर काकांनीं त्यास साफ सांगितलें "द्रव्यप्राप्तीच्या हव्यासानें जो आपली संतती लोकांना देण्यास प्रवृत्त होतो अशाचा मुलगा मला मुळींच स्वीकारावयाचा नाहीं. कामांतकाम आणि भज मना राम; अशा वृत्तीचा मी मनुष्य आहें. माझाही हेतु साधावा आणि त्यायोगें एखाद्याला माझ्या कृत्याचें उपकार भासून मला त्याचा दुवा मिळावा अशा सालस, सत्वस्थ, गरीब मनुष्याचा मुलगा मिळाल्यास मी दत्तक-घेण्याचा विचार अद्याप ठरविणार आहे." काकांचा हा रोकडा जबाब माणिकबोवाच्या अंतर्यामीं थोडासा बोंचला. काकांनीं आपली प्रत्यक्ष निंदा करून आपल्याला तुच्छवत् केलें नाहीं तरी दुसऱ्याच्या सामान्य स्तुतीनें आपली त्यांनीं अप्रत्यक्ष रीतीनें हेटाळणीच केली अशी समजूत करून घेऊन माणीकबोवा काकांबद्दल वैषम्य मानून राहिला होता. काकांनीं धर्मपाळास दत्तक घेतलें तेव्हां तर माणीकबोवा काकांवर दात ओठ खाऊं लागला. धर्मपालाच्या उपनयनकाळीं व उपयामप्रसंगीं माणिकबोवास काकांनीं समारंभ साजरा करण्याकरितां पाचारण केलें होतें. त्यास लोकाचाराप्रमाणें मान देण्याकरितां तो काकांच्या घरीं जेवणाखाणास गेलाही होता; पण त्यायोगें त्याला सुख न होतां उलट संतापच जास्त झाला.

ज्याच्यामुळें काकांची दौलत आपल्या हातची गेली, ज्याच्यायोगानेंच

आपल्या एखाद्या पोराचें चोज अंतरलें. त्या धर्मपालाचा थाटमाट व बडिजाव पाहून माणिकबोवाचें पित्त पराकाष्ठेचें खवळलें आणि त्या दिवसापासूनच माणिकबोवा बिचाऱ्या धर्मपालाचा पुरता वैरी बनला. काकासाहेबांच्या मृत्यूची वदंता सर्व नगरांत पसरली तेव्हां दुखवटा देण्याच्या बुद्धीनें त्यानें भामिनीकडे येण्याचें सोंगही करून दाखविलें होतें. धर्मपालास कसातरी पेंचांत आणावयाचें असें त्याच्या मनांत सारखें घोळतच होतें. त्याला धर्मपाल दुष्टासारखा सलावयास लागला होता. हें स्वहृदयांत बोंचत असलेलें शल्य नाहींसें करण्याची संधी त्यास भामिनीनें आयतीच आणून दिली.

---

## प्रकरण ६ वें.

माणिकबोवा वयानें तीस पसतीस वर्षांच्या उमरीचा होता. तो बराचसा बुटका असून रंगानें गोरापान होता. त्याचे नेत्र विशाल असून आंतील मांसगोलक मांजरासारखे होते. त्यावरूनच कल्पना केली तर स्वार्थाविषयीं तो मार्जारवृत्तीचाच होता. त्याचे कपाळ रुंद व विस्तीर्ण होते. त्याचें नाक एकंदरींत सरळ दिसत असे; परंतु, मध्यभागाच्या सुमारास तें जरा उचललें होतें. त्याची हनुवटी व गाल मांसल असून त्यांच्यावरील दाढीचे केस तो फार वाढू देत नसे. त्याच्या केंसांत धूसर वर्णाची छाया पसरली असल्यानें करड्या रंगानें युक्त असलेली आंखुड दाढी व कल्लेदार मिशा त्याच्या गौरवर्णसंपन्न गटगटीत गालाला, हनुवटीला व ओंठाला चांगली शोभा देत. त्याचे हात पाय शरीराशीं साजतील अशा बेतानें आंखुड असून परिपुष्ट होते. त्याच्या छातीवर केस मुळींच नसत. या लक्षणास अनुसरून तो काळजाचाही तसाच घट्ट होता.

तो भुंवयांच्या मध्यभागीं नेहमीं एक शेंदराचा टिळा लावी. मोतीं, पोंवळीं घालून सोन्यांत मढविलेली एक उत्तम रुद्राक्षाची कंठी अक्षय्य त्याच्या गळ्यांत असे. तो बहुतेक उघडा असे. बाहेर जातांना तसेंच

कारण असेल तर तो पेहराव करी; नाहीं तर अंगावर रेशमी उपरणें आणि त्याच्यावर हिरव्या गार शालीचा एक फरद पांघरूनच तो घराबाहेर संचार करी. कपाळावर, डोळ्यांच्या दोन्ही पोटावर, भुजदंडावर तो सतत भस्माचीं बोटें ओढीत असे.

हा माणीकबोवा वरवर पाहणारास मोठा शांत दिसे; पण ती शांती मैंदाच्या शांतीप्रमाणें होती. तो साधुवृत्तीचा आव आणून ध्यानस्थ होऊनही राहत असलेला दृष्टीस पडे; पण त्या शुष्कध्यानाची सर्व दीक्षा त्यानें बकापासून उचललेली होती. त्याच्या सदां आनंदीत समाधान-युक्त दिसणाऱ्या चेहऱ्याकडे सहज पाहिलें असतां तो सौम्य, रंगेल, विनयी, दयाळू असा भासे; पण ती सौम्यता, रंगेलपणा, विनयसंपन्नता आणि दयाशीलत्व हीं सर्व वेश्येच्या मुखमडंणाच्याच किंमतीचीं होतीं. स्वार्थापुढें त्याला कांहींच दिसत नसे. तो आपल्या स्वतःला देवऋषि ह्मणवी. जारण, मारण क्रिया करून कांहीं दैवतें प्रसन्न करून घेण्यांत आपल्याला जय आल्याचा पुकारा त्यानें चोहोंकडे पसरून टाकला होता. कोणाचीं भुतें काढ; कोणाला अंगारे लाव; कोणाला कांहीं तोडगे करून दे; कोणाला गंडे बांध; कोणाला भालदोऱ्या घाल; कोणाला ताईत भरून दे; कोणाला शकुन सांग अशा प्रकारच्या थोतांडानें तो भावड्या व अडाणी जनाकडून बहुत पैका काढी. प्रसंगांत सांपडल्यामुळें घाबरून जाणाऱ्या जनतेला मधुयुक्त शब्दाचें बोट लावून शेवटीं तिच्या मानेवर सुरी कशी ठेवावी ह्या शास्त्रांत तो चांगलाच निष्णात होता. त्याची भोगवासना बरीच जोमदार होती. तो नजरेचा इतका पापयुक्त होता कीं, भोगसुखास योग्य अशी कोणतीही स्त्री त्याच्या दृष्टीस पडली असतां ती त्याच्या दुष्ट नजरेखालून नजरभ्रष्ट झाल्याखेरीज जावयाचीच नाहीं. तो मनाचा इतका खोल असे कीं, त्याच्या हृदयाच्या अंतर पडद्यांतील गूढ विचार ओठाच्या बाहेर कधीं चुकून देखील यावयाचे नाहींत.

अशा मासल्याचा माणीकबोवा हा मंत्रतंत्र करून दुनिया झुकविणारा होता. या झोटिंगाशीं भामिनीसारख्या कुटिल स्त्रीची गाठ पडली ह्मणजे धोत्र्याशीं भांगेचेंच संमेलन झालें ह्मणावयाचें. भामिनीनें माणिकबोवाच्या घरीं हमेष पैरवी ठेविली. त्याच्या मुलाबाळांस वरचेवर कांहीं तरी खाऊ

नेऊन देऊन त्याच्या बायकोला एखादा खण, एखादवेळ कांहीं निमित्तानें एखादें लुगडें अर्पण करून तिनें माणिकबोवाच्या घरादाराचें प्रेम आपणावर जडवून घेतलें. माणिकबोवाच्या मनांत आपणाविषयीं विश्वास व लोभ उत्पन्न झाला आहेसें पाहतांच तिनें माणिकबोवाजवळ आपली सर्व कुळकथा इत्थंभूत सांगितली. ती शांतपणें ऐकून घेऊन माणिकबोवांनीं तिच्यांतील सार कायतें जाणलें. भामिनीला पाठिंबा देण्याचें आश्वासन देऊन आधि आपल्या ताब्यांत पुरी घेतल्यानंतर मग आपला लाग कसा साधावयाचा हें त्यानें आपल्याशीं ठरवून टाकिलें. एका वाटेनें आपल्या हातांतून गेलेली काकांची जिनगी दुसऱ्या वाटेनें चालत आपल्या घरीं येणार या भविष्यानें तो अतिशय प्रमुदित झाला. पण आपली मोदवृत्ति तशीच लपवून ठेवून आपलें भाकींत जलदीनें खरें ठरावें या मतलबानें तो भामिनीस ह्मणाला " काय चमत्कार आहे पहा ! काकांच्या मागें धर्मपालासमवेत तुह्मी गुण्यागोविंदानें संसार चालवीत असाल अशी माझी समजूत होती. पण आमचा सर्व अंदाज चुकला ह्मणावयाचा ! काकांचा आमचा लोभ फार; व त्यांनीं आह्मांस सोडल्यापासून आपल्याच्यानें तुमच्या घरीं पाऊल सुद्धां टाकवत नाहीं बोवा ! तरी पण आमच्या जुन्या स्नेहाच्या घरांत अशी कचकच असावी हें आपल्याला नाहीं बोवा बरें वाटत. "

माणिकबोवास काकांबद्दल अभिमान वाटतो असें त्याच्या भाषणावरून जाणून भामिनी ह्मणाली " तुह्माला बरें वाटत नाहीं आणि आह्माला बरें कां वाटतें ? पण त्याला उपाय काय ? मी बायको मनुष्य काय करणार ? ते नवराबायको आणि सौमिनी असे तिघेजण झाले आहेत एक. त्यांच्या पुढें माझें एकटीचें काय चालणार ? त्या सर्वांचा माझ्याजवळच्या जिनसावर कायतो डोळा ? माझ्या डोक्यांत धोंडा घालून ते माझ्या पेटीवर केव्हां हातोडा घालतील याचा मला कांहीं नियम लागत नाहीं. अहो, त्यांच्याच हवालीं घर करून कुठें बाहेर यावयाचें ह्मणजे जीव सुचिंत राहील कां ? सोन्याचा खाल्लेला घास या नसत्या काळजीनें पचनी कांहीं पडत नाहीं, आणखी काय सांगूं माणिकबोवा तुह्माला ? "

भामिनी घरगुती कामानें व्यापली आहेसें ओळखतांच तिचाच मुद्दा उचलून धरण्याच्या मतलबानें माणिकबोवानें सांगितलें " तीं तिघेजण ह्मणजे कफ, वात आणि पित्त असा त्रिदोषच लागला आहे तुमच्या मागें ह्मणावयाचा ? तुमच्या जिवाला नाहीं तरी पण तुमच्या वित्ताला मात्र हा त्रिदोष केव्हां तरी बाधणार हें खास. काकांना काय समाधान वाटलें असेल तें असो. दत्तकच घेऊन ठेवलानी. लोकाचें पोर ओट्यांत घेऊन पुत्रप्राप्तीचा काय आनंद अनुभवण्यास सांपडत असेल तो ज्याचा त्यास माहीत. अहो तेथें आंतड्याचें का प्रेम असणार ? कसें झालें तरी औरस संततीची गोष्ट निराळी आहे. मला जर संतती नसती तर दत्तक-पुत्राबरोबर त्याच्या भारंभार सुवर्ण देण्याचें कोणी कबूल केलें असतें तरी मी परक्याच्या रक्तमांसाचें पोरगें आपल्या कुलांत कधींच आणलें नसतें. तुह्मी सुद्धां तेव्हां हुरळलांत ना ? "

माणिकबोवाचा सवाल आपल्यावर दोष लावण्यासारखा आहे असें पाहून भामिनीनें त्यास उत्तर दिलें " काय बोलायचं हें माणिकबोवा ? मी कशाची हुरळलें ? माझें काय चालणार होतें ! मला कां विचारलें कां पुसलें कां कांहीं कळविलें—कांहीं नाहीं. आपले गेले आणि मुलगा घेऊन घरीं आले. मी तेथें काय करायचें ? बोलाना आतां माणिकबोवा ? माझ्यावर नाहीं मी शब्द घ्यायची. "

धर्मपालाला दत्तक घेण्यांत भामिनीची कितपत संमती होती हें अजमाविण्याच्या मतलबानें टाकलेल्या प्रश्नाचें उत्तर ऐकून माणिकबोवा काकांना दोषास्पद असें बोलला " बरें दत्तक घेणें हा आधी मूर्खपणा ! आपण श्रम करून सांठविलेला पैका मरतांना बरोबर नेता येत नाहीं तर अंतकाळीं तो धर्मदाय केला तर फार चांगलें. तसें न करितां आपल्या पश्चात आपल्या कष्टाचा सुखानें उपभोग घेण्यास कोणातरी उपटसुंभास धरून आणून पुत्रस्थानीं स्थापावयाचा या सौख्याच्या कल्पनेला तोडच नाहीं. बरं तितकाही गाढवपणा करून दत्तक घ्यावयाचाच तर आपल्या कुलांतील, कोणी जवळचा नातेवाईक ह्मणा—निदान आपल्या गोत्रांतील—अगदीं निदान निदान ह्मटलें तर आपल्या पूर्ण माहितीच्या अशा शीलवंत, सत्वस्थ, कुटुंबवत्सल घराण्यांतील तरी घ्यावयाचा. कां

ज्याचा कांहींच मागमूस नाहीं, ज्या लेकाचे आईबापांचा सुद्धां पत्ता नाहीं असें गल्लीकुचीचें आपलें पोर पाहिलें कीं आणिलें उचलून आणि घेतलें ओट्यांत ! ही कां रीत ? कां हा शहाणपणा ? कां हें लांबचें धोरण ? कां हा दूरदर्शीपणा ? काय ? याला नांव तरी काय द्यावयाचें ? सांधींकोंदींतलीं हीं असलीं कारटीं मग हे असे उपकार फेडूं लागतात यांत वावगें काय आहे ? ”

माणिकबोवाही धर्मपालाच्या विरुद्धच आहे असें कळून येतांच भामिनीनें आपला विचार स्पष्टपणें बोलून दाखविण्याकरितां ती ह्मणाली “ झाली गोष्ट कांहीं परत येत नाहीं. जी चूक होऊन गेली तिचा भुरदंड मी आतांपर्यंत भरला. पण आतां याच्यापुढें माझा तेथें निभाव लागावयाचा नाहीं. मला त्या घराचें दर्शनसुद्धां नको. बोवा; मी आपली तुमच्या घरींच येऊन राहतें कशी. कोणालाही जवळ केलें तर मला कोणीही संभाळील. ”

भामिनीचा विचार आपल्या पथ्यावरच आहे असें पाहून माणिकबोवा तिच्या विचारास संमती देण्याच्या हेतूनें बोलला “ तुह्मी काय कोणाच्या अंगावर आहां. तुह्मी आपली सर्व चीजवस्त आपल्या बरोबर घेऊन येणार. तुमच्यापासून दुसऱ्याला काडीची सुद्धां तोषिस नाहीं. माझ्या घरीं यायचें ह्मणतां तर खुशाल या. घर तुमचें आहे. अलीकडे काकांचें आमचें प्रेम थोडें कमी झाल्यासारखें होतें एवढेंच काय तें. बाकी काका आणि मी कांहीं दोन नव्हतो. ”

माणिकबोवाच्या तोंडुन परामर्षकारक निघालेल्या उद्गारांचें इंगित त्या अप्रबुद्ध प्रमदेस कोठून समजणार. ती द्रव्यलोभी व मतिहीन भामिनी माणिकबोवाच्या बोलास मोहली आणि तिनें त्याच्या घरीं चोरून येऊन राहण्याचा संकल्प ठाम ठरवून टाकला.

धर्मपाल किंवा सौमिनी यांना कांहींएक कुणकुण न कळतां घरांतील सर्व जोखमीची चीजवस्त माणिकबोवाच्या साहाय्यानें गुप्तपणानें लांबविण्यांत आली. आपल्या स्वतःच्या शरीराखरीज आपला जीव गुंतेल असें धर्मपालाच्या सदनांत कांहीं राहिलें नाहीं अशी खात्री करून घेऊन एके दिवशीं रात्रीं सर्वत्र सामसूम झाल्यावर काकासाहेबांची सहधर्म-

चारिणी भामिनी आपल्या कुलाचा, लौकिकाचा, स्वाभिमानाचा, नवऱ्याच्या अब्रूचा सर्व विचार झुगारून देऊन गुप्ततेनें काळोखांत घराच्या बाहेर पडली आणि आगाऊ ठरवून ठेविल्याप्रमाणें आपल्याला पळवून नेण्याकरितां हजर राहिलेल्या माणिकबोवाच्या हातांत हात घालून त्या लफंग्याच्या घरांत शिरली !

---

# प्रकरण ७ वें.

रात्रीचा काळ संपून सकाळ झाल्यावर नित्याप्रमाणें धर्मपालाच्या घरांतील सर्व माणसें जागी होऊन घरांत वावरूं लागलीं तों त्यांना गृहामध्यें भामिनीचा वागारा कोठें दिसेना. कांहीं खाजगत कामाकरितां ती कोठें बाहेर गेली असेल किंवा शेजारच्या पाजारच्या वयस्क बायकांजवळ घरांतील चऱ्हाट वळीत बसली असेल अशा समजुतीनें कोणी तिकडे विशेष लक्ष पुरविलें नाहीं. प्रहर दीड प्रहर सूर्य वर आला तरी सुद्धां भामिनीचा ठिकाण नाहीं. असें झालें तेव्हां धर्मपाल व सौमिनी तिच्या शोधार्थ आसपासचीं गृहें शोधूं लागलीं. जवळपास भामिनी कोठेंही नाहीं असें तपासांतीं कळून आल्यावर तिच्याविषयीं नुसती चिंता करण्यांतच तास दीड तास गेला. मध्यान्ह काळ प्राप्त झाला. जेवणाची वेळ आली तरी भामिनी परत आली नाहीं. तेव्हां त्यांच्या मनांत तिच्याविषयीं भयंकर कल्पना चालूं झाल्या. घरांतील सदोदीत होणाऱ्या कचकचाटास वैतागून भामिनीनें आकर्तळेपणानें जीवबीव तर दिला नसेल ना ? असा प्रश्न त्यांच्या हृदयांत उद्भवूं लागला. मनाचा संशय फेडण्याकरितां त्यांनीं आपल्या घरांतील विहीरही शोधून पाहिली पण व्यर्थ. शेंवटीं नाइलाज होऊन ते सर्वजण अस्वस्थ अंतःकरणानें भोजनाच्या तयारीस लागले. कसे तरी चार चार घास पोटांत घालून ते तिच्या अकस्मिक नाहींसें होण्यावर अनंत अटकळी करूं लागले; पण त्यांची कोणतीच कल्पना निश्चित होईना. अखेर तिची रोजच्या राबत्यांतील चीजवस्त तरी घरांत आहे

कीं नाहीं हें पाहण्याकरितां सौमिनी, धर्मपाल हीं भामिनीच्या ठेवीरेवीच्या जागीं जाऊन पाहतात तों त्या सर्व जागा रिकाम्या. तिची सोनें मोती ठेवण्याची मांदुसा, मौल्यवान् वस्त्रेंपात्रें बांधण्याचें बासन, किरकोळ किडुकमिडुक ठेवण्याचे डबे हें सर्व मोकळें होऊन अस्ताव्यस्त पडलेले पाहतांच त्यांना पराकाष्ठेचा आचंबा वाटला. सर्व जिनगानीसह भामिनी पळून गेली यांत आतां संशयच उरला नाहीं. तिच्याजवळ असलेल्या संपत्तीवर आपण हात मारूं व तिला घरच्याघरींच लुबाडूं. अशा कुकल्पनेनें भामिनी कोणातरी छटेलाच्या नादानें घरांतून मुद्दाम परागंदा झाली असावी त्या अर्थी तिचा तपास करीत हिंडण्यांतही आतां अर्थ राहिला नाहीं, असें ठरवून धर्मपाल व सौमिनी हीं विचारमग्न होऊन राहिलीं. भामिनीच्या कपटाचरणाबद्दल विशेष विस्मय करीत बसण्यापेक्षां भविष्यत्कालच्या आपत्तीकडेच त्यांचें चित्त वेधून राहिलें. तांब्यापितळ्याच्या रिकाम्या भांड्याखेरीज भामिनीनें सर्व घर धुतलें. तेव्हां आतां पुढें चरितार्थ कसा चालावयाचा या चिंतेनें धर्मपालास व्याकूळ करून सोडलें. आपल्यावर अवलंबून असलेल्या सौमिनी व सुनीतीचें पोषण करण्यासही आपण असमर्थ आहोसें पाहून धर्मपालास त्याच्या स्थितीची लाज वाटूं लागली. तो अगदीं स्तब्ध झाला. डोळ्याच्या पापण्या हालविण्याचेंही विसरून जाऊन तो नुसते सुस्कारे टाकीत आत्मचिंतनांत गर्क झाला. आधींच बालवय; त्यांत सावरण्यास कोणी नाहीं; भरीतभर घरांत सहन करावा लागणारा दुस्वास तशांत खाण्यापिण्याची अबळ, अशा पीडेनें क्षीण होऊन गेलेल्या धर्मपालावर भामिनीच्या अंतर्धानानें जो गहजब गुदरला त्यामुळें तर त्याच्या तोंडचें पाणी पळालें. त्याचा विचार कुंठित झाला. त्याला ग्लानी येऊं लागली आणि दुःखातिशयानें मेंदूंतील ज्ञानतंतू मोह पावून काकासाहेबांचा तो लाडका दत्तकपुत्र धर्मपाल बेसावधपणानें जवळच बसलेल्या सौमिनीच्या अंगावर कलंडला !

धर्मपालास गिरगिरी आलीसें पाहून सौमिनीनें आपल्या डाव्या हातानें त्याला तसाच सावरून धरून अलगत आपल्या मांडीवर स्थिर केला आणि कनवाळूपणानें नाक आणि डोळे आखडून उजवा हात त्याच्या तोंडावर फिरवीत स्नेहयुक्त दृष्टीनें ती त्याच्या चेहऱ्याकडे पाहूं लागली;

तों धर्मपालाच्या त्या हृदयद्रावक व क्लेशकारक गलितावस्थेनें सौमिनीच्या अश्रुस्थानास स्फुरण आणून तिच्या नेत्रप्रांतांतून पाण्याच्या धारा वाहविण्यास लावल्या. ती वरचेवर नाक वर ओढून डोळयाला पदर लावूं लागली. हें पाहतांच शेजारीच स्थित असलेली ती पारवर्षी बाला सुनीती पौगंडावस्थेंतील कोंवळेपणानें गहिवरून जाऊन सौमिनीच्या दुसऱ्या मांडीवर स्वतःच्या ओंझळींत तोंड लपवून पडली.

कुडींत प्राण होता तोंपावेतों ज्याच्याकडे वर डोळे करून पाहण्याची कोणाची छाती नव्हती, ज्याच्यापुढें कोणाचाही अहंभावी तारा चालला नाहीं; त्याचा देहपात होतांच त्याच्याशीं शास्त्रविहीत धर्माच्या दृढतर बंधनांनीं संलग्न झालेली त्याची धर्मांगना त्याच्याशीं हरामखोरी करून, नवऱ्याच्या अब्रूवर लाथ मारून घरांतून पळून गेली आणि त्यामुळें अनाथ झालेली दोन अज्ञान लेकरें धर्मपाल आणि सुनीति हीं सौमिनीच्या दोन्ही मांड्यावर दोहोंकडे पडलेली पाहून केवळ शोकाकरितां बटीक म्हणून जवळ केलेल्या सौमिनीचा कंठ दाटून आला आणि तीं उघडीं पडलेलीं बालकें स्वतःच्याच उदरलतिकेचीं दिव्य फलें आहेत अशी भावना उत्पन्न होऊन त्या काकांच्या राखेस काकांच्या पुत्रस्नुषेबद्दल आपत्यप्रेमाचा, पान्हा फुटला. अंतःकरण सद्गदीत होऊन सौमिनीनें त्या दोघांनाही बसलें केलें आणि अश्रुपूर्ण नयनांनीं तिनें असे उद्गार काढले " धर्मपाला; बेटा, भिऊ नकोस. धीर सोडूं नकोस; सर्वांनाच कांहीं वडिलोपार्जीत जिनगी नसते. जन्मदाता परमेश्वर जीवाला जन्मास घालण्यापूर्वीच त्याच्या अन्नपाण्याची तजवीज करून ठेवितो. भामिनी तुझ्या मालकीचें द्रव्य उपटून पळून गेली याचा आतां विषाद मानूं नको. तुझ्या कपाळच्या रेषा तर कोणास काढून नेता येणार नाहींत ना ? तूं लहान आहेस तरी पण पुरुष आहेस. अशा बाल्यावस्थेंत तुला संकटांत लोटण्यांत सृष्टिचालकाचा तसाच कांहीं तरी भद्रदायक संकल्प असावा असें तूर्त तरी समाधान करून घे. " इतके शब्द उच्चारून सौमिनी उठून एकटीच घरांत गेली आणि सरासरी अर्धघटकेनें एक लहानशी पेटी हातांत घेऊन परत आली. तिनें हातांतील पेटी धर्मपालाच्या पुढें ठेविली. यावेळीं धर्मपाल ओणवा बसलेला असून त्यानें आपली मान गुडघ्यांत घातली होती.

त्याच्यापासून काहीं अंतरावर सुनीति एका कोपऱ्यांत हाताच्या बोटाकडे पाहत मान वाकवून उभी होती. धर्मपालाचें तोंड हातांनीं वर उचलून सौमिनीनें ती पेटी उघडली आणि तींतील जिन्नसा बाहेर काढून ती ह्मणाली " हे घे तुला पैसे. या पाटल्या, हे गोट, ही नथ, हे काप, या बुगड्या, या ठुशा, ही वजरटीक आणि हे दुसरे सटर फटर हे सर्व दागिने माझ्या मालकीचे आहेत तरी ते मला तुझ्या वडिलांनीं दिले आहेत. तुझ्या वडिलांच्या जिनगानीवर जसा तुझा वारसा पोंचतो त्याप्रमाणें तुझ्या पित्याच्या या बटकीवरही तुझा हक्क आहे. अर्थात् माझ्या चीजवस्तूंचा तूं यथाशास्त्र धनी आहेस. हे दागिने विकून त्याच्यावर काय मिळकत होईल तेवढ्यांतच ओलें कोरडें खाऊन प्राण जगवूं. नच निभेल तर या वास्तूंत राहून सावलींत तरी अब्रूनें मरूं. भामिनी हें घर तर उचलून नेऊं शकत नाहीं ना ? "

हे प्रेमरसानें थबथबलेले धीरोत्पादक शब्द ऐकून त्या बावरलेल्या पोरास किती उल्हास वाटला असेल बरें ? आपण ज्याच्या मांडीवर दत्तक गेलों त्याच्या बाळगलेल्या रखेली औरतीनें आपल्या उपपतीच्या दत्तक पुत्राशीं स्वतःच्या औरस पुत्राप्रमाणें मायापूर्ण वर्तन केलेलें पाहून धर्मपालास प्रेमाचें भरतें आलें आणि त्या भरांत सौमिनीच्या ठिकाणीं शुद्ध मातृबुद्धि उत्पन्न होऊन त्यानें त्या कुणबिणीस कडकडून मिठी मारली. आपल्या अंतःकरणांतील उचंबळून आलेली कृतज्ञता मिठीच्या रूपानें व्यक्त करून धर्मपाल बऱ्याच वेळानें बाजूस झाला. त्यानें तें सर्व दागिने पुन्हा पेटींत भरले आणि ते तिघेजण घराच्या आंतील अंगास निघून जाऊन आपल्या उद्योगाचें बस्तान कसें बसवावें याचा विचार करूं लागले.

---

## प्रकरण ८ वें.

सौमिनीच्या सर्व अलंकाराची विक्री करण्याचें ठरवून धर्मपालानें तिच्या संमतीनें दोन तीन सराफ घरीं बोलावून आणिले आणि त्यांना ते जिन्नस दाखविले. आपल्या दागिन्यांची अमुक एक किंमत यावी असा

सौमिनीचा अजमास होता. त्याच्या जवळ जवळ आकडा सराफांच्या मुखांतून निघतांच सौमिनीनें ती पेटी सराफांच्या पदरांत ओतली आणि ठरलेली रोख रक्कम मोजून घेतली. सवदा उरकल्यावर जवाहिरे लोक आल्या वाटेनें चालते झाले.

विक्री करून आलेल्या पैक्याचें भांडवल उभारून सौमिनीनें धर्मपालाच्या हस्तें व्यापार आरंभिला. धर्मपालास या वेळीं सोळावें वर्ष चालूं झालें होतें. तशा वयात त्यानें मोठ्या पहाटेस उठावें; स्नानसंध्या वगैरे ब्राह्मणाचा नित्य प्रातर्विधी उरकावा; अनन्यभावानें परमेश्वराचें ध्यान करावें आणि आसपासच्या खेड्यांत जावें. शेजारच्या वाड्या हिंडून लोणी खरेदी करून धर्मपाल संध्याकाळीं आपल्या घरीं परत येत असे. धर्मपालानें आणलेलें लोणी कढवून सौमिनी त्याचें तूप तयार करी आणि धर्मपाल तें घृत गांवांतील श्रीमान लोकांच्या घरीं नेऊन विकी. नुसत्या तुपालोण्यावर पुरेशी प्राप्ती होत नाहींसें पाहून सौमिनीनें त्याच्या जोडीला तांदुळाचा व्यापार जोडिला. धर्मपालानें आसपासच्या गांवांत जाऊन भात आणावें आणि सौमिनीनें सुनीतीस मदतीला घेऊन तें भात घरीं सडून, पाखडून स्वच्छ तांदुळ करावें आणि धर्मपालाजवळ पाटी भरून देऊन त्यास बाजारांत त्यांची विकरी करण्यास पाठवावें.

लोणी व भात यांच्या व्यापारांत जो काय फायदा होईल तेवढ्यावर पोटें भरावीं आणि आपल्या उंबरठ्याच्या आंत स्वस्थ असावें असा क्रम सुरू होऊन तीन वर्षें लोटलीं. या तीन वर्षांच्या अवधींत सौमिनी उंबऱ्याच्या बाहेर ह्मणून पडली नाहीं. काकासाहेबांच्या पाठीमागें त्यांची राख दारी ओसरी हिंडावयास लागली असा लौकीक होऊन त्या पुण्यपुरुषाच्या नांवास बट्टा लागेल अशा मानी समजुतीच्या भयानें दाराच्या आंत अनेक तऱ्हेचे काबाडकष्ट सौमिनी आपखुषीनें करी आणि बाहेरील श्रमाचा सर्व बोजा डोळेझाक करून धर्मपालावरच टाकी.

धर्मपालाच्या अंगची नम्रता, विनयसंपन्नता, मालाचा चोखपणा आणि व्यापाराची सचोटी यांमुळें त्याचें सर्व बस्तान उत्तम बसलें. मालाची खरेदी विशेष सवलतीनें जमावयास लागून व्यापारांत बरीच कूस राहूं लागली. घरप्रपंचाचा खर्च भागूनही कांहीं पैका शिलक पडूं लागला.

आरंभलेल्या कार्यांत यश येत गेल्यानें उत्तेजित होऊन धर्मपालानें व्यापार अधिक वाढविला. धान्य खरेदी करण्याकरितां तो बऱ्याच दूरच्या गांवीं जाऊं लागला. मुऱ्यांतील गांवढळ लोक, मावळांतील अक्षरशून्य लंगोटे यांच्या नडीच्या प्रसंगीं त्यांना तो मोबदला ठेवून कर्जाऊ रुपये देऊं लागला. स्वतःजवळ रक्कम नसली तर तोच जिन्नस शहरांतील धनशेटांच्या जवळ गहाण ठेवून कमी व्याजानें पैका आणावा आणि जास्त व्याजानें लोकांना द्यावा असाही धंदा करून तो शहाजोकपणानें द्रव्य कमावूं लागला. आपल्या मनगटाच्या जोरावर आपण प्रपंच चालवूं लागलों असें पाहून त्याला स्वतंत्र अन्न जास्त चवदार लागूं लागलें. त्याच्या चेहऱ्यावरील फिकेपणा जाऊन तो चांगला तरतरीत दिसूं लागला. त्याचें शरीर तयार व गुटगुटीत बनलें. त्याच्या सर्व शरीरावर उमेदवारीची छटा स्पष्टपणें झळकूं लागली, आणि त्याच्या विसाव्या वर्षी त्याचा भर ज्वानींत आलेला सौंदर्यसंपन्न देह पाहून सौमिनीला पुत्रप्रेमातिशयानें ब्रह्मानंद वाटूं लागला.

याच सुमारास सुनीतीलाही प्रौढ दशा प्राप्त होऊन ती देखील आपल्या अंगकांतीनें झळकूं लागली. ती ऋतुमती होऊन आपल्या आज्ञाधारक, मृदु, पवित्र आणि सत्वस्थ वर्तनानें आपल्या पतीस आणि सौमिनीस संतोषानें तल्लीन करून सोडावयास लागली.

मनुष्यमात्राचा देहस्वभावच अशा प्रकारचा आहे कीं, जोंपर्यंत तो संकटांनीं चोहोंकडून व्यापलेला असतो, नैराश्यतेच्या जाळ्यांचें त्याच्या सभोंवार वेष्टन पडलेलें असतें, दैवदुर्विपाकाच्या सामर्थ्यानें तो प्रत्येक गोष्टीस पारखा होऊन राहतो, व्यसनजनित उद्वेगानें त्याला अखिल जगत ओस व भणभणीत दिसूं लागतें, अविश्वास, कारुण्य, अधर्मपरायणता इत्यादि दुर्गुणांच्या हल्ल्यांनीं जर्जर झाल्यामुळें मानवाच्या अविद्यामय पिंडाचा नाशवंतपणा आणि सकल ब्रह्मांडांचें क्षणिकत्व यांच्या कडेच त्याचें अंतःकरण वेधून राहतें तोंपर्यंत स्मशानवैरागी माणसाप्रमाणें त्याच्या वृत्ति शून्य झाल्यासारख्या होऊन तो पराकाष्ठेचा अल्प समाधानी बनतो. स्मशानवैराग्य जसें फार काळ टिकत नाहीं. स्मशानभूमीवर वैराग्यपर होऊन राहिलेली मनुष्यें पुन्हा घरांत पाऊल टाकतांच जशी लागलीच

विषयप्रेमी बनतात त्याचप्रमाणें या असल्या अल्पसंतोषी मनुष्यांची स्थिति होते.

पूर्वभाग्याचा उदय किंवा कालाची सुप्रसन्नता यांच्या वरप्रदानानें मनुष्याचें स्थित्यंतर होऊन तो जसजसा हीनावस्थेंतून निघून उच्च दशेंत यावयास लागतो तसतसा त्याच्या अंतरंगांतील निर्विकारपणाचा नाश होत जाऊन त्याचा देह अनेक तऱ्हेच्या विकारांचें आश्रयस्थान बनतो. त्याच्या हृदयांत हजारों प्रकारच्या वृत्तींची उठावण होऊन त्याचें मन नाना वासनांच्या भयंकर जाळ्यांत गुरफटून राहतें. आशा, आकांक्षा, मनीषा, तृष्णा, इच्छा अशाप्रकारच्या जालिकांत मनाचा संचार झाल्यावर कामक्रोधादि विषारीं किरडें त्याचे लचके तोडून त्याला विव्हल करून सोडतात. द्वेष, गर्व, मद, मत्सर हीं अकाळविकाळ सांवजें त्याला आपल्या विषमय नखांनीं विदीर्ण करतात. मोह, लोभ, दंभ या समंधांच्या मायेनें त्याची विटंबना होते. निंदेच्या कांटेरी झुडपांनीं त्याचें शरीर ओरबडून निघतें. नाना कल्पना, असंख्य तर्ककुतर्क, अपरिमित विकल्प आणि अगणित संशय अशा तऱ्हेच्या अतिघोर व निर्गम गुहांत तो अडकून राहून कोंडून मरण्याचाच प्रसंग गुदरतो. विस्तीर्ण भवसागरांतून सुरक्षीतपणें तरून जावयाचें असेल, संसारसमुद्रांतील महा धिप्पाड जलचरांचीं तोंडें ठेचावयाचीं असतील, संसृतिविपिनांतील प्रचंड श्वापदांचा उच्छेद करून त्रिविध तापाच्या भयंकर वणव्यांतून सुरळीत आणि यथास्थित पार पडावयाचें असेल तर मनुष्यानें सदसदात्मक बुद्धीचें दासत्व पत्करून, शुद्ध धर्म, पवित्र आचार, उज्ज्वल नीति, सच्छास्त्र, सद्गुणासक्ती आणि साधुसमागम यांच्याच कासेला लागून इहलोकांतच स्वर्गलोक बनवून नरजन्माचें सार्थक करून दाखविलें पाहिजे.

आमचा चरित्रनायक मृत्युलोकच्या मानवयोनींतीलच एक व्यक्ती असल्यानें तो तारुण्यावस्थेंत आल्याबरोबर त्याच्या मनांत अनेकविध कल्पनांनीं प्रवेश केला. पूर्वींची भुकेबंगाल अवस्था नाहींशी होऊन बराचसा अभ्युदय होतांच त्याला महत्वाकांक्षेनें घेरलें. प्राचीनकाळची दुर्धरावस्था भोगीत असतांना त्यानें ज्या स्थितीला ब्रह्मसौख्याची असें कबूल केलें असतें ती स्थिति प्रत्यक्ष अनुभवास येतांच त्याला तींत सौख्य वाटेना.

लोकव्यवहाराशीं जास्त जास्त संघट्टन पडल्यानें तुलनेच्या योगानें स्थापित होणाऱ्या सौख्याधिक्याच्या अभिवृद्ध्यर्थ त्याच्या मनानें बहुत उचल खाल्ली. तो आपली प्रत्येक भावना, प्रत्येक गुण लोकांशीं ताडून पाहूं लागला. सकाळीं उठल्यापासून रात्रीं शयनागारांत जाईपर्यंत त्यानें जो व्यवहार केला असेल, त्याच्यावर जो प्रसंग आला असेल, जो संसर्ग घडला असेल व जो संस्कार लागला असेल त्या सर्वांची दुसऱ्यांशीं तुलना करून तो स्वतःला दुःखी ठरवून घेई. कोणत्याही गोष्टींत सूक्ष्म तऱ्हेचा कमीपणा सुद्धां त्याला असह्य होऊं लागला. श्रीमंती, सन्मान, विद्या, चातुर्य, कौशल्य, वजन, शहाणपण, पंडितपणा इत्यादि गोष्टींत आपण सर्वश्रेष्ठ नसलों तरी आपल्या वरचढ तरी कोणी असूं नये अशा भावनेनें तो ते ते लौकिकी गुण अंगी आणण्याचा यत्न करण्यास मनापासून झटे. जनतेमध्यें आपल्याला थोरपणा प्राप्त होण्यास, आपला मरातब वाढण्यास, आपला दरजा पहिल्या प्रतीचा ठरण्यास आणि अस्सल सुखाचा गड्डा हातीं येऊन चित्तशांततेचा लाभ होण्यास आपल्याला काय काय केलें पाहिजे, कसें कसें वागलें पाहिजे आणि कशा तऱ्हेचें धोरण राखलें पाहिजे याची आपल्या मनाशीं छानू करण्यांत तो रात्रीच्यारात्रीं जागून घालवूं लागला. विचारमंथनांतून त्यानें अखेर असें सार काढलें कीं, या भूलोकांतील मर्त्य जगतांत द्रव्यसंचयासच प्रमुखत्वानें श्रेष्ठपणा मिळतो. धनसंपन्नता हेंच अक्षय्य सौख्याचें स्थान होय. लक्ष्मीच्या प्रसादांतच चिरकालीक शांतीचें वसतिस्थान आहे. द्रव्यांतच सर्व प्रकारची जादु भरली आहे. लौकिकांतील शिष्टसांप्रदायाची सर्व किल्ली पैक्याच्या पोटांत आहे. सभ्यता, मोठमोठ्या पदव्या, लांबलचक किताब, सर्वमान्य हुद्दे यांचा उगम संपत्तीपासून आहे. एकंदरीत संपदा ही सर्वप्रकारच्या आरामाची वाटिका असून तिच्याठायीं प्रत्येक तऱ्हेचें वशीकरण वास्तव्य करीत आहे. असें तात्पर्य काढून आपण अमर्याद श्रीमंत व्हावयास पाहिजे अशी त्यानें आपल्या पदराला खूणगांठ बांधून ठेविली. पण उपयोग काय ? आपल्याला काय पाहिजे तें त्याला समजलें. परंतु जें पाहिजे असें समजलें तें पदरांत पाडून कसें घ्यावें हें मात्र त्याला समजेना.

स्वतःचा व्यापार अतोनात वाढवावा, उत्कृष्ट प्रकारची शेती करावी, विविध तऱ्हेचे व्यवसाय आरंभावे; म्हणजे द्रव्यार्जन होऊन आपला कार्यभाग साधेल असें त्यानें ठरविलें. पण पुन्हा या ठरविलेल्या गोष्टी उभारण्यास अवश्य असलेला आधार कसा सांपडेल हें त्याला समजेना. अशा कांहीं चमत्कारिक विवंचनेंत स्वतःला विनाकारण लोटून धर्मपालानें अनुकूल असलेल्या सुखावर मात्र पाणी ओतलें. साक्षात् उपभोगावयास सांपड असलेल्या आरामाचा बेआराम करून त्यानें स्वतःच्या हृदयांत नुसत्या अस्वस्थतेचें पटल पसरून दिलें. ईप्सित हेतू साध्य होण्याच्या मार्गांत आडकाठ्याच पुष्कळ आहेत असें जाणून तो अगदीं मुग्ध होऊन बसला. दिवसेंदिवस तो जास्त कष्टी झाला. त्या योगानें त्याच्या ठिकाणीं आळसाचें प्राबल्य वाढलें. तो अगदीं सुस्त बनला आणि सुस्तीच्या ओझ्यानें चिरडून जाऊन तो परवशा बनल्यानें बेसुमार धनप्राप्ति तर लांबच राहिली; पण होत असलेल्या किफायतींत मात्र हळू हळू तूट यावयास लागून पूर्ण सौख्याची जोड करण्याच्या लालसेनें प्राप्त असलेल्या सुखांत उणीवीच्या वाढीनें दुःखाची मात्र जास्त जास्त भर पडावयास लागली.

---

# प्रकरण ९ वें.

धर्मपालाच्या मनांत द्रव्यतृष्णेची उचल होऊन मानवी साम्राज्यांतील क्षुद्र मोठेपणाच्या हावेनें त्यास अगदीं तग्रवग्र करून सोडिलें होतें; अशा समयास सुनीतीला गर्भिण्यवेक्षण प्राप्त झालें. तिला एक दोन महिने गेले असल्यानें डोहाळ्यामुळें ती आजारी पडली. सुनीतीचें हें पहिलेंच गर्भारपण. गरोदरपणाच्या प्रयोजकीभूत आत्मनिष्ठ धर्मानुसार इच्छा उत्पन्न होण्यापेक्षां सुनीतीच्या ठिकाणीं आजारांचाच प्रादुर्भाव आधिक्यानें झाला. तिला ओकारी सुरू झाली. वांतीच्या योगानें ती अगदीं हलक बनली. अन्न जाईनासें झालें. खाल्लेले चार दोन घास ओकून पडूं लागले. त्यामुळें सुनीति शुष्क व निस्तेज झाली. त्याच्याच पोटीं थोडा ज्वरांश उद्भवून ती क्षीण होऊन धरणीवर पडली.

आपल्या लाडक्या पत्नीची अशी अवस्था पाहून धर्मपालास चैन पडेनासें झालें. ही नवीनच चिंता डोळ्यापुढें उभी राहिल्यानें तो अगदींच वेडा बनला. संसारांतील नेहमींचा अनुभव कमी असल्यामुळें तो औषध-पाण्याकरितां वैद्याकडे धावाधाव करूं लागला. हें औषध दे, तें औषध दे अशा करण्यांत त्यानें बरेच पैसे खराब केले. बायकांच्या या अशा दुख-ण्यास ओखद देण्याची जरूर नाहीं असें सौमिनी त्यास वरचेवर सांगे. परंतु, अनुभवाच्या अधीरपणामुळें धर्मपालास तें खरें वाटत नसे.

अवश्य तेवढा काळ लोटल्यानंतर गर्भारपणाच्या चौथ्या पांचव्या मासापासून सुनीतीला आराम वाटून तिची प्रकृति सुधारत चालली. ती छोकरी मूळची सुंदर असल्यानें आतां तिच्या अंगावर गर्भारपणाचें जें तेज खेळूं लागलें त्यामुळें तिचें सौंदर्य फार उठून दिसावयास लागलें. आपली भार्या पुनरपि रोगरहित होऊन जास्तच शोभायमान दिसूं लाग-लेली पाहून धर्मपालास मोठा संतोष वाटला. आणि मध्यें हें अगांतुक-पणानें जन्मास आलेलें काळजीचें कारण नाहींसें झाल्याबरोबर धर्मपा-लाचें चित्त पुन्हा आपल्या पूर्वींच्या निर्धाराकडे वळलें. सुनीतीच्या आजारांत व ती बरी झाल्यानंतर तिचीं डोहाळजेवणें वगैरे हौसा करण्यांत शिलकींतील जो पैसा खर्ची पडला त्यामुळें धर्मपालास पैशाची उणीव जास्तच वाटूं लागली. आतां आपणास पोरेंबाळें होणार त्या अर्थीं खर्चाचें प्रमाण रोजच्यारोज वाढतच जाणार असा विचार मनांत येऊन त्यानें आळस झाडून टाकण्याचा निश्चय ठरविला. देशोदेशीं हिंडून, अनेक ठिकाणचे रिवाज व व्यवहार पाहून उद्दीम व कृषिकर्म यांचें मर्म समजून घ्यावें, वैभवसंपन्न अशा शहरांत धनशेटांची ओळख करून भांडवल जमवावें, ज्ञानी, विद्वान, बहुश्रुत अशा जनांच्या अनुभवाची माहिती मिळवावी म्हणजे आपली कार्यसफलता होईल अशा संकल्पानें धर्मपाल देशपर्यटणास निघाला.

घर सोडल्यापासून धर्मपाल ज्या ज्या शहरीं मुक्काम करी त्या त्या शहरांत तो थोरमोठें म्हणून नाणावलेल्या लोकांच्या गाठी घेई, त्यांच्याशीं सलगी पाडी, सामान्य विषयावर वादविवाद काढी आणि ज्याच्या जव-ळून आपल्या उपयोगीं पडेल असें जें काय ज्ञान सांपडेल तें आपल्या

हृदयसंपुटांत सांठवून ठेवून नंतर आपला मुक्काम हलवी. या प्रवासांत एखाद्या ठिकाणीं तसाच कोणी योग्य पुरुष भेटला असतां तो त्याच्या जवळ कांहीं शास्त्रांचा त्याचें सारांशभूत तथ्य ध्यानांत येण्यापुरता अभ्यास करी. तो बुद्धिमंत असल्यानें त्याचें कार्य थोडक्या कालांत सहज उरकत असे.

या धोरणानें देशाटन करण्यांत सरासरी दोन वर्षे घालवून, अनेक प्रमेयांचा संचय करून धर्मपाल अखेर चंद्नावतीस येऊन दाखल झाला. चंद्नावती हें शहर ह्मणजे शूरसेन देशाची राजधानी होय. ही राजधानी विस्तीर्ण व अफाट असून माणसांच्या वस्तीनें सदैव गजबजलेली असे. विद्यमानकाळीं चंद्नावतीचें सिंहासन सुशोभित करणारी राणी अंबालया या नामाभिधानानें प्रख्यात होती. ती राजासनावर आरूढ झालेली राज्ञी अंबालया सदाचरणसंपन्न, परम उदार, प्रजाजनहितैषी व राज्यकार्यदक्ष असे. ती गुणांची चहाती, विद्येची भोक्ती आणि ज्ञानाची पक्षपाती असून धर्म, नीति, पावित्र्य, सचोटी इत्यादि उज्ज्वल सद्गुणांवर मोठी आसक्त असे. मोठमोठे विद्वान, जाडेजाडे पंडीत, अनेक शास्त्रज्ञ, कीर्तनकार, पुराणीक, गवय्ये, बजवय्ये, व्याख्याते, ग्रंथकार, कवि अशा प्रकारचे कित्येक गुणीजन तिच्या पदरीं आनंदानें कालक्षेप करीत खुशाल पडून होते.

अंबालयेस चंद्रानावतीची गादी प्राप्त होण्यापूर्वी शूरसेन देशाचें राजपदाचा उपभोग घेणारा पुरुष क्षेत्रवान या नांवानें गाजत होता. क्षेत्रवान हा पद्मवंशज असून त्याच्या कारकीर्दींत पद्मवंशाच्या कीर्तीनें दाहीदिशा आक्रमून टाकिल्या होत्या. क्षेत्रवान शक्रासारिखा प्रतापी असल्या कारणानें त्याच्या विक्रमयशाच्या दुंदुभीनें नभोदर कोंदटून गेलें होतें. त्याच्या वैभवशाली राज्यकर्तृत्वाच्या कालांत पद्मघराण्याच्या राजलक्ष्मीची सीमा झाली होती. या क्षेत्रवानापुढें सर्व प्रकारचीं सुखें सदां हात जोडून उभीं होतीं; तरी पण एका गोष्टीमुळें त्याच्या अंतःकरणास चैन नव्हतें. त्याला वंश विस्ताराकरितां अवश्य असलेला पुत्र नसल्याकारणानें तो रात्रंदिवस आपल्या मनाशीं झुरत होता. अखेर त्याच झुरणीनें क्षीण होऊन कांहीं काळानें

पुत्ररहित अशा स्थितींतच क्षेत्रवानाच्या आयुष्यतरूचें छेदन झालें. त्या छेदनाबरोबरच पद्मवंशाच्या वृक्षाची वाढही खुंटल्यासारखीच झाली. वंशाची अविच्छिन्नता राखण्याकरितां क्षेत्रवानाच्या पत्नीनेंही कोणा राजकुलोत्पन्न राजकिशोराचा स्वीकार केला नाहीं. क्षेत्रवानाच्या पाठीमागून थोडक्याच दिवसांनीं तीही तशीच आपल्या पतीच्या भेटीस चालती झाली.

क्षेत्रवानास पुरुषसंतती मुळीं झालीच नव्हती. आपल्या हयातींत एवढ्या या अंबालयेस जन्म देऊन तिच्या आईनें आपल्यावरचा वांझपणाचा तेवढा बोध उडविला होता. अंबालया ही आपल्या आईबापांची एकुलती-एक कन्यका असल्यामुळें ती त्यांची फारच लाडकी असे. क्षेत्रवानास अंबालयेवाचून एक क्षणभरही चैन पडत नसे. पुत्रापेक्षेची मनांतील आधी क्षेत्रवानाचें रक्त शोषण करीत असल्याकारणानें क्षेत्रवानास स्वतःच्या सर्व आशेची आणि सौख्याची जोत कायती एक अंबलयाच वाटत होती. एका अंबालयेच्या ठिकाणींच क्षेत्रवान् दशपुत्रांचें नातें मानून घेत असल्याकारणानें तो तिला एक पळभरही दृष्टिआड करण्यास राजी नव्हता. या कन्याप्रेमाच्या आतुरतेमुळें अंबालयेस ज्या मागण्या आल्या त्या तिच्या पित्यानें सर्व चालढकलीवर नेल्या. आपली प्रिय दुहिता उपवर झाली असून आपण तिच्या विवाहास नकार दर्शवितो ही गोष्ट कालपरत्वें खपेनाशी होऊन अंबालया आंतल्या आंत कुढूं लागेल व आपणाविषयीं क्रोधयुक्त होईल. असें न व्हावें व तिचा तिळाच स्वतःच्या स्वयंवराचा तिटकारा उत्पन्न व्हावा या मतलबानें क्षेत्रवान् त्या दानयोग्य स्वसुतेला पुरुषजातीचा उच्छृंखळपणा, प्रेमचांचल्य, विषयोत्कंठा यांची वरचेवर फोड करून दाखवी. पुरुषांची जात फक्त स्त्रियांच्या मोहकपणा-पुरतीच विश्वासू आहे. सौंदर्य व तारुण्य यांची बहार संपतांच पुरुष-जातीची सत्यता, विश्वास, प्रेम या गोष्टीही संपुष्टांत येतात, असें तो अंबालयेच्या हृदयांत वरचेवर बिंबवी. स्वतःच्या मनाची चाड पुरविण्याकरतां पुरुष हवेंतसें भाषण करून स्त्रीला फसवितात. आत्मकार्यापुरता भाषेंत रसाळपणा दाखवून, कार्यभाग उरकल्यानंतर अप्पलपोटे पुरुष स्त्रियांना क्षुद्र समजून वाटेल त्या अयोग्यवर्तनास कसे प्रवृत्त होतात हे भाविक,

अज्ञान व मूर्ख स्त्रीजनास त्यांच्या बुद्धिसंकोचामुळें मुळींच समजत नाहीं. अशा प्रकारचा मानभावी उपदेश वरचेवर तिच्या कानावर पाडून क्षेत्रवान अंबालयेचें अंतःकरण पुरुषांच्या सद्गुणाविरुद्ध भारून टाकण्याचा यत्न करी. क्षेत्रवानाच्या मतलबी बोलाचा इष्ट परिणाम अंबालयेच्या मनावर लवकरच झाला. ती स्वभावतःच तापट व महत्वाकांक्षी असल्यानें क्षेत्रवानाच्या लाघवी बुद्धिवादाच्या योगानें अंबालयेच्या हृद्यांत स्त्रीजातीबद्दलचा अभिमान उत्पन्न झाला. पुरुषांच्या समजुतीप्रमाणें सर्वच स्त्रिया नादान व अल्पज्ञानी असतात असें नाहीं ही गोष्ट निदान स्वतः अपवादक होऊन तरी जगाच्या निदर्शनास आणून द्यावयाची असा तिनें संकल्प ठरवून ठेविला. स्त्रियांच्या अंगांतील जोमदार मानीपणा यथास्थितपणें पुरुषांच्या प्रत्ययाला उघडरीतीनें आणून देऊन पुरुषांच्या अंगांतील खऱ्या मर्दपणानें संपन्न असा पुरुष आढळण्यांत येईपर्यंत स्वतःच्या देहावर कोणाही पुरुषाची मालकी कबूल करावयाची नाहीं असा कृतनिश्चय होऊन अंबालया अद्यापपर्यंत अविवाहीतच राहिली. क्षेत्रवानाच्या हयातींत अंबालयेला ज्यांनीं ज्यांनीं मागण्या घातल्या त्या सर्वांत आनर्त देशाधिपती विकंठ हा महाबलाढ्य व पराक्रमी होता. स्वतःच्या लग्नासंबंधानें अंबालयेचा कृतसंकल्प निश्चित होऊन गेल्यानंतर या विकंठाची मागणी आली असल्यानें क्षेत्रवानाच्या नाखुषी पेक्षां अंबालयेनेंच तिचा अधिक जोरानें निषेध केला. इतकेंच नव्हे तर पुरुषांच्या विभवास तुच्छवत् करून अंबालयेनें अहंकारयुक्त होऊन विकंठास असा खडखडीत जबाब पाठविला कीं " पुरुषत्वयुक्त खऱ्या शौर्याच्या कसोटीवर तंतोतंत कसाला उतरेल असा ओजसंपन्न वीर दृष्टीपडेपर्यंत अंबालयेचें कौमार्य ढळणें शक्य नाहीं. आपण मोठें भाग्यशाली असाल, हिरेमाणकावर आपण चालत असाल, प्रत्येकप्रकारचे वैभव आपल्या दारीं ओसरीं लोळत असेल; पण या सर्व सभाग्यतेस अंबालया जुमानीत नाहीं. वीरभार्या ह्मणवून घेण्यावांचून कोणत्याही प्रकारच्या संज्ञेस अंबालया कस्पटासमान लेखते. " हा तोरेदार व बेफामपणाचा जबाब ऐकून विकंठ क्रोधानें ग्रस्त झाला. अंबालयेनें आपला नुसता धिःक्कार केला असें नसून तिनें आपल्या सखोल उत्तरानें

आपल्या ठिकाणीं अप्रत्यक्षपणें वीर्यसंपन्नतेचा कमीपणा ध्वनीत केला असें ध्यानांत येऊन मानभंगाच्या संतापानें विकंठ लालगुंज झाला. चित्त्याप्रमाणें झडप घालून अंबालयेस लागोलाग उचलून आणावी आणि तिचा शिरच्छेद करून त्या गर्विष्ठ मानिनीस वीराचा पराक्रम दाखवावा अशा कल्पनेनें विकंठ अगदीं अधिर झाला. पण उपयोग काय ? महाफणीच्या मस्तकांतील दिव्य रत्नाच्या प्राप्तीकरितां तळमळणाऱ्या मूषकाची इच्छा सफल कशी होणार ? मदोन्मत्त हस्तीच्या मस्तकांतील मौक्तिकग्रासाकरितां लोलुप झालेल्या ग्रामसिंहाची लालसा कशानें भागणार ? विकंठ आपल्या ठिकाणीं बहुत तळमळला. पण क्षेत्रवानाच्या अजिंक्य संरक्षणाच्या छायेखालीं वास्तव्य करणाऱ्या अंबालयेस आपल्याकडून यत्किंचित् त्रास पोंचला तर आपली दुर्दशा होईल असें जाणून क्षेत्रवानाच्या मृत्युपर्यंत विकंठानें आपल्या अंतःकरणांतील क्रोधाग्नी तसाच दडपून ठेविला; आणि शूरसेन देशाधिपतीची मृत्युवार्ता समजतांच अंबालयेचें पारिपत्य करण्याचें कारस्थान विकंठानें मोठ्या जारीनें सुरू केलें.

क्षेत्रवान् इहलोक सोडून गेल्यानंतर अंबालया कुमारिकाच होती हें वाचक जाणतातच. अगदीं प्राणोत्क्रमणाच्या समयीं क्षेत्रवानानें मुख्य मुख्य सरदार व राज्यकारस्थानांत प्रवीण असे मुत्सद्दी यांच्या समक्ष शूरसेनाच्या गादीचा हक्क आपल्या कन्येस अर्पण केला आणि आपल्या समक्ष अंबालयेच्या शिरावर राज्यमुकूट चढवून सर्व राजमंडळाकडून तिचें प्रभुत्व कबूल करून घेऊन त्यानें प्रभावसंपन्न भूपतीनें नश्वर देहाचा त्याग केला.

आतांपर्यंत वर्णन केलेल्या इतिहासानें ज्ञात झालेली राणी अंबालया ज्या ठिकाणीं मोठ्या प्रवीणतेनें राजशकट चालवीत होती, त्या चंद्नावतींत प्रवेश केल्यानंतर धर्मपालानें एका बड्या व्यापाऱ्याच्या घरीं आपलें बिऱ्हाड ठेविलें. चंद्नावतीची अपूर्व रचना, अवाढव्य व्यापार, अलोट संपत्ती, अगाध ज्ञान, अनुपम शेती हीं पाहून धर्मपाल गारेगार झाला. अवश्य तितके दिवस तेथें राहून त्यानें सर्व प्रकारचें ज्ञान संपादन केलें. लोकव्यवहार, निरनिराळ्या समाजांची राहटी, मनुष्यांतील भिन्नभिन्न

जाती, जातीपरत्वें अवश्य असलेला धर्म इत्यादि गोष्टींचें ज्ञान प्राप्त झाल्या-कारणानें धर्मपाल स्वतःला शहाणा व विद्वान समजू लागला. शहाणपणा आणि विद्वत्ता यांच्या प्राप्तीमुळें तो आनंदीतही झाला. आपल्या प्रवासाचें सार्थक झालें असें वाटून त्याला स्वगृहीं परत जाण्याची उमेद आली. देदीकोठ सोडून आपणास बरेच दिवस झाले हाही विचार याच वेळेस त्याच्या मनांत वरचेवर उठावण करूं लागला. देदिकोठास राहून पैका मिळविणें कठीण जाईल; चंदनावतीस येऊन राहिले असतां नानाधंदे करावयास सांपडून मोठा लौकीक मिळवावयास सांपडेल असें समजून त्याचें चित्त घरीं जाण्याविषयीं थोडेसें बावचळलें. चित्ताच्या दुभंगपणांत तसेंच कांहीं काळ गडबडून राहून शेवटीं त्यानें तूर्त तरी स्वग्रामीं गेलेच पाहिजे असें ठरवून तो त्या तयारीस लागला.

---

# प्रकरण १० वें.

चंदनावतीस आल्यानंतर धर्मपालानें ज्याच्या वाक्यांत तळ दिला होता त्याचें नांव मणिमंत असें होतें. हा मणिमंत मोठा गर्भश्रीमंत घरंदाज असून त्यानें अतोनात पैका कमाविला होता. जवळच्या वडिलोपार्जित पुंजीवर नुसता ऐषाराम करणें किंवा घरीं मांडी ठोकून बापाच्या दौलतीवरच उत्पन्न होणाऱ्या मिळकतीवर नाना विलास भोगणें एवढ्या गोष्टींतच समाधान मानून केवळ पैक्यानें प्राप्त होणाऱ्या मोठपणांत व मिजासींत दंग होऊन राहणाऱ्या लक्ष्मीपुत्रांत मोडणारा मणिमंत हा नव्हता. स्वतःच्या अकलेनें जशी त्यानें बापाची दौलत द्विगुणीत केली होती त्याप्रमाणें विद्येच्या व्यासंगानें त्यानें आपल्या ज्ञानाची पुंजी देखील अतिशय वाढविली होती. या कारणानें नुसत्या अर्थलोलुप माणसांतच त्याचें वजन होतें असें नाहीं; तर बहुतेक सर्व जनतेवर त्याची छाप असे. या मणिमंत धनशेटाच्या सहवासानें शहरांतील कित्येक बड्या-बड्या मनुष्यांशीं धर्मपालाची चांगलीच ओळख झाली होती. नवीन स्नेह पडलेल्या सर्व माणसांना आपल्या जाण्याची वार्ता सांगून धर्मपाल

देदीकोठास जाण्याकरितां निघाला. मणिमंताच्या सुखदावस्थेचें चित्र त्याच्या डोळ्यापुढें होतेंच. त्याच प्रकारची स्थिति स्वतःस प्राप्त झाली तर आपणही सौख्यपदावर विराजमान होऊन मनुष्यलोकांत धन्य होऊं असें वाटून धर्मपालाच्या मनांत मणिमंताच्या सुखप्रद स्थितीबद्दल जबरदस्त हेवा उत्पन्न झाला. चंदनावतीस रामराम ठोकल्यापासून मध्यंतरी द्विचक्र नगरांत वस्तीला उतरीपावेतों त्याच्या अंतःकरणांत श्रीमंती, शहाणपणा आणि सौख्य यावांचून कोणत्याही विचारास जागा नव्हती.

धर्मपाल देदीकोठास जात असतां वाटेनें द्विचक्र नांवाच्या नगरांत उतरला. ज्या दिवशीं पाहटेस मुक्काम हालवावयाचा असें त्यानें स्वतःशीं योजून ठेविलें होतें त्या दिवशीं दुपारीं तो सहज फिरावयास निघाला असतां, त्याच गांवांतील जुईगंज नांवाच्या भागांत आला. जुईगंज नांवाच्या पेठेंत रस्त्याच्या दोहों बाजूला लांबच लांब घराशेजारीं घर अशाप्रमाणें घरांच्या रांगा लागून गेल्या होत्या. साधारणतः एकाच उंचीचीं व रुंदीचीं घरें जिकडे तिकडे पाहून धर्मपालास त्यांच्या बांधणीबद्दल कौतुक वाटलें. त्या कौतुकाच्या नादांत पायांची गति मंद होऊन तो प्रत्येक घर बाह्यतः निरीक्षण करीत चालला असतां एका वाड्याच्या पुढील रस्त्यांत आला. या वाड्याच्या दरवाजाचीं दारें उघडीं होतीं. धर्मपाल रस्त्यांत उभा असतांना त्याच्या नेत्रांनीं त्या वाड्याच्या अंगणांत प्रवेश करण्यास आणि त्या ठिकाणीं एका वयस्क पुरुषाच्या कानशिलावर एका तरुणीच्या हस्तांतील यष्टीचा प्रयोग होण्यास एकच गांठ पडली. हा चमत्कारीक देखावा पाहतांच धर्मपाल सहजच आंत शिरला. धर्मपालास पाहतांच ती तरुणी चार पावलें मागें सरून अंगणांतून ओटीवर चढली आणि तेथून त्या मार लागलेल्या पुरुषाकडे क्रोधदृष्टि करून गांभीर्ययुक्त मुद्रेनें टवकारून बघत गप्प उभी राहिली. आपल्यासारखा अगदीं अनोळखी व परका पुरुष त्या स्थलीं प्राप्त झालेला पाहूनही ती यौवनसंपन्न स्त्री वक्र भ्रुकुटी करून तशीच उभी राहिलेली पाहून धर्मपालास तिच्या धिटाईपणाच्या उद्दामपणाबद्दल कांहींसा तिरस्कार उत्पन्न झाला. त्यानें तिच्याकडे टेहळत पहात न बसतां त्या जखमी माणसाचें आंखावरील रक्त आपल्या धोतरानें पुसलें. धर्मपाळ हा

कोणी तरी अपरिचित मनुष्य आहे असें समजून त्या रक्तस्राव होत असलेल्या माणसानें ओटीवरील स्त्रीकडे काण्या नजरेनें एक क्षणभर पाहिलें आणि आपल्या सुश्रूषेस लागलेल्या धर्मपालाच्या अंगावर तो घायाळ बेसावधपणानें कलंडण्यास लागला.

हा कानशील सडकलेला मनुष्य वयानें पंचावन छप्पनच्या सुमाराचा दिसत असावा. तो दोंदिलतनु असून शरीरानें चांगलाच घट्टपुष्ट होता. त्याचा जबडा विस्तृत असून डोक्याचा आकार वरच्या अंगास चंबू-सारखा होता. भोंवईच्या खालच्या अंगास डोळ्याच्या कोपऱ्यावरच वर्मावर मार लागला असल्यानें तो अगदीं गलित होऊन गेला होता. धर्मपालानें त्यास ‘ बाबा बाबा ’ ह्मणून हांका मारल्या आणि आपल्या उपरण्याच्या पदराचा पंखा करून तो त्यास वारा घालीत राहिला.

तो ह्मातारा चांगला सावध होऊन कांहीं बोलूं लागावा या हेतूनें धर्मपाल आपला कृत्रिम पंखा त्याच्यावर हालवीत असतां त्यानें पुन्हा आपली दृष्टी ओटीकडे फेंकली. धर्मपालाच्या नयनांतील तेजाचें किरण ओसरीवर स्थितअसलेल्या तरुण बालिकेच्या चेहऱ्याला स्पर्श करण्यापूर्वींच अर्ध्या वाटेंत त्यांना त्या उमेदवार सुंदरीच्या निर्मल नयनकटाक्षांनीं अटकाव केला. परस्परांच्या अपांगदर्शनाचें संमेलन होतांच धर्मपालाच्या अंतःकरणांतील प्रथमची तिरस्कार बुद्धि पार धून गेली. त्यासमयीं त्या प्रमदेच्या अक्षसरोवरापासून हजारों लहान लहान नद्यांचा उगम झाल्यासारखा दिसत होता. तिच्या मनोहर नयनांतून गालावर येऊन खालीं उड्या टाकू पाहणारे अश्रुबिंदु तिच्या चकचकीत कपोलावर मोत्याप्रमाणें चमकत होते. तिच्या चेहऱ्यावर औदासिन्य, उद्विग्नता, पश्चात्ताप आणि कृतघ्नताजन्य संताप यांचें पटल पसरलें असल्यानें त्या कोमलांगीचा वदनेंदु मेघमंडलाच्छादित क्षपाकराप्रमाणें निस्तेज दिसत होता. तिच्या अंतःकरणांत सहस्रावधी विचारांची दाटी झाली होती. परंतु, त्या गर्दीचा गोंगाट नाकांतून निघणाऱ्या दीर्घ सुस्काऱ्यावांचून अन्य कोणत्याही साधनानें व्यक्त होत नव्हता. तिनें पूर्ण मुग्धता धारण केली होती. एखाद्या वस्ताद कारागिरानें तयार केलेल्या गारेच्या मूर्तीप्रमाणें स्तब्ध उभी राहिलेल्या

त्या सजीव प्रतिमेस अशा या क्षुब्ध अवस्थेंत पाहतांच धर्मपालास तिच्याबद्दल जास्तच जिज्ञासा उत्पन्न झाली. ती उमेद्वारीच्या भरांत आलेली अंगना कोण व तिचें त्या शुद्धिगताशीं नातें काय हें समजून घेण्याच्या लालसेनें धर्मपाल त्या दोघांना संदिग्धपणें कांहीं प्रश्न करूं लागला. त्याच्या प्रश्नास कोणीकडून कांहींच जबाब न मिळाल्यामुळें त्यानें त्या घराच्या माजघराकडे डोळे लावून घरांतील माणसास हाका मारण्यास प्रारंभ केला. त्याच्या दोन चार हाका होतांच एक साधारण वयस्क अशी एक विधवाबाई घरांतून बाहेर आली. तिला पाहतांच धर्मपालानें बाजूस होऊन आपल्या दिमतीस घेतलेल्या मनुष्यास त्या विधवेच्या दिमतीस दिले.

त्या विगतधवेनें अंगणांत येतांच त्या ज्ञातार्‍यास पोटाशीं धरिलें. ज्ञातार्‍यास ज्या लाकडाचा टोला बसला होता तें लांकूड ह्मणजे जात्याचा खुंटा होता. तो तेथें जवळच पडला होता. तो खुंटा आपल्या हातांत उचलून घेऊन त्या गतभर्तृकेनें ओसरीवर अद्याप उभ्या असलेल्या स्त्रीकडे टवकारून पाहून रागानें ह्मटलें " सुलोचने; अगें चवढाळ पोरी; काय गें तुझा हा माजुरीपणा ! तूं अशी मस्त कशानें झालीस ? थांब; आठपंधरा दिवसांनीं नाना घरीं आला ह्मणजे तुझें चांगलेंच कांडांत काढतें. "

इतके शब्द ऐकतांच सुलोचना वेगानें पाय आपटींत तोंडानें कांहीं पुटपुटत आंतील अंगास निघून गेली. ही चंडिका प्राप्त झाल्यापासून धर्मपालाच्या मनांतील विचारास वेगळीच दिशा लागली होती. हा दंगा घडण्याचें कारण काय असावें व त्या तीन्हीं माणसांचा एकमेकांशीं संबंध काय असावा हें समजून घेण्याच्या भावनेपेक्षां सुलोचनेच्या सौंदर्यानेंच त्याचें मन जास्त आकर्षण केलें होतें. परस्थ या नात्यानें चौकशी करण्याच्या वरकांती मतलबानें त्यानें त्या चंडीस चौकस असें प्रश्न घातलें; पण त्यांत त्याचा अंतस्थ हेतु असा होता कीं, कांहीं तडजोडीच्या गोष्टी सांगण्याचा प्रसंग आणून सुलोचनेशीं आपले चार शब्द व्हावेत. त्या चंडीचें नांव गिरजा अत्याबाई असें होतें. धर्मपालाच्या शोधक प्रश्नावरून तिनें त्यास त्यांचें सर्व नातें समजावून सांगून सुलोचनेची बहुत निंदा केली.

आत्याबाईच्या सांगण्यावरून धर्मपालास असें समजून आले कीं, त्या ज्ञातान्याचें नांव आबासाहेब असें असून तो सुलोचनेचा श्वशुर होय. आबासाहेबांचा मुलगा नाना हा आपल्या आईसह कांहीं कामाकरितां आजोळी गेला असून त्याच्या बेफाम झालेल्या बायकोनें आबांच्या डोक्यांत खुंटा घातला. गिरजा ही आबांची धाकटी बहीण होती. आबासाहेब व त्यांची बायको सगुणाबाई यांच्याशीं घरगुती भांडणामुळें सुलोचनेचें पटत नसे. आबा तोंडाचे फटकळ असल्यानें ते सुलोचनेच्या गैरवर्तनाबद्दल व बेमुरवतीच्या उलट उत्तराबद्दल सुलोचनेस प्रसंगीं खांडगळ्या शिव्या देखील देत. सासुसासऱ्यांचा जाच सहन होत नाहीं असें निमित्य दाखवून सुलोचना नानाला नेहमीं वेगळें होण्याचा उपदेश करी. नाना बाईलबुध्या नसल्यानें तो आपल्या बायकोच्या बोलण्यास मुळींच भीक घालीत नसे.

आपला नवरा देखील आपलें कांहींच ऐकत नाहीं इतकेंच नव्हे तर उलट सासुसासऱ्यांचाच कैवार घेतो असें अनेक वेळ पाहून सुलोचना निराश झाली. ती जातीची चवचाल, आडदांड, मगरूर आणि मोठी द्वांडगी असल्यानें तिनें नवरा घरीं नाहींसें पाहून हा सासऱ्याचा सूड उगविला.

गिरजा आत्याच्या संपादणीप्रमाणें सर्व दोष सुलोचनेकडेच आहे असें क्षणभर गृहीत धरिलें तरी प्रापंचिकाच्या घरांत नित्य होणारें भांडण आबासाहेबांच्या मस्तकावर सुनेकडून जात्याच्या खुंट्याचा प्रयोग होण्यास पुरेसें कारण आहे अशी धर्मपालाची खात्री पटेना. यांतील इंगित कांहीं तरी निराळेंच असलें पाहिजे असा तर्क करून व आत्याबाईनें प्रकट होतांच एकदम सुलोचनेवर बिनधोक लागू केलेला आरोप ध्यानांत आणून धर्मपाल आत्याबाईस बोलला " बाई; सगळाच अपराध सुलोचनेचा असेलसें वाटत नाहीं. तुह्मीही आपल्या सासरीं नांदला असाल. सासुसासऱ्यांची व तुमची एखादवेळ खडाजंगी झाली असेल; घरोघरीं मातीच्याच चुली. तुह्माला देखील सासुसासरे घालून पाडून बोलले असतील. मग तुह्मी त्या सासुरवासास संतापून सासऱ्याचें डोकें किती वेळ फोडलें बरें ? "

धर्मपालाचें भाषण संपतें न संपतें तों आबासाहेब एकदम शुद्धीवर आल्यासारखें होऊन ओरडून ह्मणाले " अहो; तुह्मी शहाण्याचे कांदे ! तुह्मी कोण ? तुमचा शहाणपणा व अनुभवाच्या गोष्टी आह्माला नकोत. तुह्मी येथें आलात कशाला ? "

ज्या आबासाहेबाला आपण सांवरून धरून दयाळूपणानें त्याची शुश्रूषा केली त्याच्या तोंडून असा हा अनुपकारी सवाल निघतांच धर्मपाल थोडास चवताळला. त्यानें तोच मुद्दा धटास लावण्याचा बेत करून तो ह्मणाला " आपल्या टाळक्यांतून वाहणाऱ्या रक्तानें मी आपलें धोतर भरून घेण्यापलीकडे येथें येऊन कांहींएक स्वार्थ साधला नाहीं. तुह्मी मला वाटेल तें बोला. पण तुमच्या आणि तुमच्या या स्नुषेच्या दरम्यान कांहींतरी जास्त खोल भानगड असावी. इतकें बेफामपणाचें आचरण करण्यास प्रवृत्त होण्याला सुनेच्या जिवास तुह्मी तशीच कांहींतरी पीडा केली असली पाहिजे हें कोणीही सांगेल. "

धर्मपाल निघून न जातां निलाजऱ्याप्रमाणें पुन्हा युक्तिवाद करीत आहेसें पाहून आबा ह्मणाले " कोणीही सांगेल ? पण आह्मी कोणास विचारू तेव्हां ना ? आमचा इनसाफ करण्यास कोणाही तिऱ्हाइताची जरूर नाहीं. तुह्मी येथून चालते व्हा अगोदर. "

आबा अगदीं हातघाईवर आलेसें जाणून ते जास्तच चिडावेत या बुद्धीनें धर्मपालानें जरा जोरानें सांगितलें " कां बरें; आह्मी कांहीं तुमची चोरीबिरी तर केली नाहीं ना ? घर तुमच्या मालकीचे असेल तर तें खुशाल आपल्या डोक्यावर घेऊन बसा. मला इतकेंच सांगावयाचें आहे कीं, तुमच्या सुनेच्या आणि तुमच्या दरम्यान बरेंचसें काळेंबेरें असावें ".

धर्मपालाच्या या निक्षून सांगण्यास गिरजाबाईनें जाब केला " मी तुह्माला हात जोडू कां ? तुह्मीं आपल्या कामाला जा ! तुह्माला लोकांच्या घरच्या उठाठेवी पाहिजेत कशाला ! जा बाबा. "

गिरिजेच्या नम्र भाषणावर कांहीं बोलण्याच्या हेतूनें धर्मपाल ओठाच्या बाहेर " पण मला असें " इतके शब्द काढतो आहे इतक्यांत आबा गुरगुरून ओरडले " तो हरामखोर तसा ऐकायचा नाहीं. त्या नसत्या उठाठेवी करणाऱ्या कोडग्याला जेव्हां गुद्धे लगावावे तेव्हां त्याची समजूत

पडेल. " असें बोलून आबांनीं कुस्तीची तयारी केली. तें पाहून धर्मपालानेंही अस्तन्या मागें सारल्या. हा सर्व प्रकार दाराच्या आंतून सुलोचनेस दिसत होता. खुंट्याच्या तडाक्यानें विव्हल झालेल्या आपल्या मामंजींची मशागत करणाऱ्या उपकारकर्त्या तिऱ्हाइताच्या अंगावर आपला सासरा चाल करून जात आहेसें पाहतांच सुलोचना ओसरीच्या जोत्यापर्यंत आली आणि तेथेंच थबकून धर्मपालास उद्देशून विनंतीपूर्वक ह्मणाली "तुह्मी आपले जा कसें येथून; माझ्याकरितां तुह्माला मधल्यामधेंच तडाके कशाला ? आपण वेगळ्या धोरणानें बोलता; पण तें त्यांना कसें रुचेल ? तुह्मी आपल्या कामाला जा. माझें दैव आहे आणि मी आहे. " या शब्दांचा उच्चार करीत असतां सुलोचनेनें डोळ्याला पदर लावला आणि ती उद्वेगानें गलित झालेली गोरटी ढळढळा अश्रुपात करावयास लागली.

सुलोचनेची शोकाकुल अवस्था पाहून कोणासही कींव आली असती. पण आबासाहेबांच्या मनस्तापाचें आणि अपमानास्पद शारीरिक व्याधीचें ती कारण असल्यानें तें उलट अधिकच काहून तिच्या अंगावर वसकन् धावलें. " अगे टवळे; उणगे पोरी ! वाटेल त्या अपरिचिताशीं गाऱ्हाणी सांगण्याची तुला शरम कशी वाटत नाहीं ? " असें ते बोलून तिला आणखी शिव्याशाप देऊन आपल्या मनाचें समाधान करून घेऊं लागले. त्यांच्या तोंडांतून निघालेल्या अभद्र अक्षरांनीं धर्मपाल जास्त क्रोधावला आणि बेफिकीर होऊन त्यानें आबासाहेबास दरडावून बजाविलें कीं, " या स्त्रीवर जरी तुमची सत्ता आहे तरी थोर व जाणतेपणास लाज उत्पन्न करण्यासारखे अचावचा शब्द आपण बहकता याचा तुह्मास तिच्या वतीनें कोणी जाब विचारणारा नाहीं कीं काय ? "

धर्मपाल अगदीं सलगीचें भाषण करीत आहेसें पाहून आबा व गिरिजा हीं दोघे एकदमच कलकलाट करून बोलूं लागलीं कीं " अरे गृहस्था; तुला लोकांच्या घरच्या उठाठेवी पाहिजेत कशाला ? तुझा जेथें विशेष खाजगत संबंध असेल तिथें जाऊन मग अशा धमक्या घालीत बैस. वाटेचा वाटसरू तूं; तूं रे मेल्या एवढा बाजीराव कोण. आधी आमच्या घरांतून बाहेर हो. आह्मांस दार बंद करावयाचे आहे. "

इतक्या हुंबरीतुंबरीवर येऊन तीं दोघेजण धर्मपालास ढकलून बाहेर हाकालण्याच्या बेतास आली. तेव्हां धर्मपाल निमुटपणें मागें बघत बघत चालूं लागला. त्याच्या पायांनीं त्याच्या शरीरास वाहून दरवाजा बाहेर नेलें; पण त्याचें मन मात्र अंगणांतून हलेना; इतकेंच नाहीं तर तें ओसरीच्या पायऱ्या चढून सुलोचनेबरोबर तिच्या नेहमींच्या बैठकीच्या खोलींत जाऊन हटून बसलें.

---

# प्रकरण ११ वें.

सुलोचना ही सुमारें तेवीस चोवीस वर्षांची ह्मणजे आपल्या अगदीं ऐन उमेदींत आलेली होती. तिची उंची मध्यम प्रमाणाची असून बांध्यानें ती मांसल होती. ती गौरवर्ण असून त्यांत कुसुमात्कानें आपल्या रंगाची झांक सर्वत्र पसरून दिली होती. तिचे कपाळ रुंद असून शिरावरील केशपक्ष भ्रमराप्रमाणें काळाभोर होता. तिच्या दोन्ही भोंवया ह्मणजे मनसिजाच्या धनुष्याचे दोन तुकडेच दोहीकडे कमानी करून बसविल्याचा भास होई. तिचें गाल चांगलेच गटगटीत असल्यानें नाकाच्या कोरापासून ते बरेच उचललेले दिसत. तिचें नाक किंचित् नकटें होतें तरीपण त्याचा छबदारपणा व नाकपुड्यांची उभारलेली ठेवण अशी कांहीं खुबीची होती कीं, तें जर चाफेकळीप्रमाणें सरळ असतें तर तिच्या स्वरूपाच्या शोभेची थोडीशीं तरी उलट हानीच झाली असती. तिचे नेत्र तेजःपुंज व प्रकाशमान होते. त्यांच्यांतील मांसगोलक घासलेल्या स्फटिकाप्रमाणें लखलखीत असून बाहुलीचा वाटोळा टिळा काळा कभिन्न होता. तिची हनुवटी खालच्या ओठापासून थोडीशी खोलगट दाखवून पुढें गालाच्या मृदुपणाशीं साम्य पावण्या जोगत्या बोजडपणानें युक्त होती. नाक, हनुवटी आणि गाल यांजवर गोंदलेल्या हिरवटरंगाच्या टिकल्या तिच्या सौंदर्यास फारच खुलवीत होत्या. तिच्या अधरोष्ठास प्रवालमण्यांनीं आपली खुमारी चढविलेली दिसत होती. ओटीच्या प्रारंभाला एक बारीकसा काळा तीळ होता. त्या योगानें तिच्या गौरकांतीयुक्त

मुखड्यास अपूर्व शोभा झळकत होती. त्या स्वरूपसाजिरीस कोणा पाप्याची दृष्ट बाधूं नये ह्मणून ब्रह्मदेवानें तिच्या रचनेच्या वेळीं त्या तिलकालकाची मुद्दाम योजना केली असावीसें पाहणारास वाटत असे. दोन भ्रुकुटींच्या मध्यभागाच्या जरा वरच्या अंगास चंद्रकोर गोंदलेली असून त्याच्यावर निढळाच्या मध्यभागी कुंकुमाचा सौभाग्यदायक बेतशीर लालसर टिळा सुलोचनेचा सुंदरपणा अधिकच झळकावयास लावीत होता.

यावेळीं तिनें आपल्या अंगावर विशेषप्रकारचे अलंकार कांहींच घातलेले नव्हते. तिच्या नाकांतील नथ यावेळीं आपल्या नेहमींच्या स्थानीं विराजमान झालेली नसून ती तिच्या गळयांतील जिनसाच्या एका पदरांत अडकविलेली लोंबतांना दिसत होती. त्या प्रसंगीं तिचें नाक बुच्चेंच होतें; पण नेत्रांना विलाप करतांना पाहून त्याला जें दुःख होत होतें त्यामुळें प्राप्त झालेल्या तांबुस हुळहुळेपणाच्या योगानें तें मोठें गोंडस दिसत होतें. तिचा गोलदार स्तनभार पुष्ट व काठिण्ययुक्त असल्यानें तो आपल्या वरील कंचुकीच्या आच्छादनास जुमानीत नाहींसा वाटत होता. तिनें काळा शालु परिधान केला असून कुलीन बायकोस योग्य असा लांबलचक पदर काढलेला होता. पदराच्या योगानें तिचा सर्व देह झाकलेला असल्यामुळें तिच्याकडे बारीक नजर लावून पाहणाऱ्या अभिलाषशील दृष्टींची सर्वस्वी निराशा होत असे.

अशाप्रकारच्या सौंदर्यानें संपन्न असलेल्या सुलोचनेस पाहून धर्मपाल अगदीं भांबावून गेला. प्रथमारंभीं तिच्या उद्दामपणाबद्दल त्याला तिरस्कार वाटला; पण मागाहून तिच्या केविलवाण्या स्थितीचें ज्ञान होतांच ती तिरस्काराची छाया नाहींशी झाल्यानंतर त्याच्या हृदयांत सुलोचनेची मूर्ति अगदीं ठसून राहिली. आबासाहेबांना मदत करण्याचें निमित्य त्यानें वरकरणी दाखविलें. त्याच्या दुःखानें आपण दुःखित झाल्यासारखें दाखवून त्यानें आपली भूतदया व्यक्त केली. सुलोचना व आबा यांतून कोणीही भाषण करीत नाहींतसें पाहून त्यानें घरांतून कोणी बाहेर यावें या बुद्धीनें आंतील अंगास हांका ठोकून आपला भलेपणा स्थापित केला. गिरजाबाईच्या बोलण्यांत तोंड घालून व नंतर आबा-

साहेबांशीं दुद्धाचार्यांप्रमाणें सयुक्तिकवाद आरंभून त्यानें आपल्या सहानुभूतीचें, औदार्याचें न्यायप्रियतेचें, व अनुभवाचें प्रदर्शन करून जगाच्या दृष्टीला चकविण्याची चोख व्यवस्था केली. पण त्याचें हें सर्व कर्म लफंगेपणाचें होतें. त्याच्या बुडाशीं त्याचा हेतु शुद्ध नव्हता.

देदिकोठ सोडल्यापासून आतांपर्यंत त्यानें जें पर्यटन केलें त्यांत पुष्कळ निरनिराळ्या स्त्रिया त्याच्या पाहण्यांत आल्या नसतील असें नाहीं. पण त्याच्या प्रवासाचा हेतू द्रव्यमोहानें उत्पन्न झाला होता. मोह, लोभ वगैरे विकारांनीं त्याला सतावून सोडलें होतें; तरी त्यांत कामाची उचल झाली नसल्यामुळें द्रव्यप्राप्ति व तदंगभूत इतर सुखशांती यांच्याच नादांत तो गर्क होता. विद्वत्ता कमाविण्यास, अनेक विलास करून शांती मिळविण्यास व लौकीक संपादून जनतेंत आपलें नांव होईल असें करण्यास अवश्य असलेलें जें द्रव्य त्याच्या कमाईचें साधन या नात्यानें तो ज्ञानार्जनाच्या मार्गे लागला होता. मग अर्थातच ज्ञानसंपादनाच्या उत्कंठित वृत्तीच्या काळांत काम, क्रोध यांना थारा कोठून मिळणार. अनेक व्यवहार, अनंत विद्या व अपारज्ञान यांची पैदास करण्यांत मनुष्याचा जो काळ जातो त्यांत तादितर सुखोपभोगाच्या प्रत्यक्ष साधनांकडे त्याचें विशेष लक्ष नसतें. चौकसबुद्धीनें हरतऱ्हेचे शोध करणें, निरनिराळ्या विषयांत पारंगत असलेल्या माणसांच्या तोंडून ज्याच्या त्याच्या विषयांवरील स्पष्टीकरणें ऐकणें, श्रुत झालेल्या प्रमेयांचा सयुक्तिकपणा आपल्या अंतःकरणांत विवंचून पाहणें, शंका घेणें आणि त्यांच्या निरसनार्थ पृच्छा करणें अशा तऱ्हेच्या व्यवसायांत विद्या व कला यांचा अभिलाष करणाऱ्याचा काल निघून जात असतो. हा आयुष्याचा वेळ निरुपाधिक असल्यानें तो कोणाच्या डोळ्यावर येत नाहीं व त्याचें चित्तही क्षुद्र वृत्तीच्या भक्षस्थानीं पडत नाहीं.

सर्व कला कौशल्य, विद्या, शास्त्रें, व्यवहार इत्यादिकांचें आपल्याला ज्ञान झालें आहे अशी धर्मपालाची समजूत झाली असल्याकारणानें त्याच्या अंगांतील स्वभावजन्य अहंकाररूपी वारू बेफाम झाला होता. आपणास आतां शिकावयाचें कांहीं राहिलें नाहीं अशा समजानें त्याच्या चित्तांत आतां प्रापंचिक सौख्याचेंच प्राबल्य झालें होतें. सुलोचनेस पाह-

तांच त्याच्या विद्यार्थी दशेंत दबून राहिलेला कामरूपी सर्प फों फों करीत चेकाळून राहिला. सुलोचनेची तेजोमय मूर्ति त्याच्या डोळ्यापुढून हालेनाशी झाली. त्या यौवनांगीनें धर्मपालास वेडे करून सोडलें. तिची पेंचांतील स्थिति लक्षांत आल्यानंतर तो पेंच आपण दूर केला तर ती आपल्याबद्दल पूज्यभाव धारण करील या दुष्ट हेतूनेंच धर्मपालानें तिचा कैवार घेतला. आबा व गिरजा यांच्याशीं सुलोचनेच्या वतीनें भांडण केलें असतां आपल्याबद्दल तिच्या मनांत आदर उत्पन्न होऊन तिच्याशीं चार शब्द बोलावयास सांपडतील व तेवढ्या संधीनें तिच्याशीं जास्त सलगीचीं भाषणें करून व आधाराची आशा दाखवून अर्धें अधिक कार्य पार पाडावयास सांपडेल अशा धोरणानेंच धर्मपालानें आबा व गिरजा यांना खडकावलें. पण त्याचा इष्ट परिणाम न होतां धर्मपालास त्या घरांतून पाय काढण्याचाच त्वरित प्रसंग आला यामुळें तो फार खट्टू व दुःखित झाला. आपण स्वग्रामीं परत निघालों आहों हें विसरून जाऊन तो त्या द्विचक्र नगरांत तसाच भडकत राहिला. सुलोचनेची प्राप्ती कशी होईल, एकदां त्या यौवनांगीस घट्ट आलिंगन देण्यास कसें सांपडेल, तिच्या मृदु गालांस स्पर्श करण्यास अधिर झालेले आपले हस्त धन्य केव्हां होतील, तिच्या मुखाला भेट देण्यास उतावीळ झालेले आपले ओठ चुंबनविधीनें कसे तृप्त होतील, तिच्या रसाळ अधरोष्ठांतील सुधारसाची चव घेण्यास हपापलेली आपली रसना कधीं शांत होईल या विचारांनीं धर्मपालाचें डोकें इतकें मदड होऊन गेलें कीं, एक आठवडाभर तो अगदीं विषण्ण झाला. त्याला कांहीं सुचेना. कोठेंतरी चार पैसे टाकून तुकडा खावा आणि पिशाप्रमाणें पायांच्या आधीन होऊन गांवांत वाटेल तिकडे वणवण करीत फिरावें याखेरीज त्याला अन्य व्यवसायच उरला नाहीं.

सुलोचनेच्या सौंदर्यतेजानें धर्मपालावर ही जी मंत्रक्रिया केली तिची गुंगी हलके हलके आपोआप जशी कमी व्हावयास लागली तशी आपली इच्छित वस्तु प्राप्त करून घेण्याच्या युक्तीला त्याच्या मस्तकांत जागा व्हावयास लागली. सुलोचनेचें माहेर कोणीकडे, तिच्या माहेरची हवाल काय ? आबांचा व तिचा खरा अंतस्थ वृत्तांत कसा आहे या गोष्टी हमखास समजतील; व सुलोचनेशीं आपली समक्ष मुलाखत होईल तर आपण

त्या गोष्टीला घरांतून सहज काढूं असा बेत ठरवून तो आपल्या प्रीतिपात्राची गाठ घेण्याच्या प्रयत्नास लागला.

आपलें चित्त वेधून घेणाऱ्या मनमोहिनीची भेट घेण्याकरितां कोणीतरी मध्यस्त सोधला पाहिजे ह्मणून आबासाहेबांच्या वाड्यांत जाणाऱ्या येणाऱ्या माणसांचा शोध करण्याकरितां धर्मपाल त्या जुईगंजांत वरचेवर हिंडून तलास करावयास लागला. आपली चित्ताकर्षिणी कोठें जातांयेतां निदान आपल्या दृष्टीस पडून नेत्रांची तरी तूर्त तहान भागावी या उद्देशानें तो आबांच्या वाड्यासंन्निध नित्य घिरट्या घालूं लागला. आपण या नगरांत नवखे असल्यामुळें एकाच ठिकाणीं रोजच्यारोज अशी पैरवी ठेवल्यानें आपणाबद्दल लोकांना भलताच संशय येऊन कोणी गुप्तपणानें आपल्याही पाळतीवर असण्याचा संभव आहे अशी भीतियुक्त कल्पना धर्मपालाच्या मनांत उद्भवली. परंतु, रथिनाथाच्या संचारानें त्याला बेहोष करून टाकलें असल्यानें त्याची ती भीति जागच्याजागींच चीत झाली. कामाच्या आतुरतेमुळें धैर्ययुक्त होऊन धर्मपाल घरदार विसरून मूर्खाप्रमाणें देह कष्टवीत त्या जुईगंजांत एक पंधरावडाभर राबत राहिला. एवढ्या आवधींत त्याला कोणी उपयुक्त असा कार्यनिर्णायकही आढळला नाहीं आणि कोरडें समाधान देणारें सुलोचनेचें फुकाचें दर्शनही घडलें नाहीं.

---

# प्रकरण १२ वें.

तशाच ताटकळलेल्या स्थितींत निर्लज्जपणानें धर्मपालानें आणखी दोन दिवस काढल्यानंतर एक मराठ्याची बाई आबांच्या घरांतून बाहेर पडतांना धर्मपालाच्या नजरेंत आली. त्या कुणबिणीचें नांव गुणाई असें असून तिच्या हातांत त्या वेळेला दाण्यानें भरलेलें एक टोपलें होतें. तिला पाहतांच ती आबांच्या घरची दळपीण असावी असा त्यानें तर्क केला. आपण बरेंच दिवस आबांच्या घरावर कुत्र्याप्रमाणें पाहरा करीत असतां यापूर्वी हीं बाई आपल्याला दिसली नाहीं. त्याअर्थी ती तेथील

नेहमींची मजुरी करणारी असून तिचे आपल्या यजमानाच्या घरांत चांगलें दळणवळण असेल कीं नाहीं याबद्दल धर्मपाल साशंक झाला. कदाचित् नैमित्तिक कामाकाजाकरितांच तिची योजना असेल असाही विचार त्याचक्षणीं उत्पन्न होऊन धर्मपालानें आपली पहिली शंका थोडीशी कमजोर केली आणि ताबडतोब तो त्या मोलकरणीच्या मागोमाग तिच्या घरापर्यंत गेला.

गुणाई आपल्या घरांत गेल्यावर कांहीं वेळ बाहेर थांबून धर्मपाल बेधडक तिच्या घरांत शिरला. गुणाईनें त्याची पूसतपास करितां त्यानें तिला सांगितलें " बाई ! तूं आतां ज्या घरांतून दळण घेऊन आलीस त्या घरांतील नानाहेब गांवाहून परत आले काय ? "

धर्मपालाच्या प्रश्नास गुणाईनें उत्तर दिलें " होय; नानासाहेबबी आल्याती आणि त्यांची आई सगुणताई आल्याती. तुम्ही कोन् ? तुमचं त्यांच्याकडं काय काम हाय ? "

यावर धर्मपालानें अशी बतावणी केली कीं " नानाचा व माझा परिचय आहे. मलाही एक दळण कांडण करणारी व भांडीकुंडी घासणारी बाई पाहिजे आहे. अशाप्रकारची बाई मला नाना मिळवून देणार आहेत ह्मणून तुला सहज विचारलें. "

गुणाईस कामाकाजाची अवश्यकता होतीच. ती लागलीच बोलली " मग ह्याला नाना कशापायीं पायजेती ? मी तुमचे काम करीन. कुनीबी झालं तरी मोल देणारच ! तुमी कां फुकट श्रम घ्याल ? आन् नाना तरी कां तुमास्नी कुनी मोफत मानूस गाठून देणार हायती थोडच ? "

गुणाई द्रव्याच्या नडीत आहे तेव्हां ती पैक्याला सहज भाळेलसें कल्पून धर्मपालानें लागलीच जवळचा एक रुपाया काढला आणि तो गुणाईपुढें छन् करशी वाजवून तिला ह्मटलें " पैशाबद्दल आपली तकरार नाहीं. काम मात्र इमानानें व वेळेवर केलें पाहिजे. "

धर्मपालास कामकरणीची बरीच जरूर असावी असें त्याच्या रुपाया देण्याच्या घाईवरून ताडून गुणाईनें सांगितलें " मी तशी लोकासारखी नव्हें बर कां ? नानासाबांच्यात मी दोन तीन दिवसांतली नवीनच हाय म्हणा ? पण या गांवांत समद्यांना मी ठाव हाय. तुमास्नी कुनाच नांव

सांगूं बगा; पण इकूत कशाला व्हावं; तुमचं मला घर दावा; तुमी स्वतः माझ्या कामाचा अनुभव तर पहा आंदि मंजी समदं समजत या. तशी लोकासारखी न्हवं बरं का. ”

आपल्या प्रथमच्या संशयाप्रमाणें गुणाई नानाच्या घरांत नवखीच आहे असें तिच्याकडून कळल्यामुळें आपल्या कल्पनेच्या अचुकपणाबद्दल कांहींसें बरें वाटून व गुणाईच्या अनुकूल भाषणानें स्वीकृत कार्यांत थोडेसें उत्तेजन आल्यासारखें वाटून धर्मपाल जरा जास्त उमेदीनें गुणाईस ह्मणाला “ अरे रे रे ! एकूण नानांच्या घरीं तूं नवीनच आहेस. ह्मणजे नाना मला कोणी दुसरीच बाई देणार होते वाटतें. ”

नानाच्या शिफारसीवांचून आपलें काम जाऊं नये ह्मणून गुणाई मिनतवारीनें बोलली “ नानांच्या घरीं मी दळणकांडाण नवतरच करूं लागल्यें हे खरं. पण त्यांच्यांतली मला समदीं ठायती हाय. आजपर्यंत त्येंच्या घरीं त्येंच्या सुनबाई घरींच दळीत. पण त्यें कांहीं येगळच कोयाड झालंया. सगुणाताई, गिरजावयनी, आबासाब यांनीं बोलबोलून सुलोचनेला ह्मायराला पिटाळली; ह्मणशानी दळणकांडाण भाइर आलया. नाहींतर व्हय; नांव कशाला काढता. त्यो ह्मातारा असा छट हाय कीं काय इचारू नका. ”

गुणाईच्या मुखांतून त्या प्रिय शब्दांचा उच्चार होतांच तेवढ्या चार अक्षरांच्या श्रवणानें आपलें श्रोत्रेंद्रिय पावन झालें असें धर्मपालास वाटलें. त्या प्रेमळ नांवाचा वारंवार उच्चार करावयास सांपडून आपल्याला सुलोचनेचा पवित्र जप घडण्याची संधी गुणाईनें आणून दिली ह्मणून गुणाईवर प्रसन्न झालेल्या धर्मपालानें आपल्या कुशल भाषणानें उलट तिलाच फसविण्याचा प्रयत्न करून बातमी काढण्याच्या मिषानें तो बोलला “ ह्मातारा कसा छट ? ती सुलोचनाच फार आडदांड होती. सुलोचना जर वडील माणसांच्या मर्जीनुसार वागती तर सुलोचना सगळ्यांना प्रिय होऊन सुलोचनेवर कोणाचाही राग न होता सुलोचनेचेंच सर्वांवर वजन राहिलें असतें. सुलोचनेनें घरांत धुसपुस चालविली; सुलोचनेनें सासूला शिव्या दिल्या; सुलोचनेनें सासऱ्याचा अपमान केला; सुलोचनेनें गिरजा आत्याबाईच्या चाहड्या केल्या. अशाप्रकारें सुलोचना ही अव-

खळ असून सुलोचनेच्या अवखळपणाबद्दल सुलोचनेस दोष न देतां सुलोचनेच्या सासूस, सुलोचनेच्या सासऱ्यास, सुलोचनेच्या आतेसासूस नांवें ठेवण्यांत काय अर्थ आहे इरें. ”

सुलोचनेच्या नांवाचा हा पंधरावेळ झालेला नामघोष ऐकून गुणाईस धर्मपालाच्या बोलण्याचें हसूं आलें. त्यांतील खरा भावार्थ ओळखण्याजोगें ज्ञान त्या कांडपिणीला कोठून असणार ? धर्मपाल नानाचा मित्र असल्याकारणानें तो साहजीकच त्यांचा कैवार घेऊन सुलोचनेला निंद्य ठरवीत आहे एवढें तिला समजलें. आबासाहेब व सुलोचना यांच्या मधील तेड काय आहे ती गुणाई जाणत असल्यानें तिला सुलोचनेच्या माथी मारलेले अपवाद न साहून ती धर्मपालास ह्मणाली “ तुह्मी आपल्या स्नेह्याच बाजूचें बोलणार; त्या सासुरवासिणीची बाजू कोण उचलून धरणार ? अहो; त्या थेरड्याचें चाळे तुह्माला ठाऊक कोठें आहेत. कोणाजवळ बोलूं नकाहो. ती गिरजाबाई येवढी ह्मातारडी झाली आहे; पण कसली खेळी आहे कीं कांहीं विचारूं नका. त्या टवळीचें तर सगळें हें कौसाल आहे. ”

सुलोचनेच्या अभिमानानें गुणाईच्या तोंडून हळू हळू गोपनस्फोट होऊन आपला कार्यभाग होणार अशी बरीच आशा वाटून धर्मपालानें तिला विचारलें “ कायगें, काय ह्मणतीस; हें सर्व लचांड आत्याबाईनें उभारलें ? सांग मला सविस्तर हकीगत तर सांग. ”

धर्मपालाची आग्रहपूर्वक विनंति ऐकून गुणाई सर्व मजकूर सांगण्यास उद्युक्त झाली. सुलोचनेचा घरगुती इतिहास कांहींसा घाणेरडा असल्यामुळें तो पुरुषाजवळ कसा बोलावा ह्मणून तिनें आरंभी आणखी थोडी घासाघीस केली. पण अखेर धर्मपालाच्या हट्टपूर्ण आग्रहावरून व ती बातमी गुप्त राखण्याच्या वचनावरून गुणाईनें सर्व वृत्तांत त्यास कथन केला.

आबासाहेबांचे चिरंजीव नानासाहेब हा कोणत्याही प्रकारें गुणानें, विद्येनें व शहाणपणानें व्यवहारदृष्ट्या कमी नव्हता. स्वरूपानेंही तो चांगला देखणा असून सुलोचनेवर त्याचें प्रेमही असे. सुलोचनेची आपल्या भ्रतारावर पूर्ण प्रीति होती. इतकेंच नव्हे तर ती सुशील मुलगी पतिव्रतेच्या शुद्ध व पवित्र आचरणानें संपन्न होती. नानासाहेब हा गुण-

संपन्न होता; तरी पण त्याचा स्वभाव अगदीं एककल्ली व थोडासा चिडखोर असे. त्याला दुसऱ्याची वाटेल तशी चेष्टा करण्याची मनापासून आवड असे. पण त्याच्या स्वतःवर दुसऱ्याकडून थट्टा मस्करीचा प्रयोग झाला तर तो लागलाच गोरामोरा होऊन एकेरीवर येई. आबासाहेब व गिरजाबाई यांची नानावर चांगली छाप असे.

आबासाहेबानें आपल्या मनगटाच्या जोरावर बरीच पुंजी साठवून ठेविली असल्यानें त्याचें सगुणाबाईवर चांगलें वजन होतें. सगुणाबाई माहेरची कंगाल असून स्वभावानें गरीब व सालस असल्यामुळें ती आबानांच काय पण आपल्या नणंदेला देखील तशा प्रौढ वयांतही वचकून असे. आबासाहेबांस चार पोरेंबाळें होऊन सुलोचनेएवढी सून आलेली होती. वयाच्या मानानें त्याची वृत्ति निवृत्तिपर बनावयास पाहिजे होती. परंतु, त्याच्या स्वभावाचा प्रकार अगदीं उलट होता. त्याची नजर अतिशय पापी व दुष्ट होती. तरुणपणापासून त्याला बाहेरख्यालीपणाचा मोठा छंद असे. स्वतःच्या वयमानाचा विचार न करितां त्याला तरुणीसमागम करण्याची पूर्वीप्रमाणेंच अद्यापही जबरदस्त हौस असे. स्वतःच्या जवळ पैक्याची ऊब असल्याकारणानें त्याला जनापवादाची पर्वा नसे. देहसार्थकाकरितां तो पूजा, स्नान, संध्या, देवदर्शन इत्यादिकांचें बंड दाखवी; पण या भोगछंदाच्या कामांत मात्र त्याचा सर्व धर्माचार गवाळ्यांतल्या गवाळ्यांतच अडकून राही. सुलोचनेचें अप्रतिम सौंदर्य, तिचें तारुण्य, तिचा मोहकपणा, तिचा चणचणीतपणा, तिची सदाचारवृत्ति या गोष्टींचा अभिमान धरून अशा स्नुषेच्या प्राप्तीबद्दल धन्यता मानावयाची टाकून तो बुद्धिभ्रष्ट झालेला थेरडा आबासाहेब विषयपर भावनेला हार जाऊन सुलोचनेशीं आपलें असलेलें श्वशुराचें नातें विसरला. आबासाहेब कन्येच्या ठिकाणीं असलेल्या आपल्या पुत्राच्या भार्येवर आषक्त झाले. त्यांनीं सुलोचनेला वश करण्याकरितां हरेक उपाय योजून पाहिले. कसल्याही प्रकारच्या मोहानें सुलोचना भुलत नाहीं व कोणत्याही तऱ्हेच्या कुशलतेस सुलोचना जुमानीत नाहीं असें पाहून आबासाहेबांनीं तिला भोंदण्याच्या कामांत आपल्या बहिणीचें ह्मणजे गिरजा आत्याबाईचें साहाय्य मागितलें. त्या चवचाल बोडकीनेंही सुलोचनेला आबांचें

माशुक बनविण्याची खटपट करण्याला बेधडक कंबर बांधली. गिरजाबाई सुलोचनेवर जास्तच प्रेम दाखवून हलकें हलकें तिचें मन भारण्याचा यत्न करावयास लागली. तिच्या लाघवी व छद्मी भाषणाची मात्रा सुलोचनेनें तिळमात्र चालूं दिली नाहीं.

आपण केलेला पाजीपणाचा व ताळतंत्ररहित प्रयत्न फसला यामुळें अगदीं मुंगळा लागून व तो प्रकार उजेडांत आला असतां आपलें तोंडास कायमची काळोखी लागून नानाचें व आपलें जन्माचें हाडवैर लागून राहील. या भीतीनें त्या बहीणभावांनीं सुलोचनेस एकदां भ्रष्ट तरी करावयाची किंवा तिनें आपला हेका नच सोडला तर उलट तिच्यावरच कांहीं भलतें किटाळ रचून तिला सासर वर्ज करावयाचें असा अखेरचा विचार ठरविला. सगुणाबाई व नाना घरांत नाहींत असें पाहून एके दिवशीं त्या अविचारी व काळीजशून्य आबासाहेब नांवाच्या झोटिंगानें व गिरजा नांवाच्या डांकिणीनें आपल्या योजलेल्या बळीवर झडप मारण्याचा डांव साधला; पण तो चांगलाच गळ्यांत आला.

एके दिवशीं सुलोचना दळावयास बसली असतां गिरजाबाई कांहीं कामाच्या निमित्तानें बाहेर जाण्याचें मिष करून माडीच्या जिन्यांत छपून बसली. सुलोचनेचा एक हात जातें ओढण्यांत गुंतला आहे, दुसऱ्या हातानें ती वैरण घालीत आहे, व तोंडानें सुस्वरावर कांहीं गाणें गात आहे अशा प्रसंगांत आबासाहेबांनीं पाठीमागून अल्लाद जाऊन आपल्या सुनेच्या उमेदीच्या स्वभावगुणधर्मानुसार पुष्ट असलेल्या अवयवांची कठिणता चांचपून पाहिली.

चक्कीच्या घर्षणाच्या नादांत नादलुब्ध होऊन एकाग्र मनानें जातें फिरवीत असतां दंडाच्या खालून पुढील भागास आपल्या कंचुकीला अकस्मात स्पर्श होतांच स्त्रीधर्मास अनुसरून सुलोचनेनें एकदम किंकाळी फोडून मान मागें करून पाहिलें. आपल्याशीं मनुष्याच्या मनुष्यत्वास बाध आणण्यासारखें वर्तन करणारा प्राणी आपल्याला पितृतुल्य असलेला आबाच आहे असें ओळखतांच तिचें नेत्र त्या चांडाळाला पाहण्यापासून लज्जेनें परत मुरडले. परंतु, ती अभिमानी प्रमदा अबलेप्रमाणें लाचारपणानें स्वस्थ रडत बसली नाहीं. आबांचें सर्व रंग तिनें पुरतेपणें ओळ-

खले होते. आबांच्या सैतानी क्रीडेचा तिच्या हृदयांत संचय होऊन राहिला होता. स्वशुराकडून आजपावेतों झालेल्या अवमाननेच्या योगानें त्रस्त होऊन गेलेली ती अवमानित सुलोचना आबांच्या या पशुवत कृत्यानें नागिणीप्रमाणें खवळली. तिनें लागलीच जात्याचा खुंटा उपटून घेतला आणि आपल्या अपकार कर्त्याला त्याच्या बदकर्माचें योग्य प्रायश्चित्त देण्याकरितां ती वाघीणीसारखी आबांवर चाल करून गेली.

दुखापतीमुळें संतप्त झालेल्या सर्पिणीप्रमाणें फूत्कार करीत सुलोचना आपल्या मागें आली असें पाहतांच आबा वेगानें पळावयास लागला. आपण केलेल्या घोरतर अपराधाच्या जाणीवीनें आबांच्या पायांतील शक्ति हरण झाली. तुपाच्या जबरदस्त लालसेमुळें त्याची प्राप्ती करून घेण्याकरितां युक्तिप्रयुक्ति योजण्यांत आबांच्या अंगीं पुष्कळ धाडस होतें. पण दृष्टीला अवगत असणाऱ्या तुपाशेजारी अदृश्य स्थितींत स्थित असलेल्या बडग्याचें दर्शन झालें म्हणजे त्याच्यापुढें टिकाव धरण्याजोगें आबांच्या अंगांत धैर्य नव्हतें. म्हातारा पळतां पळतां उंबरठ्यांतच अडखळला. त्याच्या हृदयाचा धीर सुटून तो कांपावयास लागला आणि ओटीवरील जोत्याच्या पायरीवरून अंगणामध्यें धाडकन आपटला.

आपल्या अपराधाची क्षमा मागण्याकरितांच जणु काय त्यानें हा सुलोचनेस साष्टांग प्रणिपातच घातला. पण तेवढ्यानें तृप्त न होतां सुलोचनेनें आपल्या हातांतील खुंटा त्याच्या टाळक्यांत घातला.

या गोष्टीस चार सहा दिवस होतात तों सगुणाबाई व नाना घरीं परत आले. त्यांना आपल्याबद्दल भलतीच बातमी समजून घराचा नाश होऊन अब्रू जाऊं नये म्हणून आबा व गिरजा यांनीं नानाची व सुलोचनेची गांठच पडू दिली नाहीं. सुलोचना ही वाईट चालीची कृत्या असून तिचें बाष्कळ कृत्य आम्ही डोळ्यांनीं पाहिलें असें सांगून त्या दोघांनीं नानाच्या अंतःकरणास आग लावून दिली. नानानें लागलीच बायकोचा त्याग केला. आपल्या वडिलास उद्दामपणानें भलतेच शब्द बोलल्याबद्दल व त्यांच्या अंगावर खुंटा हांटल्याबद्दल नानासाहेबांनीं सुलोचनेस यथास्थित चोप दिला आणि वडील आणि आत्याबाई यांच्यांत मिसळून त्यानें आपल्या धर्मभार्येच्या पदरीं नसताच दोष

बांधून तिला घराच्या बाहेर वाटेल तसें स्वेच्छाचार करण्याकरितां ह्मणून लाथा मारून हाकून लाविली.

अशा प्रकारच्या इतिहासांतील सारांश गुणाईस माहीत होता. तो तिनें धर्मपालास इत्थंभूत निवेदन केला. या गुप्त वृत्तसारावरून धर्मपाल सुलोचनेविषयीं दयापर झाला. परंतु, आपल्या स्वतःच्या नाजुक इच्छेच्या सिद्धीस ही गोष्ट अनुकूळच आहे असें आपल्या मनाशीं अजमावून तो गुणाईशीं थापाथापी करून तेथून उठला आणि आपल्या चुकलेल्या शिकारीच्या पाठलागाकरितां लगबगीनें चालता झाला.

---

# प्रकरण १३ वें.

द्विचक्र नगरांत चोहोंकडे सांधी कोपऱ्यांत हिंडून सुलोचनेचा फार बारकाईनें तपास करण्यांत धर्मपालानें आणखी दोन दिवस दवडले. तिचा कांहीं एक सुगावा लागत नाहीं व लागण्याची आशाही दिसत नाहीं असें समजून तो पूर्णपणें निराश झाला. निराशाजन्य कमकुवतपणा आणि सुलोचनेच्या प्राप्तीची आसक्ती यांनीं त्याचें सर्व अवसान नाहींसें केलें. आतां तेथें राहणें ह्मणजे केवळ मूर्खपणा आहे अशी खात्री होऊन त्याच्या अंतःकरणांत घरीं जाण्याचा विचार जागृत झाला.

देदीकोटाकडे मार्ग रोखून तो वाट चालत असतां त्याच्या अंतःकरणांत सुलोचनेच्या संदिग्धतेबद्दलचा विचार पदोपदीं वावरत होता. रस्ता तुडवीत असतांना वाटेंत आढळणारा कोणी स्त्री वाटसरू दिसला कीं, तो सुलोचनाच असेल कीं काय असा त्याला भास होई. क्षणामध्यें त्याला असें वाटे कीं, द्विचक्रनगरांत पुन्हां परत जाऊन पुनरपि सुलोचनेचा शोध करावा. क्षणांत त्याचा असा विचार ठरे कीं, आनासाहेबांच्या घरीं बेधडक जाऊन सुलोचनेच्या माहेरचा पत्ता विचारून त्याच ठिकाणीं चालतें व्हावें. क्षणामध्यें त्याच्या मनांत अशी कल्पना येई कीं, नानासाहेबांशीं एकांतात प्रत्यक्ष मुलाखत घेऊन त्याला सर्व गुप्त हकीगत यथास्थित समजावून सांगावी. अशा करण्यानें नानासाहेब हर-

प्रयत्न करून सुलोचनेला हुडकून काढून तिला आपल्या कबजांत घेऊन खुशाल संसार करीत राहिल्यामुळें सुलोचना आपल्याला प्राप्त होणार नाहीं हें खरें; तथापि ती नुसती डोळ्यांनीं पहण्यास सांपडून नेत्रशांती तरी होईल. अशा कल्पनातरंगांत गटांगळ्या खात खात धर्मपाल मार्गक्रमण करीत असतां द्विचक्र नगरापासून सुमारें पंधरा कोश दूर येऊन पोंचला.

ती वेळ रात्रीची होती. येथून पुढील मार्ग अरण्यांतून होता. शुद्ध पक्षांतील द्वादशीचा चंद्र प्रकाशमान झाला असल्याकारणानें रजनीनें रुपेरी शालू परिधान केल्याचा भास होत होता. अरण्यांतील वृक्ष, लता, कांटेरीं झुडपें यांच्यावर चांदण्याची छाया पसरली असल्यामुळें तीं यथास्थितपणें दृष्टिगोचर होण्यास अडचण पडत नव्हती. हें अरण्य जुनाट वृक्ष, दाट झाडींत संचार करणारीं हिंसक श्वापदें, गांवोगांव हिंडून लोकांच्या घरावर दरोडे घालून त्यांचें वित्त हरण करणाऱ्या दरोडेखोरांच्या दऱ्या किंवा गुहा, ओढे किंवा लहानसान ओहोळ यांच्या ओलसरपणाचा आश्रय करून राहणारे जुनाट सर्प अशा प्रकारच्या भीतिप्रद परिस्थितीनें युक्त नव्हतें. तें अरण्य ह्मणजे ओसाड असें माळरान होतें. भोंवतांना डोंगराचे लहान लहान कडपे असून त्यामधून वाट काढलेली होती. त्याच्या आसपास मैल दोन मैलावर लहान लहान खेडीं असून त्यांतील लोकांपासून पथिकांस उपद्रव पोंचण्याचा संभव असे. रस्त्यानें जाणाऱ्या येणाऱ्या गाड्या व पायींच चालणारे प्रवासी यांना गांठून खेड्यापाड्यांतील बुभुक्षित भुरटे लोक या सडकेला वाटमारी करीत असत.

सुमारें तीन तास प्रवास केल्यानंतर धर्मपाल एका उतरणी शेजारी येऊन पोंचला. येथून पुढें रस्ता फारच अरुंद असून अतीशय वरंगळतीचा होता. ही सखल पायवाट पळत पळत उतरून जाऊन धर्मपाल एका ओढ्यानजीक पोंचला. उजव्या हातास स्वच्छ पाणी झुळुझुळूं वाहत होतें. डाव्या हातानें ओढ्याच्या कांठानें मळलेली वाट दिसत होती. ओढ्याच्या किनाऱ्यानें दगडागोट्यांतून ठेंचाळत चालता चालता धर्मपाल थकून गेला. या वेळेस रात्रीचे बारावर दोन वाजण्याचा सुमार होता.

वाटचालीनें पाय मट्टचाला येऊन वाळू आणि खरबरीत दगड यांच्या-योगानें ते आणखी हुळहुळे झाल्यानें धर्मपालास थोडी विश्रांति घेण्याची अवश्यकता वाटूं लागली. सकाळ होईपर्यंत निरुपद्रवी अशी आडोशाची जागा सांपडली तर बरें होईल असें चिंतन करीत तो विस्तृत अशा झाडा-वर अगर ओढ्या भोंवतालच्या पुढें टोंकें आलेल्या डगरीवर दृष्टि ठेवून रेंगाळत पावलें टाकूं लागला. चारपांचशें पावलें टाकल्यानंतर त्याला एक लहानसें देऊळ दिसलें. हें देवालय ह्मणजे तीन चार खणाची एक पडवी होती. याच्या तीन्ही बाजूंच्या भिंती पक्क्या विटाच्या रचलेल्या असून त्या चुन्यानें पांढऱ्या केलेल्या होत्या. दरवाजाचें अंग अगदीं मोकळें होतें. त्यास दार बीर कांहीं एक नव्हतें. तोंडाच्या बाजूनें धर्म-पाल त्या देवळांत गेला. चांदण्याचा प्रकाश आंतील अंगास पडण्या-जोगता त्या देवळाच्या तोंडचा भाग साधलेला नव्हता. देवळाचा दरवाजा ह्मणून जी जागा उघडी राखली होती ती जर उलट दिशेस असती तर त्या चौखणाच्या पडवींत उजेडच उजेड झाला असता. पण तें संधान राखलें नसल्यामुळें धर्मपाल आंत शिरला तों तें देवालय अंधारमय होतें. बाहेर चंद्रप्रकाश असल्यानें आंतील भाग जरी अस्पष्ट दिसत होता तरी आठदहा घटका त्या स्थलीं झोंप घेणा-रास खालची भुई साफसूफ करून निजण्याकरितां तेथें जास्त उजे-डाची जरूर सहजच भासणारी होती.

धर्मपालानें आपल्या जवळ प्रवास करीत असतां ज्या अवश्य वस्तु बाळगिल्या होत्या त्यांत दिव्याबत्तीची सोय होती. त्यानें दिवा लाविला आणि जवळच्या गाशावजा बसकरानें थोडीशी जागा लोटून तें हंतरून त्याजवरच तो बसला.

दिव्याच्या स्वच्छ प्रकाशाची चांदण्याच्या धुकेवजा उजेडास मदत मिळतांच त्या देवळाचा आंतील भाग नजरेला स्पष्टपणें दृश्यमान व्हाव-यास लागला. धर्मपालानें दरवाजाच्या सामनें तोंड करून पाहिलें तों भिंतीच्या बरोबर मध्यावर एक मोठा थोरला कमानदार कोनडा कोरलेला असून त्यांत भवानीची एक मूर्ति बसविलेली आहे असें त्याच्या नजरेस पडलें.

हें एखाद्या सटवाईचें देऊळ असावें किंवा शेतकरी लोकांनीं शेतांच्या संरक्षणास साहाय्य करणारी म्हणून एखाद्या देवतेची दैवत म्हणून या ठिकाणीं स्थापना केली असावी; अशी कल्पना करून तो जाग्यावरून उठून देवीच्या सन्निध गेला. देवीपुढें हात जोडून त्यानें आपल्या उजव्या हाताच्या कोपऱ्याकडे सहज पाहिलें तों तेथें कोणी तरी निजलें आहे असें त्याच्या नजरेस आलें. हा देवीचा कोणी भोप्या असेल असें वाटून त्या देवळाची चौकशी करण्याकरितां व आपल्यालाही जागती सोबत मिळविण्याकरितां धर्मपालानें त्या निद्रिस्थ मनुष्यास मोघम हाका मारून पाहिल्या. हाकावर हाका मारल्या तरी तो झोंपी गेलेला मनुष्य हूं कां चूं करीत नाहींसें पाहून धर्मपालास त्याच्या निद्रेच्या गाढपणाबद्दल आश्चर्य व थोडा त्रास वाटला. हाकांचा मोघमपणा सोडून देऊन धर्मपाल कांहींतरी नांवानें स्वर मोठा करून त्याला पाचारण करूं लागला. इतकें झालें तरी देखील तो जागा होत नाहीं त्याअर्थी त्याची झोप लुच्चेगिरीची आहे असें आपल्याशीं ठरवून धर्मपालानें त्या निद्राणाला हातानें हालवून त्याचें वस्त्र ओढून फेकून दिलें.

आपल्या शरीरावरील पांघरूण काढतांच तो झोंपलेला मनुष्य दचकून उठल्यासारखा बसला राहिला. हाताच्या मुठीनें डोळे चोळून आपलें अस्ताव्यस्त झालेलें नेसतें वस्त्र सावरून तो ताडकन् उठला आणि धर्मपालाकडे तोंड करून उभा राहिला.

तो देदिप्यमान चेहरा दृष्टीस पडतांच धर्मपालाचे नेत्र दिपून गेले. त्या तेजःपुंज चेहऱ्याच्या प्रभेनें तेथील दिव्याचें तेज निस्तेज होऊन तो नुसता पिवळसर जोतीनें युक्त दिसूं लागला. जिच्या करितां आपण अविश्रांत श्रम केले, जिनें आपली तहान भूक हरण करून टाकली, जिनें आपल्या अंतःकरणास अपरिमित कष्ट दिले, जिनें आपल्या चित्ताच्या चिंध्या करून आपणास शेकडों ठिकाणीं पायपिटी करावयास लाविलें, जिनें अखेर आपली निराशा करून नैराश्यतेच्या वणव्यानें आपला प्राण कासावीस करून सोडला; ती गोजीरवाणी सुलोचना अकस्मात दृष्टीस पडतांच धर्मपालाचें हृदय ब्रह्मानंदानें भरून गेलें. सुलोचनेच्या वदनचंद्रानें धर्मपालरूपीं चकोरास प्रेमाचें भरतें आलें. अनेक

जन्म तपश्चर्या करणाऱ्या साधकास पूर्ण निराश बनल्यावर एकाएकी एखादी सिद्धि प्राप्त व्हावी त्याप्रमाणें सुलोचनेच्या प्राप्तीनें आपलें सर्व अनुष्ठान सिद्ध झालें असें वाटून धर्मपाल परमेश्वराच्या कृपेबद्दल त्यास मानसिक स्तुतीनें स्तवूं लागला.

सुलोचनेनें धर्मपालास ओळखलें. आपली बाजू तोलून धरून आपल्या सासऱ्याशीं वाद घालणारा उपकारी पुरुष हाच होय. असें सुलोचनेला पक्कें स्मरण झालें. तिची भावना पूर्णपणें शुद्ध असल्याकारणानें ती निष्कपटभावानें धर्मपालाकडे बघत स्तब्ध उभी होती. धर्मपालाच्या अंतःकरणांत आपल्याविषयीं भलतीच वासना वास करीत असून तो आपल्या सौंदर्यास भुलला आहे ही गोष्ट त्या बिचारीच्या स्वप्नींही नव्हती. सासरच्या माणसांनीं आपला त्याग केल्यामुळें आपल्यावर आकाशच कोसळलें. अशा स्थितींत धर्मपालाच्या साहाय्यानें आपल्याला सुरक्षितपणें माहेरी जातां येईल अशा आशेनें सुलोचनेस धर्मपालाची भेट हा ईश्वराचा प्रसादच वाटला. कांहींशीं अवसानयुक्त होऊन ती दुःखानें गांजलेली प्रधूपिता प्राश्रित होऊन धर्मपालास विनयपूर्वक वाणीनें ह्मणाली " प्रिय बंधो; आपलें नांव, गांव वगैरे कांहींएक मला ठाऊक नाहीं. एके समयीं आपण माझा पक्ष धरून माझ्या मामंजींना दरडावलें व त्याचवेळीं आपण मजबद्दलची कळकळ व्यक्त करून दाखविली हें माझ्या चांगलें ध्यानांत आहे. त्या वेळेच्या आपल्या वर्तनावरून व काळजीच्या उद्गारावरून आपण माझ्याशीं जें बंधुत्वाचें नातें जोडलें तेंच कायम राखून या दीन अबलेस तिच्या आईबापाकडे पोंचती कराल अशी मला आपल्या दर्शनानें आशा उत्पन्न झाली आहे. "

त्या नाजूक कंठानें युक्त सुलोचनेच्या मुखांतून या मधुर शब्दांचा उच्चार होतांच धर्मपाल प्रसन्न झाला. तिच्या वाणींतील अमृतांश श्रवणद्वारानें प्राशन करून धर्मपालानें भाषण केलें " सुंदरी; तूं सांगशील ती सेवा करण्यास हा धर्मपाल एका पायावर तयार आहे. हा तुझा दास आहे, सेवक आहे, गुलाम आहे; तूं मला वाटेल तो हुकूम कर. पण तेवढा पहिला संबोधनात्मक शब्द परत घेऊन माझ्याशीं जोडलेलें बंधुत्वाचें नातें पार नाहींसें करून टाक. "

धर्मपालानें ज्या शब्दानें तिला संबोधिलें त्या शब्दांतील अर्थ लक्ष्यांत घेऊन व त्याच्या पुढील भाषणांतील पापी धोरण ओळखून सुलोचना बोलली " दुःखानें त्रस्त झालेल्या परक्याच्या कुलकामिनीस संकटकाळीं शुद्ध बुद्धीनें हातभार लावण्यांतच खरा पुरुषार्थ आहे. आपत्काळाचा फायदा घेऊन आपद्ग्रस्त अबलेला अशुद्ध इच्छेनें अभद्रकारक वाणीनें दुखविणें हा शुद्ध नीचपणा आहे. "

सुलोचना वरकांतीं शारीरीक सौंदर्याप्रमाणेंच अंतर्सौंदर्यानेंही चमकणारी बायको आहे असें वाटून धर्मपाल कांहींसा पुन्हां उत्साहगलित झाला. परंतु, तिच्या अंगसंगावांचून जीव जड वाटावयास लागला असल्याकारणानें त्याची विपरीत भावना त्याला बोलावयास लाविल्यावांचून सोडीना. तिचा शब्द धरून त्यानें शब्दपांडित्य आरंभिलें " हे मनहरणी; तुझ्या गाढ आलिंगनाकरितां नीचपणा पतकरण्यास मला कशाचीही दिक्कत वाटत नाहीं. वाटेल त्या प्रकारचा हलकेपणा करावयास मी तत्पर आहे. मी तुझें संरक्षण करण्यासच काय पण मी तुझ्या बरोबर हव्या तसल्या आपत्ति भोगण्यासही सिद्ध आहें. तूं संनिध असतांना कोणत्याही आपदांच्या अंगांत मला क्लेश देण्याचें सामर्थ्य नाहीं. तुझ्याप्रमाणेंच मलाही तुझ्या भेटीमुळें जी एक प्रकारची आशा सफल होण्याची आशा वाटूं लागली आहे ती पुरवून तुझ्या संभोगार्थ भुकेलेल्या या धर्मपालाची कामक्षुधा शांत कर. "

धर्मपालाचें स्पष्ट, लज्जारहित व मानखंडणेचे गलिच्छ उद्गार ऐकतांच सुलोचना कावरी बावरी झाली. निर्जन अशा त्या स्थलांत रात्रीच्या वेळीं हा धर्मपालरूपी अजगर आपल्या अब्रूस गिळंकृत करावयास सरसावला तर आपली पवित्रता सांभाळण्यास कोण धावणार या विवंचनेनें व्यासक्त होऊन स्त्रीपणाच्या कमकुवतपणानें पुन्हां ती आर्जवानें ह्मणाली " आपल्या शब्दांतील उदात्तपणावरून मी आपल्या अंतःकरणाची जी परीक्षा केली ती सपशेल चुकली. मला वाटलें होतें तसें आपलें मन औदार्ययुक्त नसून नीचत्वानें परिपूर्ण आहे. आपल्या अंतःकरणांतील कठोरता व छांदिष्टपणा आपल्या भाषणांत असतां व भाषणांतील मृदुपणा व उदारता अंतःकरणांत असती तर फार चांगलें झालें असतें.

आपल्या एकंदर चरित्रावरून आपल्या जिव्हेची कोमळता ही आपल्या अंतःकरणाच्या छद्मीपणाची सांगातीण आहे असें वाटतें. मी आपणास हात जोडून विनंती करते कीं, आपण माझ्याबद्दलची पापवासना सोडा. माझा छळ करूं नका; माझ्या मनाला जन्माचा चटका लागेल असें वर्तन करण्यास प्रवृत्त होऊं नका. माझ्यावर ज्या व्यसनाचा घाला पडला आहे त्यांत समाधान मानून दिवस काढण्यास माझ्या शुचिर्भूतपणाखेरीज मजजवळ अन्य कांहीं एक साधन नाहीं. आपल्या बावरलेल्या वृत्तीस विचारानें ताळ्यावर आणा. मी जातीची अबला, संकटांत बुडलेली; पण साध्वीच्या आचाराविषयीं लंपट आहे. ईश्वरास क्रोध येईल, पातिव्रत्य देवतेचा अपमान होईल व धर्माचा छळ होईल असें वर्तन करून आपलें कूल नरकांत लोटण्यास फुकट उद्युक्त होऊं नका. ”

त्या साध्वीव्रततत्पर महिमावतीच्या तोंडचा उपदेश ऐकून एखाद्या सुसंस्कृत मनाच्या माणसास शुद्ध प्रेमाचा पान्हा फुटला असता. विपत्काळींही सद्गुणपरावृत्त न होतां दुर्वर्तनाला सदाचारी बनविण्याच्या चातुर्ययुक्त वाचेनें संपन्न अशा स्त्रीस पाहून एखाद्या पापानें मोह पावलेल्या खऱ्या विद्वानानें सुलोचनेस भगिनी ह्मणून तिचा स्वीकार करण्यांत भूषण मानलें असतें. पण त्या कल्याणीचा उपदेश धर्मपालास रुचला नाहीं. त्याच्या अंगचें कौशल्य, त्याची विद्वत्ता, त्यानें संपादलेलें ज्ञान, त्यानें आकळलेली विद्या या सर्वांचा मदनाच्या सामर्थ्यापुढें पराजय झाला. कामविकारानें बेहोष होऊन त्यानें तिला सांगितलें “ प्रिये; हे माझे जिवलगे; तुझें सर्व ह्मणणें मला समजतें ! धर्म, सदाचार, सद्गुण, कुल इत्यादि सर्व गोष्टींच्या व्याख्या मला अवगत आहेत. पण त्या सर्व गोष्टी तुझ्या प्रेमापुढें मी तुच्छ समजतों ! तुझ्या भोगकामाकरितां आसक्त होऊन मी सर्व उज्ज्वल सद्गुणांची रक्षा करण्यास तयार झालों आहे. अधर्म, दुर्गुण, दुराचार, कुलकलंक यांनीं मजवर पापरूपीं तीक्ष्ण बाणांचा वर्षाव करून माझ्या शरीरांतून रक्ताचे पाट वाहविले तरी तुझ्या रतिसंयोगाकरितां तें सर्व मी पतकरीन. अशा प्रकारें तुझ्या प्रेमानें आकर्षण केलेल्या मला तूं आनंदानें मिठी

मार. एवढ्या अवजड गोष्टी पतकरण्यास मी केवळ तुझ्या प्रेमामुळें सरसावलों आहे. त्या अर्थी त्या प्रेमाची खरी किंमत ओळखून तूं मला रतिदान दे. याच्यापुढें तूं जर कठोरता व हट्ट धरशील तर माझा नाइलाज होऊन तें प्रेम माझ्या हातून तुजवर बलात्कार करवील. ”

इतकें बोलून धर्मपाल सुलोचनेच्या शेजारीं जाऊन त्यानें तिची हनुवट धरण्याचा यत्न केला. सुलोचनेनें त्याच्या हातास झिडकारिलें व ती जरा मागें सरली. धर्मपाल पुन्हां पुढें जाऊन तिचें चुंबन घेण्याकरितां आपलें मुख तिच्या मुखासरसें न्यावयास लागला. सुलोचनेनें डाव्या हातानें त्याला मागें रेटून आपला उजवा हात त्याच्या तोंडाआड धरिला. अशानें तो पुरुष आवरणार नाहींसें वाटून ती कोणाच्या तरी मदतीकरितां मोठ्यांना धावा करूं लागली. इतक्यांत धर्मपालानें जास्त नेट करून आपल्या तोंडावरील तिचा हात आपल्या डाव्या हातांत दाबून धरिला आणि उजव्या हातानें तो तिची हनुवट पुढें ओढून घेऊं लागला.

मदनलीलेच्या अशा त्या दंगामस्तीनें सुलोचना घामाघुम होऊन गेली आहे व धर्मपाल तिच्या हनुवरील हस्त काढून तिच्या वक्षस्थळास स्पर्श करण्याच्या बेतांत आहे इतक्यांत त्या देवळाच्या बाहेरून त्यांच्या कानावर असे शब्द आले “ धर्मपाला; सावध रहा; विचारापासून भ्रष्ट होऊ नकोस; एवढ्याकरितां तुला मनुष्यत्व प्राप्त झालेलें नाहीं. नरदेहाचें हें कर्तव्य नव्हे; मलिन कर्मापासून दूर सर. ”

या सूचक शब्दानें भानावर येऊन त्या स्त्रीपासून दूर सरण्याचें बाजूलाच ठेवून कोणी मनुष्य बाहेरून आंत येण्यापूर्वी एकदा मुखचुंबनसुख तरी पदरांत पाडून घ्यावें अशा बुद्धीनें धर्मपालानें सुलोचनेची मान डाव्या हाताच्या कवळांत धरली आणि सव्य हास्ताच्या पंजानें तिचें मुख उचलून तो मोह पावलेला धर्मपाल तिच्या गालावर किंवा ओठावर आपल्या ओठाची मुद्रिका उठविणार तोंच एक भव्य पुरुष दाण दाण पाय आपटीत त्या देवळांत शिरला आणि मेघगंभीर गिरेनें तो गर्जना करून ह्मणाला “ अरे दांडग्या; मागें हट; त्या स्त्रीला नुसता स्पर्श करशील तर येथेंच तुझे तुकडे होतील. ”

हे गंभीर शब्द कर्णरंध्रावर येतांच त्यांच्या मार्दवानें धर्मपालाचा सर्व

देह सुलोचनेपासून अलिप्त झाला. त्यानें त्या पुरुषाकडे दृष्टि फेंकली.

हा पुरुष शरीरानें मोठा धिप्पाड होता. त्याच्या मिशांचे मोठाले आंकडे त्याच्या रुंद चेहऱ्यास विलक्षण भव्यता देत होते. त्यानें आपल्या अंगांत पायघोळ असा लांबलचक पांढरा शुभ्र अंगरखा घातला होता. त्याच्या डोक्यावर सफेत रंगाचें भलें मोठें पागोटें असून अंगावर सफेत दुहेरी धोतर होतें. त्याच्या हातांत एक जाडीशी लांब काठी असून पायामध्यें कोराकरकरीत लाल जोडा घातलेला होता.

त्या धवलकांतीनें युक्त व महौजा, भव्य पुरुषास पाहतांच धर्मपाल गांगरून गेला. देवळांतील देवीनेंच आपला भ्रष्टाकार पाहून हा वेष धारण केला असावा किंवा सुलोचनेचा स्वधर्मच या रूपानें तिच्या रक्ष-णार्थ अवतीर्ण झाला असावा किंवा त्या अबलेचें तारण करण्यास सर्व-साक्षी देवाचा एखादा दूत उतरला असावा असा कांहीं तरी समज होऊन धर्मपाल घाबरला आणि तिरमिरी आल्यासारखा जमिनीवर आडवा होऊन बेशुद्ध झाला. सुमारें अर्धा तास त्याच निर्भान स्थितींत राहून तो पुन्हा शुद्धीवर येत चालला. चांगला सावध होऊन त्यानें चोहोंकडे अवलो-कन केलें तों त्याच्यावांचून त्याठिकाणीं कोणीही दिसेना. देवळाच्या बाहेर येऊन चारी दिशेला नजरेच्या टप्प्यांतील प्रदेशांत तो आपल्या नेत्रांनीं सुलोचनेचा व त्या अलौकिक पुरुषाचा पाठलाग करूं लागला पण व्यर्थ. सूर्योदय होऊन चांगलें दिसूं लागेपर्यंत व कांहीं भेदरलेल्या, कांहीं आश्चर्ययुक्त व कांहीं विचारमय अशा स्थितींत धर्मपालास त्या देवळांतच बसणें भाग पडलें.

---

# प्रकरण १४ वें.

उजाडल्यानंतर धर्मपाल त्या देवळांतून आपलें चंबू गवाळें घेऊन चालता झाला. वाटेनें त्यानें सुलोचनेचा बहुत छडा काढला; पण कांहींच थांग लागेना. तो धवल पुरुष कोण याबद्दल त्याच्या मनांत अनंत कल्पना घोळूं लागल्या. सुलोचना हातची गेली; आपण तिच्याशीं

श्रृंगारयुक्त भाषण करण्यांत व तिची समजूत घालण्यांत व्यर्थ काल दवडल्यामुळेंच आपण तिच्या संगमसुखाच्या आस्वादास फुकट अंतरलो याबद्दल अत्यंत कष्टी होऊन तो खिन्न मानस होत्साता देदिप्कोठास आपल्या घरीं येऊन पोंचला.

फार दिवसांनीं धर्मपाल घरीं आला हें पाहून सौमिनी व सुनीति यांना पराकाष्ठेचा आनंद झाला. धर्मपालानें घर सोडल्यानंतर सुमारें पांच सहा महिन्यांनीं सुनीति प्रसुत होऊन तिच्या पोटीं पुत्ररत्न उत्पन्न झालें होतें. यावेळीं धर्मपालाचा मुलगा सरासरी अडीच वर्षीचा झाला होता. त्याचें नांव त्रिविक्रम असें ठेविलेलें होतें.

सौमिनीनें त्रिविक्रमास आणून धर्मपालाच्या मांडीवर दिलें. स्वतःच्या पुत्राचें मुख पाहून धर्मपालास संतोष वाटला. त्यानें मोठ्या आवडीनें आपल्या पुत्राचें मुख चुंबिलें आणि लडिवाळपणानें कांहीं वेळ मुलग्याला खेळवून त्यास परत सौमिनी जवळ दिलें.

धर्मपालानें आपल्या प्रवासांतील ढोबळ हकीगती सांगण्यांत सौमिनी सुनीतिसह पांच चार महिने घरीं स्वस्थ बसून काढलें. एवढ्या काळांत सुनीती पुन्हां गर्भवती झाली.

आपली सून दुसऱ्यांदा गर्भार झाली हा विचार मनांत आणून सौमिनीनें घरांतील वाढत्या खर्चाबद्दल धर्मपालाजवळ गोष्ट काढली. धर्मपाल शहाणा व विद्वान होऊन आला होता हें त्याच्या सांगण्यावरून समजलें होतें. त्याच्या शहाणपणाचा व विद्वत्तेचा प्रत्यक्ष अनुभव पाहण्याचें सौमिनीस कारण नव्हतें व तसें असतें तरी ती गोष्ट तिच्या शक्तीच्या बाहेरची होती. धर्मपालानें पैका कमावून आणला आहे कीं नाहीं याच गोष्टीशीं सौमिनीचें कर्तव्य होतें. त्याच्याशीं एकांतांत सुखदुःखाच्या व प्रपंचांतील कारभाराच्या बातां करतां करतां सौमिनीस असें पक्कें कळून चुकलें कीं, पैशाच्या बाबतींत धर्मपाल गेला तसाच कोरडा ठणठणीत परत आला. या रिक्तहस्तें परत येण्यावरून सौमिनीनें त्यास पुष्कळ छेडलें. घरादाराची कांहींच शुद्ध न धरितां व मागली ओढ न राखतां धर्मपालानें जवळचा पैसा चैनीबारी उडवून प्रवास केला, प्रपंच वाढत चालला, व्यापारांत होणारी मिळकत पुरेनाशीं झाली या गोष्टींचे दाखले

देऊन सौमिनीनें धर्मपालास चांगलेंच झाडलें. धर्मपाल आतां कांहीं लहान नाहीं, त्याचें त्याला सर्व समजू लागलें आहे, उद्या आणखी दर वर्षास पोर होणार; लोकांनीं त्याच्या संजगणा कोठवर कराव्या वगैरे शब्द बोलून सौमिनीनें धर्मपालाचा फारच पाणउतारा केला.

सौमिनीनें आपणास तोंडचा घास घालून या सांप्रतच्या रूपास आणलें ह्मणून तिचा आपण मान ठेविला पाहिजे; हा भाग सोडून दिला तरी सामान्य दृष्टीनेंही तिचे शब्द अप्रिय असले तरी खरे आहेत, अशी खात्री होऊन धर्मपालास विशेष वाईट वाटलें. आपण ज्या हेतूनें प्रवासास गेलों तो बाजूलाच ठेऊन आपण भलत्याच नादांत पडून तीन वर्षांचा काळ फुकट लोटला असें त्यास त्याचें मन खाऊं लागलें. कोरडें ज्ञान व शब्दपांडित्य माध्यान्हकाळ भागवू शकणार नाहीं असें त्याच्या आतां ध्यानांत आलें. पैक्यावांचून सर्व गोष्टी व्यर्थ आहेत असा आपला ठाम सिद्धांत ठरला असतांना आपण मुद्दा सोडून भलतीकडेच वाहवलो असा त्याला पश्चात्ताप होऊं लागला; पण उपयोग काय ? सुलोचनेचें जें वेड त्याच्या हृदयांत भरलें होतें तें त्याचा पिच्छा सोडीना. पूर्वीच्या बेता-प्रमाणें बडा व्यापार, शेती करून द्रव्याची पैदास करावी हा विचार जेथल्यातेथेंच थांबून कांहीं अघटीत प्रकारानें आपणास एकदम द्रव्य-लाभ होईल तर फार बहार होईल असा विचार त्याच्या हृदयांत वरचे-वर उद्भव पावूं लागला. प्रवासांत ठिकठिकाणीं राहून त्यानें जें ज्ञान पैदा केलें तें लौकिकीं व नुसतें पुस्तकीं असल्यामुळें समयविशेषीं तें सहजच लटपटून गेलें आणि इंद्रियांच्या वेगपूर्ण धावेनें विषयाधीन होऊन सुलोचनेसारखी कामलता दृष्टीस पडतांच त्याचा ज्ञानवृक्ष समूळ उन्मळून पडला. धर्मपाल कामाच्या आहारी गेला. सुनीतिसारखी धर्मपत्नी सुखदुःखसांगातीण भोगवासना तृप्त करण्यास तत्पर असतां तो कामदेवाच्या कुटिल जाळ्यांत अडकून अगदीं कुचकामाचा बनला. घरीं आल्यानंतर द्रव्यार्जनाचा राजरोस मार्ग सुटून द्रव्याचा हव्यास उत्पन्न झाला. कामाच्या आधीनतेमुळें उत्पन्न झालेल्या आळसाची वृद्धि झाल्याकारणानें त्याची उद्योगशील वासना सुटून तो द्रव्यलोभाच्या वेड्या वाकड्या मार्गांत शिरला. अगणित द्रव्य आणि सुलोचना यांनीं

त्याचें अंतरंग व्याप्त झालें. त्याला दुसरें कांहींएक सुचेना. दिवसानुदिवस पैक्याचा तुटवडा येत चालल्यानें सौभिनी त्यास हरतहेनें बोले. तिकडे त्याचें लक्ष्यच जाईनासें झालें. तो एकांतांत मुग्धता धरून बसे. अचानक लक्ष्मी प्राप्त होण्याकरितां काय कुलंगडीं करावींत व सुलोचनेचा उपभोग घेण्याकरितां काय तंत्र योजावें याचें मनन करीत तो आठीप्रहर एकाग्रतेंत घालवूं लागला. काम, मोह, लोभ, तृष्णा यांची त्याच्यावर जबरदस्त झडपण बसली आणि सुनीतीच्या पोटीं दुसरा पुत्र जन्म पावेपर्यंत स्वतःस ज्ञानी, गुणी, विद्यासंपन्न, सर्वश्रुत व चतुर समजणाऱ्या धर्मपालानें सरासरी दहा महिन्याइतका काळ मनोराज्य करण्यांत आणि कुटिल कल्पनांची शक्याशक्यता ठरविण्यांत केवळ घरच्याघरीं बसून घालविला.

---

# प्रकरण १५ वें.

मनुष्याचें शरीर उभें आहे आणि अंतःस्थ वासनांचा उपशम झाला नाहीं तोंपर्यंत इंद्रियांची धांव बंद पडणें शक्य नाहीं. शब्द, रूप, स्पर्श, रस आणि गंध या पांच विषयांच्या ठिकाणीं वास्तव्य करणाऱ्या मोहांतील सामर्थ्यास न जुमानतां दृश्यभूतास नश्वर समजून श्रवण, नयन, त्वचा, रसना आणि घ्राण यांना मनाच्या दाबाखालीं ठेवून पंच कर्मेंद्रियांना कर्तव्याच्या मर्यादेबाहेर एक केसभर देखील सरकू न देतां ज्ञेय वस्तूंकडेच दश इंद्रियांची लय लावूनच आयुष्याचा काळ घालवावयाचा असा मनाचा ठाम संकल्प ठरण्यास मनावर ज्ञान व विज्ञान यांचें पूर्णपणें वर्चस्व असणें अत्यंत जरूर आहे. मनाची वृत्ति चंचल करून सोडण्याकरितां टपून बसलेल्या क्षुद्र विकारांचें वाढलेलें कीट ज्ञानजोतीनें जळून खाक होऊन चित्तचतुष्टय जर आरशाप्रमाणें स्वच्छ बनेल तर शब्दादि विषय व कामादि रिपु यांचें प्राबल्य नष्ट होऊन त्यांना मनुष्यापुढें हात टेकावे लागतील. अशा प्रकारची अचाट शक्ति उत्पन्न होण्यास अवश्य असलेलें वैराग्य, जगाच्या मिथ्यत्वाबद्दलची खात्री,

मनोलय, वासनोपशम, आत्ममनन, आत्मार्चन, आत्मनिरूपण, यांचा साक्षात्कार होऊन जीवनमुक्तता प्राप्त होणें ही गोष्ट अत्यंत दुर्घट असल्याकारणानें जो तो मनुष्य इंद्रियाधीन होऊन नश्वर सुखाकरितांच रात्रंदिवस काबाडकष्ट करीत आहे. अज्ञानपंकानें ज्यांचें चित्त लिप्त झालेलें आहे त्यांची दृष्टि आंधळी होऊन ते तर क्षणोक्षणीं विषयांच्या गर्तेत ठेंचाळून पडतांना दिसतात यांत कांहींच आश्चर्य नाहीं. कारण त्यांच्या ठिकाणचें अज्ञान हें कींव करण्यासारखें असल्यानें त्यांच्या हातून घडणारीं अनन्वीत क्रिया व दुष्कर्में हीं अंशतः तरी क्षम्य समजलीं जाण्याचा संभव आहे. परंतु, या विषयमोहांच्या साम्राज्यांतील आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही होय कीं, स्वतःस ज्ञानी व शहाणे ह्मणविणारे, अज्ञानी मनुष्यांच्या क्रियेस दोष लावून स्वतःच्या ज्ञानाचें दिग्दर्शन करणारे, लौकिकी मोठेपणाच्या मर्यादा आखून ठेवून त्याच्या आंत मनसोक्त धिंगाणा घालून मानवी मोठेपणाचा गर्व वाहणारे सर्व महाजन देखील निरनिराळया परिस्थितींत विषयमोहाच्या लगामांतच अडकलेले दिसतात. एवढेंच नव्हे तर जीवन्मुक्तता, ब्रह्माचें सत्यत्व, आत्मानात्मविचार, आत्मस्वरूप, नरजन्माचें ध्येय, शुद्धकर्तव्य, कर्तव्यबद्ध शुद्धता, शुचिर्भूतधर्म, धार्मिक शुचिर्भूतपणा, दयापर औदार्य, औदार्यशील दयाभूतपणा इत्यादि गोष्टींचें प्रत्यक्ष प्रतिपादन करणारे व मोठमोठ्या उज्ज्वल प्रमेयांवर वाक्पांडित्याची झोड उडविणारे देखील विषयरूप नदीच्या विषयमय उदकाच्या मंडलाकार भ्रमणांत गरके खातानाच दृष्टीस पडतात. दोघांच्यांत तफावत इतकींच कीं, ज्ञानवान् मनुष्य आपल्या परिस्थितींतील निकडीचा पाठिंबा घेऊन उजळ माथ्यानें आपल्या ज्ञानाच्या योगानें आपली क्रिया समर्थन करून दाखवितो आणि अज्ञानी मनुष्यास दोष पदरांत घेऊन स्वस्थ बसण्यावांचून गत्यंतर नसतें. भिन्न भिन्न विषयांचे आवडीच्या वैचित्र्यानुसार ज्ञानवान् गृहस्थ परस्परास कमी अधीक ठरवून विषयाधीनतेंतील सरसनिरसपणा स्थापन करून स्वेच्छाचार करण्याची सवलत पद्धतशीर ठरवितात. मूलभूत व अस्सल सद्गुणांचा विचार पाहतां सर्वांच्या क्रिया एकाच जातीच्या असतात. जातींतील निरानिराळया प्रकारानुसार व मनावर झालेल्या

थोड्या बहुत संस्काराच्या नाजुकपणाच्या प्रमाणानुरोधानें वेगळाल्या कर्मांच्या भयंकरपणाचें मान कमीजास्त सांपडेल येवढेंच काय तें !

धर्मपालास एकदम श्रीमंत होण्याची इच्छा प्रबल झाली. सोन्यारुप्याच्या ढिगावरून आपणास कसें चालावयास सांपडेल, हिरेमाणकांत लोळण्याची आपली वासना कशानें सिद्धीस जाईल याचें चिंतन करतांकरितां त्याच्या मनांत भयानक विचार उत्पन्न झाले. कोणा धनिकाच्या घरावर गुप्तपणें दरोडे घालून आपण संपत्तीची जोड करावी, एखाद्या भोळसर, श्रीमंत बाईबापडीस विश्वासानें फसवून लाट मारावा, एखाद्या तालेवार धनाढ्याच्या घरीं लोभ लावून व विश्वास उत्पन्न करून त्याच्या घरांतील माणसांना भोंदून पैका लुबाडावा अशा प्रकारचे सहस्रावधी विचार धर्मपालास भुरळ घालूं लागले. धर्मपालाच्या मनावर विद्येचा जो काय थोडा बहुत परिणाम झाला होता व धर्मतत्वांच्या नुसत्या श्रवणानें त्याच्या ठिकाणीं जें पापभीरुत्व उत्पन्न झालें होतें त्यांच्या योगानें एवढ्या भयंकर धाडसास त्याचें मन तयार होईना. खेरीज श्रीमंतीच्या हावरेपणानें त्यास जिवावर उदार केलें नव्हते. स्वतःचा सुरक्षितपणा कायम राहील अशा बेतानेंच कोणतेंही कृत्य करावयास हात घातला पाहिजे हें तो समजून होता. तेव्हां असलें दुष्ट विचारापासून मागें सरून त्यानें दुसरीच कलृप्ति काढली. जारण मारणादि क्रियांची माहिती मिळवून वेताळ, झोटिंग वगैरे पिशाच्चें प्रसन्न करून घ्यावीं, अभिचार कर्मानें दैवतें आपल्या मुठींत आणावीं; मंत्रसाधनें करून, यंत्रांची सिद्धता करून, वशीकरण प्राप्त झालें ह्मणजे आपलें सर्वच कार्य भागेल असें मनांत कल्पून तो कोणी महामांत्रिक, देवऋषि, जादुगार यांच्या शोधार्थ गांवामध्यें टेहळणी करीत राहिला.

एका अमावास्येच्या दिवशीं रात्रीं बारा वाजण्याच्या सुमारास धर्मपाल आपल्या घरांतून बाहेर पडला. वद्य पक्षांतील शेवटची तीथ असून त्यांतल्या त्यांत नभपथ मेघांनीं आक्रमित झाल्याकारणानें काळोख इतका पडला होता कीं, डोळ्यांत बोट घातलें तरी दिसत नव्हतें. यामिनी उडुगणरहित असून आपल्या पतीशीं वियोग पावलेल्या विरहिणीप्रमाणें उदास दिसत होती. प्रपंचाचा व्याप संभाळण्याकरितां दिवसा

परिश्रम करून थकलेले प्राणी सुषुप्तीमध्यें घोरत पडले होते. चंद्रसूर्यांच्या प्रभेनें पृथ्वी प्रकाशित झालेली असतांना ज्यांच्या कपाळाला तिडीक चढते असें कृष्ण कारस्थानी घातक नरपशू व मांसादिकावर निर्वाह करणारे हिंस्र चतुष्पाद व अमंगल शब्द करून अनिष्ट सुचविणारे अशुभ पक्षी यांच्यावांचून अर्धसृष्टि निद्रानंदांत निमग्न होती. एखादा सालस मनुष्य कांहीं कारणानें बाहेर पडला असता तर त्याच्या दृष्टीस सर्व सृष्टी-सौंदर्यावर कृष्णवर्णाचें अंधकारमय वस्त्र पसरलें आहे कीं काय असें भासलें असतें. पाऊल उचलून टाकतांना पदोपदीं तो अडखळला असता; निशादेवीच्या उग्र रूपानें त्याचें अंत:करण भेदरून जाऊन मोठाले दगड, मातीचीं टेंगळें, उंच उंच झाडें, लहान लहान झुडपें, घरांच्या माड्या, देवळारावळांचीं शिखरें इत्यादिकांच्या ठिकाणीं त्याला भुताखेतांचें भास होऊन त्याची छाती धडधडावयास लागली असती.

अशा घोर आणि सुबद्ध निशाकाळीं बाहेर पडून धर्मपाल आपल्या घरापासून उत्तर दिशेच्या अंगाला सरासरी दोन मैल लांबीच्या अंतरावर जाऊन पोहोंचला. या बाजूला वस्तीचें प्रमाण जरासें तुटक होतें. घरा-घरांतील अंतर बरेंच असून वस्तीला चिकटूनच रानावनास व शेताभातास सुरुवात झालेली होती. या ठिकाणच्या जंगलांत भुतांचें वास्तव्य आहे; दर अमावास्येला वेताळ महाराजांची स्वारी वाजत गाजत निघते असा गांवामध्यें पुष्कळ बोभाट होता. त्या जागेच्या नजीक असलेल्या घरां-तील माणसांना वेताळाच्या वरातींतील घोड्यांच्या टापा, ढोल नौबदी यांचा भीषण स्वर, शिंगें, तुताऱ्या यांचा कर्कश आवाज नेहमीं ऐकू येतो; अशी दाट अफवा धर्मपालाच्या कानावर आलेली होती. या ठिकाणीं जाऊन वेतालराजाचें दर्शन घ्यावें व त्यास प्रसन्न करून घ्यावें अशा बुद्धीनें धर्मपाल त्या रोखानें चालला होता.

भुतांच्या राजाचें प्रत्यक्ष दर्शन घडलें ह्मणजे आपण घाबरून जाऊं कीं काय ? पिशाचाचीं मायावीं व ओंगळ स्वरूपें पाहून आपली बोबडी वळेल कीं काय ? वेताळानें कृपा केली असतां वरप्रदान मागून घेतांना आपण गडबडून जाऊं कीं काय ? अशाप्रकारच्या कल्पना करीत सावध-

पणानें पावलें टाकीत धर्मपाल एका मोठ्या वाड्याच्या संनिध आला तों समोरून कोणी मनुष्य येत असल्याचा त्याला संशय आला.

मनुष्याचा भास उत्पन्न होतांच धर्मपाल तेथेंच थबकून काळोखांत शक्य तेवढ्या बारीक नजरेनें त्या समोरून येणाऱ्या माणसाची हालचाल न्यहाळीत राहिला.

त्या मनुष्याच्या हातांत कंदील असल्याकारणानें आंतील दिव्याच्या गतीबरोबर त्या कंदील धरणाराच्या गतीचे चांगलें ज्ञान होत होतें. तो मनुष्य हलके हलके येतांयेतां त्या वाड्याच्या माडीखालीं थांबला.

ज्या माडीखालीं त्या रात्रिंचरानें आपली गति थांबविली ती माडी हा त्या वाड्याचा पिछाडीचा भाग होता. यावेळीं माडीच्या पांच खिडक्यांतून दोन खिडक्या उघड्या होत्या. यांपैकीं एका खिडकीखालीं येऊन त्या गुप्तगृहस्थानें आपला कंदील जमिनीवर ठेविला. त्यानें आपल्या अंगावर काळ्या रंगाचा पोकळ अंगरखा धारण करून तोंडावर बुरखेवजा टोपी घातलेली होती. पायघोळ पेहराव आणि टोपीच्या आकाराचें शिरस्त्राण यांच्या योगानें त्याचें सर्व शरीर आच्छादित झालेलें असल्यामुळें त्या कृष्णवर्ण प्रावरणाच्या आंत केवढा अघोर कृष्णकारस्थानी देह लपलेला आहे, याचें लांबच्या नेत्रांना ज्ञान होण्यासारखें नव्हतें. त्याचे लुकलुक करणारे प्रभायुक्त डोळे व नाक एवढें मात्र उघडें होतें.

त्या राक्षसी पुरुषानें दिवा खालीं ठेवून आपल्या अंगरख्यांतून एक पंचासारखें वस्त्र बाहेर काढलें आणि तें उलगडून आपल्या दोन्हीं हातांनीं खिडकीखालीं पसरून धरिलें. हें कृत्य होऊन सुमारें दहा सेकंदें गेलीं असतील नसतील तोंच खिडकींतून कांहीं वस्तु त्याच्या पदरांत पडल्या. त्यानें लागलीच त्याच वस्त्रांची गाठोडी बांधली आणि तो आल्या वाटेकडे परत फिरला. त्यानें पांच पंचवीस पावलें टाकलीं असतील इतका वेळ जातांच खिडकीची दारें लावून घेतल्याचा आवाज झाला. त्याबरोबर खिडकीकडे नजर फेकून धर्मपालानें आपली जागा सोडली आणि तो धोरणानें त्या वाड्याखालीं येऊन त्यानें त्या घरास आपल्याला समजेल अशी कांहीं खूण करून ठेविली. इतका प्रकार झाल्यानंतर धर्मपालानें समोर नजर टाकली तों कंदील बराच दूर गेला आहे असें

त्याच्या नजरेस आलें. हा कंदीलवाला कोण असावा व त्यानें काय कारस्थान केलें असावें हें स्पष्ट समजावें ह्मणून धर्मपाल जरा जलदी करून त्या गृहस्थाच्या मागोमाग जाऊं लागला.

धर्मपाल त्या निशाचराचा पाठलाग करितां करितां ते दोघेजण गांवाच्या स्मशानभूमींत येऊन पोहोंचले. त्या अघोर कर्मी मनुष्यानें एका झाडाखालीं कंदील ठेविला आणि हातांतील गाठोडी खालीं ठेवून तो खालीं बसून तेथें जमीन उकरावयास लागला. धर्मपाल गुप्ततेनें राहून त्याचें सर्व कृत्य पाहत होता. त्या स्मशानवासी रात्रिजागरानें दोन हात खोल खळगा खणून तयार झाल्यानंतर बरोबर आणिलेली ती पुरचुंडी त्यांत सोडली आणि त्यांतून एक ठुशाचा उत्तम जोड व हिऱ्याच्या दोन पेट्या बाहेर काढल्या. दिव्याचा प्रकाश मोठा करून तो ते अलंकार त्याच्यापुढें धरून निरखून पाहूं लागला. कांहीं वेळ निरीक्षण झाल्यानंतर तो निशाचरीविद्यापारंगत साहसी मनुष्य ते दागिने त्या खळग्यांत टाकणार इतक्यांत दडून राहिलेला धर्मपाल वेगानें धांवत धांवत त्याच्या संन्निध आला आणि धाडसानें ओरडून ह्मणाला " चोरा, बदमाषा; केवढें तुझें हें साहस. अशा या निशीथसमयीं समंधाप्रमाणें स्मशानांत येऊन हे दागिने पुरून ठेवीत आहेस यांतील अर्थ काय ? तूं जिन्नस कोठून आणलेस हें मला माहीत आहे. याकरितां तूं जरी कोणाचें घर फोडिलें नाहींस तरी हे दागिने चोरीचे आहेत हें मी जाणतों. तुला वाटत असेल कीं तुझें काळोखांतील चोरटें कृत्य कोणीं पाहिलें नसेल. पण तुझा समज चुकीचा आहे. मी तुझ्या सारखा पाळतीवर आहे. त्या भव्य वाड्याच्या खिडकींतून तुझ्या साथीदारानें हे अलंकार खालीं तुझ्या पदरांत टाकतांना मीं आपल्या डोळ्यांनीं पाहिलें आहे. बोल तूं कोण आहेस बोल. "

हे खुणेचे व पटणारे शब्द ऐकतांच तो स्मशानमांत्रिक बावरला. आपला गुन्हा बाहेर पडून आपण आतां फासांत अडकणार या भावी भयानें त्याचा शक्तिपात झाला. कशीतरी थावराथावर करून धर्मपालास अनुकूळ करून घेऊन त्या प्रसंगांतून निसटलें पाहिजे असें मनांत ठरवून तो नम्रतेनें बोलला " तुह्मी ह्मणता तें सर्व कृत्य खरें आहे. पण त्यांतील

इंगित तुह्मास ठाऊक नाहीं. मी हे दागिने छपवून आणले आहेत; पण ही चोरी नव्हे. यांतील सर्वच अर्थ विलक्षण आहे. तुह्मी कोण हें जर मला समजेल व आपण शांतपणानें मला सामील व्हाल तर आपल्या अंगावर कांहींएक बाजू न येता आपला पुष्कळ फायदा होईल आणि माझें संरक्षण होऊन माझा डावही साधेल. ”

त्या मांत्रिकाची ही विनंति धर्मपालाच्या आयतीच पथ्यावर पडली. त्याच्या विनवणीस एकदम रुकार दिला असतां आपणही तसेच कोणी लफंगे आहों असें होऊन आपलें वजन राहणार नाहीं व आपलें पाणी जोखण्याकरितां त्यानें आपणास फायद्याची लालूच दाखविली असेल तर आपल्या संमतीनें तो आपणावर एकदम उलटून हात जाईल, हूय जाईल आणि शेवटीं धुपाटणें हातांत येईल अशा धोरणी समजुतीनें धर्मपालानें पहिल्या प्रथम निरपेक्षपणाचा खूपच आव आणला. आपल्या दरडावणीच्या भाषणानें त्यानें त्या पापकर्मतत्पराला अगदीं जेरीस आणलें. तो अगदीं काकुळतीस येऊन गरिबीनें करुणा भाकावयास लागला. तेव्हां केवळ भूतदयेच्या भिडेखातर ह्मणून धर्मपाल आपला बोज राखून त्या रात्रिंचरास अनुकूल झाला. त्या दोघांनीं संगनमतानें ते दागिने तेथें मातीआड करून ठेविले आणि ते त्या जादुगाराच्या घरीं निघून गेले. धर्मपालानें ती सर्व बातमी गुप्त ठेवावी याबद्दल त्या जांगुलिकानें त्यास ठरल्याप्रमाणें चारशे रुपये रोख मोजून दिले. आणि त्यांनीं एकमेकांची माहिती एकमेकास तांत्रिकरीतीनें समजावून सांगितली. धर्मपालानें सर्व रुपये चांगले सावधपणानें बांधून घेतले. परस्परांनीं या नवीन झालेल्या मित्रत्वाबद्दल आनंद व्यक्त केला आणि धर्मपाल तेथून निघून आपल्या घरीं जाऊन सुखानें निद्रानंदांत लोळत पडला.

---

# प्रकरण १६ वें.

आपल्या अभावाचा भोपळा फुटून आपलें बिंग बाहेर पडूं नये अशा हेतूनें आपलें सैतानी कृत्य छपविण्याकरितां ज्यानें धर्मपालास चारशे रुपये लांच भरिला व आपल्याला एक मदतगार पैदा केला तो गृहस्थ देहिकोठचाच राहणारा होता. त्याचें नांव रमलभारती असें असून तो मोठा वीरमंत्रवेत्ता होता. शाबरी ही त्याच्या घराण्यांत पिढ्यानपिढ्या चालत आलेली घराणेदाज विद्या होती. त्याच्या ऐंद्रजालिक मायेची चोहोंकडे फार प्रख्याती होती. महान खडतर असें मातंगयाग करून वेताळ, ब्रह्मसमंध व तशाच प्रकारचीं अघोर दैवतें प्रसंन्न करून ठेवल्याचा रमलभारतीच्या वाडवडिलांचा मोठा लौकीक असे. आपल्या मायिक कौशल्यानें या रमलभारतीनें मोठमोठ्या श्रीमानास, राजेरजवाड्यांसही भुरळ पाडली होती. अनेक तऱ्हेच्या सकाम व तमोगुणी स्त्रिया, कुलशीलसंपन्न अशा गर्भश्रीमंतांच्या बायका, त्याचप्रमाणें स्वतःस हुशार व बायकापेक्षां अधिक शहाणें व ज्ञानी समजणारे थोर व समंजस लक्ष्मीवान् पुरुष देखील या रमलभारतीच्या हातांतील अगदीं बाहुलीं बनलीं होतीं. त्यानें आपल्या गारुडाच्या प्रभावानें अनेक लोकांचीं अनेक महदाश्चर्यकारक कार्यें करून देऊन अपार द्रव्य कमाविलें होतें. हाच रमलभारती मागें वर्णन केलेल्या माणिकबोवांचा गुरु होय. यांच्याच तालमींत तयार होऊन माणिकबोवांनीं स्वतःचा देव्हारा माजवून जगवंचना चालविली होती.

रमलभारती हा वयानें चाळीसाच्या बेताचा दिसत असे. तो अंगापिंडानें तयार व भरलेला दिसे. त्याचें शरीर खादीचें व तालीमबाजीचें असल्यानें तो मोठा जिवट व कसदार भासे. त्याच्या देहाचा वर्ण काळा होता. परंतु, त्याच्या शरीरावर जो एक प्रकारचा तुळतुळीतपणा झळकत असे त्याच्या योगानें त्याची कृष्णवर्ण कांति कृष्णसर्पाप्रमाणें सळसळीत दिसे. त्याला स्वभावतःच दाढी वगैरे विशेष येत नव्हती. त्याच्या स्मश्रू साभ्यास्ती पण वळणानें छान ऐटबाज होत्या. त्यानें आपल्या पेशाच्या

आविर्भावाप्रमाणें जटाजूट वगैरे कांहीं राखलेलें नव्हतें. गाईच्या पावला-एवढी लांबसडक शेंडी व त्याच्या भोंवती चार चार बोटें संजाब एवढेंच काय तें त्याच्या शिरावरील वैभव होतें. त्याचा चेहरा नारिंगाइतपत गोलदार असून नाक अगदीं सरळ होतें. नाकाला शोभेल असाच भाल-प्रदेश असून गाल व हनुवट यांची ठेवण निमूळती व साधारणत: चिंचो-ळीच होती. त्याच्या डोळयांत मात्र विलक्षण तेज भरलेलें होतें. त्यानें प्रसन्न मुद्रेनें कोणावर नजर फेंकली असतां तींतील लकाकीनें कोणाचेही नेत्र दिपून गेल्यावांचून रहाणें मोठें दुर्घट काम होतें. त्याच्या नेत्रांतील मध्यबिंदूवर जी प्रभा चमकत होती तिच्या प्रकाशमय किरणांनीं त्याची काळीकुळकुळीत तेजोमय बुबुळें ह्मणजे लहान लहान कृष्णवर्ण शुक्राच्या चांदण्याच आहेत कीं काय असें क्षणभर भासल्यावांचून राहत नसे.

त्याची दंतपंक्ति शुभ्रवर्ण असून इतकी व्यवस्थित होती कीं, त्यानें स्मित केलें असतां त्याच्या ओठाच्या आंत एका शेजारी एक अशा रीतीनें चिकटून हंसांचीच ओळ बसल्यासारखें वाटे.

रमलभारती हा स्वभावानें मोठा विलासी असे. स्वच्छ व उंचीं वस्त्रें, सुगंधीं उंचीं उंचीं अत्तरें, सुवासिक पुष्पांचे गजरे यांचा त्याला भारी शोक असे. तो अंगावर मर्दानी अलंकार धारण करी व पोंवळमण्याची एक माळ सतत आपल्या हातांत वागवी. एखाद्या राजशाली पुरुषाप्रमाणें ऐटदार फेटा वापरण्याची त्याला मनापासून आवड असे. शिवाय रोज-रोज एकाच रंगाचें शिरोवेष्टन वापरणें त्याला पसंत नसल्यानें अनेक रंगांचें व निरनिराळ्या तऱ्हेचे किती तरी फेटे त्याच्याजवळ पडलेले असत. मोठमोठ्या लक्ष्मीपुत्रांच्या छांदिष्ट दयिता रमलभारतीच्या गुणा-वर व स्वरूपावर मोठ्या प्यार असत. गुप्त व नाजुक कामासंबंधानें त्याचा पुष्कळांशीं एकांतांत अगदीं निकट संबंध येई; पण लघळपणानें आपली किंमत करून घेणें त्याला खपत नसे. आपल्या लहरीप्रमाणें तो रमणीय रामांच्या बरोबर रतिरंग करण्यांत रममाण होत असे. परंतु, रतिलक्षास अगदीं दैवताच्या ठिकाणीं कल्पून तो स्वतःस त्याचा लीनदास समजण्यास नेहमीं नाखुष असे. तो स्वाभिमानी, महत्वाकांक्षी व स्वछंदवर्तनप्रिय असल्याकारणानें त्याला दुसऱ्याचा शिरजोरपणा, आर्जव, आढ्यता व तोरा मुळींच मानवत नसे.

अशा प्रकारच्या स्वभावानें युक्त असलेला रमलभारती धर्मपालास वचकणारा नव्हता. मोठ्या मोठ्या मी मी ह्मणविणारांसही तो मोजून नव्हता. मग यःकश्चित धर्मपालाची त्याच्यापुढें प्रतिष्ठा ती काय होती ? पण धर्मपालाच्या शब्दबाणांनीं त्याच्या नेमक्या वर्मावरच भेद केला होता. महा वणव्यामध्यें सांपडलेला भुजंग जसा लीन होऊन अहाळत राहतो, तद्वतच धर्मपालाच्या शब्दरूपीं जातवेदानें रमलभारतीची धांदल उडवून दिली. अगदीं योग्यवेळीं खुणेची गोष्ट सांगून धर्मपालानें त्याच्या पुढें जी भयप्रद भाषणाची खांच उघडून ठेविली तिच्यांतील गहन भीतीस गांगरून जाऊन पंकगर्तेंत अडकलेल्या मत्त मातंगाप्रमाणें रमलभारतीस धर्मपालापुढें हार खाऊन त्याला आपलासा करून घेणें भागच पडलें.

अपरात्रीच्या काळोखमय एकांतांत आपल्या घराच्या माडीवरील खिडकींतून जिनें रमलभारतीच्या पदरांत ठुशा व पेट्यांचे जोड फेंकून दिले ती भोगावती या संज्ञेनें युक्त होती. ती त्या वाड्याच्या मालकाचीच कंन्या असून सौंदार्य व तारुण्य यांनीं संपन्न होती. तिच्या नांवाप्रमाणेंच ती भोगवासनेस इतकी लोलुप असे कीं, एखाद्या आधाशी माणसाप्रमाणें तिला संयोगसुखाची तृप्तीच वाटत नसे. ती हस्तिनी जातीची स्त्री होती. स्वभावानें ती पराकाष्ठेची खाष्ट असे. ती लज्जावगुंठनरहित असून तोंडाळ, उद्धट, बेपर्वा आणि चवचाल असे. जार जारिणीशीं गोष्टी बाता करणें, वरचेवर अनोळखी परपुरुषाबरोबर हासत राहणें; चालतांना सदां पदर पाडणें, निऱ्या सरसावणें, पतीची अवज्ञा करणें, अशा प्रकारच्या दुर्भगेच्या ओंढाळ लक्षणांनीं भोगावती परिपूर्ण असल्याकारणानें तिच्या भ्रतारानें कंटाळून भोगावतीचा त्याग केला होता. भोगावतीचा बाप सुशर्मा हा कुटुंबवत्सल असून बराच तेगार बाळगून असे. बापाच्या स्थितिमानानुसार भोगावती कांहीं माहेरच्या माणसास जड वाटणारी नव्हती. परंतु, आपल्या कंन्येस तिच्या नवऱ्यानें टाकून दिलें या दुर्लौकिकाबद्दल सुशर्म्याला मनांत मोठा कमीपणा वाटत होता. पतीच्या ठिकाणीं चित्त ठेवून पतीशीं पतिव्रताभावानें वागून संसार करणाऱ्या स्त्रींपैकीं भोगावती ही नव्हती हें खरें असलें तरी स्वपतीनें आपला त्याग केल्यामुळें आपलें नाक खालीं झालें आहे ही गोष्ट भोगा-

वतीच्या मनाला खात होती. रमलभारतीच्या नादीं लागण्यांत तरी भोगावतीचा हेतु हाच होता कीं, आपला पति आपल्या ताब्यांत रहावा. वशीकरणाच्या लालसेनेंच तिनें रमलभारतीशीं सुरतसंयोग देखील चालू केला होता.

रमलभारतीची आपल्या घरादारांत ओळख होऊन घरोपा पडावा आणि त्याला आपल्या वाड्यांत येऊन हवा तसा धुडगुस घालण्यास सांपडावा या अंतस्थ उद्देशानें ती वरचेवर आपल्या गुरूकडे खेपा घाली व त्याच्या मंत्रसामर्थ्याबद्दल आपल्या बापाजवळ नेहमीं वाखाणणी करी.

सुशर्मा हा जवळ बरीच पुंजी बाळगून होता. देवघेवीचा व्यापार करून तो वर्षाच्या काठीं बरीच कमाई करी. त्याचा प्रपंच मोठा विस्तृत होता. त्याच्या कुटुंबाचा दहावीस माणसांचा गाडा सुरळीत चाललेला पाहून कोणाही सुजनास प्रेम वाटत असे. तो मनाचा मोकळा, हाताचा उदार, मनुष्यप्रेमी व मंडळीचा भोक्ता असे.

सुशर्म्यास प्रवीर या नांवाचा एक वडील बंधु होता. व्यापार व घरगुती व्यवहार सुशर्माच आपल्या अंगावर घेऊन पाहत असे. तरी वडीलपणास मान देऊन तो प्रवीराची मर्जी सांभाळण्यास व त्याच्याशीं आज्ञाधारकपणानें वागण्याबद्दल फार प्रेमानें दक्ष असे. ते दोघेजण एकत्रच होते. दोघांचा प्रपंचपसारा सारखाच होता. दोघांचा लौकिक, दोघांचा दरारा, दोघांचे स्नेही सोबती व दोघांचीं गुरुकार्यें यांत प्रतारणा किंवा भेदभाव कांहीं एक नव्हता. दोघांच्या स्वभावांत मात्र अलीकडे फार फरक पडत चालला होता. प्रवीराच्या मनांत द्रव्यलोभानें बराच गोंधळ उडवून दिल्यामुळें तो थोडासा कुढा व तुसडा बनला होता. त्याला किमया करण्याचा नाद लागला होता. त्याचा हा घरबुडविणारा छंद पाहून सुशर्मा आपल्या धाकटेपणास अनुसरून शक्य तेवढ्या व्याजोक्तीनें प्रवीराला खडकावीत असे. पण त्याचें सर्व बोलणें निष्फळ होऊन प्रवीर आपल्या नादांत जास्तच गढून गेला आहे असें दिसे. प्रवीराची ही प्रवृत्ति जाणूनच भोगावती घरामध्यें सदोदीत रमलभारतीचें गोडवे गाई, त्याच्या अद्भुतकृत्यांचें वर्णन करी आणि त्याच्याशीं परिचय करून त्याला घरीं आणण्याकडे आपल्या चुलत्याच्या अंतःकरणांत प्रेम उत्पन्न करण्यास झटे.

रमलभारतीच्या मायिक कृत्याचा प्रत्यक्ष अनुभव पहावयास जाण्याचें आपल्या काकाशीं आगाऊ ठरवूनच भोगावतीनें त्या जादुगाराच्या सुचनेवरून घरांतील ठेवणीतले दागिने त्याच्या पदरांत टाकलें होतें. भोगावतीनें रात्रीं इतक्या गुप्ततेनें जे दागिने रमलभारतीस आपल्या घरीं आणून त्याच्या पदरांत फेकले ते तिला दिवसाढवळ्या आपल्याबरोबर घेऊन त्याला चोरून नेऊन देताही आले असते. पण पुढें दाखवावयाच्या गहन कृत्याबद्दल अणुरेणु इतकीही शंका येऊं नये एतदर्थ ती एक आठवडा घरांतून बाहेर पडून रमलभारतीच्या भेटीसच मुळीं गेली नाहीं. आपण अगदीं संशयाच्या पार असावें ह्मणून इतका अट्टहास करण्याचें त्या दोघांत पूर्वींच ठरलें होतें.

रमलभारतीला ऐन पेंचांत गाठून त्याच्याजवळून चारशें रुपये घेऊन धर्मपाल घरीं आल्यानंतर दुसऱ्या दिवशीं धर्मपालास त्यानें खूण करून ठेवलेलें घर कोणाचें हें समजावून घेण्याची सहजच इच्छा उत्पन्न झाली. त्यानें प्रवीराच्या वाड्याशीं जाऊन बाहेरच्या बाहेर परस्पर सर्व बारीक चौकशी केली. सुशर्मा, प्रवीर, भोगावती, रमलभारती या सर्वांची बरीचशी हकीकत धर्मपालास व्यवस्थेशीर समजली. भोगावती व रमलभारती यांचा बारीक प्रेमाचा मजकुर ध्यानांत घेतांच खिडकींतून जिनसा फेंकणारा मनुष्य भोगावतीच असावी असा त्याचा तर्क पोहोंचला. भोगावतीची व जादुगाराची नाजुक लीला मनाला शिवतांच त्याच्या मनांत सुलोचनेची प्रतिमा उत्पन्न झाली. रमलभारतीच्या नादानें वागून त्याला प्रसन्न करून घेतला असतां आपल्याला द्रव्यलाभ होऊन सुलोचनेचीही प्राप्ति होईल असें वाटून त्याच्या हृदयांत रमलाबद्दल आदर उत्पन्न झाला. भोगावती ही भर्त्यानें त्यागिलेली आहे या बातमीवरून ती कदाचित् सुलोचना असेल व तिचें माहेरचें नांव भोगावती असेल अशी शंका उत्पन्न होऊन त्याच्या मनांत भोगावतीस समक्ष डोळ्यांनीं पाहण्याची आतुरता उद्भवली. किमयेची खटपट करणाऱ्या प्रवीराशीं ओळख करून त्याचा स्नेह कसा संपादावा व भोगावतीस पाहण्याकरितां तिच्या गृहांत काय निमित्तानें प्रवेश करावा या विवंचनेनें धर्मपालाचा पाठपुरावा केला. रमलभारतीचें गर्हणीय कारस्थान प्रवीरास कळवून त्याचा स्नेह संपादावा तर भोगावती व रमल-

भारती रुष्ट होणार. रमलभारतीच्या वशिल्यानें प्रवीराशीं मैत्री जोडावी तर त्यांच्या दोघांत घरोपा वाढूं देणें त्याच्या दृष्टीनें इष्ट नव्हतें. तेव्हां आतां काय करावें ? आपले दोन्ही उद्देश सफळ होण्यास काय मार्ग स्वीकारावा याचें मनन करितां करितां त्यानें प्रथम रमलभारतीच्या घरीं जाऊन त्याच्याशीं स्नेह वृद्धिंगत करण्याचा विचार कायम केला; आणि ज्या दिवशीं जादुगाराच्या पैशाचिक सामर्थ्याचा दाखला दाखविण्याकरितां भोगावती प्रवीरास त्या मृतभूमीकडे घेऊन जाणार होती त्या दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या बेतास धर्मपाल रमलभारतीच्या घरीं जाऊन हजर जाहला.

---

# प्रकरण १७ वें.

पूर्व संकेताप्रमाणें भोगावती व प्रवीर रमलाच्या घरीं दाखल झाल्यावर चार दोन घटका इकडल्या तिकडल्या गप्पागोष्टी झाल्या. या बाता खबलण्यांत धर्मपालाची प्रवीराशीं ओळख होऊन भोगावतीसंबंधाचा रिकामा संशय फिटला. भोगावतीचें गोजिरवाणें रूप पाहून धर्मपालाच्या कामवासनेस चेव आला. ती रमलभारतीचें प्रीतिपात्र असून काममत्त आहे या गोष्टीच्या स्मरणानें त्यास तिच्या प्राप्तीची आशा सहज संभवनीय वाटावयास लागली. यावेळीं वासनेचा उच्छृंखलपणा तसाच दाबून ठेवून तो पुढील कार्यावर नजर देऊन प्रवीराशीं जास्त सलगीनें गप्पाष्टकें करीत राहिला.

रात्र मध्याला येऊन पोंचण्याच्या सुमारास हा चौघांचा कंपू गांवाच्या महास्मशानांत जाऊन पोहोंचला. रमलभारतीनें जादुगारीस अवश्य तें सर्व सामान बरोबर घेतलें होतें. अंधाऱ्या रात्रीं स्मशान उठलें असतां प्रवीरादि मंडळीस अपाय घडूं नये अशा संकेतानें रमलानें लागलीच शेंदराचें एक मोठें गोलाकार चक्र आंखलें आणि त्यांत प्रवीर, भोगावती व धर्मपाल यांना बसविलें. नजरबंदीचे खेळ दाखवून आपल्या बरोबरच्या मंडळींना थक्क करण्याकरितां अवश्य त्या गोष्टींची पूर्व तयारी

रमलानें त्या स्मशानांत आधींच सायसंगीन करून टाकलेली होती. शेंद-राच्या मंडलांत ते तिघेजण स्थित झाल्यावर रमलानें अग्नि प्रदीप्त करून त्यावर दोन चार ओंझळी लोहबंदी ऊद टाकला आणि तोंडानें मंत्राचीं अक्षरें पुटपुटून त्या स्मशानमांत्रिकानें भुताखेतांना पाचारण केलें. आजू-बाजूस नजर फेंकून भोंवतालच्या झाडांवर रोख ठेवून तो भुतांशीं संभाषण करूं लागला. सुमारें अर्ध घटका नुसत्या वाऱ्याशीं भाषण करून त्यानें झाडावर निखारे मारण्यास सुरवात केली व अग्नीमध्यें सनकाड्या जोतीयुक्त करून तो झाडावर फेंकूं लागला. इतक्यांत त्या झाडांच्या पर्णांमधून अग्नि प्रज्वलीत होऊन मोठा जाळ दिसूं लागला. झाडांवरून अक्राळ विक्राळ पिशाच्चें खालीं उड्या झोंकूं लागलीं. कांहीं वेळानें जाळ नाहींसा झाला. रमलानें पुन्हां मंत्रोच्चार करितांच मोठमोठाले भुजंग त्या ठिकाणीं फूत्कार टाकीत संचार करूं लागले. अंगावर वीत वीत लव वाढलेले विशाल सर्प रमल लीलेनें पकडून हातांत उचलून घेई. अशा प्रकारचे नजरबंदीचे व दुसरे अनेक हस्तलाघवाचें प्रयोग दाखविल्यानंतर रमलभारती एका झाडाच्या बुंध्याशीं क्षणभर निश्चेष्ट बसला. नंतर त्यानें एक कर्कश किंकाळी फोडून आपल्या वायुरूपी गुप्तदूतास पाचारण करून प्रवीराच्या घरीं जाऊन कांहीं खुण आणून दाखविण्याची आज्ञा दिली. एक घटका चोहोंकडे उडीद फेंकण्यांत व हातांतील भारलेली कांडी आडवी तिडवी फिरविण्यांत जाऊन देऊन त्या वीरमंत्र्यानें तेथें पुरलेले दागीने एका मागून एक असे प्रवीराच्या अंगावर फेंकले. आपल्या घरांतील ठेवणीचे दागिने ओळखतांच प्रवीर अगदीं गुंग होऊन गेला. रमलभारतीच्या मांत्रिककर्माबद्दल त्याला पूर्ण विश्वास उत्पन्न झाला. त्याच्या अलौकिक सामर्थ्याबद्दल तो धर्मपालाजवळ स्तोत्र गाऊं लागला. आतां आपणास किमया खास साधणार या भरंवशानें त्यानें रमलास साष्टांग नमस्कार घातला. रमलानें त्याला अभय देऊन पोटाशीं धरिलें. धर्मपालास त्या जादुटोण्याचें कौतुक वाटलें. पण त्या दागिन्यांबद्दल मात्र त्याला कांहींच आश्चर्य वाटलें नाहीं. उलट त्या दागिन्यांच्या क्लृप्तिप्रमाणेंच भुतें, साप यांचें कांहीं तरी थोतांड असावें असाच त्याला संशय आला. तो संशय खरा खोटा कसाही असला तरी रमलभारती हा

मोठा मायावी, धोरणी, लाघवी व बीरमंत्री आहे व त्याच्या छंदानें चाललें असतां आपला आतोनात लाभ आहे अशी खात्री होऊन त्यानेंही आश्चर्ययुक्त होण्याचा बहाणा केला. बरीच रात्र झालीसें पाहून तो चौकडा रमलाच्या घरीं परत गेला. रमलानें तशा रात्रीस स्नान करून ओलेत्यानें आपल्या दैवताची दोन घटका डोळे मिटून आराधना केली. देवाचा प्रसाद वांटून रमलानें त्यांना आपआपल्या घरीं जाण्यास सांगितलें. जातेवेळीं ते तिन्ही दागिने बरोबर घेऊन जाण्याबद्दल त्यानें प्रवीरास सूचना दिली. प्रवीरानें भारतीला आपल्या घरीं येण्याचा आग्रह करून त्याच्याकडून ती गोष्ट कबूल करविली व धर्मपालाविषयीं पूर्ण स्नेहभाव व्यक्त करून दाखवून त्यालाही आपल्या घरीं येण्याची आदरानें विनंति केली. आपण दोघे आतां गुरुबंधु झालों व गुरूच्या प्रसादानें किमया साधली तर आपणांस कांहीं कमी नाहीं असें आश्वासन देऊन प्रवीरानें धर्मपालाशीं स्नेह जमवून टाकून दुर्व्यसनी माणसांचें व्यसनसाम्येंकरून सख्य किती जलद जमतें याचें प्रत्यंतर दाखविलें. जातेसमयीं तिघांनीं रमलास नमस्कार केला व त्याचा शुभकारक आशिर्वाद घेऊन ते तिघेजण आपआपल्या ठिकाणीं गेले.

---

# प्रकरण १८ वें.

प्रवीराशीं ओळखपाळख होऊन त्याच्या द्वारें धर्मपालाचा भोगावतीच्या माहेरीं शिरकाव होऊन घरांतील माणसांशीं घरोपा पडत चालला. तरी अखेर धर्मपालाचा सुशर्म्याशीं जास्त लोभ जडला. सुशर्म्याला नित्याच्या व्यवहारांत पैशाअडक्याची जरूर लागली म्हणजे धर्मपालच मोबदल्यावर त्याला हवेतितके रुपये थोड्या व्याजानें आणून देई. गांवांतील मोठमोठे सावकारलोकांजवळ धर्मपालाची पत असून त्याच्यावर त्यांचा लोभ असल्यामुळें ते लोक धर्मपालास दलाल या नात्यानें कमी व्याजावर वाटेल तेवढी रक्कम आनंदानें व लोभानें देत. कधीं कधीं फार अडचणीच्या प्रसंगीं धर्मपाळ सुशर्म्याला हातावर देखील रुपये काढून देई.

धर्मपालाबरोबरच भोगावतीच्या घरांत रमलभारतीचेंही चांगलें बस्तान जमलें. भोगावती व रमल हीं घरामध्यें धडधडीतपणें एकांतांत गुळगुळ गोष्टी बोलत बसत. हा प्रकार सुशर्म्याच्या ध्यानांत येत नसे असें नाहीं. पण आपला वडील भाऊही त्या कारस्थानांत आहे अशा समजुतीनें सुशर्म्याच्या मनांत त्यांच्या एकांताबद्दल भलताच संशय दृढ होत नसे. प्रवीर व भोगावती यांचीं मनें भारलीं जाऊन रमलानें त्यांना किमया व वशीकरण यांच्या नादानें वेडें करून टाकिलें. आज अमकें अनुष्ठान कर; उद्यां तमकें पाठ कर; परवां अमुक होम कर; तेरवां तमुक सांगता कर; असे खेळ सुरूं होऊन त्या प्रीत्यर्थ नित्यशः फार खर्च होऊं लागला. एखाद्या द्रव्यलोलुपाला सामुद्रिक सांगणारानें चार आठ आण्यावारीं राजपदप्राप्तीचें वचन दिलें ह्मणजे तो जसा ऋण काढून सण करण्यांत उमेद दाखवून जवळच्या असलेल्या द्रव्याचें वाटोळें करीत सुटतो तद्वत्च रमलाच्या नादानें प्रवीराची चित्तवृत्ति भ्रमित झाली. अपार सुवर्णाच्या प्राप्तीच्या भरंवशानें त्यानें रोजच्या रोज दिवाळी आरंभून लक्ष्मीच्या अनिश्चित् कृपाप्रसादापूर्वीं तिच्या अक्कासाहेबांचा निश्चित प्रसाद होण्याचा रंग मात्र संन्निध आणून ठेविला. प्रवीरानें अमुक रकमेचा हुकूम सोडावा आणि सुशर्म्यानें तेवढी रक्कम जवळ नसली तरी धर्मपालाच्या मध्यस्तीनें लोकांकडून आणवून खर्च करावी. या गोष्टीस सुशर्मा कंटाळला. आपल्याच्यानें आतां हें निभावयाचें नाहीं; सबब रमलभारतीचें आपल्या घरांतून कसें तरी उच्चाटण केलें पाहिजे असा संकल्प करून त्यानें ती गोष्ट धर्मपालाकरवीं हलकेंच भोगावती व प्रवीर यांच्या कानावर जाईल असें केलें. त्या दोन्ही पट्टशिष्यांकडून रमलास ती गोष्ट सहजच समजली. चार आठ दिवस तसेच जाऊं देऊन एके दिवशीं रात्रीं दहा वाजण्याच्या सुमारास रमलभारती सुशर्म्याच्या घरीं नाक धरून देवापुढें बसले. बारावाजण्याच्या सुमारास घरामध्यें निजानीज होऊन अगदीं सामसूम झालें. प्रवीर व भोगावती देवघराच्या बाहेर डुकल्या खात बसले होते. सुशर्मा ओसरीवर आंथरूण टाकून अर्धवट झोपीं गेला होता. इतक्यांत रमलभारतीनें आपलें ध्यान सोडून भयंकर किंकाळ्या मारण्यास व सारख्या उचक्या देण्यास

सुरवात केली. त्याच्या त्या धिंगाण्यानें प्रवीर व भोगावती घाबरून जाऊन ते त्यास घट्ट धरून बसले. त्यांच्या घाबऱ्या घाबऱ्या हाकांनीं सुशर्माही जागा होऊन त्यांच्या संन्निध प्राप्त झाला. गडबडीमुळें घरांतील इतर निद्रित माणसेंही जागीं होऊन देवघरांत डोळे चोळीत जमलीं. बोवाजीस काय झालें ह्मणून पाहतात तों रमलाच्या तोंडांतून लाळ गळत आहे; त्यानें डोळे भेसूर केले आहेत, व सर्व शरीर विगलीत होऊन तो झोकांड्या खात आहे. मधून मधून नखशिखांत थरथर कांपत आहे असें सर्वांच्या नजरेस आलें. त्याला अकस्मात पित्ताची लहर आली असावी, दाताची उचल होऊन त्याचा झटका आला असावा; उन्मादाचा प्रकोप झाला असावा अशा नाना कल्पनांनीं मोरआवळा, डाळिंबपाक, महाळुंगपाक यांच्या कथल्या भराभर सुटूं लागल्या. सूतशेखर, हेमगर्भ, त्रैलोक्यचिंतामणी या मात्रांचे वळसे सहाणेवर वाजावयास लागले. अचुक गुणकारीं चाटणें तयार होऊन दोन तीन रुप्याच्या वाट्या भारतीच्या तोंडाशीं येतांच त्यानें जोरानें दोन्ही हात झाडून वाट्या भुईवर पाडल्या आणि हात पाय ताठून आपल्या अवसानानें बसला राहून तो घुमावयास लागला. प्रवीर व भोगावती हे त्यास मोठ्या लळयानें ‘ महाराज, महाराज, ’ अशा हाका मारून सावध करावयास लागले. त्यांच्या हाकाकडे दुर्लक्ष करून महाराज जास्तच जोरानें घूत्कार करूं लागले आणि अंगाला आळोखे पिळोखे देऊन व हाताच्या पंजांची तिढी घालून बोवा घोगऱ्या व कापऱ्या स्वरानें बोलते झाले कीं, “ तुह्मी मला जाणत नाहीं; मला औषधोपचार कसला करिता ? तुमच्या घरांत विटाळशीचा विटाळ बाटवला जात आहे. याकरितां मला मुद्दाम प्रगट व्हावें लागलें. आज या अनाचारास्तव मी सर्व घराचा बळी घेतला असता; पण भारतीच्या तपःसामर्थ्यामुळें आज मीं गय केली आहे. ही विटाळाची गोष्ट खरी कीं खोटी याची चौकशी करा. ” इतकें सांगून भारतीबोवांनीं हाताची तिढी सोडली आणि मागल्या बाजूस उसळी मारून ते धाडकन् जमिनीवर निश्चेष्ट होऊन उताणे पसरले.

कांहीं वेळानें रमल सावध झाला. प्रवीरानें त्याच्या डोळ्यास पाणी लाविलें. भोगावती कोमट दुधाचा पेला घेऊन आली. तेवढा पेला मुका-

त्यानें वशाखालीं लवंडून भारती अस्पष्ट व हलक्या आवाजानें बोलले " आतां मला स्वस्थ पडूंद्या; मी चांगला सावध आहें. "

हे शब्द ऐकतांच प्रवीरानें भोगावतीच्या साहाय्यानें महाराजास माडी-वर नेले व मऊ गादी पसरून त्याजवर स्वस्थपणें निजविले. झालेल्या प्रकाराबद्दल तांत्रिक व किरकोळ वाटावाट करण्यांत घटका दोन घटका घालविल्या नंतर बाकीची सर्व मंडळींही आपापल्या बिछान्यांत शिरली.

सुशर्म्याला मात्र पुन्हां झोप लागेना. रमलाच्या अंगांत देवाचा, वास्तुपुरुषाचा किंवा निदान एखाद्या ब्रह्मसमंधाचा संचार झाला असावा याबद्दल त्याला जवळ जवळ खात्री वाटूं लागली. त्याच्या अंगांत येण्या-बद्दल आपल्याशीच भवति न भवति करण्यांत सुशर्म्यानें राहिलेली रात्र आंथरुणावर जागून काढली. सकाळ होतांच तो आपण होऊन धर्मपा-लाच्या घरीं गेला व त्याला रात्रीची सर्व हवाल समजावून सांगून त्याच्यासह आपल्या वाड्यांत परत आला. रमलाचा वृत्तांत ऐकून धर्म-पालही चकित् झाला. पण तो रमलाबद्दल प्रथमपासूनच साशंक अस-ल्यानें त्यानें घरांत कोणी विटाळशी असल्याचा तपास करून आपली खातरजमा करण्याचा घाट घातला.

धर्मपालाच्या या चातुर्यपूर्ण धोरणानें भारतीचा सत्यासत्यपणा कसो-टीस लागण्याचा चांगला झोक आला होता. पण, कालमहात्म्याच्या अगाधतेनें म्हणा अगर भारतीच्या सद्दीच्या जोरानें म्हणा, तपासाअंतीं सुशर्म्याच्या घरांत प्रवीराच्या धाकट्या सुनेनें विटाळ चोरल्याचें प्रत्ययास आलें. कावळ्याच्या सहज बसण्यानें ही ढाळी मोडली खरी; परंतु त्याच्यायोगानें भारतीची हाकालपट्टी होण्याचें बाजूस राहून उलट सुशर्मा देखील त्याच्या सट्ट्यांत पूर्णपणें सांपडला. त्याचा भारतीवर पूर्ण विश्वास बसला आणि भारतीबद्दलच्या आपण केलेल्या कुकल्पनांबद्दल त्याला पूर्ण पश्चात्ताप वाटावयास लागला.

प्रवीराच्या सुनेचें नांव दुर्भगा असें होतें. हिनें रजस्वलादोषाची कालवाकालव केल्याचा अनुभव कळल्यामुळें घरामध्यें सर्वांनीं तिच्यावर कटाक्ष धरिला. तिच्याशीं कोणी सरळ भाषणही करीना. ती सर्वांच्या दुस्वासाचा विषय बनली. सुशर्मा स्वतः तिला गांजीत नसे. पण तिच्या घरांतील गांजणुकीकडे दुर्लक्ष करून मौनपणाची संमती दर्शवी.

दुर्भगेच्या वेडेवेडे चारानें आपल्या किमयेला विघ्न होईल अशा सुचनेवरून रमलाच्या मसलतीनें एक मोठें दिव्य अनुष्ठान करून अनिष्ट शांती करण्याचें सर्वानुमतें ठरलें. या निमित्तानें मोठें थोरलें प्रयोजन करून ब्राह्मणभोजन करावयाचें, असंख्य सुवासिनी न्हावयास घालून त्यांच्या खणा नारळांनीं ओटच्या भरून त्यांना अन्नसंतर्पणानें तृप्त करावयाच्या असा बेत कायम झाला. या प्रीत्यर्थ लागणाऱ्या खर्चाकरितां सुशर्म्यानें धर्मपालाजवळ दीडहजाराची रक्कम हातावर कर्ज मागितली. धर्मपालानें लोभाच्या भिडेखातर ती गोष्ट कबूल केली.

सुशर्म्याचें चित्तही फंदी बनलें होतें; तरी त्याची सचोटी ढळली नव्हती. लोकांमध्यें त्याच्या घराबद्दल अप्रेम उद्भवलें होतें व नानाप्रकारच्या दूषणात्मक टीका होत होत्या, तरी सुशर्म्याचें वजन कमीं झालें नव्हतें. सुशर्म्याला रक्कम देण्याकरितां धर्मपालानें आपल्या एका सावकाराजवळ हातावर रक्कम मागितली. या सावकाराचें नांव केरूनाना असें होतें. केरूनानांचा धर्मपालाशीं सावकारी नात्याखेरीज खाजगत परिचय होता. धर्मपाल आपल्याजवळ जी एवढी रक्कम मागत आहे ती सुशर्मा व प्रवीर यांना हातावर द्यावयाची आहे असें समजतांच केरूनानांनीं धर्मपालास सावधपणा राखण्याचा उपदेश करून त्यांना कर्ज देण्याची भानगड न करणेंच बरें असें सांगितलें. केरूनानांचा न रुचणारा सल्ला ऐकून धर्मपालानें सुशर्म्याच्या प्रामाणिकपणाची फार शिफारस करून रकमेबद्दल आग्रह धरिला. सुशर्मा सत्याभिमानी असला तरी तो भलत्याच ढंगांत गुंगला असल्यानें त्याच्यावर विसंबणें बरें नव्हे असें सांगून केरूनानांनीं धर्मपालास मोडून काढलें. त्या कामांत व्याजाची बरीच कसर आपणास मिळेल असा झोक दाखवून धर्मपालानें केरूनानास वळविण्याचा पुन्हां यत्न केला. या युक्तीसही नाना हार जात नाहींत असें पाहून धर्मपाल अगदीं निर्वाणीवर येऊन ह्मणाला "यापेक्षां आमच्यावर तुमचा विश्वास नाहीं व आह्माला पैसे साफ द्यावयाचेच नाहींत असेंच स्पष्ट सांगाना ?"

धर्मपालाच्या तोंडून आलेला प्रश्न ऐकून नाना शांततेनें बोलले " तूं असें आह्माजवळ बोलूं नयेस. तुझा आमचा व तुझ्या

बापाचा व आमच्या वडलांचा लोभ काय होता तिकडे तूं लक्ष पुरविलें पाहिजेस. तुला योग्य ती गोष्ट सांगितली. बाकी रुपये काय तयार आहेत. तूं ह्मणशील तेव्हां घेऊन जा. ”

नानांचे थोरपणाचे उद्गार ऐकून धर्मपाल ओशाळला. पण पैसे देण्याचा मुद्दाच बलवत्तर असल्यानें तो पुन्हां निर्भीडपणानें ह्मणाला “ तुह्मांला मी आहेना ? मी ते पैसे कोणालाही दिले, मी तें कशांतही गुंतविले आणि त्याचे कांहींही झालें तरी तुमच्या रकमेस जबाबदार मी स्वतः आहेंना. ”

त्याच्या तोंडून इतका उच्चार होत आहे तोंच केरूनानांनीं वादग्रस्त प्रश्न आटपता घेतला व पैसे देण्याचें कबूल केलें. धर्मपालानें दुसऱ्या दिवशीं खात्यावर सही करून देऊन दीडहजार रुपये नेले आणि ते जसेच्या तसे सुशर्म्याच्या देखत प्रवीराच्या पदरांत मोजून टाकले. त्या संबंधानें थोडीशी कसर ठेवून व्याजाचा दर तोंडी सांगितला. त्याच्याबद्दल मोबदला, कागद, पत्र, नुसती दोन बोटाची पावतीही त्यानें घेतली नाहीं.

रुपयांची जमाजम होतांच रमलभारतीच्या मंगलदायक शांतीस सुरवात झाली. दहा अकरा दिवस एकसारखी खैरात चालून अखेरच्या दिवशीं सर्व समाप्ति होऊन दीडहजार रुपये चक्काचूर झाले. हा सर्व समारंभ रमलाच्या धोरणानुसार उरकण्यांत आला. आपल्या मसलती-प्रमाणें सुशर्मा देखील आपल्या जाळ्यांत सांपडला आणि ह्मणून हा सर्व उत्सह यथास्थित साजरा झाला. आतां आपणास प्रतिकार करणारा अगर आपल्यावर बोटें मोडणारा कोणी उरला नाहीं अशा समजानें रमलाचा हर्ष त्रैलोक्यांत मावेना.

---

# प्रकरण १९ वें.

सांगतेप्रीत्यर्थ झालेल्या समारंभांत धर्मपालानें अगदीं घरच्याप्रमाणें झटून अंगमेहनत केली. रमलावर त्याचा चांगला भरंवसा नव्हता; पण त्याच्या अंगांत येऊन त्यानें सांगितलेल्या गोष्टीचा ताळा पटतांच धर्मपालाच्या मनांतही रमलाबद्दल विश्वास उत्पन्न झाला. या सुमारास धर्म-

पालास तिसरा पुत्र झाला. आपला प्रपंच वर्षास वाढू लागला याबद्दल त्याला आतां फिकीर मुळीच वाटेना. कारण त्याला एकदम चारशें रुपये अचानक मिळाले होते व सुशर्म्याला कर्ज आणून देण्यांत व्याजाची कसर बरीच मिळे. खेरीज रमलाच्या प्रसन्नतेनें किमया यशस्वी होणार हा एक मनाला दम होता. पैशाच्या दृष्टीनें त्याचें मन शांत होतें. सुलोचनेबद्दल मात्र त्याला स्वस्थता नव्हती. पण रमलापासून वशीकरण प्राप्त झालें म्हणजे आपली तीही आशा सफल होईल अशी त्याला उमेद आली होती. दोहोंबाजूंनीं तो मनांत उड्या मारीत होता. इतक्या सुमारास अकस्मिकरीतीनें सुशर्म्यास कांहीं जबर आजार उत्पन्न होऊन तो निजधामास पोंचला. सुशर्म्याच्या मृत्यूनें धर्मपालास मित्रवियोगाचें मोठें दुःख झालें. परंतु सृष्टीधर्माच्या अव्याहत क्रमावर नजर देऊन त्यानें आपलें व सुशर्म्याच्या घरांतील मंडळींचें समाधान केलें.

सुशर्म्याच्या मरणानें प्रवीर पूर्ण स्वतंत्र झाला. आतांपर्यंत त्याच्या कामांत प्रवीराचा व्यत्यय नसे; पण त्याचें मत तरी घ्यावें लागे. आतां त्याचेही कारण संपलें. भोगावतीस बाप या नात्यानें वाईट वाटणें सहजच होतें. पण रमलाच्या प्रेमावर दृष्टि ठेवून तिनें पितृनिधनाबद्दल थोडें समाधानही मानलें.

रमलानें भोगावतीस मोहनीमंत्र देण्याचें कबूल केलें व तिच्याकडून सर्व साधन करून मंत्राचा रोज जप करण्यास सांगितलें. भोगावतीस मंत्रोपदेश होतांच प्रवीरानेंही किमयेकरितां रमलाला निकड लावली. व सुशर्म्याच्या तत्सतानंतर धर्मपालाच्या मदतीनें हिशोबाच्या वह्या तपासून पाहतां कीर्दीवर बरेंच कर्ज झाल्याचें ध्यानांत येऊन प्रवीरास किमयेवांचून कांहींच दिसेनासें झालें. रमलाच्या मागें प्रवीरानें किमयेचें सारखें दुद्दें लावलें.

किमयेसंबंधानें थोडें प्रत्यंतर दाखवून सुशर्म्याचें सर्व वित्त हरण करावें व त्याच्या हातांत करटी देऊन भोगावतीसह निघून पलायन करावें अशा विचारानें कांहीं तंत्राची योजना करण्यांत रमल चूर होऊन राहिला असतां भोगावतीचा नवरा जांबवान हा स्वशुराच्या परलोकप्रयाणाची वार्ता ऐकून आपल्या सासुरवाडीस आपण होऊन चांगुलपणानें आला.

प्रवीरानें त्याचा यथायोग्य सन्मान ठेवून भोगावतीच्या त्यागाबद्दल आपल्या मनांत कांहीं एक तेढ नाहीं असें दाखविलें. जांबवान स्वशुरगृहीं भलेपणानें आला. पण भोगावतीनें त्याच्या भलेपणाचा अर्थ भलताच केला. रमलानें आपणास जो मंत्र उपदेशिला त्याचेंच तें फळ आहे असें समजून ती रमलाबद्दल जास्त आदरयुक्त झाली. भोगावतीनें नम्रपणा दाखवून पतीला मोहण्याकरितां सदाचाराचें प्रदर्शन केलें. जांबवानासही पत्नीच्या ठिकाणीं झालेला फरक पाहून वृंदावन गोड झाल्यासारखेंच आश्चर्य वाटलें. जांबवानाची धर्मपालाशीं ओळख होऊन चेष्टामस्करीही व्हावयास लागली. भोगावतीचें चरित्र लक्षांत आणून धर्मपालास जांबवानाची फार कींव आली. भोगावतीसंबंधानें धर्मपालाची वासना पापयुक्त होतीच. पण भोगावतीसारखा भक्ष रमलासारख्या वाघाच्या पंजाखालीं असल्यानें धर्मपाल आपली इच्छा पोटांतल्यापोटांत दडवून प्रसंगाची वाट पहात होता. जांबवानरूपीं तीव्र कोयता हातांत सांपडला तर त्या रमलशार्दूलाचे पंजे तोडून त्याचा आहार पळविण्यास सांपडेल अशा बुद्धीनें धर्मपालानें विशेष आग्रह करून व प्रवीराकडून अगदीं गळ घालवून जांबवानास तेथें राहून घेतलें. बायकोच्या माहेरी मुक्कामच पडला तेव्हां हलके हलके जांबवान व भोगावती यांचा एकांत सुरू झाला. भोगावती व्यभिचारी होती. परंतु, तिच्या जारकर्माचा प्रत्यक्ष दाखला जांबवानास आलेला नव्हता. खेरीज फार दिवसांचा वियोग व भोगावतीनें सलामिलाच दाखविलेली सत्शील विनयसंपन्नता यांच्यामुळें जांबवानास बायकोबद्दलच्या सुरतप्रेमाची जागृती झाली. जांबवान भोगावतीवर शुद्ध प्रेम करावयास लागला ही गोष्ट धर्मपालास पुढील कार्यास फारच हितावह वाटली. जांबवान स्त्रीलंपट होत चाललासें पाहून भोगावतीस रमलाच्या मंत्राची फलद्रुपता प्रत्ययास येऊन ती अगदीं हुरळून गेली.

जांबवानाच्या सहवासामुळें रमलाबरोबर भोगावतीची रात्रीची मुलाखत बंद पडली. रमल जांबवानाचा मत्सर करूं लागला. ही गोष्ट धर्मपालानें जाणली. धर्मपालानें प्रवीराकडून रमलाला किमयेबद्दल सारखा जारीनें तगादा लावला.

रमलभारतीनें प्रवीराची कामना तृप्त करण्याकरितां त्याला किमयेची झांक दाखविण्याची सर्व तरतूद केली. एके दिवशीं रात्रीं रमलभारती आपल्या घरीं गेल्यावर दोन तीन दिवस प्रवीराकडे मुळींच आला नाहीं. तपासा अंतीं गुरुभारती आजारी असल्याची वदंता लागतांच प्रवीर व धर्मपाल त्याच्या घरीं गेले. भारती बिछान्यावर पडला होता. जवळच एक तस्त, शेगडी, व औषधाच्या पुड्या ठेवलेल्या असून त्याच्याच घरांतील कोणी बायकामाणसें त्याची सेवा चाकरी करीत होतीं. प्रवीर व धर्मपाल येऊन बसतांच बायामाणसें घरांत चालतीं झालीं. रमल उठून बसला. आजारासंबंधानें सांप्रदायपूर्वक प्रश्नोत्तरें होऊन भारती लवकर बरा होण्याची आशा वाटूं लागली. आजार उत्पन्न होण्याच्या आद्य कारणांचा उहापोह सुरू होतांच भारती बसल्या बसल्या सरकून आपल्या शिष्यांच्या अगदीं समीप गेला आणि बारिक शब्दानें ह्मणाला " माझा आजार हा देहधर्मानुसार उत्पन्न होणारा दोष नव्हे. हा नैमित्तिक दोष आहे. हा आध्यात्मिक ताप आहे. हा ईश्वरी कोपाचा परिणाम आहे. "

त्याचें भाषण संपतांच धर्मपाल आश्चर्ययुक्त होऊन बोलला " आतां ईश्वरी कोप कां असावा ? परमेश्वराच्या आराधनेप्रीत्यर्थ दीड हजार रूपये अकरा दिवसांत गारद झाले तरी ईश्वराचा क्रोध अद्याप शिलक आहेच. बराच आहे ह्मणावयाचा हा ईश्वरीकोप ! "

धर्मपालाचें थोडेंसें उद्वेगपूर्ण बोलणें श्रवण करून भारतीनें सांगितलें " तसें नव्हे. परवांच्या संतर्पणानें देवता शांत झाल्या यांत शंकाच नाहीं. ही तिसरीच क्षुब्धता आहे. ही आपण होऊन आपल्या अंगावर ओढून घ्यावयाची आहे. आपण मला जी निकड लावली आहे त्याबद्दल मी तलास करून पाहिला. अंजनाविधीनें असें कळलें कीं आपल्याच घरांतील मागल्या आवाडांत अपरंपार दौलत पुरलेली आहे; पण तिच्यावरील रक्षक जबरदस्त आहे. मी एके दिवशीं रात्रीं एकटाच त्याठिकाणीं जाऊन कुदळ घातली; पण मीच ह्मणून बचावलों. मला सोन्याच्या राशी दिसल्या; पण त्यांच्यावर ज्या जाज्वल्य समंधाचें वास्तव्य आहे त्यास तोषविण्याकरितां मी कांहीं एक नैवेद्य नेला नसल्यानें त्यानें मजवरच झडगण केली. आतां मी रेशमाचा गंडा भारून दंडांत बांधला आहे त्यामुळें ती पीडा

दूर होईल. सांगण्याचा मतलब असा कीं, तुह्मांला मी ती जागा उकरून लक्ष्मीचें दुरून दर्शन करवीन; पण तिचा लाभ होण्यास त्या ठिकाणीं तुह्माला जांवई, पुत्र, कन्या किंवा स्नुषा एक जोडपें बळी द्यावयास पाहिजे. ”

रमलाचें भयंकर उद्गार ऐकून धर्मपाल व प्रवीर या दोघांनींही सुस्कारे टाकून संमति घेण्यादाखल प्रश्नरूपी हुंकार दिला. नंतर प्रवीर ह्मणाला “ आपण चार आठ दिवसांनीं पूर्ण बरें झाला ह्मणजे पहिल्याना आह्मांस दर्शन तर करा. मग पुढला विचार पुढें. ”

इतका बेत ठरून ते दोघे तेथून उठून घरीं गेले. किमयेच्या कामांत आतां कोणी तरी बळी पडणार असें धर्मपालास खास वाटलें. कांहीं असलें तरी त्यांत आपण नामानिराळें राहूनच आपला फायदा होणार अशा समजुतीनें धर्मपालानें तो विचार सोडून दिला व किमयेचा प्रश्न आटपतांच वशीकरणाचाच मंत्र शिकावयाचा असा निश्चय ठरवून तो आपल्या कामास गेला.

चार आठ दिवसांच्या अवधींत रमलानें प्रवीरास जमिनींतील निधान दाखविण्याची सर्व तयारी केली. तो प्रवीराच्या घरीं गेला आणि रात्रीं अकराच्या पुढें आवाडांत लक्ष्मीचें विवर उघडून दाखविण्याचें ठरलें.

त्या कृत्यास धर्मपालही रात्रीं हजर राहिला. पूजाद्रव्याची व नैवेद्य, धूप, दीप, यांची यथासांग तयारी करून ते तिघेजण परसांत गेले. भोगावती व जांबवान यांस हा मजकूर विदित नव्हता. रमलभारती स्नान करून डोळे मिटून मंत्र जपू लागले. तुपाचा दिवा व उदबत्त्या पेटून धुपत राहिल्या होत्या. मंत्राचें एक आवर्तन झालें कीं, भारती महाराज डोळे उघडून पुढील जागेवर पाणी शिंपीत. अशीं सात आवर्तनें झाल्याबरोबर धर्मपालानें पहार लावतांच ती जागा भराभर उकलावयास लागली. जागेच्या भुसभुशीतपणावरूनच त्यांना रमलाच्या कर्तबगारीचें चोज वाटू लागलें. धर्मपालानें खणावें व रमलानें माती काढून भरून टाकावी, असें होतां होतां खळगा बराच खोल झाला तेव्हां खणण्याचें काम संपलें. रमलानें धूपदीप ओवाळून निरांजन पुढें केलें तों त्या प्रकाशामुळें खळग्याच्या तळाशीं असलेले सुवर्णाचे गोळे आपल्या

दिव्य कांतीनें चमकावयास लागलेले पाहून धर्मपाल व प्रवीर अगदीं आश्चर्यान्वित झाले. पांच दहा सेकंदें जाऊन देऊन रमलानें पुन्हां निरांजन ओवाळिलें व खळग्यांत माती ढकलून तो खाडा बुजवून टाकिला.

पुढें एक आठवडा गेल्यानंतर प्रवीर व रमल यांची गुप्त मसलत होऊन जीवनानास बळी देण्याचा भयंकर बेत ठरला. बलिदान झाल्यानंतर प्रवीरानें घरांतील सर्व जडजवाहीर भूगत द्रव्यास भेटवावयास आणून तीन लक्ष जप संपविल्यानंतर भूमीच्या पोटांतील निधान प्राप्त होईल असें रमलाचें ह्मणणेंही प्रवीरानें मान्य केलें.

रमलाचा हा गुप्त कट धर्मपालापासून चोरून ठेवला होता. बलिदानाबद्दल त्या दोघांचीं खाजगत बोलणीं होतात असा संशय येऊन धर्मपाल त्यांच्यावर थोडा रुसला होता. रमलभारती बळी अर्पण करून द्रव्य काढण्याच्या पूर्वींच आपण धाडसानें ती जागा रात्रीं उकरावी व सर्व सोनें पळवून नेऊन बसावें, असा बाका ठरवून धर्मपाल चोरून प्रवीराच्या आवाडांत शिरला. त्यानें आपल्या सोबतीकरितां आपल्या एका दुसऱ्याच मित्राला बरोबर घेतले होते. ती नेमकी जागा खणून तळ लागतांच सुवर्णगोलक चकाकूं लागले. धर्मपालानें धीर धरून धैर्यानें त्या गोलकांस वर उचलून हातांत घेतलें तों तें सर्वच थोथांड आहेसें कळून आलें. वाटोळ्या दगडांच्या गोट्यास बेगडेनें चोहोंकडून मढवून ते गोलक तयार केले होते. त्या कृत्रिम गोळयावरून धर्मपालास भारतीचें कपट कळून आलें. रमलभारतीला कांहीं भूतेंखेतें काढण्याची, हिंवताप बांधण्याची, साप–विंचू उतरण्याची आणखी अशाच मासल्याची जादु करण्याची मंत्रक्रिया ठाऊक असली तरी त्याला किमया करण्याची अगर द्रव्योत्पत्तीची मंत्रक्रिया माहीत नाहीं असा सिद्धांत ठरवून धर्मपाल आपल्या सोबत्यासह आवाडांतून चालता झाला. जातांना त्यानें ते बेगडी धोंडे तसेच आंत टाकून खळग्यावर माती लोटून संशयाचें कांहींएक कारण राहूं दिलें नाहीं.

---

# प्रकरण २० वें.

रमलभारतीच्या गुणाविषयीं धर्मपालाचें अनुमानच खरें होतें. पिशाच्च डांकीणी, शंखिणी, इत्यादिकांचे मंत्र, नजरबंदी, दृष्टिबंधन क्रिया, जादुटोणा व वीरमंत्र या गोष्टींत रमल हा वाकबगार होता. पण त्याला सोनें करणें व कुबेराला घरचा दास बनविणें या गोष्टींची कांहींच माहिती नव्हती. भूतकालच्या गोष्टी जाणण्याचें शास्त्र पढून भूतकालीन माहितीचा प्रत्यक्ष अनुभव आणून देऊन तेवढ्या जोरावर भविष्य सांगून तुंबडी भरणाऱ्या भूतभविष्यवाद्यांप्रमाणेंच रमलाची अवस्था होती. एखादी गोष्ट जवळ वास्तव्य करीत असली ह्मणजे तेवढ्या जोरावर इतर अनुषंगिक गोष्टींचा आव आणून जनतेला फसविण्यास उशीर लागत नाहीं हें शास्त्र रमलानें मुखोद्गत केलें होतें. जादूच्या आधारावर व भुताखेतादि मंत्रांच्या पुकाऱ्यावर तो वाटेल त्या क्रिया करून देण्याच्या बेधडक बाता झोकून टाकीत असे.

धर्मपालास ज्या रात्रीं भारतीच्या किमयेंतील तथ्य समजलें; त्यानंतर आठ दहा दिवसांनीं प्रवीरानें आपल्या घरीं जांबवानाच्या निमित्तानें मेजवानीचा थाट केला. धर्मपालास आमंत्रण दिलें होतेंच. माजघरांत व ओटीवर पानें मांडलीं होतीं. ओसरीवर खाशी पंगत बसविली असून माजघरांत घरगुती माणसें बसलीं होतीं. धर्मपाल माजघरांत होता. खाशा पंक्तींत गांवातील नेहमींच्या ओळखींतील माणसें दिसत नव्हतीं. रमलाच्या टोळींतील बहुतेक पुंडांनींच खाशी पंगत सजविली होती. आजच्या मेजवानीस अगदीं अपरिचित लोक कोण बोलाविले आहेत, याबद्दल धर्मपाल मनांतल्या मनांत तर्क बसवीत होता. जेवणें आटपत आलीसें पाहून मागील भात आणण्याच्या बेतास माजघरांत भात पहिल्यानें नेला व ओसरीवर भात आणण्यास मुद्दाम उशीर लाविला. माजघरांतील मंडळी उठून आंचवून ओटीवर येतांच खाशा पंक्तीस भात वाढला. खाशा पंक्तींतील लोक उठून आंचवण्याकरितां परसांत आवाडांत गेले. जांबवानास बरोबर घेऊन प्रवीर व भारती आंचवण्याच्या

निमित्तानें त्यांच्या इच्छित स्थळीं गेले. जांबवान हातांत तपेली घेऊन हात धुवूं लागला तों प्रवीर व रमल यांनीं त्यास एक जोरानें धक्का मारिला. त्याबरोबर तो झोक जाऊन पडला. त्याच्या शेजारीच एक भला मोठा खळगा खणून त्याचें तोंड कुचक्या, काटक्या व वाळका. पाला यांनीं झाकलें होतें. जांबवान धक्क्यासरशी त्या खळग्यांत पडावा अशा बेतानेंच त्याला गुद्दा लगाविला होता. तो आंत पडतांच त्याच्यावर माती लोटून त्याला गाडण्याची सर्व तजवीज केली होती. परंतु, त्याची वेळ आली नसल्यामुळें रमलाचा सर्व बेत फसला. जांबवानाचा झोक जाऊन त्याचा एक पाय खळग्याच्या पोकळींत जातांच त्यानें शंखध्वनी केला. पांचजन्याचें स्फुरण कानावर पडतांच धर्मपाल ओटीवरून धावत परसांत गेला. तो जांबवान् एक पाय खळग्यांत सुटलेला व दुसरा पाय त्याच्या काठावर ताणलेला असा फासटलेल्या स्थितींत पडला आहे व तोंडानें ओरडत आहे असा धर्मपालानें पाहिला. त्याच्याजवळ रमल, प्रवीर व रमलाचे पठ्ठे मजा पहात उभे होते. धर्मपालानें तेथें लगबगीनें पोंचतांच ' पहात काय उभे राहिला ' ह्मणून रमलास एक गचांडी लगावली व जांबवानास हात देऊन उठविलें. त्याच्या अंगाचा धुराळा झाडन धर्मपालानें त्यास चौकस प्रश्न करितांच जांबवानानें झालेला प्रकार सांगितला. धर्मपाल आश्चर्यानें रमल व प्रवीर यांच्याकडे रोखून पाहूं लागला. मध्येंच त्यानें सहजगत्या खळग्याकडे नजर टाकली तों त्याच्या कांठावर चौफेर हळद कुंकू व पुष्पें वाहिलेलीं त्याच्या नेत्रास दिसलीं. हा देखावा पाहून रमलानें आजारी असतांना सांगितलेल्या बलिदानाची धर्मपालास नेमकी आठवण झाली. जांबवानाची करुणाशील अवस्था पाहून, बेगडी सुवर्णाच्या कपटमय कृत्याची स्मृति होऊन व हें सर्व कृत्य रमल व प्रवीर यांनीं आपणापासून लपवून ठेवल्याची मनाला लागलेली चुळमूळ जागृत होऊन धर्मपालास त्वेष चढला. त्या आवेशांत त्यानें रमलास आणखी दोन ठोसे देऊन तो तत्क्षणीं जांबवानास घेऊन वेगानें आपल्या स्वतःच्या घरीं निघून गेला.

धर्मपालामुळें आपलें कृत्य फसलें; आपलें कपट उघडकीस येणार, असें वाटून प्रवीर व रमल गोंधळले. पण रमल हा तसा लेचापेचा

नव्हता. आपल्या चेल्यांच्या देखत आपणास धर्मपालानें जो मार दिला त्याबद्दल तो अपमानानें जळू लागला. वस्तुत: रमलाला धर्मपालाची संगत मुळींच नको होती. त्याला त्याचें वर्म ठाऊक होतें व त्याच्याकडून प्रवीरास पैक्याचें साहाय्य होऊन तो रमलाची पोळी मारत होता एवढ्या मळेंच रमल धर्मपालाबद्दल कानाडोळा करून होता. मनामध्यें तो धर्मपालाचा द्वेषच करीत होता. धर्मपालास अद्यापपावेतों वशीकरण वगैरे कांहीं एक न शिकविण्याचें कारण तरी हेंच होतें. सुशर्म्याच्या पश्चात रमल व प्रवीर यांनीं संगनमतानें धर्मपालाबद्दल दुजाभाव व्यक्त करण्यास सुरुवातही केली होतीच. अशा प्रकारें रमलाच्या अंत:करणांत अग्नीची ठिणगी वास्तव्य करीत होती. जांबवानाच्या बाबतींत धर्मपालाकडून रमलाशीं जे दांडगाईचें वर्तन घडलें त्यामुळें ती फुणगी चेतली गेली. रमल धर्मपालावर दात ओठ खाऊं लागला. आपल्या जादूच्या प्रभावानें एखादें दुर्धर साधन करून अगर आपल्या पठ्ठ्यांची त्याच्यावर प्रेरणा करून त्याला पक्का गोत्यांत आणून आपल्या दारचें कुत्रें बनवावयाचें असा रमलानें कृतनिश्चय ठरविला. रमल व प्रवीर धर्मपालाचे दुस्मान बनले. किमयेच्या नादानें रमलाच्या हाताची मळी बनलेला प्रवीर धर्मपालाचे उपकार, स्नेह, लोभ, घरोपा वगैरे सारे विसरला आणि आणिबाणीच्या प्रसंगांत आपल्या उपयोगीं पडलेल्या धर्मपालास दगा देण्याकरितां सज्ज झाला.

आपल्या नवऱ्यावरील प्रसंग समजतांच भोगावतीस पहिल्या झटक्याला किंचित् कोप येऊन ती रमलावर व प्रवीरावर फूत्कार टाकू लागली. परंतु, तिनें खिडकींतून दागिने टाकल्याची गोष्ट धर्मपाल जाणत असून धर्मपालाला भोगावतीचा अभिलाष आहे व रमल व भोगावती यांचा गुप्त विलास धर्मपालाकडून जांबवानास समजून ते दोघेजण त्याच्या नाशाच्या तजविजींत आहेत असें सांगून भारतीनें भोगावतीस शांत करितांच ती अल्पबुद्धि आपले फूत्कार धर्मपाल व जांबवान यांच्यावर फेकू लागून प्रवीर व रमल यांच्या कारस्थानांत सामील झाली.

धर्मपालानें जांबवानास आपल्या घरीं नेलें. त्यानें त्याला प्रवीर व रमल यांचें चरित्र सांगून भोगावतीचें कुटिल कर्म समजावून सांगितलें.

भोगावतीचा बेफामपणा नाहींसा होऊन ती सत्त्वशील बनली असेल अशी आशा करणाऱ्या जांबवानास तिचा दुराचाराचा खात्रीलायक पुरावा मिळाल्यानें त्यानें तिच्या कायमच्या त्यागाची शपत घेतली व तिला चांगलें प्रायश्चित्त देण्याचा विचार त्याच्या हृदयांत घोळावयास लागला.

जांबवानाचा घरगुती वृत्तांत समजावून घेऊन धर्मपालानें त्यास मदत करण्याचें अभिवचन दिलें. जांबवानाची सरला या नांवाची एक बहीण असून ती अकस्मात कोठें नाहींशी झाली होती. तिचा शोध लावण्याकरितां तो देशोदेशीं हिंडत होता. आपल्या सासुरवाडच्या शहरांत कोणी माणिकबोवा या नांवाचा महा मांत्रिक व भविष्यज्ञ मनुष्य वास्तव्य करीत आहे असा लौकीक जांबवानानें आपल्या सोनगड नांवाच्या स्वतःच्या गांवांतच ऐकिला होता. आपल्या सासऱ्याच्या मृत्यूबद्दलही सासुरवाडच्या माणसांची भेट घेऊन त्यांचें सांत्वन करावें, बायकोचा आचार सुधारला असल्यास तिलाही घरीं आणावें म्हणून तो देदिकोठास आला होता. तरी त्यांत माणिकबोवाची गांठ घेणें हाच त्याचा अंतस्थ व मुख्य मतलब होता. ही सर्व हकीगत जांबवानाकडून धर्मपालास समजली होती. जांबवान सरलेबद्दल बहुत दुःख व उदासीनता दाखवी. सरलेवर त्याचें निःस्सीम भगिनीप्रेम असल्यामुळें आपली वृत्ति अतिशय बावरली आहे असेंही तो धर्मपालाच्या प्रत्ययास आणून देई. सरलेच्या सद्गुणाबद्दल जांबवान नेहमीं तारीफ करी व कल्पनेनें तिची दुर्गति कल्पून तो ममताळू भाऊ बहिणीच्या वियोगाबद्दल कित्येकवेळां अश्रुपात करतांनाही धर्मपालास दिसे. धर्मपालानेंही आपला व सुलोचनेचा तात्पुरता मजकुर जांबवानास विदित केला. रमलाशीं शत्रुत्व बाणल्यामुळें माणिकबोवासारख्या माणसाची आपल्यालाही फार जरूर आहे असें धर्मपालानें जांबवानास सांगितलें. जांबवान धर्मपालाकडे आधींच आपला उपकारकर्ता म्हणून पाहत होता. त्याच्या दयाशील व हिंमतबाज स्वभावाबद्दल त्याला पहिल्यानाच आदर उत्पन्न झाला होता. त्यांत ही समव्यसनाची भर पडली आणि व्यसनसाम्याच्या दुजोऱ्यानें त्या दोघांची गट्टी जमून त्यांनीं दुसऱ्या दिवशीं माणिकबोवाचें दर्शन घेण्याचा बेत कायम ठरविला.

---

# प्रकरण २१ वें.

माणिकबोवांच्या नित्य क्रमानुसार त्याच्या घरीं कित्येक कामुकांची दाटी झाली होती. मंत्रक्रियेच्या नादीं असलेले बरेच लोक माणिकबोवांची मार्गप्रतिक्षा करीत त्याच्या वाड्याच्या बाहेरील दिवाणखान्यांत तिष्ठत बसले होते. वाड्याच्या अंगणांत पांच दहा शिपाई खडे असून दिवडीवर कांहीं पहारेकरी बसले होते. दरवाजाबाहेर तीन चार घोडेस्वार अश्वारूढ उभे असून दोन उत्तम प्रकारचे जवान वारू रिकामे उभे असून आपल्या पाठीवर आरोहण करणाराची मार्गप्रतीक्षा करीत आहेतसें दिसत होते.

धर्मपाल आणि जांबवान माणीकबोवाच्या दाराशीं येऊन पोहोंचले. दरवाजाबाहेरील देखावा पाहून ते आंत जाण्यास कचरले. माणिकबोवांच्या घरीं कोणी श्रीमान पाहुणा आला आहे किंवा तो सर्व लवाजमा खुद्द त्याचाच आहे याबद्दल त्यांची कल्पना चालेना. माणिकबोवाचेंच हें वैभव असेल तर तो आपली गांठ कशाची घेतो अशा विचारानें ते थोडे निराश झाले ? पण इच्छित वस्तुप्राप्तीच्या उत्कंठेनें त्या क्षणिक निराशेस पिटाळून लावतांच त्यांनीं त्या घोडेस्वारास शोधक अर्थाचा प्रश्न करून पाहिला. त्यांच्या प्रश्नास घोडेस्वारांनीं कांहींच उत्तर न देतां उलट त्यांना चुप बसण्याबद्दल ओठ दाबून व नाकावर बोट ठेवून इशारा केला. धर्मपाल व जांबवान किंचित् विस्मययुक्त होऊन पुढें काय प्रश्न करावा या विचारणेंत पडून त्या स्वाराकडे मुग्धतेनें पाहूं लागले; तों दुसऱ्या स्वारानें त्यांना निमुटपणें घरांत जाण्याबद्दल हातानें खूण केली. ते दोघेजण घरांत शिरले. दिवडीवर किंवा अंगणामध्यें त्यांना कोणी अटकाव केला नाहीं आणि त्यांची कोणी कांहीं चौकशीही केली नाहीं. ते तहत पुढील दिवाणखान्यांत जाऊन तेथें जमलेल्या कामार्थी जनांत मिसळले. बराचवेळ झाला तरी माणिकबोवा दिवाणखान्यांत येत नाहींत ह्मणून कंटाळून त्यांनीं तेथील मंडळींत बोवाबद्दल विचारपूस केली. त्यांत त्यांना असें समजलें कीं, सांप्रत माणिकबोवा आपल्या खाजगत

महालांत बसले आहेत. आनर्त देशाचा महान पराक्रमी राजा विकंठ हा माणिकबोवाच्या भेटीस आलेला असून कांहीं अंतरस्थ बाबासंबंधानें त्यांचीं खलबतें चाललीं आहेत.

विकंठासारखे भूपालक देखील माणिकबोवाच्या कच्छपि आहेत असें समजतांच धर्मपाल व जांबवान यांना माणिकबोवाबद्दल खात्री वाटावयास लागली. थोरांच्या कारस्थानांत आपली डाळ कशाची शिजते अशा समजानें तेथून परत जावें व एखाद्या दुसऱ्या फुरसतीच्यावेळीं पुन्हां यावें अशा बेतानें ते दोघेजण तेथून उठले. इतक्यांत विकंठाचा व माणिकबोवांचा एकांत आटपून तो आनर्तपति बाहेर जावयास निघाला. त्याच्याबरोबर त्याचा प्रधान होता. दरवाजाबाहेर सज्ज असलेल्या घोड्यावर बसून तो वीर्यसंपन्न पार्थिव आपल्या बरोबरच्या शिपाई प्याद्यांसह आपल्या मार्गानें निघून गेला. माणिकबोवांचा वाडा पूर्ववत् स्तब्ध झाला. माणिकबोवा पुढच्या बंगल्यावर आले. त्यांनीं एकदां सर्व मंडळीकडे प्रेमदृष्टीनें पाहिलें. माणिकबोवानें धर्मपालास मुळींच ओळखिलें नाहीं. कोणाचे काय काय प्रश्न आहेत ते समजावून घेऊन माणिकबोवांनीं कित्येकांस तेथल्यातेथेंच तांत्रिक उत्तरें दिलीं. कोणाकोणास कांहीं मुदतीनें पुन्हां यावयास सांगितलें. सर्व मुमुक्षजन माडीच्या खालीं उतरले. धर्मपाल व जांबवान हे देखील सर्वांसमवेत खालीं जाण्याकरितां उठून जिन्याच्या तोंडाशीं घोटाळले. बाकीचीं माणसें निघून गेलीं तरी त्या दोघांना घुटमळतांना पाहून माणिकबोवांनीं त्यांस विचारलें " हं ? तुह्मी नवखे दिसतां; तुमचें काय काम आहे तें कांहीं बोलला नाहीं ? "

यावर त्यांनीं अशी विनंति केली " आपलें नांव ऐकून आह्मी फार लांबून आलों आहों. आमचें कार्य फार नाजूक व गुप्त आहे. आपण आपल्या अगदीं एकांताच्या जागीं चलाल तर बरें होईल. "

त्यांची गरिबीची विनवणी ऐकून माणिकबोवा बोलले " कांहीं हरकत नाहीं. येथें कोणी येणार नाहीं. मी दार बंद करून घेतों. तुमचें कार्य काय आहे तें खुशाल बोला. संकोचाचें बिलकुल कारण नाहीं. " इतकें सांगून बोवानें जिन्याचें दार बंद करून आंतून

कडी लावून टाकली. त्यां तिचावांचून त्याठिकाणीं आतां कोणी येणार नाहींसें समजून जांबवान ह्मणाला " माझी बहीण बरेच दिवस नाहींशी झाली आहे. तिचा कांहीच शोध नाहीं. तिला कोणी पळविली आहे कां ती सध्या जीवंतच नाहीं ? जीवाचा कंटाळा येऊन प्राण देण्यास तयार होण्यासारख्या प्रसंगानें तिला गांठलें होतें. तिचें नांव सरला असें आहे. त्याचप्रमाणें या सद्गृहस्थांचा व एका स्त्रीचा लोभ जमलेला आहे. ऐन रंगाच्यावेळीं कोणी दुष्टानें यांना थप्पड लगावून यांच्या तोंडचा घास हरण केला आहे. त्याही स्त्रीचा तपास लागणें इष्ट आहे. आपण हीं दोन्हीं कामें कराल व वशीकरणाचा मंत्र आमच्यांतून कोणाला तरी शिकवाल तर आपले आमच्यावर फारच उपकार होतील; इतकेंच नव्हे तर आपल्या विद्येबद्दल आपणास मोठें बक्षीस देऊन वर आह्मीं आपले जन्माचे दास होऊन राहूं. "

त्यांचें भाषण ऐकून घेऊन माणीकबोवा थोडा विचार केल्यासारखें दाखवून बोलले " तुमची स्थिती काय आहे ती मला ठाऊक नाहीं. तुह्मीं जर भरपूर खर्च करण्यास तयार असाल तर रोख पैसे घेऊन आणखी आठ दिवसांनीं मजकडे या. तुमचीं नांवें आतां मला सांगून ठेवा. तुह्माला मी त्या दोन्हीं स्त्रियांचा नेमका तलास लावून देईन. वशीकरणाचा मंत्र मात्र मी कोणासच शिकवीत नाहीं. त्याबद्दल एवढेंच सांगतो कीं, मीं तुह्मांस एक साधनयुक्त यंत्र भारून देईन. तें यंत्र दंडांत बांधून मी सांगेन त्याप्रमाणें क्रिया बिनचुक कराल तर तुमच्या कारणापुरतें वशीकरण तुह्माला प्राप्त होईल. पण बघा बुवा ! हें खर्चाचें काम आहे. तुमचा दम असेल तसें. "

माणिकबोवाचें पैक्याकडे फार लक्ष दिसतें असें त्याच्या शब्दांवरून जाणून ते ह्मणाले " आह्मीं कांहीं कोणी राजे नाहीं. तरीपण तह्मी संतोषी रहाल इतके रुपये आह्मी तुमच्या स्वाधीन करूं. काम मात्र बिनतकरार व जलद झालें पाहिजे. "

येवढ्या प्रश्नोत्तरानें सवदा पटून ते दोघेजण उठले. आणखी पांचसहा दिवसांनीं पैसे घेऊन येण्याबद्दल बोवास विश्वासपूर्वक पुन्हां बजावून ते जिना उतरून खालीं अंगणांत आले. जांबवानाच्या पुढें धर्मपाल प्रथम

अंगणांत आला. धर्मपालाचें पाऊल अंगणांत पडण्याचा व त्याचवेळीं भामिनी ओसरीवर येण्याचा एकच अपूर्व योग जमला. परस्परांची नजरानजर होतांच त्यांची ओळख पटली. धर्मपालास पुरतेपणीं ओळखून भामिनीनें घरांत परत जावें; पण तसें न होतां भामिनी उलट अंगणाकडे पुढेंच येऊन उभी राहिली. तिला स्पष्टपणें पाहतांच धर्मपाल तेथेंच थबकला. इतक्यांत त्याच्या पाठीशींच जांबवान येऊन पोहोंचला. त्याचक्षणीं "अहो पाहुणे? गेला कां काय? थांबा हो. " अहां; पण तुम्हीं आपलीं नांवें मला सांगितलीं नाहींत. " अशीं अक्षरें उच्चारीत माणिकबोवा धडधड जिना उतरून खालीं आला धर्मपालाच्या अगदीं नजीक येऊन भिडेपर्यंत माणिकबोवानें आपलें वाक्य संपविलें. भामिनीच्या संबंधानें विचार करण्यांत धर्मपाल एकाएकी अस्वस्थ झाला असल्यानें त्यानें माणिकबोवास जोरानें जबाब दिला " माणिकबोवा; माझें नांव धर्मपाल. या माझ्या मित्राचें नांव जांबवान आहे. बोला काय तें. "

हा जबाब करितांना त्याच्या स्वरांतील धोरण जरा चमत्कारीक भासण्यासारखें होतें. 'धर्मपाल' या नांवाचा उच्चार कर्णरंध्रांत भरतांच माणिकबोवास एकेक खाणाखुणांची आठवण पटावयास लागली. तीं मनुष्यें आपणाकडे कपटबुद्धीनेंच आलीं असावींत अशी माणीकबोवाची एकदम खात्री झाली. आतां काय मिष करून त्यांना घराबाहेर लावावें याचें मनन करण्यात माणीकबोवा घोटाळलेला पाहून धर्मपाल बेफामपणानें म्हणाला " माणिकबोवा! तुम्ही मंत्री, जादूगार, देवऋषी आहां तसे पक्के बेरडही पण आहां. ज्या बाईचा आज कित्येक वर्षें शोध नाहीं; जी आपल्या घरांतून चोरी करून नाहींशी झाली आहे ती हीच माझी माता भामिनी होय. हिला भोंदून तुम्हीच घराबाहेर काढली असावी. तुम्ही पक्के चोर व भोंदु दिसता. "

धर्मपालाचे निंदापूर्ण उद्गार ऐकतांच माणिकबोवा खवळला. संतापाच्या भरांत येऊन पहिल्याप्रथम त्यानें आपल्या क्रोधाची आग भामिनीवर पाखडली. ओटीवर कठड्याला गुडघा लावून उभी असलेल्या भामिनीवर डोळे वटारून बोवा म्हणाला 'तुम्ही कां येथें तोंड वासून उभ्या राहिलात? आपल्या कामाला घरांत चालत्या व्हा.' असें खडकावून त्यानें

भामिनीस बरून लाविलें. ती आंत जातांच धर्मपालाकडे लाल डोळे करून बोवा बोलला ' कायरे पोरा ? तूं कोणाला दोष देतोस ? तुझी आई घरदार सोडून लोकांच्या घरांत शिरली त्याला दुसऱ्यांनीं काय करावें ? तुम्ही लेको लायखीचे असतां, तुम्हाला जर कांहीं अब्रूची चाड असती, तुम्हाला जर आपल्या कुलाचा अभिमान असतां तर तुमच्या घरांतल्या बोडक्यांनीं लोकांचे उंबरठे पुजलेच नसते. '

या उपमर्दकारक जल्पनेनें त्वेषयुक्त होऊन धर्मपालानें माणिकबोवावर एकदम चाल केली. त्याच्या नरडच्याला चिमूट लावून धर्मपाल गर्जना करून ओरडला " अरे भामटच्या; तुम्ही संगनमतानें चोरून आणलेले बापाचे दागिने काढा अगोदर कोठें आहेत ते. बायाबापडच्यांना भुरळ पाडून बेरडा, तूं कितीजणांच्या जिनग्या गिळंकृत केल्या असशील त्या सर्व तुला येथल्या येथें ओकावयास लावतो. हरामखोरा, हीच तुझी सर्व जादू दिसत आहे. बोल, हरामखोरीनें उपटलेल्या अपापाच्या जिनसा कोठें आहेत त्या काढ आणि या भामिनीला घेऊन खुशाल मंत्र करीत ×××× बैस. "

असें भाषण करीत असतां धर्मपालाच्या हाताची चिमुट सैलावली अशी भावना होतांच माणिकबोवानें धर्मपालाच्या छातींत तसाच एक गुद्दा लगाविला. त्या सरशी धर्मपाल बराच मागें सरला. तेवढ्यांत चांगलें अवसान घेऊन माणिकबोवा अंगणांत पडलेलें एक लाकूड घेऊन धर्मपालावर धांवला. इतक्यांत जांबवानानें मध्यें होऊन दोन्ही हातांनीं माणिकबोवाचे दोन्ही हात वरच्यावर उचलून धरिले आणि धर्मपालास घराबाहेर निघून जाण्याचा इशारा केला. धर्मपाल त्याच्या टप्प्याच्या पलीकडे गेलासें पाहून जांबवान त्याला सोडून अलग झाला. धर्मपाल मोठा अविचारी आहे असें दूषण देऊन जांबवानानें माणिकबोवाचें शांतवन करण्याचा घाट घातला. जांबवान व धर्मपाल हे सिद्ध साधक असले पाहिजेत असें कल्पून माणिकबोवा जांबवानास दरडावून बोलला " तुमचें ज्ञान पुरे करा. तुम्ही त्याचेच साथीदार आहां. तुम्ही मला प्रतिरोध केला त्याप्रमाणें धर्मपालासही तुम्ही प्रतिकार केला असता तर आपलं सौजन्य सिद्ध झालें असतें. तुम्ही दोघे एकाच तालमीतले आहां.

चालते व्हा माझ्या घरांतून अगोदर. मी नांवाचा माणिकबोवा आहें. तुझा दोघांच्या मुसक्या बांधून तुझाला नाक घासण्यास लावून अखेर रस्तोरस्ती चिंध्या चिवडण्यास न लावीन तर नांवच बदलून ठेवीन. ”

अशीं संतापयुक्त अक्षरें उच्चारून माणिकबोवानें जांबवानास आपल्या घराबाहेर हाकललें. शें दोनशें पावलांच्या अंतरावर धर्मपाल जांबवानाची वाट पहातच होता. दोघां स्नेहांचा मिलाफ होतांच ते आपल्या घराकडे चालूं लागले. वाटेनें जातां जातां त्या दोघांचें घडलेल्या प्रसंगाचें वर्णन करण्यांत बरेंच बोलणें झालें. धर्मपालानें भामिनीबद्दलचा मूळ चरित्रवृत्तांत जांबवानास कथन केला. माणिकबोवाच्या घरीं नसतांच रोजगार उपस्थित झाल्यामुळें आपलें मुख्य कार्य फसलें व माणिकबोवासारखा सामर्थ्यसंपन्न, मंत्रविद्यापारंगत, अभिचारकर्मी, व राजपुरुष व राजसंश्रय अशा बलवानाशीं शत्रुत्व उभें करून आपण आपल्याला धोक्यांत मात्र घालून घेतलें; याबद्दल जांबवान बहुत पश्चात्ताप दर्शवूं लागला. धर्मपालास देखील माणीकबोवाच्या चेटुकज्ञानाची भीति वाटूं लागली. माणीकबोवाच्या घरीं कुरापत उकरून काढण्याचें अग्रेसरत्व धर्मपालाच्याच माथीं पडणारें असल्यामुळें त्यानें आपलें भययुक्त विचार लपवून ठेवून जांबवानास धीर दिला व आणखी शोध करून आपण तिसराच कोणी चित्राशास्त्रकुशल असा खात्रीचा पुरुष गाठून आपलें काम करून घेऊं असें अभिवचन देऊन ते दोघेजण स्वस्थ झाले. माणिकबोवा व रमलभारती यांनीं कांहीं कोयाड रचलेंच तर त्यांतून पार पडण्याकरितां आपणासही चांगलें मनुष्यबळ पाहिजे असें ठरवून त्यांनीं स्नेहसंघ जोडण्याचा संकल्प ठरविला, आणि त्या दिवसापासून ते फार सावधगिरीनें व जपून वागावयास लागले.

---

# प्रकरण २२ वें

शूरसेन व आनर्त या देशांच्या सरहद्दी एकमेकास भिडलेल्या होत्या. हे दोन्ही देश पूर्णपणें स्वतंत्र असून एकमेकांचा राजकीय दृष्ट्या कांहीं एक तंटा बखेडा नव्हता. दोन्ही प्रांत सुपीक व सधन असल्यामुळें त्यांचीं राजसूत्रें धारण करणाऱ्या राज्याधिकाऱ्यांना एकमेकांचा हेवा वाटण्याचें कांहीं कारण नव्हतें. पराक्रम, शौर्य, सैन्याचा जोम, दरारा व वैभव यांचा विचार केला असतां आनर्तपती विकंठापेक्षां शूरसेनाची सत्ता वहिवाटणारी राणी अंबालया श्रेष्ठ होती. व्यक्तिदृष्ट्या विकंठ हा अंबालयेपेक्षां कमी प्रभवशाली नव्हता. तथापि अंबालयेच्या पित्यानें दिग्विजयामुळें जो यशाचा झेंडा उभारला होता, जें वैभव संपादलें होतें त्याच्या योगानें सर्व उत्तम प्रतीचीं राष्ट्रें अंबालयेस बरीच वचकून होतीं. तिच्या पदरच्या सरदारांची एक जूट, वीर्यसंपन्नता, राजभक्ति, व खुद्द राज्ञीच्या अंगांतील पवित्र क्रौर्य, जोमदार निश्चयप्रियता, सद्गुणपर अहंभाव, प्रजावात्सल्य यांच्या योगानें शूरसेनदेशावर जें राष्ट्रीय तेज विलसत होतें त्याच्या योगानें इतर राष्ट्राधिपतींचे नेत्र दिपून जात असत.

अंबालयेचें भाग्य पाहून विकंठास त्याचें मुळींच वैषम्य वाटत नव्हतें. तिनें आपल्या लग्नाच्या कामीं विकंठाचा जो उपमर्द केला त्याबद्दल विकंठ रात्रंदिवस जळत होता. अंबालयेचा पिता क्षेत्रवान् हा स्वर्गाची वाट धरीपर्यंत त्यानें बाह्यांगीं शांतता धरिली. तरी पण तेव्हांपासून त्यानें सैन्याची दुरस्ती करून त्यांत शक्य तेवढी वाढ करण्याचा उपक्रम गुप्तपणानें चालूं ठेविला. सरहद्दीच्या संरक्षणार्थ ह्मणून त्यानें दरम्यान असलेल्या देदिकोठच्या बाहेर लष्कर आणून सज्ज ठेविलें होतें. त्या ठिकाणची हवा फार निरोगी आहे असें प्रतिपादन करून त्यानें त्या ठिकाणीं आपणास राहण्याकरितां एक भव्य राजवाडाही उठवून दिला होता. अलीकडे तर त्यानें आपलें वास्तव्य सतत त्याच ठिकाणीं ठेविलें होतें. तो अंबालयेच्या राज्याची पाहणी करण्याकरितां तिच्या अमला खालील प्रदेशांत कांहींतरी निमित्तानें नेहमीं संचार करी. शूर-

सेन प्रांतांतील घनदाट अशा अरण्यांतील गूढस्थळीं तो आपले शिपाई लपवून ठेवून आपण निर्भयपणें उघड्या माथ्यानें वाटेल तसे विहार करी.

विकंठ हा तीसवर्षांचा असून स्वरूपानें देखणा होता. त्याचे आईबाप अकाळींच मृत्युमुखांत पडले असल्याकारणानें विकंठास अकाळींच स्वातंत्र्य प्राप्त झालें होतें. तो स्वभावत: रंगेल व विषयी होता. लहानपणापासून त्याच्या स्वैच्छ वर्तनास अप्रतिहत धुडगुस घालण्याची सवड मिळाल्यानें तो मोठा छांदिष्ट, व्यसनी व पराकाष्ठेचा दुराचारी निपजला. तो जसा विषयी होता तसाच पराक्रमी व हिंमतबाज होता. त्याला स्वत: फार अभिमान वाटे तरी दुसऱ्याचा गर्व किंवा ताठा त्याला बिलकुल खपत नसे. स्वत:चा कोणीं अपमान केला, कोणी उणें उत्तर केलें, कोणी अवज्ञा करून त्याच्या मनास त्रस्त केलें तर तो प्रलयाग्नीच्या भडकणाऱ्या कल्लोळाप्रमाणें लाल बुंद होऊन जात असे. स्त्रीसंभोग व क्रोध हे गुण त्याच्याठिकाणीं अगदीं अनिवार होते. ज्या स्त्रीविषयीं त्याच्या अंत:करणांत संयोगेच्छा उद्भवली तिला हरप्रयत्नानें मलीन केल्याखेरीज तो कधींच रहावयाचा नाहीं. मदनानें त्याला इतका ढिला बनवून टाकला होता कीं, कोणत्याही दरजाची तरुण व नवीन स्त्री त्याला सुंदर व उपभोग्यच वाटे. कोणत्याही क्षुल्लक बाबतींत देखील कोणी त्याचें मन यत्कींचित् दुखविलें तर त्याला तो अपकारकर्ता कट्टा दुस्मान वाटे व त्याला यथास्थित दंड केल्यावांचून त्याला अन्न देखील गोड लागत नसे.

अशा प्रकारच्या विलक्षण स्वभावशीलतेनें संपन्न असलेल्या विकंठाच्या मनांत अंबालया भरली जावी यांत कांहींच आश्चर्य नाहीं.

राणी अंबालया ही वयानें वीसपासून पंचवीसाच्या दरम्यान होती. तिची उंची मध्यम प्रमाणांत असून ती देहावयवानें अगदीं प्रमाणांकित होती. तिचें शरीर शामवर्ण होतें. इंद्रनीळ मण्यांचा अर्क काढून त्याची तिच्या सर्व अवयवावर सर्वत्र झांक चढविलेली दिसत असल्यानें तिची अंगभा मेघसौंदर्यास मान खालीं घालावयास लावीत होती. त्या शामलांगीचा भालप्रदेश विस्तीर्ण होता. नीलकांतीनें युक्त घनांबूवर विद्युलतेची चमक चमकली असतां पाहणाराच्या नेत्रास जी दैदीप्यता भासमान

होते त्याप्रमाणें तिनें आपल्या शिरोभागीं धारण केलेल्या बिंदी, बिजवरा या भूषणांच्या तेजानें तिचा निढळप्रांत लकाकत असे. त्यांतच ललाटावरील दिव्य कुंकुमचिरी आपल्या आरक्तपणाच्या छायेनें सर्व कपाळभर सायंकाळच्या संध्यारागाची छटा पसरल्यासारखें दाखवी. तिच्या धनुष्याकृति भोंवया जेथल्या तेथें अगदीं चित्राप्रमाणें रेखलेल्या असून एखाद्या कुशल ओताऱ्यास नमुना दाखविण्याकरितांच विधात्यानें त्या भृकुटींची मुद्दाम आंखणी केली असावीसें वाटे. तिचे नेत्र आकर्ण असून त्यांची तेजःपुंज विशालता त्यांच्याकडे टक लावणाराच्या दृष्टीस ग्रासून टाकीत असे. ती सरल नासिकानें युक्त असून त्याची मध्य कोर इतक्या खुबीनें साधली होती कीं, त्याच्या दोहीं अंगच्या खालीं रुंदावत आलेल्या दोन्ही बाजवा दोहीं अंगास दोन त्रिकोनच उभारले आहेत कीं काय असें वाटावयास लावीत. तिच्या सर्व अंगपिंडाच्या सडपातळपणाशीं संगतवार अशा पद्धतीनें तिचे गाल, हनुवटी स्थूल ना कृश अशा प्रकारच्या गोजिरवाण्या व मृदु सडसडीतपणानें युक्त होती. तिच्या मुखाची ठेवण चिंचोळी व छबदार होती. तिचे ओंठाच्या बिंबवर्णावरून परमेष्टीनें त्यांत जन्मतःच तांबुल भरून ठेवल्याचें अनुमान होई. नक्षत्र पुंजाप्रमाणें लटकणाऱ्या अत्यंत शोभायमान तारकामुळें तळपणारे तिचे नाजूक व पातळ कान नाकपुडीच्या बरोबर समरेषेंत होते. वदनरूपीं सर्वानंदसदनाचीं कपाटें उघडलीं असता त्यांत सांठविलेला हिऱ्यांचा हारच कीं काय अशा कांतीनें तिची द्विजपंक्ती झळकत असे. तिच्या मस्तकावरील केशसमूह सावधगिरीनें विंचरून त्यांचा भांग काढलेला असे. भोंवयांच्या मध्य बिंदुपासून बरोबर रेषा ओढून पाहता तिचें दुसरें टोक नेमकें भांगाच्या प्रारंभाला येऊन मिळण्यांत चूक पडली नसती. दोहीं बाजूंचा निमूळता केश—पक्ष ह्मणजे त्या भांगानें आपले काळेभोर व तुळतुळीत असे दोन पंखच पसरले असावेत असें वाटे. ती आपल्या लांबसडक केसांची वेणी घालून त्यांचा जो बुचडा खोवी तो कृष्णसर्पाच्या वेटोळ्याशीं साम्य पावणारा असे. तिचा कंठ चिंचोळा व इतका नाजुक होता कीं, त्याच्यावर विराजमान झालेल्या वदनोत्पलाचा तो लुसलुशीत देंठच आहे अशी पाहाणाराला चकभूल

पडे. तिचें वक्षस्थल पुष्ट असून त्याच्यावरील समांतरावर उभारून आलेल्या स्तनगोलकामुळें तें फारच खुलून दिसत होतें. कुचतटाची गोलदार, रसरशीत, व काठिण्ययुक्त सुंदरता यौवनाचें पूर्ण प्राबल्य जाहीर करीत होती. जगाच्या नेत्रांची जिज्ञासा प्रदीप्त करणारी कांचोळी आपल्या कर्तव्यांत किंचित् ढिलाई करील तर महावैभवशाली अंबालयच्या सामर्थ्याचा किंवा दराऱ्याचा बिलकुल मुलाजा न ठेवतां कंचुकीच्या खालीं दडलेल्या प्राण्यांनीं जगाच्या नेत्रांची हौस पुरविण्यास कधींही सोडलें नसतें. तिची सिंहकटी गजशुंडेप्रमाणें, निमुळतें उरुस्तंभ, त्यांच्याशींच निटसपणांत स्पर्धा करणारे जानू, पोटऱ्या, पादतल या सर्वांची प्रतिमा अपूर्व होती. किरकोळ परंतु सर्वांगाच्या वळणशुद्धतेंत यत्किंचितही बाध न येईल अशाप्रकारें गोंडस भुजदंड, व सळसळीत कोंपरें व चिमकुले, चिमणे करपल्लव यांच्या योगानें तिच्या स्वरूपसुंदरतेस परमावधीची मनोहरता प्राप्त झाली होती.

अशा प्रकारच्या त्या शृंगारसरोवर मराळिकेस पाहून कोणत्या विषयीं हंसाचें मानस तल्लीन होणार नाहीं. सर्वांगावर अलंकार धारण करून करिराजाप्रमाणें मंद मंद गतीनें गमन करीत असतां निस्पंदनाच्या योगें-करून उत्पन्न होणारा तोरड्या, पैंजण, नेपुरें यांचा मंजुळ ध्वनी ऐकतांच त्या नृपनंदिनीस आलिंगन देण्याकरितां कोणत्या पुरुषाचे हस्त व वक्षस्थल अधिर झाल्यावांचून राहील ? स्वरमाधुर्यसंपन्न अशा कंठांतून निघणारे गोड शब्दामृत ओष्ठप्रांतांतून स्रवूं लागले असतां अंबालयच्या अधरमधूचें पान करण्याकरितां कोणत्या काममत्त भ्रमराचे ओठ शिवशिवणार नाहींत. तिचें गाढें सौंदर्य पाहून मदन देखील वेडा व्हावयाचा ! अशा त्या शूरसेन प्रांतांतील चंद्नावतीच्या राणीनें विकंठाचें मन आकर्षण करून टाकलें होतें. तिचा तोरा उतरून तिला आपल्या सद्मांत आणण्याबद्दल विकंठ हरतऱ्हेचे ढंग करीत होता. माणिकबोवाचें मंत्रसामर्थ्य कानीं येऊन विकंठानें याच हेतूनें माणिकबोवाशीं गुप्त मसलत केली होती. विकंठासारखा सिंहासनस्थ पुरुष आपल्याला नत झालेला पाहून माणिकबोवानें मोठ्या आनंदानें त्याचें कार्य करण्याचें आश्वसन दिलें होतें.

---

# प्रकरण २३ वें.

विकंठानें माणिकबोवाची गुप्त भेट घेऊन अंबालयेच्या प्राप्तीबद्दल कांहीं बळवत्तर जादू करण्याबद्दल त्यास विनंति केली तेव्हां या बड्या कामीं आपणास आपल्या गुरूचा सल्ला घेतला पाहिजे असें माणिकबोवानें विकंठास सांगितलें होतें. त्याच्या पासून कांहीं मुदत मागून घेऊन त्यांनीं तिघांची एकांतांत बैठक करण्याचा दिवस नेमून टाकला होता. ठरलेल्या दिवसापूर्वीं माणिकबोवानें आपला गुरु रमलभारती याच्याशीं मुलाखत करून त्याला विकंठाचा मजकूर निवेदन केला. रमलभारती आपल्या जारणमारणाच्या विद्येमुळें स्वतःला सामर्थ्यसंपन्न समजत होता. तरीपण विकंठासारख्या प्रबल राजाच्या संरक्षणाची त्याला अलीकडे फार जरूर वाटावयास लागली होती. आपल्या मंत्रज्ञानाची गोष्ट अंबालयेच्या कानापर्यंत घालवून तिचा आश्रय मिळविण्याकरितां भारतीनें वशिला लावून पाहिला होता. पण तिच्या पुरुषद्वेषामुळें त्याची तेथें कांहींच मात्रा चालेना. आजपावेतों कित्येक सुंदर व तरुण स्त्रियांना भ्रष्ट करून भारतीनें स्वतःला अनेक शत्रू निर्माण करून ठेविले होते. प्रवीरासारख्या हजारों लोकांचीं घरेंदारें धुळीस मिळवून त्यानें शेंकडों जणांशीं वैर संपादन करून ठेविलें होतें. जांबवानासारख्या निरपराध माणसांच्या जिवावर उठून भारतीनें लाखो लोकांचें अंतःकरण दुखविलें होतें. धर्मपालासारख्या नादी माणसास लांचलुचपतीनें आपल्या कामापुरतें वश करून अखेर त्यांना सपशेल फसवून रमलभारतीनें हरेक लोकांना तुच्छवत् करून टाकलें होतें. तरी अशा लोकांच्या वैरास, इतराजीस, मत्सरास व सूडास तो मोजून नव्हता. त्याला स्वतःच्या मनांत ज्याची भीति वाटत होती तो पुरुष फार निराळाच होता. आतांपर्यंत तो त्या गुप्त भयाबद्दल बेगुमान होता. परंतु, त्याच्या भयाची वस्तु वृद्धिंगत होऊं लागली त्याप्रमाणें त्याची भीति वाढत चालली. विकंठाची भेट घेऊन त्याला आपल्या भयाचें कारण निवेदन करून तो जर आपल्याला भयापासून तारण्याचें वचन देईल व अवश्य तितका रुक्का खर्च करील तर आपण नवीन व महान जाज्वल्य

असें साधन करून अंबालयेला विकंठाच्या चरणाची दासी करून ठेव असें भारतीनें माणिकबोवास सांगितलें. दोघांचें त्या मुद्यावर आणखी बरेंच महत्वाचें बोलणें होऊन माणिकबोवा गुरुजींना घेऊन नियमित वेळेला देदिकोठच्या सरहद्दीपलीकडे विकंठाच्या राजवाड्यांत जाऊन हजर झाला.

वचन दिल्याप्रमाणें माणिकबोवा नेमलेल्या दिवशीं रमलभारतीस घेऊन आलेला पाहतांच विकंठास त्याच्या खरेपणाबद्दल विश्वास उत्पन्न झाला. रमलभारतीचा लौकीक माणिकबोवाकडून त्याला इत्थंभूत समजलाच होता. त्या दोघांचा योग्य सन्मान करून विकंठानें त्यांना आपल्या-जवळ बसविलें. भारतीशीं सर्वसामान्य विषयांवर सलगीनें गोष्टी बाता करून त्यानें त्याच्या अंतःकरणांत आपल्या सुजनत्वाबद्दल प्रेम उत्पन्न केलें. माणिकबोवाच्या सूचनेवरून विकंठानें आपल्या मतलबाच्या मुद्यावर बोलण्याचा ओघ आणून सोडला. महत्वाच्या गोष्टी उघड रीतीनें बोलणें सुरक्षित नव्हे असें दर्शवून भारतीनें एकांताची अवश्यकता सुचविली. या सूचनेवरून विकंठाच्या मनांत भारतीच्या सावधगिरीबद्दल जास्तच आदर वाटावयास लागला. त्या ठिकाणाहून ते तिघेजण उठले, आणि विकंठाच्या अंतस्थ बैठकीच्या एका टुमदार दिवाणखान्यांत चालते झाले. विकंठाच्या सूचनेवरून तो एकांत रतिमात्रही भंग न होण्याबद्दल राजकारभाऱ्यानें खबरदारी राखली. तिघेजण तेथील मऊ बिछायतीवर स्थित झाल्यानंतर माणीकबोवानें विकंठास भारतीचा मनसुबा कळविला. विकंठानें लोभयुक्त होऊन रमलास अभय दिल्यानंतर तो सांगूं लागला "आपल्यासारख्या अधिकारसंपन्न थोर माणसाशीं माझा हमेष प्रसंग घडतो. सांप्रत मला ज्याच्यापासून अपाय होण्याचा खात्रीलायक संभव आहे ती व्यक्ती म्हटली म्हणजे आंध्र देशाचा रुद्रवंशीय महाराजा लोहपात ही होय. या लोहपाताचा प्रत्यक्ष असा गुन्हा माझ्या-कडून कांहींच घडलेला नाहीं. द्रव्यतृष्णा, विषयवासना, मानमरातब, अधिकारप्राप्ति यांतून कोणत्याही हव्यासाच्या भरीं पडून मी स्वतः त्या लोहपाताच्या क्रोधास पात्र झालों नाहीं. अप्रत्यक्ष रीतीनें मात्र लोह-

पातास मजबद्दल पूर्ण वैषम्य वाटण्यास बळकट्टर कारण आहे. लोहपाताची सावत्र माता कुंदिनी हिनें आपणाप्रमाणेंच एका भारदस्त माणसाच्या ख्रतीनें माझ्याशीं स्नेह पाडला. त्यावेळीं या लोहपाताचा या भूतलावर जन्मही झाला नव्हता. लोहपात त्यासमयीं आपल्या सख्ख्या मातेच्या उदरांतील जठरानलांत उकडत होता. आईनें भक्षण केलेल्या आम्ल, तिक्त, क्षार, कटु पदार्थांच्या, रसांतील तीक्ष्णतेच्या तापाचें परिमार्जन करण्याचे देखील या लोहपातास ज्ञान नव्हते. लोहपाताचा पिता महाराणा शतधन्वा यास संपदा आणि कुंदिनी अशा दोन बायका होत्या. त्यापैकीं संपदा ही दुसरी व कुंदिनी ही पहिली होय. कुंदिनीस संतती होईना तेव्हां शतधन्व्यानें पुष्कळ वैद्यक्रिया, नवस, अनुष्ठानें करवून पाहिलीं; पण सर्व व्यर्थ. कुंदिनीच्या पोटीं संतान होणें दुरापास्त आहे असें समजून त्यानें संपदेशीं विवाह केला. लग्नसमयीं संपदा ही पूर्ण वयांत आलेली असून अगदीं दानयोग्य राजकन्यका होती. विवाह होऊन चार सहा महिने लोटले असतील नसतील तोंच संपदा अंतर्वत्नी झाली. संपदेला गर्भप्राप्ति झाल्यामुळें तिचे राजकीय चोज सुरू झालेले कुंदिनीला पहावेनात. ती आपल्या मनांत उदास व कष्टी झाली. राजमंदिरांतला सुखसोहळा तिला त्रासच देऊं लागला. संपदेला पुत्र झाला तर राण्याचें आपल्यावरील प्रेम कमी होईल; संपदेचाच वंश गादीवर बसेल आणि आपला जन्म निष्फल होईल. अशा भावनेनें हिरव्यानेत्रांनीं संपन्न अशा झोटिंगानें कुंदिनीला सतावून सोडलें. ती संपदेचा मत्सर करावयास लागून तिच्या गर्भस्थ जीवाचा नाश करण्याच्या प्रयत्नास लागली. स्त्रियांचा देहस्वभाव जाणून शतधन्व्यानें कुंदिनीबद्दल शक्य ती खबरदारी घेतली होती. गुप्तपणें विषप्रयोग करणें, औषधांत कपट करणें, भलतेच पदार्थ खावयास देणें अशा प्रकारच्या घातुक क्रिया होण्याचा संभव जाणून शतधन्व्यानें संपदेला फार सावधगिरीनें व काळजीनें जपली होती. कुंदिनी आपल्या मनांत तडफडून हरेक दुष्ट बेत करीत होती. अखेर माझ्यासंबंधाचा मजकूर तिच्या श्रवणपथापर्यंत जाऊन तिनें मला आदरपूर्वक पाचारण केलें. कुंदिनी आपल्या नवऱ्याची लाडकी असेल; पण किती झालें तरी

आंध्रदेशाधीश पर्वतीय राजाची ती महाराज्ञी होती. तिच्या आज्ञेचा भंग कोण करील ? तिच्या सखीच्या विनंतीवरून मी राणीकडे गेलों. तिचें माझें खलबत होऊन तिनें लागेल तें द्रव्य देण्याचें वचन दिल्यानंतर मी त्या योजनेस लागलों. मी आपल्या स्वतःच्या देहास कितीतरी शीण देऊन, भीतियुक्त प्रसंगांतील यातना सोसून, स्वतःच्या जीवावरही उदार होऊन कांहीं मंत्र साध्य करून रुद्रस्वरूपी भूत प्रसन्न करून घेतलें. संपदेची बाहुलीसारखी एक प्रतिमा करून ती एका बाटलींत घालून ती बाटली पुरून टाकली. त्या बाटलीचा प्रभाव असा होता कीं, ती जोंपावेतों मातीच्या आड दडलेली आहे तोंपावेतों संपदेच्या पोटांतील गर्भ जिवंत बाहेर कधींही यावयाचा नाहीं. ज्या दैवताची त्या बाटलीवर छाया पसरली होती त्याची अट अशी होती कीं, त्या बाटलीस पुन्हां जर सूर्यदर्शन घडेल तर ती जादू निःसत्व होऊन संपदा सुरक्षितपणें प्रसूत होईल. संपदेला नवमास पूर्ण होईपर्यंत याची परिक्षा कळण्यास मार्गच नव्हता. अखेर संपदेचे दिवस पूर्ण झाले. तिचें पोट दुखण्यास आरंभ झाला. हें पाहतांच कुंदिनी कावरीबावरी होऊन मजकडे हेलपाटे घालूं लागली. तिचा विश्वास डळमळूं लागला. परंतु, दहावा महिना संपत आला तरी संपदा प्रसूत होईना; हें पाहतांच कुंदिनीला भरंवसा वाटूं लागला. राजकुलांतील संपदेच्या लोभाचीं माणसें तिचे दिवस मोजावयास चुकले असतील असें ह्मणून समाधान करून घेऊं लागलीं. संपदेचें पोट दुखतच होतें. पोटांतील तिडीक जास्त जोरकस होऊन अकरावा महिना लोटला. बारावा महिना चालूं झाला. तेव्हां मात्र सर्वजणांना चिंता वाटूं लागली. कोणी शकलबाज बायांनीं संपदेनें घोडीचा पायबंद ओलांडला असेल अशी शकल लढवून तिच्या बारामहिने बाळंत न होण्याबद्दल सर्वांचें सांत्वन केलें. बारावा महिना संपला. प्रसूति तर होईनाच; पण तिला वेदनांनीं मात्र जर्जर केलें. तिचें पोट घडा झाल्याप्रमाणें फुगलें. तिच्या पोटांत गर्भ नसून तो गर्भासारखें पोट फुगविणारा कांहीं रोग असावासें कल्पून औषधोपचार व चिकित्सा सुरू झाली. मोठमोठ्या राजवैद्यांस आणून परिक्षा करविली. रोग वगैरे कांहीं एक नसून पोटांत गर्भच आहे असें वैद्यराजांनीं अनुमत दिलें. गर्भ बाहेर येऊन मूल व बाळंतीण मुक्त व्हावी ह्मणून औषध घ्यावें तर गर्भावस्थेंत

तसें करणें वाजवी नव्हे असें सर्वानुमतें ठरलें. टाण्याटोण्याची औषधें देऊन भागेना; रसायणासारखें ओखद देतां येईना. अशी कांहीं चमत्कारिक स्थिति प्राप्त झाली. इकडे संपदेचें उदर जलोदराप्रमाणें फुगून तिला अत्यंत क्लेश झाले. तिचें अन्नपाणी बंद राहिलें. ती सारखी तिडकूं लागली. तिच्या किंकाळ्या ऐकून वाड्यांतील सर्व माणसांस अन्नपाणी सुचेनासें झालें. तिच्या विलापांनीं सर्व राजधानीं चिंताक्रांत होऊन गेली. शतधन्व्याला संपदेचें दुःख पहावेना. शस्त्रप्रयोगानें गर्भ छिनून काढावा तर तिलाही अपाय होईल असें शस्त्रवैद्यांनीं सांगितलें. सर्वतोप्रकारें नाइलाज झाला. तेव्हां तें दुःख नजरेनें पाहणें नको असें वाटून शतधन्व्यानें संपदेला दासदासी समवेत आपल्या जलमंदिरांत नेऊन ठेवून तो परमेश्वरावर हवाला टाकून बसला. हें जलमंदिर आंध्र देशाची राजधानी गिरिकन्या इजपासून पंधरा कोस लांब होतें. संपदेची शक्य ती बरदास्त ठेवण्यास तिच्या बरोबर राजानें विश्वासू प्रधान व शूर सरदार दिले. जलमंदिरांत गेल्यानंतरही संपदेच्या व्याधींत कमीपणा आला नाहीं. ती जास्तच आक्रोश करावयास लागली. तिचा गर्भही बाहेर येईना व तिचा प्राणही जाईना. संपदा महाशब्द करावयास लागली म्हणजे जलमंदिराच्या आसपासचा प्रदेशही शोकाकुल होई. जलमंदिराच्या भोंवतालच्या टेकड्या, वृक्ष, लता, नजीक भराऱ्या मारणारे पक्षी व लीलेनें आसपास हिंडणारे पशु इत्यादिही संपदेच्या शोकमय स्वरानें सद्गद होऊन अश्रु ढाळू लागले. जिवंत ना मृत अशा अवस्थेंत संपदा बेसावध होऊन पडल्यास एक पंधरावडा लोटला; तों त्या ठिकाणीं कोणीएक प्रवासी सहज फिरत फिरत प्राप्त झाला. त्यानें तो करुणस्वर ऐकून मंदिरांत चौकशी केली. त्याला संपदेचा वृत्तांत समजला. त्यानें संपदेला स्वतः नेत्रांनीं पाहण्याची अवश्यकता आहे असें सांगितलें. प्रसंगांत सांपडलेल्या माणसांच्या अधिरपणास व विश्वासुक वृत्तीस हार गेलेल्या तेथील माणसांनीं त्या प्रवाशास संपदेपर्यंत नेलें. त्यानें तिचें निरीक्षण करून तो तेथून बाहेर आला व निराशायुक्त विचारांत आहेसा दिसला. प्रधानानें त्याचें मत विचारतां तो मुशाफर म्हणाला “ हा रोग नव्हे, हा स्वाभाविक आजार नव्हे, गर्भाशयांतील सर्वसाधारण

अव्यवस्थेचें हें कार्य नव्हे. ही सर्व जादु आहे. हा बीरमंत्राचा प्रभाव आहे. मी कोणी मांत्रिक नाहीं; परंतु कांहीं घातक मंत्राच्या साहाय्यानें प्राप्त होणाऱ्या क्षुद्र व नीच दैवतासिद्धीमुळें दुष्ट जादुगार असे प्रकार करितात हें मी जाणतों. याला कांहींएक उपाय नाहीं. ही जादु उलटविणारा कोणी भेटल्यावांचून या बाईची सुटका होणार नाहीं. त्या अशाच स्थितींत किती दिवस खितपत राहतील याचा सुमार नाहीं. " मुशाफराच्या माहितीनें आशायुक्त होऊन प्रधानानें त्यांस विनवून सांगितलें " आपण ज्याअर्थी या जादूचा मथितार्थ जाणता त्याअर्थी ती जादु परत उलटाविण्याची क्रिया आपणास माहिती नसेल असें खरें नसलें पाहिजे. आपण कांहींही मागा, वाटेल ती अट घाला, पाहिजे तें करा; पण येवढा परोपकार करून लाखो माणसांचा दुवा घ्या व अपूर्व यशाचा वाटा साधा. " असें बोलून प्रधानानें त्या प्रवाशापुढें साष्टांग लोळण मारिली. त्या प्रवाशास मंत्रविद्येचें ज्ञान नव्हतें. त्यानें तशा गोष्टी पुष्कळ ऐकल्या होत्या. त्यानें पुढें सांगितलें " ही जादु निःशक्त करण्याचें सामर्थ्य ईश्वरसाक्ष मजपाशीं नाहीं. परंतु, तिचें सामर्थ्य नष्ट होण्यास कसें काय घडावयास पाहिजे याची मात्र मला माहिती आहे. कोणा जादुवाल्यानें या राणीच्या नांवानें तिची प्रतिमा भारून ती बाटलींत घालून त्या बाटलीवर ब्रह्मराक्षसास स्थापून ती शिशी पुरून ठेवलेली असेल. त्या शिशीस सूर्यदर्शन झालें असतां तुमचें कार्य होईल " प्रवाशाची माहिती ऐकून प्रधान वगैरे मंडळींचें मन दचकलें. त्यांना कुंदिनीबद्दल संशय आला. तिनेंच कोणा देवऋषीच्या अनुकूलतेनें हें कौसाल केलें असेल तर ती बाटली पुरलेली जागा सांपडणें दुर्धर होय. असा उहापोह होऊन सर्वजण सचिंत झाले. त्या सर्वांची आशा सुटलेली पाहून व राणीचा विलाप ऐकून प्रवाशाचें हृदयही फार द्रवलें. त्यानें आपल्या मनांत बरीच विचारणा करून शेवटीं असें सांगितलें " मला मंत्र बिंत्र तर येत नाहींच; पण अदमासानें एक युक्ति योजून पहावी असें मला वाटतें. तुह्मीं आतांच्या आतां राणी प्रसूत होऊन पुत्ररत्न प्रसवली असा आनंददायक निरोप राजधानीस धाडा. राजेसाहेबांना सर्वमानकऱ्यांसह या ठिकाणीं आणण्याकरितां

सर्व स्वारीची तयारी करा. हें दुष्ट कर्म केल्याबद्दल ज्या कुंदिनीवर तुमचा वहीम आहे, तिच्यावर गुप्ततेनें राखण ठेवा. कदाचित पुत्रजन्माची वार्ता ऐकून ती कष्टी होईल आणि बाटली सुरक्षीत असून असें कसें झालें असें विचारण्याकरितां जादुगाराची गांठ घेईल व शिशीचा व्यवस्थित रंग पाहण्याकरितां चकून ते ती जागा उकरून पाहतील. हा आपला एक तोडगा आहे. ईश्वरकृपेनें माझा तलास खरा झाला तर तुमचें आयतें काम होऊन राणी हातींपायीं मोकळी होईल. जीवात्मा आहे तोंवर उपाय करीत असावें. ”

प्रवाशाची शोधकबुद्धी विचित्र आहे असें वाटून प्रधानानें त्यास तेथेंच आग्रहानें राहून घेतलें. दुसऱ्या दिवशीं प्रवाशाच्या सूचनेप्रमाणें राजधानीस उत्साहजनक बातमी पसरली. राजा शतधन्वा सौख्य गिरीच्या शिखरावर आरूढ झाल्यासारखा होऊन हत्तीवरून पेढे वाटीत सुटला. संपदेला मुलगा झाल्याचें वृत्त समजतांच कुंदिनीच्या अंगाचा तिळपापड झाला. तिची स्थीरता पार ढळून ती उतावीळपणानें मजकडे आली. मलाही आश्चर्य वाटलें. मला कांहींच पोंच राहिला नाहीं. माझी अक्कल गुंग झाली. मी कुंदिनीसह बाटली गाडलेल्या जागीं चोरून गेलों. आमच्या पाळतीवर दोन चार लोक होते हे त्यावेळीं मला समजलें नाहीं. आह्मी ती जागा उकरली तों त्यांत बाटली पूर्वीप्रमाणें सुरक्षित होती. बाटलीच्या सुरक्षिततेबद्दल खात्री करून घेण्याकरितां आह्मीं जो उपद्व्याप केला तोच न कळत आमच्या अंगावर आला. बाटलीला आमच्या करवींच सूर्यदर्शन घडलें. हा प्रकार झाल्यानंतर राणी संपदा खरोखर प्रसूत झाली. त्या प्रसूतींतीलच जो बालक तोच हा सांप्रतचा लोहपात होय. लोहपाताचा जन्म ज्याच्या शहाणपणानें झाला त्या प्रवाशाचें नांव सुदेव असें होतें. शतधन्व्याला सुदेवाचें वर्तमान समजतांच त्याला मोठा गहिंवर आला. त्यानें सुदेवाच्या चरणावर मस्तक ठेऊन त्याला राजगृहीं ठेवून घेतलें. संपदेला सुदेव हा प्रत्यक्ष पित्याप्रमाणें वाटूं लागला. सुदेवाच्या अकलेची सर्वत्र वाहवा झाली. तेव्हांपासून शतधन्वा सुदेवाच्या सल्ल्याखेरीज कांहींच करीत नाहीं.

लोहपातास त्याच्या जन्मापूर्वीं त्याच्या आईस केवढ्या मरणप्राय

यातना सोसाव्या लागल्या हें समजलें. तेव्हां तो अतिशय खेदयुक्त झाला. सुदेवाच्या हुषारीनें व बुद्धिसामर्थ्यानें आपल्या मातेचे क्लेश हरण झाले असें कळतांच लोहपाताची सुदेवावर बहाल मर्जी झाली. त्याला त्याजबद्दल पराकाष्ठेचा आदर व प्रेम वाटू लागलें. आपलें जीविताचा रक्षणकर्ता सुदेव आहे असें वाटून लोहपात स्वतःला त्याचा जन्माचा ऋणि समजू लागला. आपल्या मातेच्या छळास कारणीभूत झालेले इसम ह्मटले ह्मणजे कुंदिनी व रमलभारती हे आहेत असें समजतांच तो राजा लोहपात इतका कोपायमान झाला कीं, त्यानें माझा व कुंदिनीचा घात करण्याचें योजिलें आहे; इतकेंच नव्हे तर जगांतील सर्व जादुगार व बीरमंत्री यांचा नायनाट करून टाकावयाचा असा त्यानें विडाच उचलला आहे. आपल्या सापत्न मातेस त्यानें वेगळा तनखा तोडून देऊन हाकून दिली आहे. कुंदिनीरूपीं शीत चांचपून सर्व स्त्रीरूपीं भाताची परिक्षा ठरवून एकंदर स्त्रीजातीवर त्याचा मोठा कटाक्ष आहे. स्त्रीच्या उज्वलगुणांनीं संपन्न, स्त्रीधर्मास यथास्थितपणें चिकटून राहणारी, सुशील, आज्ञाधारक, विनयसंपन्न, मानी, लज्जावती अशी एखादी कुलशीलवान् कन्यका स्वतःच्या कसोटीस बरोबर उतरेल तरच तिचा पत्नी ह्मणून स्वीकार करावयाचा असा त्याचा निर्धार आहे. तशा प्रकारच्या स्त्रीचा शोध करण्याकरितां व सर्व जादुगारांना पकडून गच्छेंती देण्याकरितां हल्लीं त्या लोहपात राजानें बलभीम या नांवाचा एक प्रबल सरदार संचारार्थ पाठविला आहे. त्या बलभीमानें कित्येक देवऋषि, जादुगार, मांत्रिक यांना बांधून गिरिकन्येस पाठवून दिले व त्यांचा लोहपातानें तेथें भयंकर हाल करून घातही केला असें मला पक्कें समजलें आहे. हल्लीं तोच बलभीम राज्ञी अंबालया हिच्या राज्यांत हिंडत आहे. त्याची माझ्यावर आणि या माणिकचोवावर केव्हां गदा येईल याचा कांहीं नियम नाहीं. त्याच्या भयानें मला अन्नपाणी गोड लागत नाहीं. आपण जर आमच्या रक्षणाची हमी घ्याल व आपला खजीना मोकळा कराल तर हरेक नवीन साधनें करून आह्मीं अंबालयेला आपली बटीक बनवूं व लोहपाताचेही दात घशांत घालण्याचा उपाय पाहूं. ”

रमलभारतीनें सांगितलेली ही हकीगत ऐकून विकंठ राजा चकित् झाला. तरीपण स्वतःच्या कार्यावर नजर देऊन त्यानें भारतीचें सर्व ह्मणणें कबूल केलें. भारती, माणिकबोवा व विकंट यांचा निराळाच कट तयार झाला आणि ते तिघे विषयांध, भ्रष्ट, दुर्बुद्धि, दुराचारी नरपशु आपल्या पशुलीलेच्या तयारीस लागले.

---

# प्रकरण २४ वें.

धर्मपाळ व जांबवान हे माणिकबोवाशीं दंगादंगी करून घरीं गेल्या-नंतर त्यांनीं सौमिनीस भामिनीचा सर्व मजकूर कळविला. भामिनीनें माणिकबोवाच्या सल्ल्यानेंच घरांतील डागदागिना लांबविला अशी त्यांची खात्री झाली. आपण जींवत असतां आपली आई दुसऱ्याच्या घरांत गेली याबद्दल धर्मपालास मोठें लांछन वाटूं लागलें. माणिकबोवाच्या नर-डीचा घोट घ्यावा असा धर्मपाळास त्वेष चढला. पण त्या त्वेषानें त्याचा त्यालाच अधिक त्रास सोसावा लागला. विकंठासारखा प्रतापी राजा माणिकबोवाच्या कच्छपी आहे त्या अर्थीं आपल्या हातून त्याचें काय पारिपत्य होणार; याबद्दल धर्मपालास स्वतःचा कमकुवतपणा भासूं लागला. रमलभारतीच्या मर्मावर घाव मारून आपण त्याचेंही शत्रुत्वच पदरांत पाडून घेतलें ह्मणून तिकडूनही तो कच-रावयास लागला. सुलोचनेचा शोध नाहीं यामुळें अस्वस्थेनें त्याची पिछे-हाट चालविलीच होती. प्रवीराशीं तेढ उपस्थित झाल्यामुळें द्रव्यप्राप्तीं-तही धक्का बसू लागला. आतां पुढें काय करावें याविषयीं तो घोटाळ्यांत पडला. कांहीं तरी धाडसाचें कृत्य करून माणिकबोवाला खरपूस चोप द्यावा व त्याच्याजवळील आपल्या मालकीचा पैका उपटून आणावा; याबद्दल मात्र त्याचें मन वरचेवर ओढ दाखवू लागलें. त्यानें त्याकामीं जांबवानाचें गुप्त साहाय्य मागितलें आणि एके दिवशीं माणिकबोवाच्या घरावर रात्रीं हल्ला करावयाचा असा त्यांनीं बेत ठरविला.

आपल्या घरांत भामिनी आहे ही गोष्ट धर्मपालास समजली त्याअर्थीं

ती आतां आपल्याशीं सरळभावानें चालणार नाहीं; असें माणिकबोवाच्या सहजच मनांत आलें. भामिनीच्या द्रव्याचा प्रश्न मनांत आणून धर्मपाल आपल्या विरुद्ध कांहीं कट करून आपला नाशही करण्यास सरसावेल असें वाटून माणिकबोवानें त्याबद्दलची तरतूद लावण्याची युक्ति काढली. भामिनीचा पैका अद्याप तिच्याच कडीकुलपांत होता. तो पैका कसातरी आपल्या प्रत्यक्ष कबजांत घेऊन भामिनीला एकदां भिंधी करावी व आपल्या घरांतून हाकून द्यावी असें माणिकबोवानें योजलें.

धर्मपालानें पाळत राखून जांबवानास बरोबर घेऊन माणिकबोवाच्या वाड्यावर दरोडा घातला. या दिवशीं रात्रीं माणिकबोवा घरांत नसून कांहीं खाजगत कामाकरितां भारतीच्या घरीं गेला होता. धर्मपालानें रात्रीच्या सामसूमवेळीं वाड्यांत शिरकाव झाल्यानंतर माणिकबोवाच्या दिवाणखान्यांत प्रवेश केला. त्याठिकाणीं बोवाची बायको निजली होती. त्याच ठिकाणीं बोवाची जवाहीर ठेवण्याची पेटी होती. ती पेटी फोडण्याकरितां जांबवानानें त्या संदुकीवर ठोका मारतांच बोवाची बायको दचकून उठली. घरांत कोणी चोर शिरले असावेत असें वाटून तीं बावऱ्या घाबऱ्या मोठ्यानें बोवास व भामिनीस हाका मारूं लागली. इतक्यांत जांबवानानें तिचें तोंड दाबून धरिलें व धर्मपालानें तिच्या अंगावरील दागिने काढण्याकरितां तिच्याशीं हिसकाहिसक चालविली. त्या धटिंगणांच्या पुढें त्या बिचारीचा नाइलाज झाला. तिचें ओरडण्याचें साधनही बंद पडलें. धर्मपालानें तिचे गोट, तोडे पाटल्यादि दागिने काढून घेतले आणि ते दोघे जण घराबाहेर पडण्याकरितां दरवाजाची कडी काढण्यास आले. दरवाजा उघडण्यास व माणिकबोवा बाहेरून येण्यास एकच गांठ पडली. त्याच्या बायकोनें किंकाळ्या फोडून घरांतील माणसें उठविलीं. त्या सर्वांची ओरडाओरड याच क्षणीं बोवाच्या कानावर दरवाजांत आली. बदमाषगिरी करून पळून चाललेले बदमाष आयतेच सांपडलेसें समजून माणिकबोवा त्यांच्यावर तुटून पडला. रस्त्यांतच झोंबाझोंबी सुरू झाली. बोवानें धर्मपालास ओळखिलें व तो शेजाऱ्यापाजाऱ्यांच्या साह्यार्थ ओरडू लागला. आसपासचीं माणसें धावत आल्यास

आपला निभाव लागावयाचा नाहींसें पाहून धर्मपाल व जांबवान यांनीं पलायन सजीवतें केलें आणि आपलें घर गाठलें. चोरटे हातांतून निसटलेसें पाहून माणिकबोवाही निमुटपणानें घरांत शिरला. पण त्याची बायको व भामिनी यांच्याकडून त्याला सर्व मजकूर समजला. त्यानें चोरीबद्दल विशेष खंत न दाखवितां मारहाण झाली नाहीं यांतच समाधान करून घेतलें.

रात्र निघून गेली. चोर कोण होते व चोरी काय हेतूनें झाली हें माणिकबोवानें ओळखलेंच होतें. ऐवज गेले या नुकसानीपेक्षां त्यांनीं बायकोचे हाल केले याबद्दल बोवा आपल्या मनाशीं चवताळून गेला. या गोष्टीचा मोबदला घ्यावयाचा ह्मणून त्यानें भामिनीस भ्रष्ट करावयाचा असा कृतनिश्चय कायम केला.

चोरीचें धाडस कोणी केलें याची कोणास कांहींच वर्दी न देतां बोवानें ती गोष्ट तशींच मनांतल्यामनांत दाबून ठेविली. महिना पंधरा दिवस जाऊन देऊन ती गोष्ट शिळी झाल्यावर त्यानें एके दिवशीं रात्रीं भामिनीस कांहीं घरगुती निमित्तानें खाजगत दिवाणखान्यांत बोलाविलें. परावलंबनीय बनलेली ती भामिनी त्याच्या ह्मणण्याप्रमाणें माडीवर जाऊन बसली. बोवांनीं छपरपलंग सजवून ठेवलाच होता. भामिनीसारख्या विधवेशीं समागम करण्याबद्दल बोवाला कांहींच दर्द वाटत नव्हती. तसल्या प्रकारच्या घाणेरड्या कामांत बोवा निरढावलेलाच होता. सहज चेष्टेचें बोलणें सुरू करून माणिकबोवानें आपला ओघ भामिनीच्या स्वरूपवर्णनाकडे वळविला. भामिनीनें त्याच्या तशा भाषणाला नापसंती दर्शविली. भामिनीनें आपला पैका आपल्या स्वाधीन केला; पण आपला देह दुसऱ्याच्या ताब्यांत देण्यास ती खुषी नाहींसें पाहून बोवा ह्मणाला " भामिनी, तुला तरी सौख्य पाहिजेच आहेना ? खऱ्या सौख्याला अंतरून तुला किती तरी दिवस झाले. एखादे दिवशीं कांहीं रंग केला तर त्यांत काय बिघडेल ! "

बोवानें भ्रष्ट भाषण ऐकून भामिनी आश्चर्यानें बोलली " बोवा, काय हे अचावचा बोलणें ? असे अभद्र शब्द तुह्मी तोंडावाटें उच्चारू देखील नयेत. मी सर्वस्व तुमच्या हवाली केलें त्याचें कां मला हें प्रायश्चित्त ? "

भामिनीच्या प्रश्नास बोवानें उत्तर देण्याकरितां प्रश्न विचारिला " मग आजपर्यंतच्या खर्चात तुमचा पैका संपन नाहीं का गेला ? आतां तुमचे मजपाशीं काय उरलें आहे. मी जर तुह्मास हाकून दिलें तर तुमचें हाल कुत्रें सुद्धां खाणार नाहीं. तेंव्हां बऱ्या बोलानें माझें ह्मणणें मान्य करा. बरें त्यांत तुमचें नुकसान काय आहे ?" बोवाचे बेजबाब व फाजील बोलण्यानें तिचा स्वाभिमान जागृत होऊन भामिनीनें उत्तर केलें " माझें नुकसान सर्वस्वीं मी आपल्या हातानें केलें. पण तुह्मी असले छटेल असाल असा माझा तर्क नव्हता. मी आपलें वित्त तुमच्या हवाली करून मजुराप्रमाणें तुमच्या घरांत काबाड-कष्ट करीत आहे त्याचें कांहींच नाहीं वाटतें ? वर आणखी तुमचें हें भलतें बोलणें. माझे दागिने परत टाका ह्मणजे तेवढ्यावर मी आपला जन्म कोठेंही काढीन."

भामिनी घाईवर आलीसें पाहतांच बोवानें सांगितलें " आतां तुमचे दागिने कुठले ? ते संपले; ते तुमच्या खाण्यांत गेले. तुमच्या पांढऱ्या पायानें तर मजवर दोन बिलामती आल्या. तुह्मीच माझें नुकसान भरून द्या. तुमच्यामुळेंच तुमच्या कारस्थानें माझी गचांडी धरली. तुमच्यामुळेंच परवाची चोरी झाली. तुमच्या पोरानेंच माझ्या बायकोचे दागिनें हिसकावले. माझ्या बायकोच्या अंगाशीं ज्यानें झोंबाझोंबी केली त्याच्या आईस ह्मणजे तुह्माला भ्रष्टविल्याखेरीज मी राहणार नाहीं. दागिने तुमचा कारटा घेऊन गेला. आतां बऱ्या बोलानें तुह्मी पलंगावर या ह्मणजे माझें नुकसान भरून निघालें. तुमचें नाक एकदां खालीं झालें ह्मणजे तुमच्या कारस्थाची अब्रू संपली. नंतर तुह्मास मी हाकून लावणार आहे."

असें बोलून बोवा पलंगाखालीं उतरला आणि भामिनीच्या अगदीं नजीक आला. तिचें मनगट धरून तो तिला ओढावयास लागला तेव्हां तिनें महाशब्द करण्याची धमकी घातली. तिच्या तशा कृतीनें तिचीच छीथू होणार आहे असें सांगून त्यानें तिला तशीच बिछान्यापर्यंत खैचली. शरमेनें हतवीर्य होऊन भामिनी ढळढळ रडावयास लागली. तिची स्मृति व ज्ञान गुंग झालें. नुसती स्तब्धता धरून रडत रडत तिनें

त्याच्यापासून सुटण्याकरितां हिसडाहिसड सुरू केली तिला धर्मपालाची आठवण झाली. माणिकबोवावर एकदम झडप घालून त्याचा कोणी तरी गळा कापावा असें तिला वाटूं लागलें. तिच्या मानसिक विचारास धाब्यावर बसवून माणिकबोवानें तिला गादीवर बसविली. दोन्ही हातांनीं तिच्या दंडास जबर धक्का हाणून त्यानें तिला तशीच लोळविली आणि तो समंध तिच्या उरावर बसला. कांहींएक दिक्कत न बाळगितां सारासार विचाराचे तिळतुल्य तुकडे करून तो खवीस माणिकबोवा भामिनीच्या निरीची गाठ सोडणार तों त्याठिकाणीं अकस्मात एक भव्य म्हातारा प्रकट झाला. सुलोचनेला सोडवून नेणारा जो वृद्ध तोच हा गृहस्थ होय. त्या वयोवृद्धानें पुढें होऊन बोवाचें डोकें वर उचललें आणि काय कर्म चाललें आहे असें हातानेंच खुणवून विचारिलें.

तशा एकांत व निर्भय जागीं आपणास स्पर्श करण्याकरितां कोण प्राप्त झाला हें पाहण्याकरितां बोवानें म्हाताऱ्याच्या चेहऱ्याकडे पाहतांच बोवा भामिनीच्या वक्षस्थलावरच थरथर कापूं लागले. त्याचें अवसानें गळालें. आपली सुटका होणें आतां शक्य नाहीं; येथेंच आपली गठडी वळणार; आपल्या घराचें वाटोळें होणार; आपले सर्व बेत जेथल्या तेथेंच राहणार असें सर्व त्याच्या मनांत एकदमच उभें राहिलें. त्याची बोबडी वळून हिंव भरल्याप्रमाणें त्याचे दात थडथड वाजूं लागले. त्या म्हाताऱ्याच्या ठिकाणीं त्याला काकासाहेबांचा पूर्ण भास झाला. आपल्या पातिव्रत्यतत्पर धर्मांगनेस मलीन होण्याचा प्रसंग ओढावलासें पाहून तिच्या मृतपतीनें संकटसमयीं उडी घातली अशी पक्की खातरी पटतांच माणिकबोवा उथळ्यासारखा कलंडला व पलंगाच्या खालीं जमीनीवर धाडकन आपटला. बोवाचें गाठोडें खालीं आदळतांच भामिनी वस्त्र सांवरीत उठली. म्हातारा तिच्या डोक्यामागेंच असल्यानें तिला दिसला नाहीं. एकाएकीं बोवा असा बेशुद्ध होऊन कसा पडला याचें परम आश्चर्य वाटून ती लगबगीनें पलंगाखालीं उतरली. उलट दिशेला तिचें तोंड फिरतांच म्हातारा अदृश्य झाला. आपणास दुर्धर क्लेश देणाराच्या दुःस्थितीचा विशेष विचार करीत न बसतां भामिनी खालीं चालती झाली. बोवाच्या घरांत येथून पुढें वास्तव्य करणें अती धोक्याचें आहे व आपल्या द्रव्याबद्दल त्याच्याशीं वासाघीस

घालण्यांत कांहींएक निष्पत्ति होणार नाहीं असें ठाम ठरवून भामिनी लागली व घराबाहेर पडून वाट फुटली तिकडे तडक चालती झाली.

---

# प्रकरण २५ वें.

माणिकबोवाच्या बायकोच्या अंगावरील जिनसा घरीं आणून धर्मपालानें त्या सौभिनीजवळ दिल्या. भामिनीनें चोरून नेलेल्या जिनगीचा थोडासा तरी मोबदला परत घरांत आला हें पाहून धर्मपालास कांहींसें समाधान झालें. माणिकबोवाला आणखी केव्हां तरी असाच लुबाडावयाचा व पेंचांत गाठून खरपूस समाचार घ्यावयाचा असाही धर्मपालाचा बेत झाला. भोगावती व रमलभारती यांचें सूत्र कशाप्रकारचें आहे हें धर्मपालाकडून जांबवानास समजलेंच होतें. त्याबद्दल जांबवान भारतीवर दांत ओंठ चावीत होताच. प्रवीराच्या घरांतील बलिदानाच्या हकीगतीवरून जांबवान व धर्मपाल हे दोघे भारतीच्या नाशास प्रवृत्त होऊन बसले होते. माणिकबोवाप्रमाणें एकदां भारतीचा देखील समाचार घेऊन भोगावतीस पळवून आणली पाहिजे असें जांबवानानें फार आग्रहानें सांगितलें. त्यावरून आपल्या आणखी कोणा सोबत्याच्या मदतीनें ती गोष्ट लवकरच कशी पार पाडावयाची या विचारांत ते गढून राहिले. भारतीला थोडी चुणूक दाखविली म्हणजे मग सरला व सुलोचना यांच्या प्राप्तीचा मार्ग पहावयाचा व कोणी अन्य किमयागार गांठून सोनें बनवावयाचें असा पुढचा विचार ठरला. कसेंही झालें तरी धर्मपालाची सुलोचनेची आठवण ताजी होती. व त्याचा मुख्य मुद्दा जी श्रीमंती ती अचानक लाभण्याचा प्रयत्न हा त्याच्या कर्तव्यांतीलच एक भाग झाल्यासारखा दिसत होता.

एवंच जगपर्यटण करून हरेक तऱ्हेची ज्ञानप्राप्ति करून घेतल्यापासून हा काळपावेतों कोणत्यातरी व्यवहारिक सबबीवर व प्रापंचिक सयुक्तीवर विसंबून राहून धर्मपाल हलके हळू काम, क्रोध, लोभ, मोह, मद आणि मत्सर यांच्या षट्चक्रांतच भ्रमण करीत राहिला होता. शांतता, आनंद, सौख्य, समाधान, स्थीरता, थोरपणा यांच्या हव्यासानें त्यानें अनेक विद्यांचें

सेवन केलें व नाना गुरूंची कास धरली. या योगेंकरून उद्दिष्ट कार्य तर साधलें नाहींच पण उलट तो मदाचा दास बनून त्याची देहवयसेची पेटी अभिमान प्रवृत्तीच्या पोटांत बांधली गेली. रजोगुणाच्या महावातानें त्याचा अज्ञानसागर क्षुब्ध होऊन कामक्रोधरूपी लाटांच्या उसळण्यानें धर्मपालाचें ज्ञानतारूं दोन्ही बाजूनें कलंडण्यास लागलें. गुणत्रयवृत्तींची भरती येऊन त्याचें तें जहाज अनेकविध वासनारूपी क्षारयुक्त जलानें भरून गेलें. नाकातोंडांत क्षारोदक शिरतांच बुद्धिरूपी नेत्र उघडले तरी क्षारतेच्या योगानें नेत्रांना अंधत्व येऊन त्याला खरा मार्ग समजेना. विपरीत ज्ञानामुळें त्याला एकसारख्या मोहाच्या गटंगळ्या बसू लागल्या. मदरूपी मीनानें त्याला चघळून फेकून दिल्यानंतर त्याला मत्सररूपी मगराची मिठी पडली. दंभरूपी महा भयंकर नक्राच्या जबड्यांत धर्मपाल आडकून राहिला. भवार्णवोल्लंघनाकरितां त्यानें केलेले उपाय व साधलेलीं साधनें निष्फल होऊन त्याचें उद्दिष्ट हेतूचें जहाज जास्त जास्त खोलांतच जावयास लागलें होतें.

एके दिवशीं दिवसा साडे अकरा वाजण्याच्या सुमारास धर्मपाल व जांबवान आपल्या घराच्या दरवाजावरील माडीवर गांवांतील आणखी पुष्कळ स्नेहीसोबत्यांसह गप्पा मारीत बसले होते. माणिकबोवा व रमलभारती यांची खोड चांगली कशी मोडेल याबद्दल निरनिराळ्या जल्पना चालल्या होत्या. आणखी दुसऱ्या कित्येक स्वतंत्र विषयांवर सामान्य चर्चा चालली असून मधून मधून विनोदी भाषणामुळें हास्य उत्पन्न होत होतें. अशा समयाला रस्त्यावर बराच गोंगाट ऐकू आला. त्यांनीं कान देऊन ऐकण्याची खटपट केली तों तो गोंगाट बराच लांबून ऐकूं येत आहे असा त्यांचा अजमास झाला. कांहीं काळ तो ध्वनी बंद पडलासें वाटे. क्षणाभरानें तो जास्तच उमटलासें भासे. असें बराच वेळ होतां होता तो आवाज एकसारखा व अधिक स्पष्टपणें ऐकूं येऊं लागला. गोंगाट अगदीं संन्निध येऊनच थडकला अशी अटकळ होतांच माडीवरील सर्वजण खिडकींतून रस्त्यावर पाहूं लागले. त्यांना असें दिसलें कीं, एक बराच वृद्ध मनुष्य पुढें पळत येत असून त्याच्या मागें कांहीं मंडळींचा घोळका लागला आहे.

हा वृद्ध मनुष्य अगदीं काटकुळा होता. तो एक मळकट पंचा नेसला होता. त्याच्या हातांत एक पाणी पिण्याची कासंडी होती. त्यानें अंगावर एक छाटीवजा उपरणें घेतलें होतें. त्याचीं अगदीं हाडें निघालेलीं दिसत होतीं. त्याचे गाल फारच कृश दिसत असून डोळे खोल गेल्याचा भास होई. त्याच्या डोक्यावर करंगळी येवढी जाड व वीतभर लांब अशी फक्त एक शेंडीची बट राखलेली असून त्या बटींत एक रुद्राक्ष अडक विलेला दिसत होता.

या मनुष्याच्या मागें लागलेली चटोर मंडळी लहान थोरांनीं युक्त होती. तींतील कांहीं लोक " कृष्ण कृष्ण " व कांहीं लोक ' रामराम ' अशा शब्दांचा घोष करीत त्या म्हाताऱ्याच्या मागें खिदळत होती.

" कृष्ण कृष्ण " अशा शब्दांचा उच्चार ऐकून तो म्हातारा चिडून जाऊन " त्या छिनालाचें, त्या जाराचें नांव कशाला घेता ? " असा प्रश्न करून मंडळींना बीभत्स शिव्या देई. " रामराम " हीं अक्षरें उच्चारलेलीं ऐकतांच तो वृद्ध " त्या उदास, अरसिकाचें नांव कां घेतां ? " असें म्हणून लोकांना शाप देऊन दगड मारावयास लागे. असा हा दंगा धर्मपालाच्या घराशीं येऊन थडकला. माडीवरून इतर मंडळी खालीं निघून गेली व त्याच टोळक्यांत सामील झाली. धर्मपाल व जांबवान आपल्या खिडकींतूनच पहात होते. तो किडकिडीत म्हातारा धर्मपालाच्या खिडकीखालीं येतांच त्यानें शिव्या शाप देतां देतां व टोळक्यावर धोंड्याचा वर्षाव करितां करितांच वरती खिडकीकडे नजर फेंकली. धर्मपालाची व त्याची दृष्टादृष्ट होतांच धर्मपालानें त्यास हातानें खुणावून माडीवर पाचारण केलें. ती खूण ओळखून त्यानें धर्मपालास विचारिलें " कां ? वरती कशाला ? चेष्टा करायलाच माडीवर बोलावितां आं ? " या प्रश्नावर नकारात्मक उत्तर देऊन धर्मपालानें पुन्हां त्यास खुणविलें. इतक्यांत घोळक्यांतील मंडळीही " रामराम; कृष्ण कृष्ण " असे ओरडत पुन्हां त्याच्या नजीक आली. म्हाताऱ्यानें हव्या तशा शिव्या झोकल्या व त्यांच्यापासून होणारी पीडा चुकविण्याकरितां म्हणून तो धर्मपालाच्या घरांत शिरला. तें पाहून घोळका निघून गेला. म्हातारा माडीवर येतांच धर्मपालानें त्यास हातानें जागा दाखवून खालीं बसावयास सुचविलें. म्हातारा

आसनस्थ झाल्यावर जांबवान त्यास म्हणू लागला "आपण इतकें चिडता काय म्हणून ? राम, राम आणि कृष्ण, कृष्ण—

जांबवानाचे एवढे शब्द बाहेर पडतांच म्हातारा एकदम उठला व परत जाण्याचा आविर्भाव आणून म्हणाला " हें काय बरें ? तुम्हीहीं निर्लज्जाप्रमाणें मस्करीला सुरुवात केली. "

जांबवानाचा ते शब्द बोलण्यांत चेष्टेचा हेतु नव्हता हें धर्मपाल जाणत होता. तरीपण तो म्हातारा तेथून चालता होईल असें वाटून त्यानें जांबवानास दाबलें व म्हाताऱ्यास आग्रहानें खालीं बसविलें. कांहीं काळ स्वस्थ बसण्यांत व अर्थपूर्ण दृष्टीनें परस्परांकडे बघण्यांत गेल्यावर धर्मपाल म्हाताऱ्यास म्हणाला " महाराज ? आपण ब्राह्मणच दिसतां ? आपलें स्नान झालेंच असेल. नसलें झालें तर पाणी तापलें आहे. आमचींहीं स्नानें व्हावयाचीं आहेत. आंघोळ करा व आज नैवेद्य येथेंच होऊं द्या. "

या विनंतीस म्हाताऱ्यानें नाहीं होय म्हणतां म्हणतां मान्यता दर्शविली आणि ते तिघेजण परसामध्यें आंघोळ करण्यास गेले. स्नानसंध्या, नमस्कार, देवपूजा, वैश्वदेव वगैरे आटोपल्यानंतर तिघेजण जेवावयाकरितां पाटावर बसले. पात्रें वाढून सिद्ध झाल्यावर धर्मपालानें क्षणभर डोळ्याआड एक हात लावून दुसऱ्या हाताचीं बोटें नाचवून नैवेद्य दाखविला. धर्मपाल व जांबवान जेवण्याकरितां तयार झाले; पण त्या साधूचें नैवेद्य दाखविणें संपलें नसल्यामुळें ते पानावर हात खोळंबून म्हाताऱ्याकडे पहात बसले. म्हाताऱ्यानें आसनमांडी घातली होती. त्यानें आपले दोन्ही डोळे मिटले असून तो आपल्या ध्येयाचें ध्यान करण्यांत तल्लीन झाला होता. बराच वेळ झाला तरी त्याचा नैवेद्य आटपेना. धर्मपाल व जांबवान अगदीं कंटाळून जाऊन म्हाताऱ्याला काय बोलावें या विचारांत होते. इतक्यांत त्या ध्यात्याचें आपल्या ध्येयाशीं एकीकरण होऊन त्याच्या नेत्रमार्गांतून अश्रूंच्या धारा चालू झाल्या. त्याच्याजवळ जाऊन पाहिलें तों त्यानें प्राणवायूचा निरोध केला असल्यानें त्याचा श्वासोच्छ्वास बंद असल्यासारखें वाटलें. तो अगदींच निश्चेष्ट व एकाग्र होऊन गेला होता. डोळ्यावाटें घळघळा

वाहणारे बाष्पतोय भुईवर टपाटप गळतांना पाहून धर्मपाल आश्चर्यचकित् झाला. म्हातारा कोणी वेडापिसा नसून तो कोणीतरी कारणीक पुरुष असावा अशी धर्मपालाची कल्पना व्हावयास लागली. बऱ्याच वेळानें म्हाताऱ्यानें ध्यान सोडिलें. त्यानें डोळे उघडून तो पूर्वस्थितीवर आलासें पाहतांच धर्मपाल त्याच्या लगत गेला आणि त्याच्या पाया पडून त्यानें त्यास विचारिलें " साधु महाराज; आपण नैवेद्य कोणास दाखविला व कोणाचें ध्यान करण्यांत आपण इतकें रममाण झाला होता तें स्पष्ट सांगण्याची कृपा करावी. "

धर्मपालाचा जाब ऐकून म्हातारा सहृदय होऊन बोलला " ज्यांच्या नांवाचा उच्चार ऐकतांच मीं चिडतो व दगड मारावयास लागतों त्याच श्रीरामचंद्रास—-श्रीकृष्णासच मीं नैवेद्य समर्पण केला व त्यांचेंच ध्यान केलें. "

त्याच्या आचाराशीं विसंगत असा त्याचा जबाब ऐकून धर्मपाल म्हणाला " श्रीराम, श्रीकृष्ण हेंच आपलें ध्येय दैवत असून आपण त्यांच्या नांवाचा मग इतका तिटकारा कां दाखवितां बरें ? "

धर्मपालाचें सयुक्तिक म्हणणें ऐकतांच म्हातारा बोलला " अशारीतीनें कां होईना — हरिनामाचा घोष व्हावा यावांचून त्यांत अन्य कांहींच हेतु नाहीं. सांप्रतकाळीं शहाणपण, ज्ञान, चातुर्य, विद्वत्ता, सयुक्तता यांचा ऊत आला असल्यानें मुद्दाम केलेला हरिनाम गजराचा उपदेश कोणी जुमानणार नाहीं. इतकेंच नव्हे तर तशा उपदेशकाची वेड्यांतच गणना होईल. तेव्हां समजूत घालण्याचें कांहींएक सायास न पडतां केवळ आपल्या चिडण्यानें जर नामघोष आयतांच होत आहे तर तेवढा आव घालण्यानें मोठें कार्य झाल्यासारखें नाहीं काय ? "

म्हाताऱ्याची ती चमत्कारीक वृत्ति ध्यानांत घेऊन धर्मपालास सप्रेम कौतुक वाटलें. त्यानें त्यास पुन्हा विचारिलें " आपलें हें म्हणणें बरोबर असलें तरी आपण ध्यान करतांना श्रीरामचंद्र आणि श्रीकृष्ण या दोन्ही मूर्ति एकाच काळीं डोळयापुढें कशा रेखाटल्या ? दोन्ही ध्येयांच्या ठिकाणीं एकसमयावच्छेदेंकरून आपलें मन एकाग्र कसें झालें ? "

या भाषणावर म्हातारा ईषद् हास्य करून म्हणाला " तुम्हाला अद्याप

कांहीं समजत नाहीं. राम तोच कृष्ण व कृष्ण तोच राम, हरी तोच हर आणि हर तोच हरि ! परमेश्वरानें भक्ताकरितां अनेक सगुण रूपें धारण केलीं तरी तो निवळ नटवेष असून त्याच्या धर्माच्या ठिकाणीं द्वैतसंबंध नाहीं हें जाणणें ही गोष्ट भावनेवर अवलंबून आहे. ”

भाषणाच्या नादांत वाढलेलें अन्न निवून गार झालें. वाढणाऱ्या नायका ताटकळून कंटाळल्या असें पाहून धर्मपाल, ज्ञातारा व जांबवान यांनीं एकमतानें तो विषय तिलकाच थांबता घेतला. नायकांनीं पहिलें अन्न काढून घेऊन उन्हून जिन्नस वाढले. सर्वत्रांचें जेवण उरकल्यानंतर तो विषय पुढें चालवावयाचा असें प्रत्येकानें आपापल्या मनाशीं ठरवून ठेविलें.

# प्रकरण २६ वें.

भोजन झाल्यानंतर ज्ञातारा वामकुक्षी करण्याकरितां एका निवस्थ अशा खोलींत जाऊन पडला. जांबवान व धर्मपाल माडीवर गेले. भटजी-महाराजांस कांहीं मंत्रतंत्र प्रयोग माहीत असतील अशी कल्पना करून सुलोचना व सरला यांचा त्यास प्रश्न विचारावा; त्याचप्रमाणें किमया व वशीकरण या विषयींही त्यांना कांहीं माहिती असल्यास पहावें असें धर्मपाल व जांबवान यांचें भाषण झालें. चार घटका इतका काळ गेल्या-वर ज्ञातारा उठून माडीवर आला. जेवण्याच्या वेळचाच विषय काढून बोलतां बोलतां धर्मपाल आपल्या मुद्यावर येऊन ह्मणाला “ बोवाजी, आपण नेहमीं हवे तिकडे फिरणारे दिसता; आपण अनेक यात्रा केल्या असतील. मोठाल्या जंगलांतून आपणास पुष्कळ प्रवास घडला असेल. आपल्या पाहण्यांत शेंकडों वनस्पती आल्या असतील. मग ज्या वनस्प-तीच्या योगानें लोखंडाचें सोनें होईल अशी कांहीं जडीबुटी आपणास ठाऊक असल्यास आह्मांला सांगा. ”

धर्मपालाचा भलताच बोल ऐकून ज्ञाताऱ्यानें सांगितलें “ मी कोणी किमयेवाला बोवाजी नाहीं. या देहास वेदधर्म अशी संज्ञा आहे. लोखं-डाचें सोनें करणें ही गोष्ट आपल्याच हातांत आहे. त्याला वनस्पति,

परीस, किमया यांची अपेक्षा नाहीं. खेरीज ज्याच्या घरांत सर्वत्र सुवर्णच भरलें आहे त्यानें सोन्याच्या किमयेचा शोध कशाला करावयाचा. तुमच्या या माडीवर कोपऱ्यांत ठेवलेला हा खलबत्ताही सोन्याचाच आहे; तुमच्या जाजमावरील चाकू, कात्री हीं देखील सोन्याचींच दिसतात. मग आणखी सुवर्णप्राप्तीबद्दल आधाशीपणा आपण कां दाखवावा ? ”

वेदधर्मानें वर्णन केलेले खलबत्ता, चाकू, कात्री हे तेथील जिन्नस लोखंडाचे होते. परंतु, त्याच्या उच्चाराप्रमाणें धर्मपाल व जांबवान यांनी आपली दृष्टी जशी जशी त्या त्या वस्तूकडे फिरविली तशी तशी ती प्रत्येक वस्तु सुवर्णाचीच झाली. हा चमत्कार पाहतांच धर्मपाल विस्मय पावला. आपण ज्याकरितां आजपर्यंत सातसायास चालविले होते ती गोष्ट आपल्या पायानें आपल्या घरांत चालून आलीसें वाटून त्याला आनंदाची उकळी फुटली. वेदधर्माच्या अगाध सामर्थ्याबद्दल त्याला अनिर्वाच्य पूज्यभाव उत्पन्न झाला. वेदधर्माच्या सात्विक पराक्रमाचा अर्थ समजून धर्मपालही पूर्ण सात्वीकच व्हावयास पाहिजे होता; पण तसें न होतां त्या सात्विकी शुद्धतेचा विपर्यास करून धर्मपाल, सुलोचनेचा आतां आपणास उपभोग मिळेल अशा भावी आशेनें सौख्य सागरांत पोहूं लागला.

धर्मपालानें वेदधर्मापुढें हात जोडले आणि त्यानें त्यास पुन्हा आर्जवयुक्त वाणीनें विनविलें कीं “ साधुमहाराज; आपण आमचीं दोन कार्यें करा. आह्मी आपले किंकर आहों. आपण आह्मास आज देवच भेटला. आपण आपल्या दृष्टिपातानेंच लोखंडाचें सुवर्ण केलें. ही विद्या आह्मास शिकवा. ही एक गोष्ट झाली. दुसरें काम असें आहे कीं, सुलोचना नांवाची एक स्त्री माझें मन चोरून पळाली आहे. तिनें माझें चित्त वेधलें आहे. तिची प्राप्ति होऊन तिचा माझा अक्षय समागम होईल असें करा. त्याचप्रमाणें या जांबवानाची भगिनी सरला हिचा पत्ता नाहीं तोही आपणच लावून द्या. इतकें केलें तर आपणास आह्मी वाटेल तें देऊं. ”

आपण दाखविलेल्या अद्भुत चमत्कारानें सावध न होतां धर्मपाल भ्रमाच्याच खळग्यांत चालला आहे; असें जाणून वेदधर्म ह्मणाला “ पोरवयाच्या मानानें तुह्मी थोर आहां. पण थोरपणाच्या मानानें तुह्मी पोर

आहां. तुह्माला नरजन्माची प्राप्ति झाली आहे. परंतु पूर्व जन्मांतील तुमचे संस्कार अभद्र आहेत. तुह्माला दुर्दैवानें सोन्याची आकांक्षा फार जडली आहे. हीन धातूचें सोनें बनविण्याकरितां परिश्रम करण्यांत तुह्मी कालाचा अपव्यय केला असें मी ह्मणतों. ज्या देहाच्या सौख्यावर नजर देऊन तुह्मी सोन्याच्या नादीं लागला त्या देहाचेंच सुवर्ण कसें बनवावें हें शिकण्याकरितांच तुह्मी सर्व खटाटोप करावयास पाहिजे होता. तुह्माला जें सुवर्ण पाहिजे आहे तें सुवर्ण देहच सोन्याचा बनला ह्मणजे आयतेंच पदरांत पडतें. देहाच्या ठिकाणीं ज्या ज्या द्वैत भावना वास्तव्य करितात त्यांचा नायनाट करून देहाची कांती सुवर्णमय झाली ह्मणजे ज्या वस्तुकडे ज्या दृष्टीनें पाहावें त्या अनुरोधानें त्या वस्तूस स्वरूप प्राप्त होतें. लोह व सुवर्ण यांतील भेदभाव नाहींसा झाला म्हणजे सोनें तेंच लोखंड व लोखंड तेंच सोनें असें आहे. ”

वेदधर्माच्या ज्ञानप्रतिपादनानें धर्मपालाचें मन तिकडेच लीन व्हावयास लागलें. किमयेची वनस्पती समजून घेण्याची इच्छा तशीच टांगलेली राहून तो त्या प्रतिपादनांतच गुरफटून ह्मणाला “ आपण आपल्या अमोघ वाणीनें सोनें व लोखंड सारखें बनविलें तरी पण जगांमध्यें सोन्यानेंच सर्व व्यवहार व्यापला आहे. संसारामध्यें सुखानें राहून थाटानें व वजनानें कालक्रमणा करण्यास कनकाचेंच पाठबळ पाहिजे आहे. द्रव्यरहित मनुष्य सद्गुणाचा पुतळा असला तरी त्याला कोणी ढुंकूनही विचारणार नाहीं. पण मनुष्य कोणत्याही प्रकारचा दुर्गुणी, नादान व त्याज्य असला तरी द्रव्याच्या वाढीबरोबर तो सर्व गुणांचें, ज्ञानाचें, थोरवीचें अधिष्ठान होऊन राहतो हें आपणास आह्मीं सांगावें असें नाहीं.”

वेदधर्मः— खरा गुण कशास ह्मणावें याबद्दलची तुमची कल्पना फार उथळ असल्यानें तुह्मावर सुवर्णाची छाप बसली आहे. व्यवहारिक सद्गुण, लौकिकी थोरपणा व कायदेशीर सचोटी यांच्यांत व सद्गुण, थोरवी व सत्य यांच्या आद्य तत्वांत महदंतर आहे.

धर्मपालः— जगतांत ज्या माणसांची थोरपणांत गणना होते त्यांच्या अंगचे गुण, त्यांचा व्यवहार, त्यांचा आचार यांचें महत्व कबूल करून

तसे गुण, तसा व्यवहार व तसा आचार यांस तर तुह्मी खऱ्या थोरपणाचीं स्वर्गीं अंगें असें नांव द्याल किंवा नाहीं ?

वेदधर्म—स्वसंरक्षण व समाजव्यवस्था यांच्याकरितां गुणांचें स्वरूप मर्यादित झालें असेल तर त्या गुणांस चिकटून राहूनही गुणसंपन्नतेचें खरें कार्य साधणार नाहीं. एखाद्यानें दुसऱ्यास कर्जरोखा लिहून देऊन त्याच्याजवळून कांहीं रुपये ऋण काढलें. कागदाच्या मुदतींत रिणकोनें कर्ज फेडिलें नाहीं आणि कायदेशीर मुदत संपण्यापूर्वीं धनकोनें न्याय-कचेरींत दावाही लावला नाहीं. कर्जरोखा कायद्याबाहेर गेलासें पाहून कुळानें पैसे नाकारलें व सावकारानेंही आपला मूर्खपणा पतकरून कपाळाला हात लावून तो स्वस्थ बसला. रिणको व धनको या दोघांचीही गणना प्रतिष्ठित माणसांत होत आहे. त्यांच्या दरम्यान घडलेल्या व्यवहारांत कायद्याच्या दृष्टीनें सर्व गोष्ट यथास्थित झाली. धनको बुडाला; रिणको रिणमुक्त झाला. हें सर्व जमलें; पण यांत रिणकोचा थोरपणा कायम राहिला काय. राहिला नाहीं ह्मणावें तर रिणकोला दुर्गुणी ठरवून समाज त्याला तुच्छवत करतो काय ? समाज जर त्या रिणको माणसाच्या वृत्तीस थोरपणांतच लेखील तर तशा थोरवीस मूर्तिमंत थोरपणाच्या दरबारांत मान कधींच मिळावयाचा नाहीं. तशा प्रकारच्या माणसाच्या श्रेष्ठपणांत वैगुण्य उद्भवलें नाहीं, व्यवहारांत त्याची अवमानना झाली नाहीं, समाजांत त्याला दोष लागला नाहीं तरी धनकोपासून वाजवून घेतलेली रक्कम पुन्हां त्याच्या पदरांत पडेपर्यंत सद्गुणाच्या श्रेष्ठ सिंहासनापुढें त्याच्या थोरवीस, सद्गुणास, लौकिकास गचांडीच मिळेल. उदम्यापासून यादवार किंमत मांडून माल घेतला आणि उदम्याच्या समजुतीनें केलेल्या बेरजेप्रमाणें किंमतीची रक्कम चुकती केली. उदमी बेरीज करण्यास चुकला असला तर तो त्या गिऱ्हाइकास आकार कमी दिल्याबद्दल दोष देणार नाहीं. परंतु, उदम्याची चूक ध्यानांत येऊनही गिऱ्हाईक जर त्याचा योग्य पैका आपण होऊन देणार नाहीं तर तो व्यावहारीक सचोटीस मुकला नाहीं तरी शुद्ध सचोटीच्या न्यायमंदिरांत त्याच्यावर अशुद्धतेचा आरोप खास शाबीद होईल. याचप्रमाणें तुमच्या सर्व कारभारांची, सर्व व्यवसायांची, सर्व कृतींची, सर्व ज्ञानाची, सर्व श्रेष्टतेची व

सर्व मोठेपणाची वाट लागते. एतदर्थ गुणाच्या शुद्धतेकडे विशेष लक्ष पुरविणें अत्यंत अवश्य, श्रेयस्कर व हितकर आहे.

धर्मपाल०—तुमच्या ह्मणण्याप्रमाणें वर्तन करणारास बहूजनसमाज बावळा ठरवील. ज्या समाजाकडून धन्यवाद गावून घ्यावयाचा त्याच्याकडून बावळेपणाचा शिक्का स्वीकारण्याकरितां आपलें कपाळ कोण पुढें करील ?

वेदधर्म०—अशा वर्तनानें जनता त्या माणसास अर्वधट वेड्यात काढील हे खरें धरलें तरी परमेश्वराच्या सिंहासनापुढें त्या मनुष्यास पहिल्या प्रतीचा आदर मिळेल. ज्या जनतेच्या हातांत आपलें हळू जड करण्याचें कांहींच नाहीं त्या जनतेकडून बावळेपणाचा कमीपणा स्वीकारल्यानें ज्याच्या स्वाधीन आपलें सर्वस्व आहे अशा परमेश्वराच्या कृपेस जर आपण पूर्ण योग्य व पात्र ठरतों तर जनता आणि परमेश्वर यांतून कोणाची भीड बाळगावयाची हें ज्याचें त्यानें ठरवावें.

धर्मपाल०—या आपल्या विवेचनावरून शुद्ध सत्वगुणाचाच आश्रय करून परमेश्वरासच अनुकूल करणें श्रेयस्कर आहे असें ठरतें. तरी पण सोन्याच्या प्राप्तीची अवश्यकता राहतेच. प्रपंचाचा गाडा चालविण्याला द्रव्यावाचून अन्य बलवत्तर साधन दुसरें नाहीं. आपण आपली वृत्ति यथास्थित ठेवली तर प्रपंचभार माथ्यावर आहे तों पावतों जगाच्या वृत्तीचा, स्थितीचा व क्रमाचा विचार पाहिला पाहिजे.

वेदधर्म०—एकरूपत्वाच्या अवबोधामुळें ज्याच्या अंतःकरणांत शीतलता उद्भवेल त्याला सर्व जग शीतल भासेल. वडवानलाप्रमाणें ज्याच्या हृदयांत तृष्णाग्नि भडकून राहील त्याला सर्व जग दावदाहरूपच वाटेल. ज्या संसाराची आपण एवढी भीति धरतो तो सर्व संसार वासनेच्या पोटांतून बाहेर पडला आहे. दुःखादि अपरिमित यातनांनीं ज्यांचें चित्त त्रस्त झालें असेल ते लोक यज्ञयागासारखीं अनेक कर्मे आचरून आपलें दुःख हरण करण्याचा उपाय योजून आपणाला सदाचारी समजतात. एखाद्या अरण्याच्या अंतःकरणांत जसे पशु कालक्षेप करतात तद्वतच या असल्या धर्माचारी जनाच्या संसारांतील कालक्रमणाची अवस्था आहे.

ज्या वासनेपासून संसाराची उत्पत्ती होते ती वासना मुख्यतः शुद्ध व

मलीन अशी दोन प्रकारची आहे. संसाराची भावना व विषयांची प्रीति या मलीन वासना होत. शुद्ध वासनेचेही दोन प्रकार आहेत. स्नान, संध्या, जप, तप, यज्ञ, अध्ययन, तीर्थाटन, अतिथीपूजन या सारख्या ज्या वासना त्या शुद्धांतील मलीन वासना होत. वेदांताचें श्रवण, तत्व-चर्चा गुरुमुखांतून महावाक्याचें परिशिलन, समाधिसौख्याचा आनंद, हरीनामाच्याठायीं अनन्यभाव व सर्वच गोष्टींबद्दल निरिच्छता या शुद्ध-तर वासना होत. या शुद्धतर वासनांच्या सूत्राप्रमाणेंच देहाच्या चेष्टा चालल्या पाहिजेत.

धर्मपाल०— शुद्धतर वासनांचें प्रस्थ माजावयास लागलें तरी देहाच्या व्यवस्थित संगोपनार्थ अनेक प्रकारचें कर्म करणें भागच आहे. ज्ञानाच्या उपदेशानें मनाचा कल उज्ज्वल वासनांकडे झुकला तरी देह-सौख्यावांचून मनुष्याचें समाधान कसें होणार? देहसौख्यापासून उत्पन्न होणारी तृप्तता प्रत्यक्ष अनुभवास येणारी आहे. या तृप्ततेचा लाभ होऊन मनाला शांततेनें सात्विक वासनांनी कवटाळण्यास इच्छित देहसौख्याच्या प्राप्तीकरतां वाटेल तें कर्म केलें पाहिजे, हवा तो उद्योग चालविला पाहिजे आणि पडेल तो खटाटोप सोसला पाहिजे असें खरें नव्हे काय?

वेदधर्म—मनुष्याच्याठिकाणीं गृह, धन, सुत, दारा, वित्त, संसार, सुखसंभार व परलोकगमन याविषयीं जी भावना वास्तव्य करितें त्याचें कारण एक देहबुद्धि हेंच होय. पण ही देहबुद्धि मुळांतच खोटी आहे. देहाचें सत्यत्व सिद्ध करणें मुष्किलीचें काम आहे. जी वस्तु मुळांतच सत्य आहे ती कालत्रयींही एका स्थितींतच दिसली पाहिजे. देह जर खरा आहे ह्मणावें तर तो जसा जागृतींत भासतो तसा स्वप्नांत व सुषु-प्तींत भासत नाहीं. जी वस्तु जागृतावस्थेंत देहरूप भासते, स्वप्नांत दुसरीच आहेसें वाटते, झोपेंमध्यें मुळीं भासतच नाहीं तर ती सत्य आहेसें ह्मणता येत नाहीं. जागृती प्राप्त झाली ह्मणजे स्वप्नभ्रम नाहीसा होऊन स्वप्नांतील देह खोटा वाटतो तद्वतच प्रत्यक्ष जागृतींतील सत्य वाटणाऱ्या देहाची असत्यता आत्मज्ञानाच्या योगानें प्रत्ययास येतें. आतां या असत्य पण आत्मभ्रंशामुळें सत्य भासणाऱ्या देहाकडून ज्या क्रिया घडावयाच्या त्याचीं मुख्य कारणें पांच आहेत.

सर्व कर्मांचें अधिष्ठान हें मूळ शरीर होय. कर्मांचें कर्तृत्व ज्याच्या-कडे येतें असा अहंकार; इंद्रियांचा समुदाय; विविधशक्तींनें संपन्न अशा पांची प्राणांचा विकार, आणि पांचवें दैव किंवा पूर्व संस्कार या पांच कारणांनीं कोणतीही क्रिया निर्माण होते. गुरुकृपेनें आत्मज्ञान होऊन परमेश्वराची सर्वव्यापकता समजली ह्मणजे कर्तृत्व, भोक्तृत्व, देहात्मबुद्धी यांचा लय होऊन शरीर, व्यवहार कर्तव्य, क्लेश, सौख्य यांचाही त्याबरोबरच लय होतो.

धर्मपाल:— ह्मणजे मनुष्याचीं उन्नतावस्था जाऊन तो केवळ निर्जीव दगडाप्रमाणें बनतो. तात्पर्य सर्व हालचाल थांबवून धोंडेपणा स्वीकारून अवनती करून घेणें हेंच काय तें या जन्मींचें सार आहे.

वेदधर्म०—कर्मांचा लय होतो ह्मणजे सर्व व्यापार व चेष्टा बंद पडतात किंवा आपण त्या बंद ठेवावयाच्या आणि पाषाण व्हावयाचें असें नव्हे. परमेश्वर प्राप्तीखेरीज अन्य कोणत्याही गोष्टीच्या ठिकाणीं प्रेम राखावयाचें नाहीं. जगतांत जें जें काय आहे तें तें सर्व भगवंताचें आहे असें समजून त्याच्याच ठिकाणीं चित्ताचा लय करणें याहून कोणतीही गोष्ट श्रेष्ठ नव्हे. परमेश्वराप्रीत्यर्थ केलेलें कोणतेंहीं कर्म तें कर्म नव्हे व त्याच्याच प्राप्तीबद्दल राखलेलें प्रेम तें प्रेम नव्हे.

धर्मपाल०—जगतांतील प्रत्येक गोष्ट जर परमात्म्याच्याच मालकीची आहे तर त्या परमात्म्याच्या लाभावांचून मनुष्याला अनेक चमत्कार घडवून दाखवितां येतात व दुर्लभ वस्तु प्राप्त करून घेता येतात हें कसें ? ज्याला तुह्मी सदाचार असें नांव देतां त्याच्या उलट वर्तन असूनही मंत्र, तंत्र, जादु यांच्यायोगानें जे लोक हवी ती गोष्ट मानवाच्या आटोक्यांत आणतात ती कोणाच्या साहाय्यानें ? तुह्मी ज्या परमेश्वराचें एवढें स्तोत्र गातां तो परमेश्वर कांहीं वेळेस निर्बल कांहीं वेळेस मिंधा; कांहीं काळ क्रूर व कांहीं प्रसंगीं दयाशील असाच आहे ह्मणावयाचा ? कां परमेश्वर हा कोणीच नसून त्याची मनुष्याच्या सुरळीत व्यवहाराकरितां व समाधानाकरतां नुसती कल्पनाच धरून चालावयाची असें खरें आहे ?

वेदधर्म०—ती नुसती पोकळ कल्पनाही नाहीं, व त्याच्या सर्व-

शक्तित्वांत कधीं न्यूनही पडत नाहीं. त्याचा अधिकार काढून घेणारा कोणीही अन्य बलवंत नाहीं. आचाराकडे लक्ष न देतां मंत्र, तंत्र; यांच्या योगानें जीं दैवतें अनुकूल होतात तीं त्या परमेश्वराचीं सृष्टींतील इतर वस्तुमात्राप्रमाणेंच अंगें आहेत. एखाद्या अजब वनस्पतीच्या साहाय्यानें कांहीं अद्भुत चमत्कार करून दाखवितां आले म्हणजे त्या वनस्पतीसही परमेश्वर मानावयाचें नाहीं किंवा तशा वनस्पतीचें ज्ञान हें परमेश्वरप्राप्तीचें साधनही नव्हे. मणि, मंत्र, ओषधि यांच्या ठिकाणीं जें सामर्थ्य दिसून येतें त्याच्यावरही परमेश्वराचीच सत्ता चालत आहे. अनेक कार्यें करून देणारीं अनेक क्षुद्र दैवतें आहेत. क्षुद्र सिद्धींना प्रसन्न करून घेतलें असतां हवीं तीं महत्कार्यें घडूं शकतात; तरी तीं दैवतें व त्या सिद्धि म्हणजे कांहीं परमेश्वर नव्हे. परमेश्वर त्यांच्यावरही स्वामित्व गाजविणारा आहे. कारण ज्यानें परमेश्वरास आपल्या मुठींत आणून ठेवलें असेल त्याच्यापुढें मंत्र, तंत्र, मणि, ओषधि, शास्त्र, सिद्धि हीं सर्व लटपटून जातात.

धर्मपालः—अशा त्या सर्वश्रेष्ठ, सर्व सामर्थ्यसंपन्न, दुष्प्राप्य, गुरुगम्य परमात्म्यास गांठण्याकरितांच धर्म, सदाचार, सत्कर्म हीं साधनें त्यानेंच निर्माण करून ठेविलीं आहेत काय ? तसें म्हणावें तर, मोठमोठे शास्त्री, जपी, तपी, विद्वान, साधनी यांचीही परमेश्वराच्या प्राप्तीबद्दलची खटपट पूर्ण झालेली दिसत नाहीं यांतील मर्म काय ?

वेदधर्मः—परमेश्वरप्राप्तीचे अनेक मार्ग आहेत असें कल्पून जे लोक नानाप्रकारचीं सुकर्में आचरतांना दिसतात त्यांचें अंतःकरण केवळ परमात्मप्राप्तीच्या आतुरतेनें व्यथित झालेलेंच नसतें. अष्टांग साधन करणारे योगी, पंचाग्नींत काया दग्ध करणारे तपी; शास्त्राच्या सिद्धांताची वाटावाट करतांकरतां थकलेले पंडित यांना तसल्या साधनांनीं परब्रह्माचें दर्शन होणार नाहीं. निराहार राहून, फलाहार करून, जटाभार वाढवून, नग्न अगर मौन वृत्ति राखून, गिरिकंदरांचें सेवन करून, अनेक तीर्थें हिंडून, नानाविध विद्या अभ्यासून, श्रीहरीची गाठ पडणार नाहीं. शक्तीच्या बळावर परम पुरुष भेटणार नाहीं. धनाच्या प्रौढीवर ब्रह्म गवसावयाचें नाहीं. चौसष्ट कलांचें आकलन केलें तरी

जगदीश्वर सांपडणार नाहीं. परमेश्वर हातीं लागावा अशी जबरदस्त वांछा असेल तर ती परिपूर्ण होण्यास एक सद्भाव हेंच साधन आहे. परमेश्वरावांचून कांहीं नाहीं अशी हृदयांत ओळख न पटतां कोणताही आचार केला तरी तो अनाचारच होय; कोणतेंही कर्म केलें तरी तें भ्रमरूपच होय; कोणत्याही विद्या मुठींत आल्याशा वाटल्या तरी त्या शुष्क व निष्फळच होत. कोणत्याही प्रकारचें सुख व कोणतीही वस्तु यांच्या ठिकाणीं प्रेम न ठेवतां ज्याच्यापासून सर्व ब्रह्मांडें निर्माण झालीं व ज्याच्याठिकाणीं सर्व सुखें वास्तव्य करितात त्या सच्चिदानंद स्वरूपींच चित्ताचा लय होईल, परमेश्वर हाच आपल्या प्रत्येक व्यापाराचा विषय होईल, ईश्वराच्या सर्वव्यापकतेची, अचिंत्य सामर्थ्याची व अनादि अनंतत्वाची खात्री होऊन त्याच्याच ठिकाणीं अनन्य स्नेह जडेल तरच साक्षात परब्रह्माची भेट होणें शक्य आहे.

धर्मपाल०— इतके सायास करून देवाची प्राप्ती करून घेणाऱ्या माणसास मग तरी तक्रारीस जागा राहणार नाहीं हें तरी सत्य आहे काय? तशा माणसाचा तरी संसार सफळ करण्याची हमी परमेश्वर स्वीकारतो काय?

वेदधर्म०— परमेश्वर पाठीराखा होण्याइतका भाग्योदय असला म्हणजे अपाय तोच उपाय होतो; सर्व विघ्नांचें परस्पर निरसन होतें; प्रत्यक्ष कृतांतही त्याला अपकार करूं शकत नाहीं. पूर्व संचितानुसार त्याच्यावर आपत्तींचा घाला पडला असतां तो जर स्वतःच्या मनानें शुद्ध असल्याबद्दलची जबाबदारी पतकरील तर त्याच्यावर कोसळणाऱ्या कसल्याही आपदेबद्दलची जबाबदारी परमेश्वर सांभाळील यांत तिळमात्र संदेह नाहीं. परमेश्वर आपल्या जबाबदारीनें बांधला रहावा एवढ्याच-करितां, शुद्ध आचार, उज्ज्वल सद्गुण, सात्विक सत्यता, उच्चतम दया, उत्कृष्ट शांति व यांना साधनीभूत असणारीं विहित कर्में यांचा अंगिकार करणें हेंच आपलें कर्तव्य आहे.

हा संवाद होतांच धर्मपालाची चित्तवृत्ति तल्लीन झाली. त्याच्या अंतःकरणावर ताबा चालविणारे कामादि विकारांचे हातपाय थरथर कापू लागले. त्याला आतापर्यंतच्या आचरणाचा पश्चात्ताप होऊन त्याचें

अंतःकरण सहृदयतेनें अगदीं नाजूक होऊन गेलें. तो मौन धरून नुसते सुस्कारे टाकीत वेदधर्माकडे टक लावून पहात राहिला.

धर्मपालाची हीं वृत्ति ध्यानांत घेऊन वेदधर्मानें तो विषय तसाच सोडला आणि दुसऱ्याच स्वतंत्र गोष्टी काढल्या. त्यांतही धर्मपालाचा तटस्थपणा पाहून वेदधर्म त्या दोघांना उठवून आपल्या बरोबर घेऊन बाहेर फिरावयास गेला.

---

# प्रकरण २७ वें.

धर्मपालाच्या एका विनंतीची वाट अशा प्रकारें लागली. सुलोचना व सरला यांच्याबद्दलचा प्रश्न मात्र अद्याप सुटावयाचा होता. ती गोष्ट वेदधर्म विसरला नव्हता. दुसऱ्या दिवशीं ते तिघेजण एकत्र जमले असतांना वेदधर्मानें आपण होऊनच बोलणें काढलें. तो ह्मणाला " तुह्मीं जें मला दुसरें कार्य करावयास सांगितलें तें करून देण्यास मी तयार आहे. त्यापूर्वी मी तुम्हांस कांहीं प्रश्न विचारतों त्याचा तुह्मीं सरळ जबाब देणें इष्ट आहे. ही सुलोचना व सरला यांचा थोडासा पूर्व वृत्तांत मला तुम्हीं कथन करा. "

वेदधर्माची आज्ञा ऐकतांच जांबवानानें आपल्या बहिणीच्या सासरचीं ऐकलेलीं हकीगत तांत्रिक रीतीनें निवेदन केली. ती ऐकतांच धर्मपाल बावरल्यासारखा झाला. सरला व सुलोचना यांच्या हकीगतींत तंतोतंत साम्य आहे असें ध्यानांत येतांच धर्मपाल सुलोचनेचा समग्र वृत्तांत सांगण्याची उडवाउडवी करूं लागला. आपली बहीण सरला इच्या सासरचें नांव सुलोचनाच आहे असें ओळखून जांबवानास धर्मपालाच्या सुलोचनेबद्दल संशय आला. त्यानें ती गोष्ट वेदधर्मास बोलून दाखविली. जांबवानाचा संशय व धर्मपालाची चालढकल यांचा संबंध जळवून वेदधर्म धर्मपालास बोलला " जिच्यावर तूं भाळला आहेस ती सुलोचना कोणीही असो; तुला ती प्राप्त करून देण्यापूर्वी मी असें म्हणतों कीं, ती तुझी बहीण असती, तिच्यावर जो प्रसंग

गुदरला तसा तुझ्या बहिणीवर गुदरला असता; ज्याप्रमाणें तूं तिच्याशीं वर्तन केलेंस तसेंच वर्तन दुसऱ्या कोणी माणसानें तुझ्या बहिणीशीं केलें असतें; तर तुला कसें काय वाटलें असतें ? तुझी सुलोचना आपल्या घरीं पोहोंचून आपल्या आईबापाजवळ किंवा भावाजवळ आपली हकीगत सांगेल तशी तुझ्या बहिणीनें तुझ्याजवळ सांगितली असती तर तिला अपकार करणाऱ्याबद्दल तुला काय वाटलें असतें तें सांग. मी तुला सुलोचना मिळवून देईन; पण तुझीच बहीण अशा रीतीनें कोणी दुष्टानें मिळविली तर तुझी वृत्ति कशी होईल तें बोल. तुला सुलोचनेचा उपभोग मिळेल अशी मी तजवीज खास करीन. परंतु, तुझ्या बहिणीचा अशा रीतीनें उपभोग घेऊं पहाणारा नरपशु तुला कसा दिसेल हें समजू दे. सुलोचनेला जबरीनें अगर भोंदाभोंदीनें भ्रष्ट करवून ती अक्षय्य तुझ्यापाशीं विहार करीत राहील असें मी जुळवून देईन. पण अशाप्रकारें भ्रष्ट होऊन तुझी बहीण दुसऱ्या कोणा पापी माणसाबरोबर सतत विहार करतांना पाहून अगर ऐकून तुझी चित्तवृत्ति कितपत दम धरील हें सांग. या सर्व प्रश्नांचीं उत्तरें दिलींस म्हणजे मी तुझें सर्व कार्य करीन."

वेदधर्माचें भाषण ऐकून धर्मपाल ओशाळला. तो इतका लज्जायमान झाला कीं, त्यावेळीं त्याला तेथें बसणें देखील रुचेना. जांबवान तेथून जाईल तर बरें होईल असें त्यास वाटूं लागलें. तसें त्यास स्पष्ट सांगणें त्याला उचित दिसेना. सबब वेदधर्म एकटा सांपडेपर्यंत कांहींच बोलावयाचें नाहीं असा निर्धार राखून तो आपल्या सदसद्विवेक बुद्धीची टोंचणी सहन करीत मुकाट्यानें बसला.

धर्मपालाचा रागरंग ओळखून जांबवानाच्या अंतःकरणांत त्याच्याविषयीं तिटकारा उत्पन्न झाला. तो त्याच्याकडे क्रूर दृष्टीनें पाहूं लागला. आपल्या भगिनीवर पापवासना ठेवणारा पुरुष धर्मपालच आहे असें कल्पून जांबवान त्यास शत्रु समजूं लागला. त्याला धर्मपालाच्या घरांत एकक्षणभरही राहणें प्रशस्त वाटेना. धर्मपालानें आपला प्राण वांचविला ही गोष्ट त्याच्या हृदयांत जिवंत होती. तरी त्या उपकाराचें त्याच्या अपकारावर दडपण पडेना. त्यानें लागलीच वेदधर्मास नमस्कार केला

आणि कांहीं तरी निमित्त सांगून जांबवान तेथून उठून खालीं गेला. आपल्या बरोबरच्या सामानसुमानाचीही जरूर न बाळगतां तो घराबाहेर पडला. आपल्याला संशय आल्याप्रमाणें धर्मपालानें आपल्या भगिनीवरच दुष्ट नजर ठेविली असेल व तिच्या करतांच तो इतका भलता खटाटोप करीत असेल तर त्याचा चांगलाच सूड घ्यावयाचा अशा इराद्यानें तो आपल्या गांवाच्या वाटेला लागला. घरच्या माणसांना आपल्या गैरहाजिरींत सरलेचा कांहीं सुगावा लागला असल्यास चौकशी करावयाची; तसें नसेल तर सरलेच्या सासरी जाऊन बारकाईनें सविस्तर बातमी काढावयाची; तिचा शोध करून धर्मपालाबद्दल खात्री करून घ्यावयाची आणि धर्मपालास त्याच्या कुकर्माबद्दल पक्की अद्दल घडेल अशी तजवीज करावयाची अशा विचारांत चूर होऊन पावलें टाकीत टाकीत बऱ्याच कालानें तो आपल्या घराप्रत जाऊन दाखल झाला.

जांबवान एकाएकी उठून गेल्याबद्दल संशय येऊन धर्मपाल खालीं त्याला पहावयास गेला. त्याचें सामानसुमान जेथल्या तेथें होतें. पण तो कोठें दिसेना. त्यानें घरांत चौकशी केली. घरांतील माणसांकडून त्यास असें समजलें कीं, “ आपण आपल्या गांवीं गेलों ” असा निरोप सांगून एक पळभरही विलंब न करितां जांबवान निघून गेला.

जांबवानाच्या या कृत्यानें धर्मपाल बुचकळ्यांत पडला. सुलोचना व सरला यांच्या हकीगतींतच काय ती मख्खी आहे; ती मख्खी समजूनच जांबवानानें बाल्या हाकला असावा असें वाटून धर्मपाल फार कष्टी व अधिर झाला. लागोलाग जांबवानाच्या मागें सोनगडास जाऊन त्याची क्षमा मागावी व त्याची समजूत करावी असें देखील त्याच्या मनांत आलें. पण वेदधर्माचें वास्तव्य लक्षांत येऊन तो कांहीं विचार न करितां तसाच एकदम माडीवर गेला. धर्मपालास कांहीं प्रश्न करून जांबवानाचा मजकूर समजून घ्यावा या हेतूनें वेदधर्म ओठांतून शब्द काढणार तोंच धर्मपालानें वेदधर्मापुढें देह पसरून अभय मागितलें. वेदधर्मानें त्यास धीर देऊन उठवून बसविलें. तेव्हां त्याच्यापुढें हात जोडून धर्मपाल ह्मणाला “ साधुवर्य; मी महान् अपराधी व दोषी आहे. जांबवानाच्या सांगण्यावरून सरला तीच सुलोचना खास असावी. सुलोचनेचें माहेरचें नाव सरला असावेंसें

वाटतें. " इतकें बोलून धर्मपालानें वेदधर्मास सुलोचनेचा सर्व वृत्तांत विदित केला. वेदधर्माच्या चेहऱ्यांत थोडा बदल झाल्यासारखा दिसतांच धर्मपाल ह्मणाला " मागील अपराधाबद्दल आपण मला वाटेल तो दंड करा. एकंदरींत मी सुलोचनेस गांजलें; पण तिला मळविलें नाहीं. ती पूर्ववत शुद्धच आहे. येथून मात्र मी तिला स्वतःची बहीणच समजतों. तीच काय पण सुनीतीखेरीज सर्व स्त्रिया माझ्या आया बहिणीच आहेत असें मी मानतों. आतां सुलोचनेची व माझी भेट होऊन मी तिच्या पायावर कधीं लोळण मारीन, तिला ' भगिनी ' या शब्दानें संबोधून मी आपली जिव्हा कधीं पवित्र करीन, जांबवानाकडून होईल ती शिक्षा भोगून मी आपला देह केव्हां शुद्ध करीन, तिच्याकडून सर्व अपराधाच्या क्षमेचें वाक्य ऐकून मी आपलें पातक केव्हां धून टाकीन असें मला झालें आहे; माझी मागील राक्षसी विनंति विसरून माझी भगिनी सुलोचना मला लौकर भेटेल असा आपण अनुग्रह आतां करा. "

धर्मपालाचें सत्वशील भाषण ऐकून वेदधर्मास बहुत आनंद झाला. वेदधर्माचें उपदेशरूपी बीज वाया न जाण्याजोगें आपण योग्य क्षेत्र आहों असें धर्मपालानें दाखविल्यामुळें वेदधर्मास गहिंवर येऊन तो बोलला " धर्मपाला; तुला कृतकर्माचा पूर्ण पश्चात्ताप झालेला दिसतो. अनुतापापेक्षां कोणतेंही प्रायश्चित बलवत्तर नाहीं. सुलोचनेबद्दलची तुझी सर्व तळमळ हरण होऊन तुझा तिचा बंधुभगिनी या नात्यानें समागम होईल. तूं कोणत्याही अपेष्टांना आतां डगमगूं नकोस; शुद्ध सत्वस्थपणाच्या पाठिंब्यानें तूं काळालाही अजिंक्य होशील. एवढें मात्र पक्कें ध्यानांत वागीव कीं, आजपर्यंत जसा तुला सुलोचनेचा ध्यास लागला होता; ती सुलोचना अदृश्य स्वरूपांत असतांना तिचें अस्तित्व सत्य मानून तूं जशी तिच्या प्राप्तीची संधी दवडीत नव्हतास त्याचप्रमाणें तूं परमेश्वरप्राप्तीचा निजध्यास ठेव व त्याच्या भेटीची कोणतीही संधि वाया न जाऊ देण्याबद्दल सावध रहा, ह्मणजे तुझें इहपरलोकीं कल्याण होईल. " इतका आशिर्वाद देऊन वेदधर्म उठला व धर्मपालाचा निरोप मागूं लागला. धर्मपाल त्याचा वियोग करून घेण्यास पूर्ण नाखुष दिसला. त्याच्या आग्रहास्तव आणखी

चार दिवस त्याला सत्संगतीचा लाभ देऊन वेदधर्म जाण्यास सिद्ध झाला. मधून आधून भेट देण्याचें अभिवचन घेऊन धर्मपालानें वेदधर्मास अश्रुपूर्ण नयनांनीं जाण्याकरितां दुःखपूर्ण संमति दिली. सुनीति, सौमिनी व धर्मपालाचे सर्व पुत्र यांचा प्रणिपात स्वीकारून वेदधर्मानें सर्वांना भद्रदायक आशिर्वाद दिला. धर्मपालास अगदीं हृदयाशीं कवटाळून वेदधर्मानें त्याच्या चेहऱ्यावर आपला भाग्यदायक हस्त फिरविला आणि केवळ आपल्या दर्शनानेंच शिष्यांना पावन करणारा तो महाभाग्यवान्, सर्व कामद, वदान्य व परम यशदायक भगवान् सद्गुरु वेदधर्म आपल्या इच्छेनुसार संचार करण्याकरितां धर्मपालाच्या घरांतून बाहेर पडला.

---

# प्रकरण २८ वें.

राणी अंबालया इच्या दरबारापर्यंत जाण्यास वेदधर्मास मुभा होती. वेदधर्म हा कोणीतरी वेडा किंवा मुक्त आहे अशी अंबालयेची कल्पना झाली होती. तरी त्याच्याठिकाणीं आदरदृष्टीपेक्षां नीच दृष्टीनेंच अंबालया त्याला लेखीत असे. त्याच्याशीं दोन विनोदपर भाषणें करून, त्याची थोडी मस्करी करून व त्याचे वेडेवेडे चार पाहून, करमणूक करून घेण्यांतच ती वेदधर्माचा उपयोग करून घेई. हरणाच्या बेंबींत कस्तुरी असते, पण त्याचें जसें मृगास ज्ञान नसतें, त्याप्रमाणेंच राजसदनांत हमेष येरझारा करणाऱ्या वेदधर्माबद्दल अंबालयेची स्थिति होती.

एके दिवशीं वेदधर्माचा फेरा चंदनावतीस येऊन पोहोंचला. राजवाड्याच्या दरवाजाशीं वेदधर्म येऊन पोहोंचला तों त्यास त्या दिवशीं खास महालांत दरबार असल्याची वदंता समजली.

या खास महालाचें खरें नांव शृंगारास्पद असें होतें. शृंगारास्पदांत भरणारा दरबार फार प्रेक्षणीय असतो असा फार बोभाटा होता. तो पाहण्याचा अपूर्व योग सहज आला आहेसें जाणून वेदधर्म तिकडे वळला.

पहाऱ्यावरील रखवालदारानें वेदधर्मास ओळखून त्यास आंत जाण्यास मनाई केली नाहीं. वेदधर्म आंत जाऊन तेथील अनुपम थाट अवलोकन करून आश्चर्ययुक्त झाला.

महालाच्या मध्यभागीं एक रत्नखचित सिंहासन झळकत असून त्यावर अंबालया हिरकरणीप्रमाणें तळपत होती. शृंगारनभीची विद्युल्लताच आपल्या दिव्य तेजानें या सिंहासनावर बिराजमान झाली आहे कीं काय असें अंबालयेकडे पाहणारास वाटे. सिंहासनाच्या पुढें पांच कमानीचें मखर उभारलेलें होतें. मखराचें साही खांब रजत आणि सुवर्णमिश्रित रंगानें चकाकत होतें. त्याच्यावर मधून मधून माणकाचें व पाचूचे खडे बसविलेले असल्यानें लाल व हिरव्या रंगाची झांक नेत्रांना दिपवून टाकी. मखराच्या दोन्ही बाजूला माहिरपांची रांगच रांग लागून राहिलेली असून त्यामधून दरबारच्या कित्येक सरदारांचीं आसनें सुशोभित केलेलीं दिसत होतीं. सरदार लोक यावेळीं आपापल्या आसनाकडे पाठ करून राणी पुढें हस्त जोडून अदबीनें होते. सरदारांचे पोषाख भरगच्ची असून त्यांच्या कमरेस समशेरी लटकलेल्या होत्या. दिवाणखान्याच्या बाहेरील अंगास असंख्य वीर नागव्या तरवारी धारण करून सारखे हिंडत होते. मधून मधून ऐकू येणाऱ्या वेत्रपाण्यांच्या ललकाऱ्या, मंजूळ वाद्यांचे मधुर ध्वनी, सुस्वरावर गायन करणाऱ्या गुणिजनांचे कर्णमधुर आलाप, नर्तन करणाऱ्या कलावंतिणींच्या पायलांचा छमछुम आवाज इत्यादींच्या श्रवणानें सर्वांची चित्तवृत्ति उल्हासित झालेली दिसत होती. या महालाची सर्व शोभा व त्यांतील विलासापासून उत्पन्न होणारें सर्व समाधान हीं ज्याच्या पासंगाला सुद्धा पुरणार नाहींत अशा प्रकारची शोभा व समाधान देणाऱ्या दोन दिव्य स्त्रिया अंबालयेच्या दोन्ही बाजूस आपल्या अपूर्व अंगकांतीनें प्रकाशमान झालेल्या दिसत होत्या. मोठमोठ्या मी मी म्हणविणाऱ्या, महान सामर्थ्यसंपन्न, अतिबलाढ्य, वैभवशाली, प्रचंड अशा सुरासुरांच्या काळजाचें पाणी करून त्यांना एका क्षणांत निर्वीर्य करून टाकण्याची शक्ति स्त्रियांच्या नुसत्या नेत्रकटाक्षांत कोणत्या रूपानें वास्तव्य करिते याचें मर्त्य जगास प्रत्यंतर दाखविण्याकरितांच या दोन स्त्रिया परमेश्वरानें

भूलोकीं धाडून दिलेल्या असाव्यात असें त्यांचें निरुपम सौंदर्य सांगत होतें. त्या दोघींचें वय वीसबावीस वर्षांचें दिसत असून त्यांची उंची, बांध्याचे प्रमाण, वळणशुद्धता, अवयवांची ठेवण यांत सर्वत्र साम्यता भासत होती. त्यापैकीं एक जी अंबालयेच्या उजव्या हाताशीं बसली होती तिचें नांव विजया असें होतें. अंबालयेच्या डाव्या बाजूस बसविलेली जी दुसरी स्त्री तिचें नांव जया असें होतें.

त्या दोघी यौवनसंपन्न विलासिनींचा भालप्रदेश विशाल असून त्याच्याशीं जोडून असलेला मस्तकाचा भाग कृष्ण कुरळांनीं आच्छादलेला होता. भांगाच्या योगानें द्विभाग झालेला केशपाश तुळतुळीत सौंदर्यानें तुकतुकत होता. त्यांच्या भांगामध्यें शेंदुर भरलेला होता. मस्तकांच्या दोन्ही अंगास जडित पुष्पें झळकत होतीं. त्यांच्या काळ्या कुळकुळीत केशांची वेणी गुंफलेली होती. वेणीची कौशल्ययुक्त गुंफण पाहून त्यांचें भाग्य व्यक्त करण्याकरितां त्यांच्या उत्तमांगावर कृष्णकांतियुक्त भोगिनाथानें अक्षय्य फडा उभारली आहे असें वाटे. त्यांनीं आपल्या मस्तकाच्या ठिकाणीं व वेणीमध्यें मत्स्य, राखडी, कच्छ, नाग इत्यादि जे अलंकार धारण केले होते ते सर्व वेणीच्या पंचपदरूपीं पंचगंगांच्या संगमांतील हाटकवर्ण जलचरेंच असल्याचा क्षणभर भास होई. दोघींचे नेत्र आकर्ण असून ते इंदिरेच्या नयनांतील विशालपणास लाजविणारे होते. अनंत सौदामिनींचें रस गाळून त्यांचे त्या डोळ्यांत तेजःपुंज अंजन सारविलें होतेंसें वाटे. त्यांनीं मनांत आणलें असतें तर केवळ आपल्या दृष्टिपाताच्या योगानें त्यांनीं एखाद्या मृगीस आपल्या शिशुबद्दल बराच काळ संशयांत पाडलें असतें. बुबुळाच्या भोंवतालचा सर्व प्रदेश अभ्रकाच्या अंतर्सत्वाचाच घोटला आहे कीं काय असा दिसे. निमेषोन्मेषाचा व्यापार चालत असतां त्यांच्या पापण्या मिटल्या कीं चंद्रविकासिनी कमळांचा निद्रासमय प्राप्त झालासें वाटे. कमळाच्या मध्य केसरस्थलावर संकोचून बसणाऱ्या कृष्णवर्ण भ्रमराप्रमाणें लकाकणारी नेत्राच्या मध्यभागावरील त्यांची बाहुलीची टिकली नेत्रकमलांत अडकून पडल्यासारखी वाटे. त्यांच्या पापण्या उघडल्या असतां जो एकदम लखलखीत प्रकाश पडे त्यावरून ज्यांत पाणीदार हिरा ठेवला आहे अशा रजत करंडकाचें ढापणच उघ-

डल्याचा भास होई. अशा प्रकारच्या दिव्य नेत्रोत्पलांनीं संपन्न अशा त्या प्रमदांच्या भृकुटींचें मेढे चढविलेले दिसत. दोन्ही अंगास काजळाचे दोन वक्राकार सरच सोडून दिले असावेत, अशी भोंवयावरून कल्पना उत्पन्न होत असे. त्यांची आखणी अशी कांहीं प्रमाणानें रेखाटली होती कीं त्यांच्यावर नजर फेकणाराची दृष्टि तशाच प्रकारची आखणी करण्यांतच क्षणभर गुंतून राही. त्यांनीं आपल्या कानांत जे कुंडल घोस लटकावून दिले होते ते इतके लकाकत होते कीं, त्या दोघींना कांहीं विचार सांगण्याकरितां प्रत्यक्ष सूर्य आणि चंद्र हेच त्यांच्या कानाशीं घोटाळत असावेत असा तर्क होत असे. दोघींच्या नासिका रसाळ, नाजूक रेखलेल्या व शोभायमान होत्या. त्यामध्यें त्यांनीं ज्या झुबकेदार नथा धारण केल्या होत्या त्यांच्या मोत्याचे पाणी असें काहीं विलक्षण होतें कीं, त्या ठिकाणीं गुरुशुक्रांनीं कांहीं काळ आपलें वास्तव्य केलें असावेंसें वाटे. त्यांची देदीप्यमान प्रभा त्यांच्या मुखावर पसरली म्हणजे त्यांचे चेहरे सूर्यप्रकाशानें प्रकाशमान झालेल्या चंद्राप्रमाणें झळकत. त्या दोघींही विद्रुमाधरी होत्या. ओष्ठाचा सुकुमार आरक्तपणा शुकसारिकांना चकविणारा होता. एका क्षणांत पाषाणांना अप्सरागाचें स्वरूप देण्याजोगें त्यांच्या इंततेजांत अवसान होतें. त्या वेल्हाळवदनांचा स्तनप्रदेश यौवनानें इतका मुसमुसलेला होता कीं, त्यांच्या शरीरवृक्षाचीं पाडास आलेलीं तीं गोलाकार, टेचलेलीं व रसरशीत अशीं फळेंच आहेत कीं काय असें भासे. ते पराकाष्ठेचें पुष्ट, वाटोळे, गौर व कृष्णवर्ण पिप्पलकानें युक्त होते. त्यांच्या कंठांत अनेक तऱ्हेचे, रत्नजडित अलंकार धारण केलेले होते. त्यांनीं आपल्या अंगास केशरकस्तुरीची उटी फासली होती. नाभीचा भाग वर्तुळ, गंभीर व विशाळ होता. त्यांचे उदर तीन वळ्यांनीं संपन्न होते. मृगराजाच्या कमरेची रचना करू इच्छिणारास नमुन्यादाखल उपयोगीं पडेल अशा प्रकारच्या कोमळ व मनोवेधक कटिपृष्ठानें जया व विजया या युक्त होत्या. केळीच्या खुंटाचें अंतर्गाभे काढून त्यांच्या मांड्यांची रचना केलेली होती. त्यांच्या पोटऱ्या सुढाळ असून वर्तुळाकार घोट्यांची शोभा विलक्षण दिसे. अरुण, संध्या, बालार्क यांचे रंग एकवटून त्यांच्या अंगुळिका, नखे व

तळवे यांना बीक चढविलें होतें. स्वरूपसाजिऱ्या दिव्य प्रमदांचें वर्णन करतांना त्यांची गमनाची करिराज किंवा हंस यांच्याशीं तुलना करतात. परंतु, जया आणि विजया यांच्या मंद गतीचा विचार मनांत आणला असतां हंसानें त्यांच्या गतीचें अनुकरण केलें असलें पाहिजे अशी खात्री होई. त्या जेथें पाय ठेवतील त्याठिकाणीं वसंतास लोळावयास लावतील असें त्यांचें अलौकिक सामर्थ्य होतें. त्यांचा नखरेदार छबदारपणा पाहतांच मोठमोठ्या देवांगनांना त्यांच्या अंगुष्ठावरून ओवाळून टाकाव्या अशी त्यांची प्रतिभा जबरदस्त होती. त्यांच्या अंगकांतीच्या वर्णांत मात्र तफावत होती. जया ही हळदीच्या गाभ्याप्रमाणें विलसत असे. विजया ही उत्कृष्ट गुलाबाच्या पुष्पाप्रमाणें प्रसन्न दिसे. केतकी जयेचा हेवा करी. गुलनार विजयेला पाण्यांत पाही. एक मदनमनोहर होती; दुसरी मीनकेतन मोहना होती. एकंदरींत दोघींचा नाजुकपणा पारिजातकासारखा होता. एक आनंद वल्लीचें सुमन असें वाटे; एक लावण्यभूमीचें निधान असें भासे; एक सौंदर्यरत्नाची खाण अशी शोभे; एक मोहसागराची लाट अशी दिसे; एक श्रृंगारनभींची चपला अशी झळके; एक शृंगारसरोवर पराळिका अशी तळपे. सर्व लावण्य आटवून ब्रह्मदेवानें या ज्या दोन मूर्ति ओतल्या होत्या त्यांच्या स्वरूपवर्णनाची यथास्थित पूर्तता करावयाची ह्मणजे असें सांगण्यावांचून गत्यंतरच नाहीं कीं, जया आणि विजया या दोन सौंदर्यलतिकांच्या दृष्टीनें प्रसंगीं एखाद्या तृतिय प्रकृती मनुष्यासही क्षणभर चैतन्य प्राप्त झालें असतें !!!

श्रृंगारास्पदांतील या देवांगनातुल्य कामिनी पाहून वेदधर्मास कौतुक वाटलें. सरदार मंडळींचें नेहमींप्रमाणें राजव्यवस्थेबद्दल निरनिराळें भाषण झाल्यावर अंबालयेनें जया व विजया यांना त्यांच्या कामगिरीबद्दल प्रश्न केला; तेव्हां पहिल्याना जया अदबीनें उठून उभी राहिली आणि विनयानें पण अभिमानयुक्त वाणीनें ह्मणाली "सरकारच्या चरणप्रतापानें आह्मी आपल्या कामगिरींत सतत यशस्वी होत आहों याबद्दल आह्मांस हर्ष होतो. पण आमच्या यशानें राणीसाहेबाचें सुख दुरावतें याबद्दल त्याचक्षणीं आमचा आनंद दुखमिश्रित होतो."

जयेच्या या भाषणावर राणीनें 'हें कसें' असा प्रश्न विचारिला.

त्याला उत्तर ह्मणून विजया उभी राहून लवून बोलली " आपल्या सारख्या भूलोकीच्या दिव्य रत्नाची प्राप्ती होण्याकरितां जे जे पुरुष आपल्याला मागणी घालतात ते व खुद्द राणीसाहेब ज्यांचा पराक्रम श्रवण करून ज्यांना वर पसंत करण्याची इच्छा दर्शवितात ते असे सर्वजण आमच्या सौंदर्यमोहास बळी पडून कारागृहवासी होतात. अशाप्रकारच्या अनेक पुरुषांनीं या महालाखालील तळघर भरून गेलें आहे. अद्याप स्त्रीच्या अभिनवयुक्त सुस्वरूपतेस भुलत नाहीं असा महात्मा कोणी सांपडत नाहीं. यावरून आपला स्वयंवर होणें असंभवनीय दिसतें. आपणास जन्मभर कौमार्यावस्थेंनच रहावें लागेल याबद्दल आह्मांस बहुत दिलगिरी वाटतें. आपण आतां पुरुषांच्या उच्छृंखलपणाची परीक्षा करीत न बसतां अनुरूप व सद्गुणी, पराक्रमी, कुलशीलवान् असा वीर पुरुष पाहून त्याला आमच्याकडून परिक्षा न करतांच पसंत करून प्रापंचिक सुखोपभोग घ्यावा असें आह्मांला बरें वाटतें. सरकारचें हित आपणास जास्त समजतेंच आहे.

विजयेचें हें उत्तर ऐकून अंबालयेनें प्रत्युत्तरादाखल भाषण केलें " तुह्मी सर्व माझें हित इच्छिता यांत मला संतोष वाटतो. कोणत्याही स्त्रीवर फिदा न होणारा पुरुष भेटेल तरच मला लग्न कर्तव्य आहे हा माझा निश्चय कालत्रयींही फिरणार नाहीं. कुलशीलत्व, सद्गुणसंपन्नता, शौर्य, तारुण्य, वैभव या सर्व गुणांचा, जीव पवित्रपणा हा होय. जया व विजया यांच्यासारख्या सुंदर स्त्रियांच्या सुंदरतेस हुरळून जे लोक स्वतःला अपवित्र, अशुद्ध, पापी, भ्रष्ट अशा आचाराचे ठरवून घेतात त्यांचा सद्गुण व वीर्यसंपन्नता शिलक राहिली कोठें ? स्त्रीच्या नयनशरास जो जुमानीत नाहीं त्यालाच मी सद्गुणी व वीर्यशाली समजतें. इतर पुरुषास केवळ पुरुषाच्या अवयवानें संपन्न असे नरपशु किंवा सृष्टीच्या वृद्धीस साहाय्य करणारे मजुरदार असेंच मी मानतें. जगतामध्यें सर्व सुंदर व सर्वगुणसंपन्न कोणी नाहीं. एकापेक्षां एकेक वरचढ अशा लावण्यमयी स्त्रिया मृत्युलोकीं हमेष सांपडण्याचा संभव आहे. सौंदर्य व यौवन याच्यावर भाळून पुरुष जर आपल्या शुद्धपणाशीं बेपर्वा होतील तर कुरूप किंवा सौंदर्य विरहित स्त्रियांचा संसार सुखाचा कसा होणार ? ज्या पुरुषांनीं स्त्रियांच्या ठिकाणीं अनृत, साहस, माया इत्यादि अवगुण स्थापून

स्वतःला गुणसंपन्न ठरविलें त्याच पुरुषांच्या ठिकाणीं ते अवगुण कसे प्रमुखत्वानें वास्तव्य करतात हें त्यांच्या एका स्त्रीसंगौत्सुक्यावरूनच सिद्ध होतें. स्त्रीपुरुषसमागमाच्या व्यवहारांत स्त्रिया आपण होऊन पुरुषांच्या मागें लागल्या या उदाहरणापेक्षां पुरुषांनीं आपण होऊनच स्त्रियांना घुलविल्या किंवा भ्रष्ट केल्या याचच दाखले शेंकडोंपटीनें अधिक सांपडतील. अनृता, अविचारा, असत्याचा थारा अशा प्रकारचीं विशेषणें लावून स्त्रीजातीला दूषण लावणाऱ्या पुरुषांनीं ही गोष्ट आतां तरी ध्यानांत ठेवावयास पाहिजे कीं, स्त्रियांना पडणाऱ्या पुरुषमोहापेक्षां पुरुषांना पडणारा स्त्रीमोहच बलवत्तर आहे. जया आणि विजया यांच्या लावण्यास भुलून जे वीर ह्मणविणारे पुरुष बंदिवान होऊन पडले आहेत त्यांत कितीजण तरी पुरुषाच्या मोहक सौंदर्यानें संपन्न आहेत. तरीपण ही अंबालया भाळली नाहीं. स्त्रीजात आहेच ह्मणून विषयप्रवृत्त होणाऱ्या पुरुषास अंबालया तुच्छ समजते. कामाच्या अजिंक्य हल्ल्यास हजारोंवेळ परत फिरवूनही निभाव न लागेल तरच कामास हार जाणाऱ्या पुरुषास ही अंबालया किंमत देतें. असा पुरुष आढळेपर्यंत माझ्या हातून पुरुषांचे असेच हाल होणार. भामिनीच्या स्वरूपावर आसक्त होणाऱ्या पुरुषांच्या कामसुखाचें खरें तत्व काय आहे याचा उलगडाच होणारा नाहीं. ”

अंबालयेचें हें वाक्पांडित्य ऐकून सर्व सभा गांभिर्ययुक्त झाली. त्या मार्दवपूर्ण भाषणाची सर्व दरबारानें तारीफ केल्यानंतर वृषसेन नांवाचा महान् बलाढ्य सरदार उभा राहिला आणि त्यानें अदबीनें सांगितलें “ राणीसाहेबांच्या कृतीस कोणी दोष लावण्याचें कारण नाहीं. राणी साहेबांच्या क्रोधदृष्टीमुळें जसे पुरुषांचे हाल चालले आहेत त्याप्रमाणें स्त्रीजातीचें हाल करणारा प्राणी देखील सध्या हयात आहे. एवढेंच नव्हे तर तो अमोघ पराक्रमशाली राजा लोहपात शेंकडों स्त्रिया व जादुगार यांना बांधून आपल्या राजधानींत नेऊन त्यांचें अतोनात हाल करीत आहे. त्यानें कोणा बलभीम नांवाच्या सरदारास त्या कामावर प्रेरिला असून तो सरदार आज तारखेस आपल्या अमला खालील देदिक्कोठ शहरांत स्वैर संचार करीत आहे. त्याच्या बरोबर शिबंदी

अगर लष्कर वगैरे कांहीं नाहीं. एक सुदैव या नांवाचा कोणी मुत्सद्दी व पांचपन्नास शिपाई एवढाच कायतो त्याच्या स्वारीचा लवाजमा आहे. तथापि तो लोहपाताचा कुलमुखत्यार आहे एवढ्या नांवावरूनच कोणत्याही राज्यांत त्याला कांहीं आडकाठी येत नाहीं. त्याच्या कसोटीस उतरेल अशी कोणी अविवाहित कन्यका सांपडेल तरच तो राजा लोहपात विवाह करणार आहे. अद्याप तो अविवाहित आहे. त्या बलभीमास राज्ञी अंबालयेचा कृतनिश्चय कळला आहे. अंबालयेसारखी स्त्री आपणास योग्य आहे अशी त्याची समजूत झाली आहे. अंबालयेस मागणी करून ती जर ती आपल्या हट्टानें व गर्वानें नाकारील तर शूरसेनप्रांतावर स्वारी करण्यासही तो राजा लोहपात तयार आहे. थोडक्याच काळांत तो सरदार बलभीम चंद्रनावतीस प्राप्त होणार आहे. तरी याबद्दलचा काय तो आगाऊ विचार व्हावा. ”

वृषसेनाचे उद्गार ऐकतांच राणी वाघिणीप्रमाणें खवळली. तिचे नेत्र आरक्त झाले. तिचा सर्व चेहरा तप्त हाटकासारखा दिसूं लागला. वीरश्रीमदानें तुस्त होऊन ती परम यशस्वी क्षेत्रवान् दुहिता मानी अंबालया क्रोधानें गर्जली कीं, ‘ महाराणा शतधन्वा याचा पुत्र राणा लोहपात हा पर्वतीय राजा असून त्याची कीर्ति मला ऐकून माहीत आहे. तो कितीही बलवान् असला तरी तेवढ्याला वचकून ही अंबालया त्याच्या गळां पडणारी नव्हे. तसा प्रसंग या अंबालयेवर येईल तर ती गोष्ट तुह्मां सर्व सरदारांच्या अब्रूस कलंक लावणारी होईल. तो लोहपात जर माझ्या परिक्षेस उतरेल तर मी आनंदानें हा देह त्याला अर्पण करीन. सर्व सरदार हो; तुह्मी लढाईच्या तयारींत असा. त्या बलभीमाला माझा निश्चय जाहीर करा. बलभीम चंद्रनावतीस येण्याची वाट न पाहतां त्यालाच जया आणि विजया यांच्या श्रृंगारिक हावभावांनीं लुब्ध करून बंदीवान करा ह्मणजे सर्वच खेळ आटोपला. ”

हें भाषण संपतांच सर्वानुमतानें वृषसेन, जया व विजया यांची बलभीमावर रवानगी झाली. वृषसेन आपल्याबरोबर आणखीं निवडक दहापांच सरदार घेऊन जया व विजया यांसह देठिकोठ्यास कुच करण्याच्या तयारीस लागला.

———

# प्रकरण २९ वें.

धर्मपालास सुलोचनेद्दल हुरहुर लागून राहिली. त्याच्या नेत्रापुढें सदासर्वकाळ सुलोचनेची मूर्ति दिसे. तो रात्रीं निजला असतां त्याला स्वप्नांतही सुलोचनाच दिसे. केविलवाणी मुद्रा करून सुलोचना आपल्याला माहेरीं नेऊन घालविण्याकरितां मोठ्या काकुळतीनें विनवीत आहे असें वाटून तो तिला हाका मारीतच झोपेंतून जागा होई. अशी त्याची त्रेधा उडाली. सुलोचनेच्या ह्मणजे जांबवानाच्या गृहीं जाऊन तेथें सुलोचना असल्यास तिच्यापुढें प्रणिपात घातल्या खेरीज आपला मनस्ताप दूर होणार नाहीं असें ठरवून धर्मपाल सोनगडास निघाला.

जांबवान आपल्या घरीं पोंचल्यानंतर त्यानें आपल्या घरांतील माणसांस सुलोचनेची हवाल विचारिली. घरांतील माणसास अद्याप तिचा कांहींच शोध नाहींसें समजतांच त्यानें स्वतःस लागलेला तिचा सुगावा सांगितला. सुलोचनेच्या तपासाकरितां पुन्हा प्रवासास जावें व धर्मपालास गाठून त्याला दंड करावा या हेतूनें जांबवानानें पुन्हा घर सोडलें. धर्मपालानें आपल्या भगिनीस छळिलें; आपली कांता भोगावती ही कृत्या निघाली; रमलभारती व माणिकबोवा आपले शत्रु झाले या सर्व गोष्टींनीं त्रस्त होऊन जांबवान काहून गेला. भित्यापाठीं ब्रह्मराक्षस या ह्मणीची आठवण होऊन तो त्या ब्रह्मराक्षसावर क्रुद्ध झाला. प्राणाची आशा सोडली ह्मणजे आपल्या हातून हवा तेवढा पराक्रम होईल अशा विचारानें त्यानें सर्व सुविचारावर पाणी ओतले. सुलोचनेचा नवरा नानासाहेब, तिचा सासरा आबा, धर्मपाल, माणिकबोवा, भारती, प्रवीर, भोगावती या सर्वांचा निःपात कसा करता येईल या विचारांत मग्न होऊन जांबवान प्रवास करितां करितां एका अरण्यांत झाडाच्या छायेखालीं स्वस्थ बसला.

जगतामध्यें आपलें जीवित सर्वस्वी फोल झालें अशा विवंचनेनें जांबवान कपाळाला हात लावून सूड घेण्याची योजना ठरवीत असतां त्याच अरण्यांत एक स्त्री प्राप्त झाली. जांबवान आपल्या मनःसाम्राज्यांत

चूर होता. ती स्त्री त्याच्या संन्निध येऊन पोंचेपर्यंत त्याचें खालीं पाहून भुवया कुरतडणें चाललेंच होतें. वनांतील पायवाटेच्या अगदीं एका झाडाच्या सरसाच जांबवान बसला असल्यानें त्या स्त्रीची त्याच्यावर सहजच नजर गेली. ती स्त्री एकटीच प्रवास करून थकली असल्यानें तिलाही विश्रांतीची व सोबतीची जरूर वाटत होती. तिनें जांबवानास पाहतांच ती वाट जरा वाकडी करून त्याच्याजवळ गेली. जांबवानानें वर डोकें उचलून तिला पाहतांच दोघांची ओळख पटली. ही सोनगड-चीच राहणारी असल्यानें जांबवानानें तिला " नलिनीबाई ! तुह्मी एक-ट्याच अशा इकडे कोणीकडे ?" ह्मणून प्रश्न विचारिला.

नलिनीची जांबवानाशीं विशेष सलगी नव्हती. तिनें त्याला गांवांत प्रत्यक्ष पाहिलेला असून त्याची तिला ऐकून माहिती होती. जांबवानाचा प्रश्न ऐकून नलिनी बोलली " मजवर तसाच कांहीं प्रसंग आहे. माझा बाप सुदेव हा शोणितापुरचा राहणारा असल्यानें माझें माहेर शोणितापुरास आहे. माझ्या आईचें नांव सुशिला असें आहे. कांहीं कारणानें बापाची व माझी तेढ आल्यानें आज आठ दहा वर्षें त्याचें माझें मुखावलोकन नव्हतें, इतकेंच नव्हे तर त्याचा व माझा पत्रव्यवहारसुद्धां बंद होता. माझ्या नशिबानें माझा भ्रतार यमपुरी खेंचून नेल्यानंतर सासरच्या सर्व जिनगानीची मीच मुख-त्यार झालें. पैक्याच्या भरांत मी अगदीं बेफाम बनलें. बाबांचें कोणतेंही बोलणें मी जुमानीनाशीं झालें. यामुळें बाबांनीं माझा त्याग केला. कांहीं कारणानें पश्चात्ताप होऊन मी बाबाची क्षमा मागण्याकरितां शोणितापु-रास गेलें. तेथें मला असें समजलें कीं, बाबा एकाएकीं घरांतून जे नाहींसे झाले त्यांचा कांहींच पत्ता अद्याप नाहीं. बाबांचा शोध लागेल या आशेनें माझ्या आईनें सुमारें दोन वर्षें तशींच घरीं काढलीं. बाबा नाहींसे झाले तेव्हां माझी आई सुशीला तीन महिन्याची गरोदर होती. तिला पुढें सहा महिन्यांनीं मुलगा झाला. तो मुलगा वर्ष दीड वर्षाचा झाला तेव्हां मोठा बलवत्तर दुष्काळ पडला. घरांतील सर्व चीजवस्त बाबांनीं घराचा त्याग करण्यापूर्वीं नाहींशीं केली असल्यानें माझ्या आईस खाण्याचीही ददात पडली.

आधींच अन्नाची भ्रांत, त्यांत पराकाष्ठेचा भयंकर दुष्काळ; त्यांत

दीड वर्षाचें तान्हें पोर; त्यांत बाबांचा कांहींच शोध नाहीं. अशा स्थितींत माझ्या आईनें मजकडे यावयास पाहिजे होतें. मी चांगली सधन आहे हें आईला ठाऊक होतें. पण मी बापाशीं बेपर्वाईनें जें वर्तन केलें तें माझ्या आईलाही पसंत नसल्यानें ती मजवरही क्रुद्धच होती. निर्धनस्थितींतही त्या मानप्रिय व स्वाभिमानी सुशिलेनें वैतागून घरावर पाणी सोडून ती हवी तिकडे चालती झाली; पण माझें तोंड पाहण्यास आली नाहीं. तात्पर्य, त्यांचा दोघांचा अद्याप मुळींच पत्ता नाहीं. मला तर त्यांची भेट कधीं होईल अशी फार उत्सुकता लागली आहे. मी त्यांच्या शोधार्थ घरदार सोडून अशी भटकत आहे. माझे आईबाप अजून जीवंत तरी आहेत कीं नाहींत हेंही समजत नाहीं. कसेंही असलें तरी मरेपर्यंत त्यांची भेट होईल या आशेवरच हिंडत रहावयाचें असा माझा संकल्प आहे. आपण येथें असें कां बसला आहां हें मला समजेल तर बरें. सुदेव व सुशिला या नांवाच्या माणसांचा कांहीं बोभाट आपल्या कानावर असेल तर आठवण करा. ”

नलिनीनें लुब्ध्याप्रमाणें आपली कुळकथा गाऊन दाखविली, यावरून ती हताश व निराधार झालेली असावी असें जांबवानास वाटलें. आपल्याला एक समदुःखी सांगातीण मिळाली याबद्दल त्याला थोडासा धीर आला. नलिनीजवळ जिनगानी असेल तर तिला धीर देऊन हळूच तिच्यावर हात मारावयास सांपडेल असाही त्यानें आपल्या मनांत धीर घेतला. तिला आणखी कांहीं बोलावयास लावून तिच्या तोंडून तिच्या जवळच्या द्रव्याची हकीगत बाहेर पाडावी या मतलबानें जांबवान ह्मणाला “ मींही तुमच्याप्रमाणेंच एक हतभागी प्रवासी आहे. फरक इतकाच कीं, मी आपल्या बहिणीस शोधीत आहे. पण काय हो ? मी तुह्माला असें विचारितों कीं, तुमचा बाप तुमचें मुखावलोकन करण्यासही नाखुष झाला असें तुह्मी त्याचें मन तरी काय दुखविलें ? तुह्मी त्याला जबाब काय केला ? आतां तुह्माला पूर्व कृतीचा पस्तावा कां होतो व तुह्मी त्यास इतक्या निर्धारानें कां शोधतां बरें ? ”

यावर ती कष्टी व अनुताप पावलेली नलिनी ह्मणाली “ बाबांचें जें ह्मणणें मला आरंभीं मस्तीमुळें शुष्क वाटलें तेंच पुढें अक्षरशः

सर्व ठरून मला विलाप करण्याची बारी आली. यामुळें मला आतां बाबांच्या दर्शनाहून अधिक कांहीं प्रिय वाटत नाहीं. आतां तुम्हाला फोडून सांगतेंच समजलें. परमेश्वरकृपेनें सर्व प्रसंगांतून मी शुद्ध राहून सुटलें असल्यानं बीभत्स हकीगत सांगण्याला लाजण्याचें मला कारण नाहीं. माझ्याजवळ जें वित्त होतें त्याच्या जोरावर मी मनसोक्त वागूं लागलें. धर्मकर्म करण्यांत मी जो पैसा खर्ची त्याबद्दल बाबा मला बोलत नसत; पण मीं भलतेच ढंग आरंभिले. माणिकबोवा व रमलभारती या नांवाचे कोणी भोंदू साधु मला भेटले. त्यांच्या नादीं लागून व त्यांना अगदीं सर्व योगिराज समजून मी त्यांना हवे तितकें द्रव्य देऊं लागलें. माझा मुलगा तेव्हां अज्ञान असल्यानें माझा बाप त्याचा वहिवाटदार होता. भारती व माणिक यांना घरीं नेऊन मी त्यांची पूजा करी व त्यांना वाटेल तें धन देई. या माझ्या ढंगाबद्दल बाबांनीं माझी बरीच कानउघाडणी केली. बाबांच्या बोलण्यानें मी जागी तर झालें नाहींच; पण उलट जास्तच चेकाळून भारतीला मीं एक मोत्याचा कंठा अर्पण केला. घरांतील जिन-सांच्या मोजबातींत तो कंठा चुकला तेव्हां बाबा मला त्या कंठ्याबद्दल दोषी ठरवूं लागले. कंठ्याची अफरातफर बाबांनींच केली असा मी भार-तीच्या सल्ल्यानें त्यांच्यावरच आरोप केला. बरेच दिवस झाल्यानंतर भार-तीनें तो कंठा विकरीला काढला असतां तो बाबांनीं पकडला व स्वतःचा शुद्धपणा स्थापीत केला. मी ओशाळगत झालें. बाबा मला नाहीं नाहीं तें बोलले. बाबांच्या रागाचें भाषण मला न साहून मी त्यांना तुटकपणें बोलण्यास कमी केलें नाहीं. माझ्या वित्ताची मी मालकीण आहें; भारती, माणिकबोवा किंवा आणखी कोणीही यांना वाटेल तें देण्यास मी मुख-त्यार आहें; तुम्ही माझ्यावर सत्ता चालविणारे कोण? असा खडखडीत जबाब मीं बाबाना केला. मग काय विचारता? बाबाना तें कां खपणार? ते लागलीच म्हणाले "नलिनी, तूं अशी अंध बनू नको; तूं धर्म कर, देवभक्ति कर; पण अब्रूनें रहा. नवऱ्याच्या कुळाचाराला जप. नवऱ्याचेंच ध्यान कर. हे माणिक व भारती यांच्यासारख्या गारो-ड्यांवर भरंवसा ठेवून अखेर फसशील. तुला पोरें आहेत. तीं वयांत येईपर्यंत त्यांचें योग्य लालनपालन कर. तूं जें वित्त

तुझें समजतेस तें वस्तुतः तुझ्या अज्ञान पोरांचें आहे. तूर्त तें तुझ्या ताब्यांत आहे. तें वाटेल तसें ढंगांत बेढंगांत उडविणें हा गुन्हा आहे. खेरीज त्या वित्ताची तूंच मालकीण आहेस असें धरिलें तरी मला बेजबाब बोलण्याचा तुला अधिकार नाहीं. माझ्यामुळेंच तूं श्रीमंतीण झाली आहेस. मीं जर दहा हजार रुपये खर्चून तुला एवढ्या धनिकाला दिली नसती, मीं जर एखाद्या मधुकऱ्याबरोबर तुझें लग्न लाविलें असतें तर तूं श्रीमंतीचा तोरा कुठला दाखविला असतास ? मला तुझी एक कवडीही नको. विचार कर; सदाचारानें चल; अब्रूनें वाग; धर्मानें रहा; स्त्रियांच्या कर्मानें काळ काढ; तसें न करशील तर अंतीं फसशील; माझी तुला आठवण होईल. तूं कृतघ्न ठरली आहेस; मला याबद्दल मोठा पश्चात्ताप झाला आहे; मी अस्वस्थ बनलों आहें; तुझ्या बोलानें मला जगाचाच त्रास आला आहे. तुझ्या दुष्कीर्तिबद्दल तुला दिक्कत नाहीं. पण ती दुष्कीर्ती माझ्या कन्येची असल्यानें मला प्राण नकोसा होत आहे. येथून तूं सुधारे पर्यंत मी तुझें तोंडही पाहणार नाहीं. " इतकें सांगून बाबा गेले ते अद्याप मला भेटले नाहींत. भारती व माणिकबोवा यांनीं मला फसविलें. माझ्या जवळचे पैसे लाटून त्या मेल्यांनीं एक दिवस माझ्या अंगावर हात टाकला. त्यांचें तें पापी, कपटी वर्तन ध्यानांत येतांच मी पश्चात्ताप पावलें. माझे पोरगे मोठे झाले; त्यांना माझा वृत्तांत समजतांच तेही मला तुच्छ लेखू लागले. आई एवढ्या नात्यानें ते पोटाला तुकडा मात्र घालतात. ती स्थिति मला मरणासारखी वाटून मी बाबांच्या शोधार्थ बरीच हिंडलें व येथून जन्मभर हिंडण्याचा निश्चय आहे. "

नलिनीचा वृत्तांत ऐकून जांबवानाची एक आशा संपली. तिच्याजवळ द्रव्य असेल अशी जी त्याची कल्पना होती ती आटपली. आतां फक्त समव्यसनाचा संबंध उरला. भारती व माणिकबोवा यांचा स्वतःला असलेला अनुभव जांबवानानं नलिनीला सांगितला. दोघांनींही एकत्र होऊन त्या दोन्ही जादुगारावर यथेच्छ तोंडसुख घेतलें. त्यांचा त्यांचा थोडक्यांतच स्नेह जमला. सुलोचना, सुदेव व सुशीला यांचा तपास समयकीनें करण्याचें ठरवून ते दोघेजण तेथून उठून पुढील रस्ता क्रमावयास लागले.

# प्रकरण ३० वें.

धर्मपालानें सोनगडास जाऊन जांबवानाची व सुलोचनेची विचारपूस केली. दोन्हीही गोष्टींत निराश होऊन तो तेथून तसाच परतला. रहदारीचा रस्ता सुटून तो निर्जन पथास लागला. यावेळीं त्याला वेदधर्माची आठवण झाली. वेदधर्मानें आपल्याला आशिर्वाद दिला असून अद्याप आपली व सुलोचनेची गांठ पडण्याचा योग येईना याचें त्याला आश्चर्य वाटूं लागलें. सुलोचनेच्या नांवानें हाका मारण्यांतच आपला जन्म जाणार असें वाटून तो बहुत निराश झाला. चालतां चालतां किती काळ गेला याचें त्याला भान राहिलें नाहीं. दिनमणी अस्ताचलास जाऊन पक्षीगण आपापल्या निबिडांत शिरले तरी धर्मपाल मार्ग तुडवीतच होता. मिलिंदांनीं वारिजोदरांत शिरकाव करून मकरंद भक्षण करण्यास सुरुवात केली. विषयपर युवायुवतींच्या हृदयांत पंचशराचा संचार झाला तरी धर्मपाल सुलोचनेच्या सात्विक चिंतनांत दंग होऊन पावलें टाकीत टाकीत अरण्याच्या अगदीं मध्यगर्भांत प्राप्त झाला. दोन प्रहर रात्र झाली. श्वापदांचे दुर्धर व भेंसूर रव ऐकूं येऊं लागले. घोर यामिनी दाटून गेली असल्यानें अमंगल विहंगमांच्या ध्वनींनीं तें वन सजीव असें भासूं लागलें. अस्वलें झाडाला कवटाळून बसलीं. वडवाघुळें वृक्षाच्या डाहळ्यांना लटकून राहिलीं. त्या भयानक कांतारांत वनदेवता, यक्षिणी, डाकिणी, किन्नर यांचा दंगा सुरू झाला. आसरा, खवीस, झोटिंग हीं आपलीं अक्राळ विक्राळ रूपें दाखवून क्षणांत अदृश्य होऊं लागलीं. दिवाभीतें घूत्कार घुमूं लागलीं; गगनामध्यें टिट्टिभांचा ध्वनी घुमूं लागला; भालुवांचें भुंकणें उमटूं लागलें; अमंगळ व अपवित्र यांना धडकी भरविणारे प्रेतगण यांची गर्दी दिसावयास लागली. चक्रवाक करुणस्वरानें वाहत राहिले; चंद्रकमुदिनी विकासून राहिल्या; भयंकर पादोदर सैरावैरा सरपटूं लागले; चरावयास निघालेल्या निधानांच्या प्रभेनें तें महावन क्षणोक्षणीं चमकूं लागलें. वेदधर्माच्या अनुग्रहानें, व पुण्यमय दृष्टिपातानें धर्मपालाची चित्तवृत्ति स्वच्छ झाली असल्यानें त्याला त्या

भयावह रजनीच्या भयानक देखाव्याचें भय वाटत नव्हतें. धर्मपालाचें चित्त सुलोचनेच्या ध्यानांत व्यापलें असल्यामुळें त्याला वरचेवर सुलोचना दिसल्याचा भास होई. त्या भासालाच एकदम सत्य स्वरूप प्राप्त झालें. एकाएकी त्या विपिनांत त्याच्या समोरून सुलोचना प्रत्यक्ष चालत आली. तिची ती आनंददायक, समाधानकारक, आरामोत्पादक मूर्ति अवलोकन करतांच धर्मपालानें कांहींएक विचार न करितां एकदम तिच्या पुढें प्रणिपात घालून तोंडानें उच्चार केला ' हे प्रिय भगिनी सुलोचने; या बंधुला पदरांत घे. तुझा छळ करणारा हा धर्मपाल तुझ्यापासून क्षमेची व भगिनीप्रेमाची याचना करीत आहे. तूं मागील गोष्टी विसरून जाऊन माझा बंधु ह्मणून स्वीकार न करशील तर हा धर्मपाल येथें तुझ्यापुढें आपला प्राण सोडील. "

सुलोचनेनें धर्मपालास तेव्हांच ओळखलें. स्वरावरून तर तिच्या किरकोळ कुशंकेस जागाच उरली नाहीं. त्याची निर्वाणीची याचना ऐकून ती विस्मयान्वित झाली. ज्या धर्मपालानें आपला देह बाटविण्याकरितां भवानीच्या देवळांत आपल्या वक्षस्थळास स्पर्श करण्याचें धाडस केलें, ज्यानें स्वतःची हौस पुरविण्याकरितां वेळेला आपला प्राणही घेतला असता, त्या धर्मपालाचे लीनतेचे, सात्विक, पवित्र उद्गार ऐकतांच ती सालस सुलोचना एकदम बोलली ' प्रिय बंधो; मी तुला भाऊ असें पूर्वीच मानलें आहे. तुझ्यामध्यें एवढी विचारक्रांती कशानें घडली याचेंच मला आश्चर्य वाटतें. कसेंही असलें तरी तुला उपरति झाली हें माझें भाग्यच आहे असें मी मानतें. मी तुझा अपराध माफ केला आहे. पण या क्रूर निशाकाळीं तूं या अरण्यांत कसा ? '

सुलोचनेच्या अभयकर शब्दांनीं आराम पावून धर्मपालानें ह्मटलें ' माझ्याही मनांत तुझ्याबद्दल तसाच प्रश्न उद्भवतो. तें असो; पण तूं जर मजवर कृपा केलीस हें सत्य आहे तर तुझ्या भेटीस हपापलेल्या या तुझ्या भावाला भगिनी ह्मणून गाढ आलिंगन दे पाहूं. '

इतकें बोलून धर्मपाल बाह्या उभारून सुलोचनेला मिठी मारण्यास सरसावला. सुलोचना किती झालें तरी परांगना. दोघांचीं मनें अगदीं निर्मळ होतीं खरीं; परंतु, स्त्रीस्वभावाच्या लज्जेमुळें ती सुलोचना मानलेल्या

भावाला कवटाळण्यास अशी सहज कशी तयार होईल ! काय करावें या विचारांत सुलोचना घोटाळली आहे अशा बेतास धर्मपालानें आपणच पुढें होऊन ' मातोश्री ' असें ह्मणून सुलोचनेला पोंटाशीं ओढली. इतक्यांत मागाहून त्याच्या पाठीवर एका काठीचा सपाटून प्रहार झाला. यष्टीच्या तडाक्यानें अगदीं विव्हल होऊन धर्मपाल तसाच पालथा खालीं पडला. सुलोचना तशीच एकदम चार पावलें मागें सरून समोर पाहूं लागली तों काठी मारणारा कोणीएक पुरुष असून त्याच्याबरोबर एक स्त्री आहे असें तिच्या दृष्टीस पडलें. त्या प्रहारकर्त्या पुरुषाकडे विशेष घाबरून पाहून तशाच घाबरेपणानें ती धर्मपालाजवळ खालीं बसली. धर्मपालाचें डोकें मांडीवर उचलून घेऊन सुलोचना त्याला सावध करूं लागली. धर्मपाल बेशुद्ध झालेलाच नव्हता. काठीच्या सपाटच्यामुळें तो विगलीत होऊन बेअवसानीं पडला इतकेंच काय तें. सुलोचनेनें डोकें उचलतांच तेवढ्यांच अवसानानें तो ताडकन् उठला. आपल्या पाठीवर मागल्यामागें प्रयोग झाला याची त्यास चांगली स्मृति होती. उठल्याक्षणींच मागें वळून त्यानें आपल्या अपकारकर्त्याला पाहिलें. आपला कणा मोडणारा दुष्ट जांबवान आहे असें ओळखतांच धर्मपाल वेगानें त्याच्या अंगावर तसाच धावला. धर्मपालाची मुसांडी चुकवून जांबवानानें पुन्हां त्याच्या दंडावर काठीचा प्रहार केला. धर्मपालाजवळ काठीबिठी कांहींच नव्हते. त्यानें रस्त्यावरील दोन ढेंकळें उचललीं. अवसानाकरितां त्यानें उजवा हात मागील बाजूस ताणवेल तितका ताणून जांबवानावर ढिखळाचा नेम धरिला. त्याच्या हातांतून तें ढिखूळ सुटून जांबवानाचें ललाट किंवा कानशील सडकणार हें निश्चित झालें. इतक्यांत धर्मपालाच्या हृदयांतील विकारावर सत्वगुणाचें वर्चस्व होऊन त्यानें तें ढिखूळ फेंकून दिलें आणि तो जांबवानास ह्मणाला " अरे गृहस्था, मी तुला पुरें ओळखलें आहे. तूं माझ्या असा जवळ ये. लांबलांब सरकूं नको. "

या भाषणास जांबवानानें उत्तर केलें ' हरामखोरा; मी तुला भितों अशी का तुझी समजूत आहे. बेरडा ! माझ्या या हतभागी सरलेस एकांतांत गांठून तिला जबरीनें आलिंगन देऊन तिचा पवित्रपणा नष्ट करण्यास तूं सरसावलास त्याचें तुला प्रायश्चित्त मिळालें. वास्तविक पाहतां या कुकर्मा-

जाइल तुला ठार मारला पाहिजे; पण तूं एकेसमयीं माझा प्राण वांचविला आहेस सबब यावेळीं मी तुला जीवदान देतों. जा येथून चालता हो. पुन्हा या सरलेचें नांव काढूं नकोस.'

असें दरडावून जांबवान् काठी फिरवीत सुलोचनेकडे जाऊं लागला. त्यानें आपल्या भाषणांत 'सरला' या नांवाचा जो उच्चार केला त्यावरून सुलोचनेस तो आपला भाऊ असल्याबद्दल बरीच खात्री वाटूं लागली. पुढें धर्मपालाच्या भाषणावरून तिची खात्री पक्की पटली. धर्मपालानें जांबवानास मध्येंच अडविलें आणि त्याच्यापुढें शिर नमवून तो ह्मणाला "जांबवाना; ये ये; अगदीं संकोच करूं नको. या माझ्या मस्तकावर तुझ्या हातांतील लाकडाचा अशा जोरानें प्रहार कर कीं, माझें पंचप्राण बाहेर पडून एकदम कपालमोक्ष व्हावा. हें शिर तुझ्या चरणावर ठेविलें आहे. त्याचे रति एवढाले तुकडे कर. त्याच्यांतून रुधिराच्या सहस्रावधी धारा लागतील अशा बेतानें तें ठेंचून टाक. तुझ्याकडून मला माझ्या पापाचा दंड मिळाला ह्मणजे मी मुक्त तरी झालों. तुझ्या हातून माझें देहपतन झालें ह्मणजे पुढें या देहाकडून पातक घडण्याची भीति तरी राहिली नाहीं. आटप; वाट पाहूं नको; विचार करूं नको; तुझ्या भगिनीला अनन्वित त्रास देणाऱ्या या धर्मपालाचें शीर धडापासून एकदम निराळें करून टाक."

धर्मपालाचे हें करूणापर, हृदयभेदक, सत्वमय उद्गार ऐकतांच सुलोचना व नलिनी यांचें हृदय आंतल्याआंत लटलटूं लागलें. सुलोचना सद्गदीत होऊन केवळ मुकी बनली. नलिनीला त्यांतला कांहींच उमज न पडल्यामुळें ती तर वेड्यासारखी विचारशून्य झाली. जांबवान पूर्णपणें गोंधळून गेला. त्याच्या हृदयांत व देहावर सर्वत्र गंभीरपणाची छाया पसरून तो किंचित् कंपायमान होत्साता तोंड मिटून कांपरे सुस्कारे टाकीत पापण्या न मिटतां एकसारखा धर्मपालाकडे बघत राहिला.

हा देखावा उत्पन्न होऊन तटस्थपणांत दहावीस पळें गेलीं इतक्यांत 'शाबास, धर्मपाला शाबास,' असा अंतरिक्षांत तारस्वरांत ध्वनी उमटला. सर्वांचें लक्ष त्या आवाजाकडे वेधून जो तो आपापल्या मनांत त्याबद्दल कांहीं कल्पना बांधण्यास आरंभ करणार तोंच त्याठिकाणीं अक-

स्मात् काकासाहेब वाचकांच्या ओळखींतल्या वेषानें प्रगट झाले. त्यांना पाहतांच जांबवान व नलिनी सुलोचनेजवळ कांपत कांपत उभी राहिली. सुलोचना डगमगली नाहीं. धर्मपाल पूर्वीसारखाच दंडायमान पडला होता. काकासाहेबांनीं धर्मपालास डोकें हालवून उठविलें. धर्मपालानें डोळे वर करून काकासाहेबांस पाहतांच तो एकदम मागें सरला. आपल्या समोर आपला मृत पिता उभा राहिलेला पाहून धर्मपाल थरथर कांपूं लागला. त्याच्या सर्व अंगास मुंग्या आल्या. त्याचे ओठ थरथरावयास लागून त्याच्या तोंडांतून सकार व हकार युक्त ध्वनीसह श्वास सुरू झाला. बापाकडे नजर लावून आणि दोन्ही हात जोडून धर्मपाल धीरानें बोलला " काका; हे माझे तात महाराज; आपणास ही योनी प्राप्त झाली काय ! आपण पिशाचरूपानें प्रगट झाला याचें कारण काय ? शुद्ध, सत्वस्थ व निरपराधी मनुष्याला तुमच्यापासून पीडा होणें तर शक्यच नाहीं. मी आपला पुत्र आहें; आपली कांहीं इच्छा असल्यास अद्याप मला कथन करा. मी आपल्या आज्ञेबाहेर जाणार नाहीं. या जांबवानापासून माझें संरक्षण करण्याकरितांच आपण या समयीं दृश्यमान झाला काय ? "

आपल्या पुत्राचें मृदु व मधुर बोल ऐकून काकांनीं सांगितलें " धर्मपाला; याचवेळीं काय पण भवानीच्या देवळांत तूं मनुष्यत्वास विसरून सुलोचनेवर बलात्कार चालविलास तेव्हां तुला त्या पापकर्मापासून वांचविण्याकरितां मीच येऊन सुलोचनेला घेऊन गेलों. तूं भिऊ नको; तुम्ही कोणीही भिऊं नका. तेव्हांपासून सुलोचनेला मी आपल्याबरोबर मनुष्याच्या रूपानें सांभाळली. आज तीन दिवसापूर्वी मी तिला तिच्या माहेरची वाट दाखवून कांहीं निमित्तानें नाहींसा झालों. ती मजजवळ आनंदीत होती. ती मला वडिलासमान मानते. नवऱ्यानें त्याग केल्यामुळें तोंडाला लागलेला डाग घेऊन ती बापाच्या घरीं जाण्यास खुषी नव्हती. तिनें मजजवळ राहण्याचाच निर्धार ठरविला. आतां या योनींतील माझा वास संपत आल्यानें मीं तिचा त्याग केला. ती माझा तपास करीत करीतच या अरण्यांत प्राप्त झाली. तुझे पवित्र विचार, शुद्ध भाषण; सात्विक आचार व परमेशनिष्ठा पाहून त्वां माझा वंश धन्य

कैलास असें मला वाटतें. आतां सुलोचनेचें संरक्षण करून तिला तिच्या भ्रताराच्या घरांत घाला. ती शुद्ध, पवित्र, साध्वी, महान पतिव्रता आहे. आतां तूं येथून चंद्नावतीस निघन जा. त्याठिकाणीं बलभीम या गांवाचा कोणी सरदार आला आहे. त्याचा आश्रय करून रहा. तेथें तुला तुझी माता भामिनी भेटेल. तिचें चमत्कारिक वृत्त ऐकून घेऊन तिचा परामर्ष कर. ती शुद्ध आहे. तुझी व तुझ्या आईची भेट झाली ह्मणजे तूं मला देद्किोठ क्षेत्रांत वैरार्टीमध्यें गति दे ह्मणजे मी या योनींतून मुक्त होऊन तुझ्या पुत्राच्या महत्पुण्यप्रभावानें मी उद्धरून जाऊन मला सद्गति प्राप्त होईल. ”

आपल्याला पोटच्या कन्येप्रमाणें मानणारा ह्मातारा धर्मपालाचा बाप असून तो पिशाचरूपीं आहे याचें ज्ञान होतांच सुलोचना थोडीशी चरकली. पण सहवासजन्य निर्भयपणामुळें तिची शुष्क भीति लागलीच नाहींशी झाली. काकाशीं कांहीं भाषण करावें ह्मणून ती किंचित पुढें येऊन कांहीं बोलणार तो काका एकदम अदृश्य झाले.

समंध नाहींसा झाल्यानंतर जांबवान, सुशीला आणि धर्मपाल यांचा स्नेह व लोभ जागृत झाला. एकमेकांनीं आपापल्या हकीगती सारांशरूपानें एकमेकांस समजावून दिल्या. जांबवानानें त्या दोघांना नलिनीचें त्रोटक वृत्त सांगितलें. त्या तिघांच्या मनांत धर्मपालाबद्दल फारच प्रेम व आदर उत्पन्न झाला. सुलोचनेच्या सासरचा विचार पाहण्यापूर्वी चंद्नावतीस जाणें अवश्य आहे असें धर्मपालानें दर्शविल्यावरून त्यांनीं त्यास अनुमत दिलें. सुलोचना व नलिनी यांना घेऊन जांबवान सोनगडास निघुन गेला. धर्मपाल बलभीमाशीं मुलाखत करण्याकरितां चंद्नावतीस चालता झाला.

---

# प्रकरण ३१ वें.

सोनगड हा गांव विकंठाच्या ताब्यांतील होता. जांबवान सोनगडाकडे जात असतां वाटेनें विकंठाच्या पुढ्यांतील गुप्त पादचाऱ्यांची व त्याची गाठ पडली. वाटसरू या नात्यानें त्यांची ओळख पडून ते सर्वजण एका धर्मशाळेमध्यें रात्रीं वसतीकरितां उतरले. जेवणखाण आटोपून ते चार पांच शिपाई खालच्या पडवींत घोरत पडले. जांबवान, नलिनी व सुलोचना हे वरच्या पडवींत निजले. मोठ्या पहाटेस उठून वाट चालूं लागावयाची असें त्यांचे झोंपण्यापूर्वीं ठरलें होतें. आरंभीं सुलोचना व नलिनी गाढ झोंपीं गेल्या. जांबवान आरंभीं जागसूद होता. पण त्या शिपायांना बेसावधपणें घोरतांना ऐकून तोही झोंपेंत रममाण झाला.

पहाटेच्या समयास जांबवान जागा होऊन पाहतो तों ते सर्व सेवक, नलिनी व सुलोचना हीं तेथें नाहींत. शिपाई लोक कदाचित् आपल्या कामाच्या घाईनें निघून गेले असतील असें धरून चाललें तरी सुलोचना व नलिनी यांची वाट काय झाली असावी त्याबद्दल त्याची अकल काम करीना. उजाडेपर्यंत तो वेड्यासारखा तेथेंच बसला. चांगलें फटफटल्यावर तो खटट्रपणानेंच त्या दोघी स्त्रियांच्या तपासास निघाला. सुलोचना व नलिनी यांच्या नाहींसें होण्याशीं त्या पादचारी लोकांचा संबंध असलाच पाहिजे असें कल्पून तो तशा धोरणानें वाटेनें शोध करीत देदिकोठाकडे चालूं लागला.

त्या पादचारी हेरांचें घोरणें खरें नव्हतें. जांबवान झोपला असें पाहून ते सर्वजण हलके हलके उठून बसले. त्यांच्या नेहमींच्या पद्धतीप्रमाणें त्यांच्यांतील मुख्यानें त्या दोन बायका व जांबवान यांच्या नाकावर कांहीं मादक फक्की टाकली. एक घटकेनें ते सर्व अगदीं बेशुद्ध झाल्याबरोबर त्यांनीं सुलोचना व नलिनी यांना अचानक उचलले. सकाळच्या सुमारास त्या दोघी झोंपेंतून उठल्याप्रमाणें जाग्या होऊन पाहतात तों आपण एका शृंगारलेल्या महालांत असून आपल्या भोंवतीं माणिकबोवा व रमलभारती गप्पा मारीत बसले आहेत असें त्यांच्या ध्यानांत आलें.

हल्लीं सुलोचना व नलिनी यांना ज्या जागेंत ठेविल्या होत्या ती जागा सोनगडाहून फार लांब नव्हती. ते विकंठाचें खाजगत विहाराचें स्थान होतें. देदिकोटच्या सरहद्दीवर राहण्यापेक्षां याठिकाणीं राहणेंच जास्त प्रशस्त होय असें भारतीचें सांगणें पडल्यावरून हें क्रीडास्थान मुद्दाम तयार केलें होतें. याठिकाणीं एक गुप्त भुयार केलें असून त्यांत माणिकबोवा व भारती हें साधन करीत बसत. त्याच्या मोहनमंत्राच्या जाळ्यांत जीं सावजें अडकत त्यांना या महालांत आणून ठेवीत. ज्या नवीन स्त्रिया आणल्या असतील त्यांना घुळवून विकंठमहाराज त्यांच्याशीं विषयक्रीडा उडवीत. त्या पादचारी हेरांनीं सुलोचनादिकांवर जो फक्कीचा प्रयोग केला ती फक्की भारतीनें मोहनमंत्रानें भारलेली होती.

नलिनीनें भारती व माणिक यांना ओळखलें. आपण जिला लुबाडली तीच नलिनी त्या महालांत पाहून भारतीला तिची थोडी कींव आली. परस्परांनीं परस्परांस ओळखलें; पण कोणींही प्रत्यक्ष ओळख दिली नाहीं. सुलोचनेचें अप्रतिम सौंदर्य पाहून भारती व बोवा हुरळले. विकंठासारखा नरपति आतां या चांदणीचा उपभोग घेणार असें वाटून भारतीस मोठी हळहळ वाटली. त्याच्या दृष्टीस सुलोचना पडून ती भ्रष्ट होण्यापूर्वीं आपणच तिचा उपभोग घेऊन सोडावा असेंही त्याच्या मनांत आलें. तशा हेतूनें तो सुलोचनेशीं संभाषण करण्याकरितां तिच्या लगत गेला. पण इतक्यांत तो सावध झाला. अंबालया व बलभीम यांना पेंचांत आणण्याकरितां आपण जें साधन आरंभिलें आहे व जें आतां अगदीं थोडक्यांतच साध्य होईल त्या साधनास व्रतभंगामुळें अपाय घडेल हें लक्षांत येऊन भारतीनें सुलोचनेचा विचार सोडून दिला.

एक दोन दिवस तसेंच अज्ञानदर्शेत गेल्यानंतर त्या केलीसदनांत विकंठ प्राप्त झाला. बलभीम व अंबालया यांच्या हालचालीची प्रत्यक्ष पाहणी करण्याकरतां विकंठ गुप्तपणें चंदनावतीस गेला होता. अंबालयेनें बलभीमावर वृषसेनाची योजना केल्यामुळें तो आयताच बद्ध होईल हें जाणून विकंठ स्वस्थ मानस होत्साता याठिकाणीं परत आला होता. नित्य क्रमानुसार त्यानें नवीन स्त्रियांची चौकशी केली. सुलोचनेचें अनुपम लावण्य पाहून त्याला प्रवासाचे सर्व श्रम परिहार झालेसें वाटलें.

त्यानें कांहींएक धीर न धरितां उतावीळपणानें सुलोचनेचा बेधक हात धरिला आणि तिला खडकावून सांगितलें " सुंदरी; मी राजा विकंठ आहे. माझ्या परवानगीखेरीज येथून तुझी सुटका होणें शक्य नाहीं. मला खुष करणें तुझ्या हातांत आहे. ज्यांनीं माझें सामर्थ्य जाणून मला रतिसंभोग दिला त्या स्त्रियांना सधन करून मी कामशांती नंतर मुक्तही केल्या आहेत. माझ्या म्हणण्याचा धिःक्कार करून ज्या सुंदरी आपलाच हेका चालवून राहतात त्यांचे कसे हाल होत असतात याचें प्रत्यंतर तुला माझे सेवक दाखवितील. तसे कष्ट सोसावयाचें तुझ्या मनांत असेल तर माझा खुशाल धिःक्कार कर. येथून निभावून आपल्या घरीं सुरक्षीत जावें असें तुला बरें वाटेल तर माझ्याशीं रतिविलास करून मला तोषित कर. मी आणखी दोन दिवसांनीं येथें तुझ्या दृष्टीस पडेन. "

असें निक्षून सांगून विकंठ खालील भुयारांत निघून गेला. भारती व बोवा याचें साधन चाललेंच होतें. आतां अगदीं थोड्या काळांत साधनाची सिद्धि होऊन अंबालया तुमची दासी होईल असें भारतीच्या तोंडून ऐकतांच विकंठ आनंदित झाला. अंबालया व बलभीम यांची हवाल काय आहे व बलभीमाची वाट परस्परच कशी लागत आहे ही गोष्ट विकंठानें भारतीस समाजावून दिली. त्यामुळें भारतीही बहुत प्रमुदित झाला.

विकंठाच्या अनुज्ञेप्रमाणें त्याच्या सेवकांनीं सुलोचनेस तेथून एका लहान अशा अंधार कोठडींत नेली. आंतील देखावा दृष्टीस पडावा म्हणन त्या राजदूतांनीं आपल्याबरोबर ढळढळीत दिवे घेतले होते. सुलोचना त्या कोठडींत शिरतांच त्या दीपकांच्या स्वच्छ प्रकाशानें तिला त्या अंधकारमय खोलींत एक लहानशी खाट ठेविली आहेसें दिसलें. या खाटेवर सवंत्र अंकुचीदार खिळे पसरले होते. वर निजणारा मनुष्य यत्किंचित् हालचाल करील तर त्याच्या देहास खिळयांचीं अंकुचिदार टोकें टोंचून अंगांतून रक्ताच्या धारा लागाव्या अशी त्या खिळयांची योजना केलेली होती. त्या खाटेवर एक स्त्री निजली होती. ती स्त्री मूळची सुंदर होती. परंतु, तेथील जाचानें तिचा नुसता अस्थिपंजर उरलेला दिसत होता. ती जीवंत होती. पण हालचाल करण्याची अगर कांहीं बोलण्याची

तिला मुळींच सोय नव्हती. प्राण राहील एवढ्यापुरतेंच तिला रोज अन्नपाणी देण्यांत येत असे. तीन तीन चार चार दिवस तिला मूत्रपुरीषांतच वास्तव्य करणें भाग पडे. या स्त्रीचें सुलोचनेस दर्शन करवून दूतांनीं नंतर असें सांगितलें "या स्त्रीचें नांव सुशीला असें आहे. मारुती व माणिकबावा यांच्याशीं विकंठाचा स्नेह पडण्यापूर्वींच कित्येक वर्षें महाराज विकंठ यांनीं या स्त्रीला हस्तगत करून घेतली आहे. हिचें स्वरूप अनुपम्य होतें. ही आपल्या नवऱ्याचा शोध करीत हिंडत असतांना हिच्या लावण्यावर भुलून विकंठ राजानें हिला पकडून आणली. राजानें आपल्या प्रयत्नाची, लाघवी बोलाची, द्रव्यमोहाची सीमा करून पाहिली; पण ही स्त्री त्याच्या वासनेस जुमानीत नाहीं. आज कित्येक वर्षें ही सुशीला असह्य हाल कंठीत आहे; पण राजाच्या म्हणण्यास कबूल होत नाहीं. पातिव्रत्याच्या पवित्रपणापुढें तिला कोणत्याही जाचाची, त्रासाची, पीडेची, मोहाची, — फार काय पण प्राणाचीही पर्वा नाहीं. या स्त्रियेवर विकंठ जबरी करू शकत नाहीं. कोणत्याही स्त्रीवर जबरदस्ती न करण्याबद्दल विकंठानें आपल्या बापाच्या पायाची शपत घेतली आहे. शपत मोडली असतां काय भयंकर यातना सोसाव्या लागतात याचा त्याला अनुभव आहे. तेव्हां असे हाल करून घेण्यापेक्षां विकंठाला तृप्त करून येथून आपली सुटका करून घेणेंच शहाणपणाचें आहे. येथून बाहेर पडल्यानंतर शुद्धता कायम ठेविली म्हणजे झालें. येथें केलेल्या स्वैच्छ वर्तनाचा स्फोट होणें कधींही शक्य नाहीं."

असें सांगून त्या भूपाल किंकरांनीं सुलोचनेस पूर्व ठिकाणावर आणलें. नलिनी सर्वकाळ अद्याप तिच्याबरोबर होतीच.

बजाविल्याप्रमाणें विकंठ सुलोचनेच्या सामने प्राप्त झाला. विकंठाच्या ताब्यांत सांपडल्यापासून हा वेळ पावेतों सुलोचनेला दुसऱ्यांचें भाषण श्रवण करणें, दाखवितील ते देखावे पाहणें व आत्ममनन करणें यावांचून कांहीं करण्याची सोयच नव्हती. तिचें मत काय आहे; जाबबानाबद्दल तिच्या अंतःकरणांत काय विचार चालले असावेत; स्वतःच्या स्थितीबद्दल तिच्या मनाची कशी धांदल उडाली असावी; धर्मपालाबद्दल

तिला काय वाटत असावें; अखेर तिचा निर्धार काय ठरला असावा याचा स्फोट करण्याला तिला सवडच मिळाली नव्हती. दोन दिवसांची मुदत संपून तिच्यापुढें विकंठ उभा राहिल्याबरोबर तिचें हृदय बाहेर कळण्याचा समय आला. सुशिलेचें काळीज चर करणारा देखावा पाहून ती भ्याली असेल काय ? प्राणाची भीति वाटून विकंठाला वश होण्यास प्रवृत्त होण्याचें तिनें ठरविलें असेल काय ? आपल्याला नवऱ्यानें हाकाललें आहे या स्थितीस हार जाऊन सौख्योपभोगाची दासी होण्याचा तिनें संकल्प केला असेल काय ? बंधमुक्तता प्राप्त करून घेण्याच्या इच्छेनें, द्रव्याचा सोहळा भोगावयास सांपडेल या लालसेनें, जांबवान, धर्मपाल, स्वतःचे आईबाप यांच्याशीं भेट होण्याचा योग येईल या आशेनें, त्या दुःखाच्या पर्वताखालीं चेंगरलेल्या सुलोचनेनें पातिव्रत्याची होळी करण्याचें पतकरलें काय ? छे छे; तसला कुलविघातक विचार तिच्या अंतःकरणास शिवला देखील नाहीं. कोणत्याही प्रकारच्या मोहास लाथेनें लाथाडून, कसल्याही भीतीस मनानें झुगारून, कशाही प्रकारच्या आशेस ज्ञानानें तुच्छ करून त्या महान साध्वीनें विकंठास साफ सांगितलें ' नीचा माझ्या देहाचीं कोणीं सहस्र खंडें करून टाकिलीं तरी मी पातिव्रत्यधर्मांत एक केंसभरही अंतर पडूं देणार नाहीं. तुझ्याकडून होणाऱ्या यातनांनीं माझा अंत झाला तर ठीकच झालें. नाहींतर मी मरेपर्यंत माझा कोणीतरी शास्ता तुझें हृदय विदीर्ण करण्यास धावून येईल या आशेवरच तूं करशील ती पीडा मी निमुटपणें सहन करीन. तुझ्या इच्छेस येईल तसें कर. येवढें मात्र पुरतें ध्यानात वागीव कीं, पतिव्रतेच्या केलेल्या छळानें तिच्या नेत्रांतून पडणाऱ्या अश्रूंनीं ही धरा होरपळत असते. त्या कडकडीत अश्रुबिंदूंनीं भूमाता दग्ध होऊं लागली ह्मणजे तुझ्यासारखे विखारी कीटक कोठें दग्ध होऊन जातील याचा कांहींच भरंवसा नाहीं. "

सुलोचनेच्या वजनदार, अर्थपूर्ण व निश्चयात्मक भाषणास विकंठानें जुमानलें नाहीं. त्यानें तिला कैदेंत ठेवून तिचा छळ आरंभिला. अंधार कोठडींतील स्त्रीचें चरित्र ऐकतांच नलिनीला काय वाटलें असेल याची कल्पना वाचकांनींच करावी. ज्या सुशिलेकरितां नलिनी रानोमाळ भटकत होती; जी सुशीला जीवंत असेल कीं नाहीं याबद्दल नलिनी

साशंक होती, आपला भ्रतार सुदेव याचा शोध करण्याकरितां जी सुशिला आपले तान्हे बाळ पाठीला बांधून घरादारावर लाथ मारून बाहर पडली; ती आपली आई सुशीला एका पातिव्रत्याकरितां खिळ्यांच्या बिछान्यावर अन्नपाण्याविरहित विष्ठामूत्रांत कित्येक वर्षें खितपत पडलेली पाहून आणि त्याच ठिकाणीं आपलें वास्तव्य असतां तिचें एकदां दर्शन घडण्यावांचून तिच्याशीं कोणताही अन्य व्यवहार करण्याची अशक्यता जाणून नलिनी-च्या अंतःकरणांत काय भावना उद्भवल्या असतील याचें यथासांग वर्णन करण्यास आमची लेखणी समर्थ नाहीं. ती वयस्क असल्यामुळें विकंठानें तिला शब्दानें दुखविलें नाहीं व बंदिवासावांचून तिला कांहीं पीडा देण्याचें आरंभिलें नाहीं. यामुळें सर्व गोष्टींवर विचार करीत बसून आयु-ष्याचा काळ कंठण्याची नलिनीला तेथें मुभा होती एवढें मात्र खास.

---

# प्रकरण ३२ वें.

धर्मपाल चंद्रनावतीस जाण्याचा बेत करून जांबवानास सोडून निघाला. त्यापूर्वीं आपण एकदां घरीं जावें असा संकल्प करून तो प्रथम देदिको-ठास आला. सुलोचना व काका यांच्या प्रत्यक्ष घडलेल्या दर्शनामुळें तो समाधानयुक्त झाला होता. घरीं आल्यानंतर सुनीति, सौमिनी व त्याचे तिन्ही मुलगे यांच्याकडे पाहून त्याला आनंदा आनंद वाटला. धर्मपा-लाच्या भाषणांत अलीकडे बराच फरक झाला होता. घरकुन्याची कांहीं बाब निघाली कीं, धर्मपाल सौमिनी व सुनीति यांना धार्मिक व नैतिक तत्वांचें बीज सांगून शांत करी. कोणत्याही इतर प्रसंगीं देखील धर्मपाल प्रभुसत्ता, हरिलीला, ईश्वरी माया यांच्या वर्णनाखेरीज कांहींच प्रतिपादन करीनासा झाला. ही गोष्ट सौमिनीच्या ध्यानांत आली. त्याचा आचारक्रम पाहून सुनीति व तिचे मुलगे यांचेंही मन परमेश्वर चिंतनाकडेच जोरानें वळलें. घरामध्यें द्रव्याचा ढीग सांचला नाहीं; धर्मपालानें सुनीतीला डागडागिन्यांनीं मढविली नाहीं; पोराबाळांच्या अंगावर डागडागिने चढवून धर्मपालानें आपली श्रीमंती व थोरपणा

स्थापीत के ना नाहीं. गाड्या, घोडी, माड्या, महाल, शेले, दुपेटे, गाणेंबजावणें, अत्तरगुलाब, नाटकें, तमाशे, बैठकी, हंड्याझुंबरें, बदाम, पिस्ते, श्रीखंड, आटीव दूध, द्राक्षें, अंजीर, संत्री, चिंचे, तजाविरा, गाद्या, गिरद्या, लोड, तक्के, चाकर माणसें यांतून कोणत्याही गोष्टीची धर्मपालानें पैदास करून मर्त्य, नाशवंत, चोजाळ, चैनी, विलासी, सभ्य व शिष्ट जगांतील लौकीक संपादन करण्यांत धर्मपालाचा पराक्रम दिसला नाहीं तरी धर्मपालाचें चित्त परमेश्वरध्यानांत गुंग झालेलें पाहून सौमित्रीस सर्व सौभाग्य प्राप्त झालेसें वाटलें. सुनीतिसारखी बायको नवऱ्याचा शब्द झेलण्यास व प्रत्येक कामांत प्रतिशीं ऐक्यभावानें वागण्यास तत्पर आहे असें पाहून सौमित्रीस धर्मपालाचा संसार इहलोकीं सफळ झालासें वाटलें.

प्रापंचिक शांततेंत कांहीं काळ घरीं काढून धर्मपालानें चंदनावतीस जाण्याची तयारी केली. ही बातमी केरूनानास समजतांच नाना आपण होऊन धर्मपालाच्या घरीं आले. इकडल्या तिकडल्या गोष्टी बाता झाल्यानंतर नाना ह्मणाले " धर्मपाला; तूं आतां पुन्हां कोठें गांवाला जाणार असें ऐकलें. तेव्हां मी मुद्दामच आलों होतों. तूं आमच्या जवळून हातावर नेलेल्या दीड हजार रुपयांची आह्मांस तूर्त फार नड आहे. कसेंही करून तूं येथून जाण्यापूर्वी आमची तेवढी तजवीज जरूर कर. "

नानांची मागणी ऐकतांच धर्मपाल शांततापूर्वक बोलला " खरें; पण सध्यां मजपाशीं रुपये शिलक नाहींत. आपण कांहीं महिने असेच थांबाल तर मी त्याची कांहीं तरी तजवीज करीन. "

नानांना तशी सबड नव्हती. धर्मपाल सांप्रत खंक आहे असें जरी त्यांना कळलें तरी ते ह्मणाले " छेछे; मला थांबण्याची सोय नाहीं. रकमेची अति निकड आहे. तुला रुपये देतांना मी जितकी तत्परता दाखविली जितक्याच तत्परतेनें आतां तूं ते रुपये परत दे. अशी तसदी लावण्याचा प्रसंगच गुदरला आहे. "

नानांची चिकाटी पाहून धर्मपाळ थोडा विचारांत पडला. नानांची पुन्हा आर्जव करावी या हेतूनें तो ह्मणाला " आपले पैसे बुडणार नाहींत; दमानें घ्या. मी हवातर नवा कायद लिहून देतों. "

आपल्या मागणीनें आपल्या मनांत अविश्वास उत्पन्न झाला अशी धर्मपालाची कल्पना झाली असावी असें त्याच्या उद्गारावरून ताडून नानांनीं सांगितलें " कागद् नको. तुझ्याकडे रुपये बुडतील ह्मणून मी तजवी लावीत नाहीं. मला जरूरच तशी आहे. फार ओढ झाली आहे. नसत्या सरस्वतीदानानें मागण्यासारखें नाहीं. तूं वाटेल तें कर. दोन चार दिवसांत माझी वाट लाव. मी आज जातों. मी एक दोन दिवसांनीं येईन. "

असें सांगून धर्मपालाच्या बोलण्याची वाट न पाहतां नाना एकदम चालूं लागले. धर्मपालही त्यांच्याकडे नुसता पाहत राहिला. नाना गेल्यावर सौमिनीचें व धर्मपालाचें बोलणें झालें. त्यानें तिला नानांची निक्षून मागणी कळविली सौमिनीनें त्याला सांगितलें कीं, " त्यांचा जर इतका लकडा आहे तर तूं प्रवीराकडे जऊन असाच तगादा करून आपले रुपये आण. "

सौमिनीच्या सुचनेवर धर्मपाल ह्मणाला " माझ्याप्रमाणेंच प्रवीराजवळ रुपये शिल्लक नसले तर तो कुठले देणार ? माझ्याप्रमाणेंच त्याला विवंचनेंत पाडणं मला प्रशस्त दिसत नाहीं. "

धर्मपालाचें भोळसर भाषण ऐकून सौमिनी बोलली " म्हणजे काय ! प्रवीराजवळून रुपये उसने कां मागावयाचे आहेत ? कर्ज परत मागायला भीड कसली ? त्याला दुःख वाटेल ह्मणून त्याला रक्कम माल करून पुढें कसें करावयाचें ? "

सौमिनीच्या प्रश्नास धर्मपालानें उत्तर दिलें " त्याला सवड झाली ह्मणजे तो आपले ऋण फेडीलच. तोंपर्यंत आपलें घरांतील आहे नाहीं तें विकून नानांचे रुपये आपण भरूं ह्मणजे झालें. आपल्या घरांतील दागिन्यांचा आपणास तरी दर्शनावांचून काय उपयोग आहे ? "

या चमत्कारीक प्रश्नानें किंचित् रागावून सौमिनी बोलली " लोक गाढव ह्मणून जवळ पुंजी सांठवितात वाटतें ? एवढाले सावकार रुपयांचे ढीग पुरुन ठेवितात, जडजवाहीर सोनेंनाणें यांचा संचय करतात ते सगळे अक्कलशून्यच वाटते ? "

सौमिनीचे लोभपर उद्गार ऐकून धर्मपालानें असें प्रतिपादन केलें कीं, " प्रतिवर्षास अवश्य गोष्टींचा पुरवठा करण्यांत जवढा पैका

खर्च होतो तेवढाच अंगीं लागतो. त्याहून जास्त असलेला द्रव्यसंचय किंवा वित्ताची कमाई याचा खरा उपयोग नाहीं. संग्रहवादी लोक नुसते पैशाचे रक्षक होत. केवळ द्रव्याच्या लोभामुळें शरीर राबविणाऱ्या; पैक्याच्या उबेनें मोठेपणा प्राप्त होतो व लोकांत मान्यता मिळते अशा समजुतीनें अवश्य द्रव्याहून जास्त प्राप्तीकरतां कष्ट करणाऱ्या उलाघाली, कवडीचुंबक, धनप्रिय, अर्थतत्पर लक्ष्मीपुत्रांना मजुरदारच समजलें पाहिजे. प्रापंचिक व्यवहारास अवश्य तेवढें द्रव्य कमविण्यास जरूर असलेला काळ खेरीज करून बाकीचा काळ मनुष्यानें कशांत घालविला पाहिजे याचा विचार ज्यांच्या अंतःकरणास शिवलेलाही नसतो असेच लोक हरतऱ्हेचे काबाडकष्ट करून संसारचक्रांतील मायाब्रम्हास रिकामे भयंकर स्वरूप देतात. आपल्या जवळचे दागिने आपण कांहीं उद्यां मोडून खाणार नाहीं. ते मोडण्याचा प्रसंग आला तरी तेवढ्यावर आपला आयुष्यक्रम भागणार नाहीं. मग नानांची नड भागविण्याकरितां ते आज विकले तर काय बिघडलें ? कर्जही फिटेल आणखी— ”

धर्मपालाचें वाक्य संपण्यापूर्वीच सौमिनीस धीर न पडून ती ह्मणाली “ हा तुझा शास्त्रार्थ पुरे कर. उद्यांच्याउद्या प्रवीराकडे चल; मी तुझ्या बरोबर येतें. त्याला ह्मणावें आमचीं भांडीं बाहेर निघण्याचा प्रसंग आला आहे. तूं आपलें घर गहाण टाक पण आमचे रुपये दे. ”

इतकें होऊन सौमिनीनें बोलणें संपविलें. ती धर्मपालासही कांहीं बोलूं देईना. धर्मपाल दुसऱ्या दिवसापर्यंत मध्यें बराच काळ आहे एवढ्याच समजुतीनें शांत राहिला.

दुसऱ्या दिवशीं सौमिनीनें महाप्रयासानें धर्मपालास बाहेर काढलें. प्रवीराच्या घरीं पोंचतांच धर्मपालानें प्रवीरास नानांचा सर्व मजकूर कळवून रुपये मागितले. प्रवीरानें पहिल्याना चेष्टवारी कांहीं तरी उडवा-उडव केली. भारतीचा उल्लेख करून थोडा रागाचाही आविर्भाव आणला. तितक्यालाही न जुमानतां धर्मपालानें रुपयांची निक्षूनच मागणी केली तेव्हां प्रवीर तुसडपणानें ह्मणाला “ एवढावेळ मी सर्व थट्टा समजलों; तुह्मी रुपये कसले मागतां ? आमचा कांहीं कागद तुम्हाजवळ

आहे ? कांहीं मोबदला आहे ? मग रुपये कसले ? एवढी रक्कम आम्हास हातावर कोणीं दिली नाहीं व आह्मीं कोठून आणली नाहीं. "

प्रवीराच्या या लबाडीच्या भाषणानें सौमिनी गोंधळली. आपण दीड- हजाराच्या गंडयांत येणारसें समजून सौमिनी मोठ्याना बोलली " असें कसें बोलतां; तुह्माला पंधराशें रुपये रोख दिलेना ? तिकडले घेतले कीं, इकडे ओतले. तेव्हां कांहीं दम कां होता ? मग आतां असा लफंगेपणा कां ? आतां, लोकांचीं घरें बुडाविण्यानें— "

सौमिनी बरीच बहकत चाललीसें पाहतांच प्रवीर ह्मणाला " बाई ! उगीच गर्गशा करूं नका. तुमचें येथें काय काम आहे ? "

या बेजबाब प्रश्नास धर्मपालानें उत्तर केलें " असें कां ह्मणतां बरें ? ज्यानें तुम्हाला रुपये दिले त्याचीच ती कोणी आहेना ? तिचें कांहीं काम नाहीं. मी तर रुपये देणारा येथें आहेना ? मग ? "

धर्मपालालाही आतां तुसडावा म्हणून प्रवीरानें सांगितलें " तुह्मी दोघेही चोर. आह्मी कोणाच्या बापाची एक कवडीही लागत नाहीं. चला, येथून चालते व्हा; हट्ट कराल तर गुद्धेच मिळतील. "

असें दरडावून प्रवीर उभा राहिला. धर्मपालही उठून त्यास थांबविण्याकरितां आडवूं लागला. धर्मपालास आतां गुद्ध्याचा प्रत्यक्ष मासला दाखवावा या हेतूनें प्रवीर मूठ वळून जोरानें ओरडला " आधीं माझ्या घराच्या बाहेर व्हा. दोनदां सांगितलें. आणखी एकदां सांगेन. तरीही न ऐकाल तर हा रग्गा बसलाच समजा. " असें बोलून प्रवीरानें वळलेली मूठ उगारली. धर्मपाल पुन्हा कांहीं तरी बोल- णार असें त्याच्या ओंठावरून ओळखून प्रवीर पुढें चालून आला आणि धर्मपालावर गुद्धा रोखून ह्मणाला " यापुढें एक क्षण येथें थांबाल तर टाळकें फुटलेंच असें समजा. " हे शब्द उच्चारून प्रवीर धर्मपालाच्या डोक्यावर रग्गा मारणार तोंच माडीच्या पाटणींतून गर्जनायुक्त आवाज निघाला कीं " प्रवीरा; हरामखोरा; बेरडा; असा उन्मत्त कशानें झालास ? बापाचा माल पंधराशें रुपये मोजून घेतलेस आणि त्यालाच पुन्हा गुद्धा लगाविणार काय ? धर्मपाल माझ्या वाटणींत उभा आहे. त्या पुण्य पुरुषाच्या

अंगास स्पर्श करशील तर येथल्या येथें तुझा मुडदा पडेल. मी प्रत्यक्ष तुझा भाऊ सुशर्मा आहे. तूं याद राखून ऐस. "

आपल्या मृत भावाच्या तोंडचे हे शब्द आकाशांत ध्वनीत झालेले ऐकून प्रवीर गर्भगळित झाला. धर्मपालानें त्याची ती कावरीबावरी मुद्रा पाहून सौमिनीस घेऊन आपल्या घरचा रस्ता सुधारला.

सुशर्मा समंध झाला असून तो आपल्यावर रुष्ट झाला आहे तेव्हां त्याच्यापासून आपल्याला पीडा होईल या धकासणीनें प्रवीर कांहीं दिवस यात्रा करण्याकरितां घर सोडून प्रवासास चालता झाला.

---

# प्रकरण ३३ वें.

दोन दिवस आगाऊ सुचविल्याप्रमाणें केरूनाना धर्मपालाकडे रुपये मागण्यास आले. धर्मपालानें आपल्या घरांतील बायकोच्या अंगावरील डागांची विक्री करून व ठेवणींतले दागिने विकून केरूनानांची रक्कम बिनतकरार परत दिली.

धर्मपालानें घर धुतलेसें पाहतांच सौमिनी जरा ना उमेद व रुख्खी झाली. सुनीतिला त्याचें कांहींच वाटलें नाहीं इतकेंच नव्हे तर आपल्या वापरण्यांतील वस्तु आपल्या पतीला अगदीं समयाला फार उपयोगीं पडल्या म्हणून तिला उलट थोडाफार आनंदच वाटला.

कांहीं दिवसांनीं धर्मपाल चंद्नावतीकडे जाण्यास मार्गस्थ झाला. ठिकठिकाणीं मुक्काम करीत करीत व क्षेत्रें आणि तीर्थें यांच्या जागीं एक दोन दिवस वास करीत करीत धर्मपाल चंद्नावतीपासून पांच कोसावर येऊन ठेपला. या जागीं एक लहानसा टुमदार गांव होता. त्याचें नांव जनधाम असें होतें. या जनधामांत कोण्या धनसंपन्न पाटलानें एक सुंदर उपवन तयार केलें होतें. या उपवनांत नानातऱ्हेचे पुष्पवृक्ष व फळझाडें होतीं. याच वाटिकेंत राहण्याकरितां एक सुबक बंगला बांधलेला असून तेथें सर्व प्रकारची सोय केली होती. संध्याकाळच्या सुमारास गार वारा सुटला असतां त्याच्याबरोबर वाहत येणारा पुष्पपरिमळ अव-

घ्राण करीत व बगीच्याची शांत शोभा अवलोकन करीत बसण्याची कोणालाही मोठी मौज वाटे.

संध्याकाळीं चार घटका दिवसाच्या सुमारास धर्मपाल या बगीच्या नजीक प्राप्त झाला. पुष्पांच्या मधुर सुवासानें उल्हसित होऊन त्याला त्या उद्यानांत प्रवेश करण्याची इच्छा झाली. बागेच्या दरवाजाशीं येऊन त्यानें तेथील माळ्याजवळ त्या बागेची चौकशी करून आंत येण्याची परवानगी मागितली. धर्मपालाची नम्र विनंती ऐकून त्या माळ्यानें त्यास सांगितलें " ही बाग येथील एका सधन पाटिलबुवांची आहे. कोणालाही येथें येण्यास मुभा आहे. पण सध्यां येथें बलभीम या नांवाचे कोणी सरदार राहिले आहेत. तेव्हां त्यांचा मुक्काम आहे. तेथ पावेतों आंत येण्यास त्यांची परवानगी पाहिजे. "

बलभीमाचें नांव ऐकतांच धर्मपालानें तेथेंच पाय खोंचले. आपल्याला आतां चंदनावतीस जाण्याचें कारण नाहीं असें समजून तो त्या माळी-बुवास ह्मणाला 'आपण ज्या सरदारांचें नांव सांगितलें त्यांच्या भेटी करतांच मी चंदनावतीस चाललों आहे. त्यांचा मुक्काम येथें आहे हें मला माहीत नव्हतें. तुह्मी मजवर मेहेरबानी करून त्या सरदारांना जाऊन कळवा कीं, कोणी धर्मपाल या नांवाचा गरीब ब्राह्मण आपल्या दर्शनाची इच्छा करीत आहे. परवानगी होईल तर आपला मी फार फार ऋणी होईन.'

तो माळी मनाचा दयाळू व उपकारशील असल्यानें त्यानें धर्मपालाचा निरोप बलभीमास कळविला. बलभीमाच्या सांगण्यावरून सुदेव हा फाटकाशीं आला. सुदेवाचें व धर्मपालाचें कांहीं बोलणें होऊन सुदेव त्यास बंगल्यावर घेऊन गेला.

त्याठिकाणीं एक गादी टाकून त्यावर एक तरणाज्वान मनुष्य स्थित झालेला होता. तो राजपुरुष उन्नत स्कंध, मांसल हनुवटी व पुष्ट वक्षस्थळ यांनीं संपन्न होता. तो सप्रमाण देह करणांनीं युक्त दिसत होता. त्याच्या चेहऱ्यावर भर उमेदवारीचा तरतरीतपणा व तेज झळकत होते त्यामुळें त्याच्या गौरवर्ण युक्तअंगकांतीस विलक्षण मोहकपणा प्राप्त झाला होता. त्याचा चळगशुद्ध आकार व शरीराचा पिळदारपणा या

वरून तो अपरिमित सामर्थ्यानें संपन्न असावा असें त्याला पाहताक्षणीं कोणाच्याही मनांत येत असे.

त्यानें लष्करी पण अगदीं साधा पेहराव केला होता. यावेळीं त्याच्या डोक्यास शिरस्त्राण नव्हतें. त्याच्या शेजारीं एक म्यानांत घातलेली तरवार मात्र ठेवलेली होती. हाच तो लोहपात महाराण्याचा सरदार बलभीम होय.

धर्मपालानें बंगल्यांत प्रवेश करतांच मसनदीवरील सरदारास अदबीनें मुजरा केला. सुदेवानें बलभीमाशीं धर्मपालाची ओळख करून देऊन असें सांगितलें " आपल्या स्वारींत स्वयंपाक करण्याकरितां भामिनी या नांवाच्या ज्या बाई आहेत त्यांचा हा पुत्र आहे असें त्याच्या ह्मणण्यावरून दिसतें. त्या गृहस्थाना आपल्या मातोश्रींना भेटावयाचें आहे. "

सुदेवाच्या सुनावणीस अनुसरून बलभीमानें आपली त्या कामास संमती दर्शविली. सुदेवानें एका हाताखालील कामगारास घरांत पाठवून भामिनीला तेथें आणून हजर केली. भामिनी धर्मपालास पाहून एकाएका गहिंवरली. धर्मपालाचें ओझें तिनें पोटांत वागविलेलें नव्हतें; धर्मपालानें तिला वेणेच्या व्यथा दिल्या नव्हत्या. परंतु, धर्मपालास पाहतांच त्या पश्चात्तापानें शिणलेल्या भामिनीला माणिकबोवाच्या जुलमाची आठवण झाली. आप्तजनास बघतांच तिचा आत्मा प्रेमरसानें थबथबून तिच्या नेत्रावाटें अश्रु वहावयास लागले. ती खालीं पाहत राहिली. धर्मपालाजवळ काय भाषण करावें हें तिला सुचेना. त्याला एकदम घट्ट पिठी मारून मनसोक्त विलाप करावा अशा भावनेनें तिचें अंतःकरण गडबडून गेलें.

भामिनीची ती शोचनीय मुग्धावस्था पाहून व तिला प्राप्त झालेली हीनस्थिती मनांत येऊन धर्मपालासही दया उत्पन्न झाली. त्यानें बेधडक धावत जाऊन भामिनीस आलिंगन दिलें. माता पुत्रांचें ऐक्य होतांच भामिनीस उमासा येऊन दुःखाची पूर्वस्मृति दाटून आली. ती हुंदक्यासरशी एकदम ह्मणाली ' पुत्रा धर्मपाला; तूं चिरंजीव हो; तो माणिकबोवा-त्यानें माझे काय हाल केले–' याच्यापुढें तिच्यानें शब्दोच्चार करवेना; ती डोळ्याला पदर लावून स्फुंदन करूं लागली.

भामिनीला माणिकबोवानें त्रस्त केली असावी असें जाणून धर्मपाळ

ह्मणाला ' मातोश्री; आपण आपलें सर्व दुःख पुत्राजवळ निवेदन करण्यास भीड धरूं नका तुह्मी कशाही असा; तुमच्या हातून माझें कांहींही नुकसान झालेलें असो; तुमच्यामुळें माझा अपमान झाला असला, तुह्मीं मला त्रस्त करून टाकून यातनांत लोटलें असलें तरी तुह्मी मला पूज्य व वंद्यच आहां. माणिकबोवाबद्दल काय तें सविस्तर सांगा. '

अद्यापही भामिनी गप्पच आहेसें पाहून सुदेवानेंही तिला तशाच प्रकारचा आग्रह करून निःशंक होऊन बोलण्याची विनंती केली. कांहींवेळ विचार केल्यासारखें करून भामिनीनें माणिकबोवाशीं कारस्थान सुरूं केल्यापासून त्याच्या घरांतून बाहेर पडेपर्यंतचें वृत्त सांगितलें. बलभीमाजवळ आपण कशा प्रकारें राहिलों याची शंका येऊं नये ह्मणून ती ह्मणाली " मी माणिकबोवाच्या घरांतून तडक निघालें ती चंदनावतीच्या धोरणानें भिक्षा मागत चाललें. मला खाण्यापिण्याचे फार हाल सोसावें लागले. अखेर या सुदेवांची व माझी गांठ पडून मीं त्यांच्याजवळ लुगड्याकरितां पांच रुपये भीक मागीतले. त्यांचें माझें स्नेहपूर्ण बोलणें होऊन त्यांनीं मला लुगडेंच घेऊन दिलें. मी अन्नार्थी आहेसें पाहून त्यांनीं मला त्यांना स्वयंपाकीणीची नड असल्याचें कळविलें. मलाही पोटाच्या ओढीनें ही चाकरी बरी वाटली. तेव्हांपासून मी यांच्याच जवळ आहें. "

भामिनीचें बोलणें संपेपर्यंत बलभीम आपल्या मननांत गर्क होता. तिनें आपल्या भाषणास पूर्ण विराम देतांच बलभीमानें सुदेवास मध्यें धरून माणिकबोवा कोण असा प्रश्न केला. धर्मपालानें त्या प्रश्नाचें उत्तर ह्मणून माणिकबोवाचें वर्णन केलें. हें वर्णन कानीं पडतांच बलभीम एकदम क्रोधवश होऊन सुदेवास ह्मणाला " आजोबा; रमलभारतीच्याच जातींतले हे माणिकबोवा कोणी बद्माष जादुगार दिसतात. कांहीं हरकत नाहीं. लोहपातानें जादुगारांचें जें सत्र आरंभिलें आहे त्यामध्यें आज नाहीं उद्यां केव्हांतरी या माणिकबोवांचीही आहुती पडेलच. आजोबा; या अंबालयेच्या नादानें आपण व्यर्थ खोळंबून बसलों आहों. अंबालया प्राप्त करून घेण्यावांचून आज कांहीं नडलें नाहीं. तिला आपण मागणी पाठविली आहे. तिला लोहपाताच्या वीर्यशाली-

घगाची परिक्षा पहावयाची असेल तर ती समरांगणावर उभी राहीपर्यंत अगर तिच्याकडून तसा कांहीं मगरूरीचा जबाब येईपर्यंत आपण रमल-भारतीस पकडून लोहपातार्ची प्रतिज्ञा पूर्ण करून टाकूं. देदिकोठाहून आलेल्या गुप्त संदेशहरकानें आणलेल्या बातमीवरून हल्लीं रमलभारती तेथें नाहीं असें समजतें. तो चंद्रनावतीस असेल असा आपणास संशय आहे. तरी येथून त्वरित मुक्काम हालवून अंबालयेच्या राजधानींत शिरकाव करावा व भारतीबद्दलचा संशय फेडून घ्यावा. तसले दुष्ट कितीही जिवंत जाळले तरी रमलभारतीस दग्ध केल्याखेरीज लोहपा-ताची तृप्तता होणें शक्य नाहीं. "

या भाषणावर सुदेशाकडून सयुक्तिक सल्ला मिळण्यापूर्वींच धर्मपाल बोलला ' रमलभारतीचा व आपला काय वैरभाव असेल तो मला ठाऊक नाहीं. तो जादुगार मोठा बस्ताद आहे हें मात्र खास. तो महामांत्रिक असून खल दुर्जनांत वरिष्ठ आहे. तो नष्ट पापिष्ट असून सर्व कुटिलांमधील मेरू आहे. त्याचा मला स्वतःला अनुभव आहे. माणिकबोवा भारतीचा शिष्य आहे. ते दोघे कापट्यवेषी, धूर्त, दीर्घद्वेष्टे व कबुद्धिसा-गर आहेत. पण त्यांना पकडून शासन करणें सोपें नाहीं. ते दोघेही सामान्य पुरुष नव्हेत. आनर्त देशाधीश राजा विकंठ हा त्यांचा छात्र झालेला असून त्याचा त्यांना मोठा आश्रय आहे. माणिकबोवाच्या घरीं विकंठ राजा आलेला मी स्वतः पाहिलेला आहे. ते दोघेजण मुळांतच श्वानवृत्ति; तशांत त्यांना बलाढ्य विकंठाचें पाठबळ मिळालें असेल तर त्यांच्याकडे नुसत्या वाकड्या नजरेनें पाहण्यास तरी कोण धजणार ? आपण होऊन दंदशूकाच्या वारुळांत हात घालण्यास कोण प्रवृत्त होणार ? '

धर्मपालाचें हें ईर्षोत्पादक वर्णन श्रवण करून बलभीमाचा चेहरा क्रोधानें संतप्त झाला. तो साक्षात् संहार रुद्राची दुसरी प्रति-माच आहे कीं काय असा दिसूं लागला. त्याचें सर्व शरीर वीररसानें कंपायमान व्हावयास लागलें. त्यानें नेत्र आरक्त केले. तो अधर चावूं लागला. त्यानें धीर वीराप्रमाणें सुदेवास हाक ठोकून मेघगंभीरगिरेनें गर्जना केली कीं " काय ? लोहपाताच्या मातेला मरणप्राय यातना

देणारा भारती माझ्या हातून बचावून सुटणार काय ? या बलभीमानें भारतीला पकडण्याची जी प्रतिज्ञा केली ती निष्फल होणार काय ? शतधन्व्याची कांता संपदा इच्या कैवारार्थ आह्मी शस्त्र उचललें असतांना भारतीसारखी यःकश्चित् घुंगुरटीं जर आह्मास अजिंक्य होऊन बसतील तर या जगतांतून न्याय आणि पराक्रम यांचा उठावच झाला आहे असें ह्मणावें लागेल. विकंठच काय पण अदृश्यरूपानें प्राण्यांचे जीव हरण करणारा प्रत्यक्ष कृतांतही भारतीचें संरक्षण करण्यास प्रवृत्त झाला असेल तरी देखील या बलभीमाच्या कुडींत रक्ताचा एक थेंब वास्तव्य करीत आहे तोंपर्यंत भारतीनें आपल्याला सुरक्षीत असें समजूं नये. भारतीकरितां विकंठराजाशीं सामना करण्याचा प्रसंग आला तरी बेहेत्तर ? आनर्त-देशाची धुळधाण करीन ! आनर्तदेशाधिपाच्या नरडीचा घोट घेईन ! विकंठानें भारतीला आपल्या उदरांत दडवून ठेविला तरी त्याचें वक्षस्थळ विदीर्ण करून भारतीला तेथन बाहेर खेचून ओढून काढीन ! लोहपाताच्या मातेचा छलकर्ता सलामत राहून हा सरदार बलभीम पतन पावणें ही गोष्ट शक्य नाहीं. '

बलभीमाचें हे वीररसप्राधान्य भाषण संपतें तोंच एक शिपाई खालून वर आला. त्याच्या हातांत एक तोंड बंद केलेली पिशवी होती. ती पिशवी सुदेवापुढें टाकून त्यानें सांगितलें कीं, ' विकंठ राजाकडून कोणी रोहकांत नांवाचा सरदार आला असून तो वर येण्याची परवानगी मागत आहे. त्यानेंच मला ही पिशवी येथें सादर करण्यास सांगितलें. '

सुदेवानें बलभीमाचें अनुमत घेऊन रोहकांतास पाचारण केलें. रोह-कांतानें वर आल्यानंतर ती पिशवी सोडून तींतून एक खलिता बाहेर काढून सुदेवापुढें टाकला. सुदेवानें बलभीमास अवधान ठेवण्यास सांगून तो खलिता वाचला. त्यांत पुढील मजकूर होता:—

" चंदनावतीवर स्वामित्व गाजविणारी राणी अंबालया हिच्या बापाच्या हयातींतच तिला विकंठानें मागणी केली होती. त्यावेळीं त्या मागणीचा अंबालयेनें अव्हेर केला. इतकेंच नव्हे तर तिनें विकंठाला कस्पटासमान लेखिलें. हल्लीं तोच विकंठ अंबालयेस मागणी घालीत आहे. कोणत्यातरी प्रकारानें अंबालयेला हरण करण्याबद्दल विकंठाचा निश्चय झाला

आहे. अंबालयेबरोबर युद्ध करण्यासही विकंठाची तयारी आहे. अंबा-लयेला विकंठाप्रमाणेंच लोहपातानें मागणी केली आहे असें समजतें. द्वंद्व करून अंबालयेची प्राप्ती होत असेल तर लोहपाताशीं द्वंद्व खेळण्यास विकंठ तयार आहे. द्वंद्वयुद्धांत लोहपाताला धरणीवर लोळवून अंबालयेला नेण्याचा हक्क प्राप्त करून घेण्यास विकंठाची तयारी आहे. आपण लोहपाताचे सरदार आहां. तरी आपल्या यजमानास हा मनसुबा कळ-वून कोणता तो विचार ठरवा. लोहपाताची बाहुयुद्धाची इच्छा नसेल तर त्याच्या निसबत आपण अंबालयेला केलेली मागणी परत घ्यावी आणि अंबालयेचा नाद सोडून द्यावा. ”

या खलित्यावर विकंठाचा शिक्का मोर्तब होता. सुदेवाचें वाचन पुरें होतांच सरदार बलभीमानें आपली समशेर म्यानांतून बाहेर काढली आणि तो आवेशानें ताडकन् उभा राहिला. त्यानें आपली ज्वलित दृष्टि रोहकांताकडे वळवून त्याला खरकावून सांगितलें “ सरदार रोहकांत; विकंठाला साडेसातीनें पुरतेपणीं घेरलें असावें अशी माझी कल्पना वाहते. रुद्रवंशीय महाराणा लोहपात याला अंबालयेची मोठीशी जरूर आहे असें मुळींच नाहीं. क्षात्रतेजाच्या कसोटीवरच अंबालयेचा विवाह अवलंबून असेल तर मात्र लोहपाताला अंबालयेवांचून अन्य स्त्रीची जरूर नाहीं. लोहपाताशीं विकंठाचा प्रत्यक्ष कांहीं संबंध नसतांना विकंठानें उन्मत्तप-णानें राणाजीची ही जी आगळीक केली आहे याबद्दल विकंठाला जबर-दस्त दंड भरावयास लावण्याचें लोहपाताच्या बाहूत पूर्ण सामर्थ्य आहे. मशकानें मेरू उलथून पाडण्याची हाव धरावी; कावळ्यानें हंसाबरोबर उड्डाण करण्याची स्पर्धा करावी; मंडुकानें पयोधराबरोबर गर्जना कर-ण्याची पैज मारावी त्याच प्रकारचा विकंठानें अपकारबुद्धीनें लोहपाताला द्वंद्वाकरितां आव्हान करावें यांत अक्षरशः अर्थ भरला आहे. महाराणा लोहपात याची गोष्ट तर लांबच राहिली. त्याच्या पदरचा यःकश्चित् सर-दार हा बलभीम विकंठाशीं द्वंद्व करण्यास या घटकेला सज्ज आहे. सरदार रोहकांत; तुम्ही काय घमेंडींत आहां ? तुमच्या विकंठाला कशाचा मद चढला आहे ? त्याला असा खडखडीत जबाब सांगा कीं, बलभीमाच्या अंगांत तुम्ही रग जिरविण्याचें

अवसान आहे. बलभीमाच्या सपाट्यांतून तूं जीवंत सुटलास तर तुझी इच्छा तृप्त करण्यास लोहपात आपण होऊन तुझ्यापुढें मांडी ठोकील. तुझी इच्छा असेल तेव्हां, वाटेल त्या ठिकाणीं, वाटेल त्या अटीवर, तुझ्याशीं सामना करण्याला हा बलभीम सिद्ध आहे. सुदेवासारख्या पुण्यपुरुषाच्या आशिर्वादानें मी तुला कंठस्नान घालीन असा मला पूर्ण भरंवसा आहे. रोहकांत; उठा; चालते व्हा; तुमच्या यजमानास हा जबाब निकडीनें कळवा आणि वाटेल त्या काळीं द्वंद्वास या. "

बलभीमाचा हा रोखारोखीचा जाब ऐकून सुदेव म्हणाला " सरदार बलभीम, तूं स्थीर हो. रोहकांतावर दांत ओठ चावण्यांत अर्थ काय आहे ? विकंठाच्या मूर्खपणाच्या खलित्याबद्दल आपणही मूर्खपणाचा मर्गशा करण्यांत मतलब नाहीं. द्वंद्वयुद्धात विजयशाली होणारास माळ घालण्याबद्दल अंबालयेचा पण नाहीं. अंबालयेनें द्वंद्वाची अट घातलेली नाहीं. विकंठाची ती खोडसाळ जल्पना आहे. अंबालयेला पौरुषसंपन्न, वीरशाली पुरुष स्वयंवराकरितां पाहिजे आहे. द्वंद्वयुद्धांत कोणीही कोणास जिंकिलें तरी अंबालया कोणाचाच स्वीकार करणार नाहीं. शत्रूला युद्धांत पादाक्रांत करणें, प्रसंगीं बिनतोड धैर्य दाखविणें, केव्हांही युद्ध पराङ्मुख न होणें, स्वतःच्या प्राणास तृणवत् समजणें, औदार्य, दया, परक्लेशहरणबुद्धि, दीनसंरक्षण, शरणागताला क्षतापासून मुक्त करण्याकरितां सर्वस्व अर्पण करणें येवढ्या गुणांनींच खरें वीरत्व अंगीं येणार नाहीं. अस्सल शूरत्वास अवश्य असलेले सर्व सात्विक गुण अंगांत असून परस्त्रीच्या कोणत्याही नटवेपणास कधींही न भुलता केवळ एकपत्निव्रताच्या निश्चयानें राहण्याचें अवसान ज्याच्या अंगांत असेल तोच खरा वीर होय. अशा प्रकारच्या शुद्धपणानें ज्याचें जन्मादारभ्य चारित्र सुशोभित झालें असेल व शेवटपर्यंत ज्याचा शुद्धपणा अजिंक्य राहील तोच खरा वीर्यसंपन्न पुरुष होय ! बलभीमा, रोहकांतावर क्रोध करण्याचें व त्याच्यामुळें स्वतःचें स्वास्थ्य भंग करण्याचें कारण नाहीं. रोहकांत; तुम्ही आपल्या वाटनें निघून चला. विकंठराजाला तुम्हाला वाटेल तो जबाब कळवा. अंबालयेच्या बाबतींत आम्हास त्याच्याशीं कांहींच कर्तव्य नाहीं."

इतक होऊन रोहकांत परत गेला. सुदेवानें धर्मपालास ठेवून घेतलें. कांहींकाळ अंबालयेकडील उत्तराची वाट पाहून नंतर भारती व माणिकबोवा यांच्या पाठीमागं लागावयाचें असें ठरून ती बैठक आटोपली.

---

# प्रकरण ३४ वें.

चंद्रनावतीस अंबालयेला धडधडीतपणें मागणी करण्याकरितां व जनधामास बलभीमाऊा खलिता देण्याकरितां त्रिकंठानें रोहकांताची रवानगी केली. त्यापूर्वींच भारतीच्या महासाधनाची संपूर्णता होऊन त्याला दैवतसिद्धी प्राप्त झाली होती. त्यामुळेंच त्रिकंठ बेफाम व मत्त होऊन रोहकांताची पाठवणी करण्यांत आली होती. रोहकांत परत येईपर्यंत भारतीच्या मंत्रप्रयोगाचा अनुभव पहावयाचा असें त्या त्रिवर्गांचें ठरलें होतें. त्या साधनाचा मारा प्रथम कोणावर करून पहावा याची योजना करितां करितां दोघांचा शत्रु जो धर्मपाल, ज्यानें भोगावतीवर लक्ष ठेऊन भारतीला दुखविलें व माणिकबोवाच्या बायकोला झोंबून बोवास बिघडाविलें त्याच्या बायकोवर ह्मणजे सुनीतिवर या नवीन जादूचा मारा करावयाचा असा संकल्प ठरला. मंत्रप्रयोगाकरितां लागणारे सर्व साहित्य तयार करून भारती, माणिकबोवा व राजा त्रिकंठ हे त्या भुयारांत बसले. राजा त्रिकंठ हातपाय धून पाटावर आसन घालून बसला. भारतीनें त्याच्यापुढें दिवा लावून त्याच्यामागें त्याला दोन्ही हाताची ओंझळ करून धरण्यास सांगितलें. त्रिकंठानें त्याप्रमाणें केलें. भारतीनें त्याच्या हातास तूप चोपडून मंत्राचा उच्चार केला. पुन्हा मंत्रोच्चार करून भारतीनें एका वाटीच्या बुडावर काजळ धरिलें. तोंडानें सिद्ध मंत्र ह्मणत भारतीनें त्रिकंठाच्या हाताच्या तुपानें ते काजळ कालविलें आणि त्याचीं दोन बोटें त्रिकंठाच्या डोळ्यांत घालून त्याला अंजन केलें. भारतीच्या तोंडांतून मंत्रोच्चार सारखा होत असून तो मंतरलेले उडिदाचे दाणे त्रिकंठाच्या डोक्यावर वरचेवर टाकीत होता. अशा कृत्यांत रमल गुंतला असतां माणिकबोवानें त्रिकंठास कांहीं प्रश्न

विचारणें चालविलें होतें. विकंठ आपल्या ओंझळींत पहात होता. कांहीं वेळानें विकंठ म्हणाला " मला देदिकोठ शहर दिसूं लागलें आहे. आणखी तीन वेळ मंत्राचें आवर्तन होतांच बोवानें प्रश्न करितांच विकंठानें सांगितलें " मला एक वाडा दिसत असून त्यांत तीन चार लहान मुलगे, कोणी एक वृद्ध कुणबीन व एक स्वरूपवंत सुवासीण गरोदर स्त्री दिसत आहे. " ही स्त्री विकंठाच्या माहितीची नसल्यामुळें बोवानें विकंठास तिचें स्वरूप वर्णन करण्यास सांगितलें. विकंठानें जें वर्णन केलें त्यावरून ती सुनीतीच आहे अशी बोवा व भारती यांची खात्री झाली. नंतर बोवानें सांगितलें कीं, " ती स्त्री मूत्रत्याग करण्यास किंवा मलोत्सर्ग करण्यास बसलेली दिसली कीं, लागलीच तूं तिला पकड व ओढीत ओढीत येथें आणू लाग. " तशी संधी येण्यापूर्वी पुष्कळ काळ वाट पहात रहावें लागलें. सृष्टिक्रमानुसार सुनीति देहधर्माकरितां बसलेली दिसतांच विकंठानें तिला पकडून खेचली आणि ती गोष्ट भारतीस निवेदन केली. इतक्यांत भारतीनें मंत्र थांबविला आणि ' खैचो खैचो ' या शब्दांचा उच्चार करून मंतरलेल्या पाण्यानें विकंठाचे नेत्र पुसले तों त्या भुयारांत मूर्तिमंत सुनीति प्राप्त झाली.

हा अद्भुत साक्षात्कार पाहून विकंठ आश्चर्यानें वेडावून गेला. त्याचीं सर्व गात्रें शिथिल होऊन तो मुखस्तंभ बनला. भारतीच्या सामर्थ्याबद्दल त्याला तो देवासमान वाटूं लागला. अंबालया, बलभीम, लोहपात हें सर्वजण त्याला शुष्क पाचोळ्याप्रमाणें दिसूं लागले.

सुनीतीचें रूप पाहून, तिच्या नवऱ्यानें आपणास दिलेली उपाधि स्मरून, रमल व माणिक तिच्या अब्रूवर उठले. राजा विकंठानें तर तिचा हस्त धरून एक गालगुच्चाही घेतला. राजाच्या या माजुगी कृतीबद्दल सुनीतीनें त्याला जोरानें हिसडा दिला आणि ती घाबरी होऊन चोहोंकडे दीन वदन पाहूं लागली. ते भुयार व ते तीन परके पुरुष पाहून ती अगदीं गांगरून गेली. तिला कांहींच उमज पडेना. आपण कोण व तिला तेथें कशी व कशाकरितां आणली याची कांहो फोड न करितां त्यांनीं सुनीतीला एक दिवस तशीच भुयारांत ठेविली आणि ते तिन्ही जिवंत समंध तेथून चालते झाले.

सुनीतीला बरोबर एक तब्बल दिवस त्या विवरांत अन्नपाण्यावांचून घालवावा लागला. विवरांत जाण्यास किंवा सुनीतीच्या मनांत शिरण्यास मार्ग नसल्यामुळें तिनें साठ घटकेइतका काळ त्या भुयारांत कशा स्थितींत व काय भावनेनें कंठला हें समजण्यास अनुमानावांचून अन्य साधन नाहीं. कल्पकपणा, बुद्धिप्रागल्भ्य, एकाग्रता आणि श्रवणानुभव यांनीं संपन्न अशा वाचकांनीं आपापली तर्कशक्ति लढवून सुनीतीच्या अवस्थेचा उलगडा करून घेण्यास आमची त्यांना पूर्ण मुभा आहे.

आठ प्रहर गेल्यानंतर भारतीनें सुनीतीला महालांत नेलें. माणिक, भारती व विकंठ यांनीं तिला वश करण्याची पराकाष्ठा करून पाहिली. जबरदस्ती केल्यावांचून सुनीति भ्रष्ट होणार नाहीं अशी बालंबाल खात्री झाल्यामुळें ते तिघेजण हताश झाले. जबरी न करण्याबद्दल विकंठ बद्ध झालेला होता हे वाचकांस ठाऊकच आहे. भारती व माणिकबोवा हे जर जुलूम करण्यास सरसावतील तर अंजनविधीचा मंत्र निःसत्व होणारा होता. या सर्वच पंचायतीमुळें सुनीतीच्या शुद्ध पावित्र्यपणाचें आयतेंच संरक्षण झालें. तिला दहशत पडावी ह्मणून त्यांनीं तिला सुलोचना व सुशिला यांची भयंकर स्थिति दाखविली तरी सुनीति हारीस येत नाहींसें पाहून त्यांनीं तिला अंधारकोठडी दाखविण्याची तयारी केली. पण ती गरोदर आहेसें ध्यानांत येतांच त्या दुष्टांनीं तिच्यावर दया करून तिला नलिनीप्रमाणें मोकळीच ठेविली. जन्मामध्यें दया दाखविल्याचा विकंठ व भारती यांचा हा पहिलाच प्रसंग; पण तो सुनीतीच्या पथ्यावर पडला यामुळें भारती व विकंठ यांच्यासारख्या मनुष्ययोनींतील राक्षसांनाही आह्मी दुवा देतो.

भारतीच्या मंत्रद्वारां सुनीति अकस्मात् हस्तगत झालेली पाहून ते त्रिवर्ग संतोषित झाले. लोहपात व अंबालया यांना आतां आपल्या कबज्यांत आणून गुप्तपणानें भुयारांत कोंडूनच मारूं अशी त्यांना उमेद आली. लोहपातावर नजर ठेऊन त्याच्या रोजच्या व्यवहाराची बातमी आणण्याकरितां कांहीं हुशार गुप्त हेरांना गिरिकन्येस पाठवून देण्यांत आले.

सुनीतिच्या प्राप्तीनें जो विजय मिळालासें वाटलें त्याप्रीत्यर्थ आनंदी-

आनंद करण्यांत दहापांच दिवस घालविल्यानंतर सरदार रोहकांत चंदनावतीहून परत आला. त्यानें बळभीमाजवळ तो खलिता दिल्याचा काय परिणाम झाला, बलभीमानें काय जबाब सांगितला तो सर्व मजकुर विकंठास विदित केला. अंबालया अद्यापही विकंठास तृणासमानच लेखितें असेंही त्यानें विकंठास जाहीर केलें. बलभीम व अंबालया यांच्या मर्स्तीच्या उत्तरानें विकंठ व भारती खवळून गेले. लोहपाताकडील गुप्त समाचार श्रुत झाला ह्मणजे अंजन मंत्राचा दोघावर प्रयोग करावयाचा असा विचार ठरवून ते तिघेजण गिरिकन्येस गेलेल्या चारसंज्ञक बातमीदारांची मार्गप्रतीक्षा करीत बसले.

---

# प्रकरण ३५ वें.

सुलोचना आणि नलिनी यांचा पत्ता लावीत लावीत जांबवान एकदाचा देदिकोठास येऊन पोहोंचला. त्यानें धर्मपालाच्या घरीं जाऊन त्याची चवकशी केली तों त्याला सुनीति अकस्मात् नाहींशी झाल्याचें दुःखद वर्तमान समजलें. सौमिनी व धर्मपालाचे तिन्ही पुत्र यांना जांबवानानें सुलोचना व नलिनी यांचेंही तशाच मासल्याचें वर्तमान सांगितलें. कांहीं अजब हिकमतीनें माणसें-विशेषतः त्यांतल्यात्यांत बायका पळविणारी एखादी संस्था अस्तित्वांत आहे कीं, काय असा त्या सर्वांना जबर संशय उत्पन्न झाला धर्मपाल चंदनावतीस गेला आहे त्याला सर्व हकीगत कळविण्याकरितां जांबवान निघाला. त्याच्याबरोबर सौमिनी आपल्या सर्व परिवारासह जाण्यास सिद्ध झाली. देदिकोठ सोडण्याच्या आदल्या दिवशीं जांबवान रस्त्यानें फिरत असतां त्याची त्याचा मेहुणा नानासाहेब याच्याशीं गांठ पडली. नानासाहेबाचा बाप आबा हा मृत्यु पावला होता. बापाच्या मरणानंतर नानाची गुणाईशीं मुलाखत होऊन त्याला सुलोचनेच्या निरपराधीपणाबद्दल खात्री पटली होती. सुलोचनेच्या विरहव्यथेनें व्याकुळ होऊन तो पृथ्वीवर तिच्या शोधार्थ भटकत होता. जांबवानाचें व त्याचें बोलणें

होऊन त्याला सुलोचनेचा राहिलेला सर्व इतिहास समजला तेव्हां नानासाहेब बहुत आचंबा पावला. तो बायकोबद्दल बहुतेक निराश झाला. जांबवानापासून आपला हृदयांतील मतलब दडवून ठेवून नानासाहेब त्याच्याबरोबर सुलोचनेच्या तपासाकरितां म्हणून चंद्रनावतीस जाण्यास सिद्ध झाला. वाटेनें कांहीं लाग साधल्यास पहावा व कोणी सुंदर स्त्री प्राप्त झाल्यास मिळवावी म्हणजे आपलें मन शांत होईल असा नानांचा अंतस्थ डाव होता. दुसऱ्या दिवशीं सर्व तयारी होऊन जांबवान सर्वांसमवेत चंद्रनावतीस चालता झाला.

जेथून चंद्रनावती वीस पंचवीस कोश लांब असेल अशा ठिकाणीं एका अरण्यांत जांबवान प्राप्त झाला. त्या ठिकाणीं वृषसेनाची छावणी दिलेली होती. त्याच्याबरोबरचे दहावीस सरदार, पायदळ पलटणींतील कित्येक शूर शिपाई यांचे लहान लहान तंबू दिले असून त्यांच्यापासून कांहीं अंतरावर वृषसेनाचा मशियाना उभारला होता.

हा तळ कोणाचा पडला आहे म्हणून शोध करण्याकरितां जांबवान व नाना यांनीं आपला मुक्काम बराच लांब ठेविला होता तेथून ते निघाले. तंबूंत शिरकाव कसा होईल व तेथें आपल्याला धर्मपालाची भेट होईल किंवा कांहीं बातमी कळेल अशा हेतूनें ते छावणीच्या आसपास हिंडूं लागले. शिपाई व सरदार इकडून तिकडून हिंडतांना दिसत. ते सर्व परकेच असल्यानें त्यांच्याशीं एकदम बोलण्याचें कोणासही धाडस होईना. काय निमित्त काढून शिपायांशीं संधान बांधावें व प्रथम कोणीं सुरवात करावी या विचारांत ते घटमिळत आहेत तों व त्यांना तेथें प्रवीर भेटला. जांबवानाची व प्रवीराची ओळख—नातें होतें हें मुद्दाम सांगण्याची अवश्यकताच नाहीं.

प्रवीर व जांबवान यांनीं मागील अपकाराची ओळख न देतां स्नेहपूर्ण भाषणासच आरंभ केला. एकमेकांचें सुख-दुःख—प्रसंग वर्णन करण्यास व प्रवासाचें कारण सांगण्यास सुरुवात होतांच प्रवीरानें त्या गोष्टी चटकन् आटोपत्या घेऊन त्यांना असें सांगितलें “ कशाचा धर्मपाल, कशाची सुनीति, कसची सुलोचना घेऊन बसला आहांत तुम्ही ? तुम्हाला

या छावणींत मी अशी गम्मत दाखवितों कीं, ती पाहतांच तुम्हाला तुमचे सर्व पितर भेटल्यासारखें होईल. मी आतां तर इतका वृद्ध आहें. जात्याच स्त्रीविषयक आरामाचा मला मोठासा नाद नाहीं. तरी पण अशा वृद्धापकाळीं माझ्या मनांतसुद्धां कामवासना प्रज्वलीत होईल अशा तऱ्हेच्या गोजिरवाण्या दोन स्त्रिया या मशियान्यांत आहेत. स्वर्गातील अप्सरांची आपण नुसतीं जीं वर्णनें ऐकतों तशा वर्णनाच्याही पलीकडील वर्णनास योग्य अशा सौंदर्यानें संपन्न अशा दोन दिव्य पद्मिणी पाहून तुमचें चित्त मोह पावेल. तुम्हाला त्यांच्याकडेच बघत बसण्यावांचून कांहीं सुचणार नाहीं. माझ्याबरोबर आज दुपारीं तुह्मी तंबूंत चला. तुह्माला दुसरें असें इंगित सांगतों कीं, त्या दोन स्त्रिया स्वेच्छेनुसार वाटेल त्याच्याशीं विहारही करितात.'

प्रवीराच्या बोलण्याची प्रचीती पाहण्याकरितां दुपार उलटल्यानंतर ते प्रवीराबरोबर तंबूंत गेले. प्रवीराची वृषसेनाच्या एका सरदाराशीं आधीच मुलाखत होऊन त्याचा वशिला लागलेला होता. वृषसेन व त्याच्याबरोबरचे सरदार आपण होऊनच कित्येक नादी व छंदी पुरुषांना जया व विजया यांचा मोह घालीत व त्यांना त्यांचें दर्शन करवून ते लोक संगमसहवासास उद्युक्त झाले कीं त्यांना फजीत करून तुरुंगांत नेऊन ठेवीत.

जांबवान व नाना प्रवीराबरोबर तंबूंत गेले. जया व विजया यांचें प्रत्यक्ष दर्शन होतांच ते आपापले हेतु विसरले. त्यांना तेथून हालावेसें वाटेना. ते तिघेजण चंदनावतीस येतील तर जया व विजया या त्यांच्याशीं एकेकदां संभोग करतील अशा अटीनें ते राजधानीस जाण्याला कबूल झाले. दोन तीन स्वार बरोबर देऊन त्यांना चंदनावतीस पाठविलें आणि त्यांच्या कपाळावर स्त्रीमोहाच्या दास्यत्वाचा शिक्का मारून त्यांना श्रृंगारास्पदांतील तळघरांतल्या दावणींत सामील करण्यांत आलें.

———

# प्रकरण ३६ वें.

वृषसेनाचा आतां ज्याठिकाणीं तळ पडला होता त्याठिकाणाहून स्वारीचें कुच पुन्हा चंद्रनावतीकडे व्हावयाचें होतें. वास्तविक पाहतां बलभीमास गांठण्याकरितां वृषसेन देरिकोठाकडे चालला होता. परंतु, वाटेंत त्याला अंबालयेच्या दरबाराकडून बलभीम जनधामांत असल्या-बद्दल बातमी कळविण्यांत आल्यावरून त्याचा मोर्चा परत जनधामाकडे वळला होता. बलभीम नांवाचा सरदार कोणत्या उद्यानांत उतरला आहे त्याचा शोध आणवून वृषसेनानें आपला मुक्काम हालविला व बलभी-माच्या पुष्पबगीच्यापासून दीड मैलाच्या अंतरावर आपले तंबू ठोकले. बलभीमाला पेंचांत आणण्याकरतां प्रथम त्याच्या दृष्टीस जया व विजया यांना पाडल्या पाहिजेत असा बेत ठरवून तसा प्रसंग साधण्याकरतां वृषसेन पांच चार शूर हत्यारबंद सरदार, जया व विजया यांसह त्याच पुष्पवाटिकेभोंवती घिरट्या घालूं लागला.

अंबालयेनें आपला धिःकार केला तर तिला जेरीस कशी आणावी, रविकंठास गांठून त्याचे दात त्याच्या घशांत कसे घालावे याचा विचार ठरविण्यांत बलभीम, सुदेव व धर्मपाल यांसह वाटिकेंत कालक्षेप करीत होता. वृषसेनाच्या घिरट्या सुरू झाल्यावर दोन तीन दिवसांनीं बलभीम एकटाच त्या बगीचांत सहल करीत होता. हा संधी साधून वृषसेन एकदम त्याच्यापुढें दाखल होऊन त्याच्याशीं ओळख करण्याची इच्छा दर्शवूं लागला. वृषसेन हा अंबालयेचाच सरदार असून तो राज्याची पाहणी करण्याकरितां सांप्रत फिरतीवर आहे असें त्याच्याचकडून समजल्यामुळें बलभीमानें त्याच्या मैत्रीचा अनादर केला नाहीं. अंबालया व लोहपात यांच्या दरम्यान हल्लीं जें कारस्थान उप-स्थित झालें होतें त्याबद्दल सलगीचा वादविवाद करण्यांत वृषसेन व बल-भीम गुंग झाले आहेत; एकेक आपापल्या स्वामीबद्दल अभिमानपर, कैवारी राजनिष्ठ भाषणें करीत आहेत अशा समयास जया व विजया त्या ठिकाणीं येऊन दृश्यमान झाल्या.

घनपृष्ठावर आपल्या तेजोमय चापल्यानें चमकणाऱ्या चपलेप्रमाणें

स्वतःच्या दिव्य प्रभेनें चकाकणाऱ्या या दोन देवांगना पाहतांच बलभीमाच्या नेत्रास क्षणभर एकदम अंधारी आली. स्वर्गभ्रष्ट देवांगनाच आपल्याला दर्शन देण्याकरितां या उपवनांत अवतीर्ण झाल्या आहेत कीं काय असें वाटून बलभीम त्यांच्या सन्मानार्थ उठून उभा राहिला. जया आणि विजया यांच्या अलौकिक व प्रसन्न दीप्तीनें त्या ठिकाणीं पुष्पोद्यानसंभार विकसला असून सर्व बगीच्या वसंतलीलेचें क्रीडास्थान बनल्याचा भास झाला. या भासांत भ्रम पावून जाऊन त्या विलासी भामिनींच्या सौंदर्यवाटिकांनीं बलभीमाचें विवेकोद्यान कोमेजून टाकलें. त्या स्वर्गीय अंगनांचा मुखकमल मकरंद सेवन करण्याकरितां बलभीमाचे नेत्र केवळ षट्पदाचें रूप धारण करून बसले. त्यांच्या सप्रमाण अवयवांची रविसम द्युति पाहून बलभीमाचें अंतःकरण चक्रवाक होऊन राहिलें. आपण सांप्रत नंदनवनांतच आहों कीं काय? प्रमदवनांमध्यें दोन दिव्य देवतांच आपल्यावर सौख्यरसाचा वर्षाव करीत आहेत काय? अमोघ सौंदर्यानें संपन्न अशा दोन यक्षकन्यांनींच आपल्या तोंडांत लावण्यामृताची धारा ओतण्याकरितां आपणास चैत्ररथ वनांत आणून उभे केलें आहे काय? अशा प्रकारच्या भावनासृष्टींत भ्रमण करीत बलभीम जया व विजया यांच्याकडे निरखून पाहत राहिला. त्याची एकतानता पाहून वृषसेन ह्मणाला " सरदार बलभीम! यांना पाहून आपण चकित होऊं नका. या राणी अंबालयेच्या यःकश्चित् दासी आहेत. "

बलभीमः— जिच्या दासी अशा रूपगुणांनीं संपन्न आहेत ती भाग्यवान राणी स्वतः कशी असेल याची कल्पना होणें शक्यच नाहीं. या दासींनीं या ठिकाणीं येऊन आपल्या दर्शनदानानें मला जगतामध्यें धन्यच केलें. यांच्याशीं एक शब्द बोलावयास सांपडेल तर मला अमृताचा लाभ झालासें वाटेल. मग त्यांच्या आलिंगनाच्या सौख्यास म्यां कशाची उपमा द्यावी हें मला समजणें कठीण पडेल. पण जाऊं द्या; अशक्य गोष्टीबद्दल वाटावटा कशाला?

वृषसेनः—आपल्या दृष्टीनें सोप्या दिसणाऱ्या गोष्टी प्रसंगीं जशा अवघड ठरतात त्याचप्रमाणें प्रथम कठिण व अशक्य वाटणाऱ्या गोष्टी समयविशेषीं सोप्या व सहज शक्य अशा ठरण्याचाही संभव नसतो असें नाहीं.

इतकें सांगून वृषसेनानें तेथून निघून जाण्याची तयारी दर्शविली. वृषसेनाबरोबर जया व विजया याही निघून जातील आणि त्या बागेस तमोरूप प्राप्त होईल असें वाटून बलभीम त्याला खोळंबविण्याकरितां आणखीं कांहीं विचारूं लागला. त्याचा मनसंकल्प ओळखून जया मधुरवाणीनें ह्मणाली " आपण सांगितल्याप्रमाणें वेळेवरच आह्मी येथें आपणास पाचारण करण्यास आलों. बोलणेंच लांबवीत बसाल तर आपणास उशीर होईल. आतां येथून चलावें हें बरें. "

जयेच्या भाषणास संमती देण्याकरितां विजया बलभीमाकडे चोरून नेत्रकटाक्ष फेंकीत बोलली " आतां संध्याकाळ होत आला. दुसऱ्याच्या बागबगीच्यांत या वेळीं गप्पागोष्टी करणें प्रशस्त नव्हे. "

दोघींच्या अपांगबाणांनीं विव्हल होऊन बलभीम ह्मणाला " स्वरमाधुर्यानें संपन्न अशा नाजुक कोकिलांनीं उपवनाचा त्याग केला असतां त्याला दग्धवनाचें अगर शुष्क कांताराचें रूप प्राप्त होतें. उपवनावर असा क्रोध करणें रूपसाजिऱ्यांना शोभत नाहीं. "

बलभीम पूर्णपणें भुलला आहेसें पाहून जयेनें पदर पाडून आपलें पयोधर किंचित् उघडे पाडले; आणि बलभीमाकडे डोळ्याची प्रेमदृष्टि फेंकीत व नृत्ययुक्त पावलें टाकीत टाकीत ती हळूच ह्मणाली " तशा उद्यानाचीच चिंता वाहत न बसतां कोकिळा बसतील त्याच वनास जाण्याची तयारी करून उपवनाचें सौख्य अनुभवावें हें बरें. "

जयेच्या भाषणावरून तिच्या मनांतही आपल्याबद्दल प्रेम उद्भवलें असावेसें जाणून बलभीम वृषसेनास ह्मणाला " आपण मघाशीं ह्मटल्याप्रमाणें यांचा समागम होणें सोपें असेल तर आपण मला राज्यदान दिलेंसेंच होणार आहे. आपला तळ कोठें पडला आहे ? "

यावर वृषसेनानें सांगितलें " आमचा तळ येथून दीड मैलावर आहे. पण तेथें येऊन आपला कार्यभाग होणार नाहीं. आपलें भाग्य मोठें ह्मणूनच सहजासहजीं मी यांच्यासह येथें आलों. माझ्या मघांच्या ह्मणण्याप्रमाणें ती गोष्ट सोपी करणें आपल्यावर आहे. त्याबद्दल कांहीं अट आहे. ती अट आपण संभाळाल तर आपलें मनोरथ पूर्ण होतील. "

वृषसेनाचें बोलणें ऐकून बलभीमास जास्तच आशा वाटूं लागली.

कांहींही अट असली तरी ती जया व विजया यांच्या समागमसौख्याच्या महत्वानें क्षुल्लकच असणार, असें समजून बलभीम वाटेल त्या अटी स्वीकारण्यास आपल्या मनानें कबूल झाला. या गोष्टीस चालढकल व विलंब नको ह्मणून त्यानें वृषसेनास अट काय आहे ती विचारली. वृषसेनानें जया व विजया यांना विजय मिळाल्याचें सांकेतीक चिन्हांनीं सुचवून त्यांस कांहीं निमित्तानें तेथून निघून जाण्यास खुणविलें.

पाहतां पाहतां त्या दोघीजणी दिसेनाशा झाल्यावर वृषसेन ह्मणाला " लोहपातराजाचा व अंबालयेचा द्वंद्व संग्राम होऊन लोहपातास राणी अंबालयेनें निर्वीर्य केलें असें लोहपाताच्या सही शिक्याचें विजयपत्र देऊन लोहपात अंबालयेचा गुलाम आहे असें जर आपण लोहपाताच्या स्वदस्तुरनें लिहून देत असाल तर जया व विजया यांतून कोणातरी एकीशीं आपला एकांतांत एकदां समागम होईल. या अटीखेरीज दुसऱ्या कोणत्याही उपायानें जया व विजया यांतून कोणाचें नख देखील आपल्या दृष्टीस इतःपर पडावयाचें नाहीं. "

वृषसेनाची अट ऐकून बलभीम क्षणभर घोटाळला. त्याला त्या अटीचें मोठें कोडें पडलें. रुद्रवंशाची कीर्ति, शतधन्व्याचा लौकीक, सुदेवाचा सदुपदेश यांच्या स्मरणानें त्या अटीस तुच्छ करावेंसें मनांत आलें कीं, जयेची मूर्ती त्याच्यापुढें उभी राहून तो तिच्यापुढें नम्र होई. आंध्रदेशाची सत्ता, धार्मिक पवित्रता, सदाचार, वीर्यसंपन्नता या सद्गुणांनीं त्याचें अंतःकरण त्या अटीला झुगारून देण्यास प्रवृत्त केलें कीं, विजयेची प्रतिमा त्याच्या हृदयांत संचारून त्याला लीन करून सोडी. अशाप्रकारें त्याचें मन द्विधा झालें. त्याची बुद्धि हेलकावे खाऊं लागली. त्याचा विचार दुभंग झाला. मनाच्या आंदोलयमान स्थितींत बराच वेळ हेलकावे खातां खातां तो कामाचा दास बनला. आठ दहा दिवसाची मुदत मागून घेऊन त्यानें तशा प्रकारचें लिखित पत्र आणून हजर करण्याचें पतकरलें. जयपत्र हातांत पडेल त्याच दिवशीं रात्रीं बलभीमाचा व जयेचा विलास घडेल असें वृषसेनानें वचन दिलें. हा सर्व सवदा ठरविण्यांत बराच काळ गेलासें पाहून ते दोघेजण आपापल्या मकाणाप्रत चालते झाले.

# प्रकरण ३७ वें.

धर्मपाल बलभीमाच्या गोटांत आल्यापासून त्याचा व सुदेवाचा फारच स्नेह जमला. भामिनीचें व धर्मपालाचें सर्व चरित्र श्रवण करून व भारती व माणिकबोवा यांच्याशीं धर्मपालाचें असलेलें वैर लक्षांत आणून, धर्मपालानें आपणास विकटाचा डाव सांगितला. हें ध्यानांत बाळगून आणि सुदेवाचा धर्मपालावर जडलेला लोभ पाहून बलभीमानें धर्मपालास आपला असें मानलें. मोठमोठ्या शास्त्रसिद्धांतावर, तात्विक प्रमेयावर, अनुभवज्ञानावर सुदेवाशीं धर्मपालाचें जें संभाषण होई त्यामुळें सुदेव धर्मपालास फारच मोठा लेखूं लागला. बलभीमाच्या मनांत धर्मपालाच्या सत्वस्थ विचारांबद्दल पूज्यभाव उत्पन्न झाला. तात्पर्य, धर्मपाल भामिनीस घेऊन आपल्या घरीं जाण्याची इच्छा दर्शवूं लागला. तेव्हां बलभीमानें व सुदेवानें त्यास आग्रहानें ठेवून घेतलें व बलभीम परतला म्हणजे आपल्या सर्व कुटुंबासह कायमची वस्ती करण्याकरितां गिरिकन्येस येऊन राहण्याचें वचन मागितलें. धर्मपालानें ठाम असें अश्वासन कांहींच दिलें नाहीं. भामिनीस देदिकोठाला नेऊन काकासाहेबांस गति दिल्यानंतर काय तें ठरवूं एवढेंच सांगून कांहीं दिवस आणखी तेथें राहण्याचें मात्र त्यानें त्यांच्याजवळ कबूल केलें.

वृषसेनाशीं गुप्त मसलत ठरवून बलभीम आपल्या बंगल्यांत आल्यानंतर त्यानें सर्व मजकूर सुदेवास निवेदन केला. सुदेवानें त्याला स्पष्ट जबाब ताबडतोबीनें दिला नाहीं. सुदेव उत्तर देण्याची उडवाउडव करीत आहेसें पाहून बलभीम विचारांत पडला. एक दोन दिवस तसेच गेल्यावर बलभीम वरचेवर लिखित पत्र देण्याचाच मुद्दा सुदेवाजवळ काढूं लागला. आपण आजपर्यंत केलेला उपदेश वाया घालवून बलभीम केवळ पालथा घट बनला आहेसें पाहून सुदेवानें जास्त बुद्धिवाद सांगण्याचें नाकारलें. बलभीमाच्या अंतःकरणांत पुष्पचापाचा मारा चालला असल्यानें तो बेफामपणानें सुदेवास ह्मणाला " आपण कांहीं बोलला नाहीं तरी मी तसें लिखित पत्र देणार हें ठरलें. आपणास हें खपणार

नाहीं हें मी जाणतों. परंतु, जोंपर्यंत जया व विजया यांचें प्रत्यक्ष दर्शन आपणास घडलें नाहीं तोंपर्यंतच आपला वेदांत कायम राहील. त्यांचें दर्शन घडलें ह्मणजे कसलाही पुरुषच काय पण स्त्रिया देखील त्यांच्यावर फिदा होऊन त्यांच्या बटकी होण्यांतच धन्यता मानतील, त्यांचें वाटेल तें काम पतकरतील ! ”

बलभीमाची ही वल्गना ऐकून धर्मपालानें सांगितलें “ सुदेव महाराज कांहींच बोलत नाहींत हें एकप्रकारें बरेंच आहे. या कामास अनुकूळ मत तर देतांच येत नाहीं. प्रतिकूळ मत देऊन आपली इतराजी करून घेण्यापेक्षां अगर केलेल्या उपदेशाच्या निष्फलतेपासून उत्पन्न होणारी तळमळ व अस्वस्थता यांची पीडा सोसण्यापेक्षां मौन स्वीकारणेंच बरें असें सुदेवांचें मत असावें. तें कसेंही असो; मी आपला सल्लागार असतों तरी मी बीज पेरण्यापूर्वीं क्षेत्राचाच विचार केला असता. आपणास वाटेल तें करण्यास आपण मुखत्यार आहां. परंतु, आपण ज्या स्त्रियांचें वर्णन करतां त्यांच्यापेक्षां शतपटीनें श्रेष्ठ अशा स्त्रिया आपखुषीनें मागें लागल्या तरी कोणत्याही अटीवर हा धर्मपाल मात्र त्यांना हार जाणार नाहीं. ”

धर्मपालाचें हें भाषण ऐकतांच सुदेवानें मौनाचा त्याग केला आणि धन्यवादाच्या वाणीनें तो बोलला ‘ शाबास, धर्मपाला; तुझ्या तोंडच्या निदान या नुसत्या शब्दांनीं तरी तूं आपल्या वाडवडिलास सद्गतीस पाठविलेस यांत संशय नाहीं. बलभीमाच्या घरीं स्वयंपाक करणाऱ्या भामिनीच्या पोटचा, हे पवित्र शब्द काढणारा पुत्र भिक्षा मागत दुनियेवर हिंडतो व अशा रंकाच्या, मगंगाच्या स्वयंपाकी बनलेल्या मातोश्रीचा अन्नदाता सरदारी भोगतो याचेंच मोठें आश्चर्य वाटतें. कसेंही असलें तरी पूर्व संस्कारांचें प्राबल्य बलवत्तर मानणें भाग आहे. अनुभवांतीं सुखाचा उलगडा होईल.

सुदेवाच्या भाषणाचा बलभीमानें फारसा विचारच केला नाहीं. धर्मपाल व सुदेव एकाच मताचे आहेत तरी धर्मपालाची त्या स्त्रियांशीं गाठ पडली असता तो आपलाच सहाध्यायी बनेल असें समजून त्याला त्यांचें दर्शन कसें घडवावें याचा बलभीम विचार करूं लागला. तशी गोष्ट

घडणें बहुतेक दुरापास्त आहे व तूर्त तशा गोष्टीस फुरसतही नाहीं असें समजून त्यामें तो विचार तसाच बाजूस सारला. आपला व जयेचा सोहळा संपला ह्मणजे धर्मपालाची परीक्षा पहावयाची असें त्यानें आपल्याशीं ठरवून टाकलें.

मुदत भरण्यास तीन दिवस अवकाश आहेसें जाणून बलभीम लिखित पत्र लिहावयास बसला. लोहपाल बहुत दूर असतां आपण त्याची सही कशी मिळविली याबद्दल धर्मपाल साशंक होईल या संशयानें त्यानें धर्मपालास कांहीं निमित्तानें चार दिवस दूर करण्याची योजना चालविली. बलभीम कांहीं तजवीज योजीत आहे तों अंबालयेकडून मागणीबद्दल उत्तर आलें. त्या उत्तरानें बलभीमाचें आयतेंच काम भागलें.

वृषसेनानें बलभीमाशीं जी अट ठरविली त्याची बातमी त्यानें अंबालयेस कळविली. बलभीमाजवळ वास्तव्य करीत असलेला कारभारी सुदेव हा कदाचित् बलभीमास अट पूर्ण करण्यापासून परावृत्त करील असें जाणून वृषसेनानें अंबालयेस असा सल्ला सांगितला कीं, "बलभीमाच्या मागणीस तूर्त असा जबाब पाठवावा कीं, लग्नाचें बोलणें करण्याकरतां लोहपालाच्यावतीनें अंबालयेच्या दरबारांत कोणीं ते समक्ष यावें. प्रत्यक्ष मुलाखत होऊन पुष्कळ नाजुक बाबींचा उलगडा झाल्यानंतर काय तो स्पष्ट जाब देण्यांत येईल. असें केलें ह्मणजे सुदेवाची चंदनावतीस रवानगी होईल. सुदेव अशा तऱ्हेनें बाजूस गुंतणें इष्ट आहे. कर्मधर्म संयोगानें सुदेवाच्या जागीं दुसरा कोणी मुत्सद्दी येईल तर त्यास जिंकून कैद करण्याकरितां अंबाळया समर्थ आहे. खेरीज इकडून विजया रवाना केली आहे."

या कारस्थानाच्या धोरणानें बलभीमाकडे थैली दाखल झाली. बलभीमास स्वतः जाण्याची सोय नव्हती. सुदेव जाण्यास नाखुष दिसला. अर्थातच त्या कामावर धर्मपालाची योजना झाली. धर्मपालास सुदेवानें अवश्य त्या सूचना देऊन कामाच्या निकाल कांहींच न सांगतां पानावर पान ठेवून परत फिरण्यास सांगितलें. धर्मपालाची चंदनावतीस रवानगी झाली. त्याच्याबरोबर जरूर ते शिपाई स्वार देण्यांत आले. अंबालयेसारख्या नाजूक असलेल्या राज्ञीचें दर्शन

घडेल एवढ्याच समजुतीवर व बळभीम आणि सुदेव यांचें कार्य घडतें एवढ्या समाधानावर धर्मपाल आनंदानें चंद्रनावतीस पोंचला. आपण मागें चंद्रनावतीस ज्या कारणानें गेलों होतों त्याहून आतांच्या कार्याची जबाबदारी वेगळी आहे हें तो जाणून होता. लोहपाताचा वकील हा पेशा राखून त्याला साजेल अशा प्रकारें त्यानें अंबालयेच्या दरबारास आपल्या आगमनाची वर्दी दिली.

धर्मपाल दाखल होण्याच्या दिवशीं दरबारचा थाट विलक्षण केला होता. दरबारांत कोणाही पुरुष सरदारास हजर ठेविलें नव्हते. हा दरबार श्रृंगारास्पदांतच भरविला होता. रत्नजडित लखलखणाऱ्या सिंहासनावर अंबालया शचीप्रमाणें विराजमान झाली होती. तिच्या संन्निध विजया अमोलिक श्रृंगार करून बसली होती. अनेक तऱ्हेचे विलासाचे व उपभोगाचे पदार्थ हातांत घेऊन हजारो सुंदर व तरुण दासी सज्ज होत्या. तेथील एकंदर अपूर्व रोषणाई लक्षांत घेतां तो दरबार नसून एखाद्या अनुपम अप्सरेचें तें शयनगृह असावेसें वाटत होतें.

धर्मपालाच्या आगमनाचा पुकारा करण्याकरितां एका स्त्रीचें भालदाराप्रमाणें ललकारणें संपल्यानंतर धर्मपाल राणीपुढें अदबीनें उभा राहिला. राज्ञीच्या वतीनें ह्मणून विजया एकदम उठून धर्मपालाच्या जवळ आली आणि त्याला सन्मानपूर्वक बसविण्याकरितां तिनें त्याच्या दंडास स्पर्श केला.

विजयेचा हा अतिप्रसंग पाहून धर्मपाल एकदम बोलला " चंद्रनावतीचा राजकुलावतंस अशा राजा क्षेत्रवान याच्या कन्येचा हा दरबार नसून आपल्या कुटिल, विलासी, कामाप्रिय सखिजनासह साक्षात ही रतीच आपल्या अंतर्गृहांतील मंचकावर आरूढ झाली आहे कीं काय असें मला वाटतें. लोहपाताच्या वकिलास आसन देण्याचा हा येथील उद्दाम प्रकार पाहून लोहपातास अंबालया माळ न घालील तर फार उत्तम असेंच मला वाटतें. "

प्रथमारंभींच धर्मपालाच्या भाषणाचें भलतेंच धोरण पाहून विजयेस आचंबा वाटला. पुरुषांना जिंकण्याच्या कामांत तिला केव्हांच

अपजय आला नसल्यानें तिनें आपलीं सर्व आयुधें सज्ज केलीं. नेत्रकटाक्षांचा धर्मपालावर सारखा वर्षाव करून तिनें त्याला मोहण्याचा प्रयत्न केला. आपलें चित्त आकर्षण करण्याकरितां विजया नेत्रबाण फेंकीत आहेसें पाहतांच धर्मपाल अंबालयेला उद्देशून ह्मणाला " राणी अंबालया मोठी चतुर, गुणग्राहक व धोरणी आहे असें माझ्या ऐकिवात आहे. पण प्रत्यक्ष अनुभवाअंतीं तें सर्व खोटें आहेसें दिसतें. या विजयेला जवळ ठेवण्यांत अंबालया चुकली आहे. ही विजया सारखे डोळे मिचकावीत आहे यावरून ती जन्मतःच चिपडी व पिचपिच्या डोळ्याची असावी असा तर्क होतो."

या भाषणानें अंबालया धर्मपालाकडे वेगळ्याच दृष्टीनें पाहूं लागली.

आपल्या नयनशरांचा उपयोग झाला नाहींसें पाहून विजयेनें नाक वर ओढून प्रणयमंजुळ दृष्टी करून मोहक मुरका मारून धर्मपालास वेध करण्याचा यत्न केला. हें पाहतांच धर्मपालानें भाषण केलें " तसेंच ही विजया सारखी नाक ओढते आहे. हिला कायमचेंच पडसें आहे कीं ही स्वभावतःच शेंबडी आहे न कळे."

हे उद्गार ऐकतांच अंबालयेच्या मनांत धर्मपालाबद्दल आदर उचंबळावयास लागला. विजयेनें आपला पदर पाडून व कंचुकीचे बंद किंचित् सैल करून आपले पुष्ट पयोधर कांहींसे दृष्टिगोचर केले. ती कुचकमंडली पाहतांच धर्मपाल बोलला " या विजयेच्या उरुस्थानावर रक्त गोठून ही केवढालीं हिंगुरटीं वाढलेलीं दिसतात पहा ! एखादी घार मुखामध्यें मांसपिंड घेऊन जात असतां ते चोंचींतून निसटून या विजयेच्या वक्षस्थलावर पडून तेथंच चिकटून बसले असावेत असा पाहणाराचा तर्क होतो."

या वर्णनाच्या योगानें अंबालयेचें अंतःकरण धर्मपालाबद्दलच्या प्रेमानें भरून गेलें. प्रेम व पूज्यभाव यांच्या दडपणानें ती जागच्याजागींच अलद्रीनें सुस्कारे टाकूं लागली.

यानंतर विजया उठून उभी राहिली. पदर सांवरून, अलंकार व्यवस्थित करून ती टचकत टचकत पावलें टाकीत मोठ्या नखऱ्यानें धर्मपालासंनिध सरबताचा पेला घेऊन आली.

तो तिचा आविर्भाव पाहून धर्मपाल ह्मणाला "ही चालताना अशी लचकते कां ? ही लंगडीबिंगडी तर नाहींना ?" असा प्रश्न करीत धर्मपालानें सरबताचा पेला स्वीकारून तसाच तो खालीं ठेविला. पेला देऊन विजया आपला नितंबभाग दाखवीत परत चालली. तेव्हां धर्मपालानें शब्द उच्चारिले "ही बाई मोठी लाघवी दिसते. ही लुगड्याच्या आंत कमरेखालीं कलश बांधून हिंडते कीं काय ? दोन टेंकड्याप्रमाणें दोन उंचवट्यांनीं संपन्न अशा इच्या नितंबांनीं इचा सारा डौल घालविला आहे. हिच्याशीं रममाण होण्याकरितां कोणा दुर्भाग्यास देवानें जन्मास घातलें असेल तो महान् पापात्मा व खडतर नशिबाचा समजला पाहिजे. हिचा आहारही पुष्कळ दिसतो. बेसुमार अन्नानें ही इतकी फुगली आहे की, हिला वाटेल तितकें ओझें सहन होत आहे. गाढवास देखील असह्य होईल असें दागिन्यांचें ओझें ही आपल्या गळयात बाळगीत आहे. यावरून ही नरजातींतील स्त्री वृत्तीनें खरजातींतील खरी असली पाहिजे. स्वपत्नीची पर्वा न करितां केवळ छांदिष्टपणानें इच्या या मेषपात्री सुंदरतेस भुलणारा पुरुष नर नसून खरच असला पाहिजे."

ही भाषा श्रवण करितांच अंबालया सिंहासन सोडून खालीं उतरली. हातामध्यें नवरत्नांची माळ घेऊन ती धर्मपालाजवळ येऊन उभी राहिली. तें पाहताच धर्मपालानें विचारलें "बरं, मग; लोहपाताच्या प्रश्नाबद्दल काय उलगडा करून घ्यावयाचा असेल तो लवकर करून घ्या. मला दुसरीं निकडीचीं कामें आहेत. अंबालयेच्या पाहुणचारानें किंवा सौंदर्यदर्शनानें आमचे कार्यभाग उरकणार नाहींत. मला जनधामास जरूर गेलें पाहिजे."

धर्मपालाचें बोलणें थांबतांच राणी लज्जित होऊन विनयानें बोलली "आतां अंबालया स्वतंत्र राहिली नाहीं. आपण जाल तिकडे अंबालयेला घेऊन चलावें. चंदनावतीला स्वामी प्राप्त झाला. आतां अंबालया धर्मपालाची—"

पुढचे शब्द उच्चारण्यास धर्मपालानें अंबालयेला प्रतिबंध केला. तो ह्मणाला "भलतेंच बोलणें काय कामाचें ? राजा लोहपाताच्या प्रश्नाचा अगोदर उलगडा करा. मी लोहपाताचा वकील आहें."

अंबालया०— राणी अंबालयेची सखी विजया पराजीत झाली नसती तर लोहपाताचा वकील धर्मपाल तळघरामध्यें अंबालयेच्या कारागृहांत पडला असता. परंतु, विजया पराजय पावून वकील यशस्वी होऊन वीर ठरल्यानें खुद्द अंबालयाच आतां वकील धर्मपालाच्या कैदेंत राहण्यास, अनुज्ञेनें चालण्यास, सुखदु:खांत वाटा घेण्यास, वचनानें, मनानें, देहानें व वाचेनें बद्ध झालेली आहे. माझा स्वीकार व्हावा.

धर्मपाल०— राणी असो किंवा महाराणी असो; देवांगना असो; नागकन्या असो; यक्षकन्या असो, फार काय पण साक्षात मन्मथकांता-रती असो; धर्मपालास सुनीति खेरीज अन्य स्त्री ठाऊक नाहीं व मरेपर्यंत ठाऊक होणें शक्य नाहीं. अंबालया लोहपातास माळ घालण्यास तयार आहे काय ?

अंबालया०— माझा पण जिंकल्यामुळें ज्याचा मजवर हक्क सिद्ध होतो तो वीर्यशाली पुरुष माझ्या सन्निध उभा असतां त्याला विसंबून माझी जिव्हा लोहपाताचा स्वीकार करण्यास सिद्ध होईल तर ही अंबालया तिचे शतशः तुकडे करून टाकील. लोहपात, विकंठ यांच्यापासून अंबालयेचें रक्षण करण्याची जबाबदारी या घडीपासून धर्मपालावर पडत. मी आपली दासी आहे. आपण स्वत: या दासीची वाटेल ती व्यवस्था लावावी.

राणीच्या भाषणावर काय जबाब करावा या विचारांत धर्मपाल क्षण-भर स्वस्थ उभा आहे इतक्यांत त्या ठिकाणीं एकएकीं वेदधर्मानें प्रवेश केला. तो सरळ धर्मपालापाशीं येऊन त्याला दंडानें हालवून म्हणाला " वत्सा धर्मपाला ! व्यर्थ वाटाघाट करण्यांत वेळ दवडूं नकोस. अंबा-लयेनें तुझें दास्यत्व पतकरलें आहे. तूं जातीचा ब्राह्मण आहेस तेव्हां तुला अंबालयेशीं विहितकर्मानुसार विवाहकरतां येणार नाहीं. याचा विचार पुढें पाहूं. तूर्त तुला कांहीं निकडीच्या कामानिमित्त जनधामास परत चलले पाहिजे. "

वेदधर्माच्या भाषणास कांहींच उत्तर न करितां धर्मपाळ त्याचें त्या महालांत आगमन कसें झालें याच विचारांत पडला. त्या संबंधानें तो कांहीं प्रश्न करणार असें ओळखून राणी बोलली " हा वेदधर्म येथें नेहमीं येत असतो. त्याची वेडगळ पण निरपराध वृत्ति जाणून त्याला येथें व

राजदरबारांत कोठेंही स्वैर संचार करण्याची मुभा ठेवलेली आहे. आतां आपण आपल्या मुखत्यारीनें वाटेल ती नवीन व्यवस्था करावी. ”

हें भाषण ऐकतांच धर्मपालानें वेदधर्मास साष्टांग नमस्कार घातला. वेदधर्मानें आपल्या भाविक शिष्यास उठवून हृदयाशीं धरलें. परस्परांच्या अंत:करणाची खूण पटल्यानें त्यांनीं जास्त वाच्यता कांहींच न करतां मनोमय वाणीनेंच एकमेकांशीं संभाषण केलें. धर्मपालानें त्या वेड्यापुढें लोटांगण घातलेलें पाहतांच राणी साशंक झाली. धर्मपालासारखा पुण्यात्मा ज्याच्या पुढें नति घेतो तो तशाच कांहीं अधिकाराचा असला पाहिजे अशी भावना होऊन अंबालया वेदधर्मास नमस्कार करून ह्मणाली “ आपलें स्वरूप न ओळखतां मीं आपणांस कवडीमोल समजलें या अपराधाची क्षमा करून मला अज्ञान दासीला सदय मनानें आशीर्वाद द्यावा. ”

अंबालयेची ही लीनता व धर्मपालाशीं एव्हांपासूनच इतका विमल आचार पाहून वेदधर्माच्या मनांत पुष्कळ बोलावयाचें होतें; पण तो काळ जरा भानगडीचा असल्यानें त्यानें सांगितलें “ अंबालये; तुझे सर्व मनोरथ पूर्ण होतील. तुझ्या सर्व शंका पुढें निरसन होतील. वादविवाद करण्यास, समजुती घालण्यास, तूर्त आह्मांस वेळ नाहीं. धर्मपालाला तूं आपल्या देहाचा ताबा दिला आहेस. पुन्हां परत आल्यावर त्याला वाटेल त्याप्रकारें तुझ्या कल्याणावर नजर देऊन तो तुझी वाट लावील. तू तोंपावेतों स्वस्थ ऐस. तूं धर्मपालाची पूर्ण अंकित असल्याबद्दल यासमयीं धर्मपालास तूं तुझी खुणेची अंगठी अर्पण कर. ”

वेदधर्माच्या वजनदार व भारदस्त शब्दावर भरंवसा धरून अंबालयेनें धर्मपालास मुद्रिका अर्पण केली. वेदधर्म व धर्मपाल लगबगीनें जनधामास चालते झाले. राणी अंबालया वेडावून जाऊन आपल्या भावी जीवित-यात्रेच्या चिंतनांत गर्क होऊन वेदधर्म व धर्मपाल यांच्या परत येण्याची चिंता करीत बसली.

धर्मपालाला चंदनावतीस पाठवून दिल्यानंतर बलभीमानें लोहपाताच्या सहीचें लिखित पत्र तयार केलें, आणि तो मुदतीच्या शेंवटल्या दिवशीं वृषसेनास जाऊन भेटला.

बलभीमाचा गुप्त बेत लक्षांत आणून दूरदर्शी सुदेव बरोबरच्या पांच चार शिपायांसह त्याच्या मागोमाग छपून त्याच्या रक्षणाकरितां गेला.

वृषसेन आपल्या मशियान्यांत बलभीमाची वाट पहात बसला होता. बलभीम येताच योग्यतेनुरूप वृषसेनानें त्याचा आदरसत्कार केला. बलभीमानें जवळचें जयपत्र वृषसेनाच्या हवालीं केलें. पत्र हातांत पडतांच वृषसेनानें बलभीमास रात्रीं हजर होण्यास सांगून त्यास महाल तयार करण्याचें निमित्त सांगून परत लाविलें. बलभीम जातांच वृषसेनानें तें जयपत्र अंबालयेकडे तावडतोब रवाना केलें. एक दोन दिवसांत बलभीमासही कैद करून रवाना करतो असें राणीला कळविलें.

रात्रीं बलभीम येणार म्हणून मशियान्यांत उत्तमप्रकारची रोषणाई केली होती. मशियान्यांत महाल तयार करवून सर्व सिद्धता चोख केली होती. रात्रीच्या सुमारास बलभीम दाखल होतांच वृषसेनानें त्यास महालांत पोंचविलें. अशा प्रसंगीं सुद्धां बलभीम आपली तरवार विसरला नाहीं हें पाहून वृषसेनानें त्याच्या दूरदर्शित्वाची व वीरत्वाची तारीफ केली. सलोख्याच्या व थट्टेच्या दोन बाता करून वृषसेन मशियान्यांतून बाहेर पडला. सुमारें एक घटका बलभीम एकटाच बसल्यानंतर त्या महालांत जया प्राप्त झाली. तिनें अस्मानी शालू परिधान केला असून तसल्याच रंगाची झुळझुळीत कंचुकी परिधान केली होती. तिचें पाऊल आंत पडतांच पैंजणाचा जो मंजुळध्वनी झाला तो ऐकून बलभीमास आपल्या प्रभावाच्या व भाग्याच्या लघुकिंकिणींच स्वर्गांत झणत्कार करीत आहेत असें वाटलें. तिच्या अंगावरील पुष्पांच्या सुवासानें तो भव्य तंबू दरवळून गेला. शुभ्र आस्तरणांनीं युक्त अशा प्रस्ताराजवळ येण्याकरितां जया पावलें टाकूं लागलीं तों आधींच राजभोग अनुकूळ असलेल्या बलभीमास आतां आपल्याला स्वर्गांतील सुखाचा लाभ होणार असें वाटून तो आनंदसागरांत डुंबावयास लागला. जया येऊन मंचकावर बसतांच तो पूर्ण एकांत पाहून बलभीमानें तिच्या हनुवटीस स्पर्श केला. जयेनें त्याचा हात झिडकारिला. जया हातास झिडकारा देण्यांत गुंतली आहे तोंच बलभीमानें घाई करून तिचें मुखचुंबन केलें. चुंबनाबद्दल तिरस्कार दाखवावा अशी जयेच्या

मनांत योजना चालली आहे तोंच बलभीमानें तिला मिठी मारून तिच्या कुचतटास आपल्या पांची बोटांनीं गाढ आलिंगन दिलें. कामरसांतील ब्रह्मसौख्यांत गुंग होण्यापूर्वींच्या सर्व लीला झाल्यानंतर परम पदावर विराजमान होण्याचा समय प्राप्त झाला. यावेळीं मात्र बलभीम पराकाष्ठेचा निराश झाला. तो मनांतल्या मनांत ब्रह्मदेवाला असंख्य शिव्या शाप देऊं लागला. ऐन मुद्याच्या प्रसंगीं फसवणूक झाल्यामुळें त्याच्या माथ्यांत जी तिडीक उत्पन्न झाली त्यामुळें त्याला विलक्षण त्वेष चढला. वृषसेनानें आपल्या जवळून अमोलिक लिखितपत्र उपटून त्याच्या मोबदला आपणाला उपभोगण्यास दिलेली जया अर्धनारी आहेसें समजून येतांच बलभीम वृषसेनावर फूत्कार टाकूं लागला. त्याचवेळेस जाऊन वृषसेनास तोडून टाकावें असें त्याच्या मनांत भरलें. तेवढ्यांतल्या तेवढ्यांत त्यानें खिन्नतेनें जयेकडे निरखून पाहिलें तों वृषसेनाच्या जागा जयाच त्याच्या क्रोधाचा विषय बनली. आपल्याला परम संताप आणणारी अशी अर्धनारी जिवंत राखणें प्रशस्त नाहीं अशा निर्धारानें त्यानें आपली तरवार म्यानांतून उपसली. ती भयंकर कृति पाहतांच जयेनें किंकाळी मारली. तिच्या आरोळीस न जुमानतां सरदारानें तरवार उगारली. तोंच सरासरी वीस सरदार नागव्या तरवारी धारण करून गर्जना करीत बलभीमाभोंवती जमले. आपल्या सभोंवार वीस समशेरींचा गराडा पडलेला पाहून तो शूर सरदार बलभीम डगमगला नाहीं. बंदुकीच्या गोळीबारानें अधिकच खवळून जाणाऱ्या भयंकर व विक्राळ व्याघ्राप्रमाणें बलभीम चवताळला. त्यानें जयेला तशीच टाकून तो स्वतःच्या संरक्षणार्थ चारी दिशेनें अलातचक्राप्रमाणें आपली समशेर पराजीत राहिला. वीस तरवारींशीं झगडा करतां करतां अखेर दमून सरदार बलभीम हतवीर्य होऊन आपणास वेढा देणाऱ्यांच्या स्वाधीन होणार त्याचक्षणीं दोन दिव्य पुरुष धाडकन् तंबूत शिरले. त्यांच्यांतील एकजण पुढें होऊन सर्वांना दरडावून अधिकारयुक्त वाणीनें मोठ्या स्वरानें ह्मणाला " शूर सरदारहो ! ज्या अंबालयेच्या हुकमानें तुह्मीं आपलीं हत्यारें उपसलीं आहेत त्याच अंबालयेच्या नांवानें मी तुह्मांस अनुज्ञा करतों कीं, तुह्मीं सर्वजण आपापलीं शस्त्रें म्यानांत घालून तंबूच्या

बाहेर चालते व्हा. हा हुकूम मान्य करविण्याचें सामर्थ्य या मुद्रिकेंत आहे कीं नाहीं तें तुमचें तुम्हीं पाहून घ्या ! ! ”

मुद्रिका पाहतांच तिच्या प्रभावानें त्या सर्व सरदारांनीं हत्यारें खालीं ठेविलीं आणि ते तंबूतून चालते झाले.

ही मुद्रिका बरोबर आणून सरदारांवर हुकमत गाजविणारे दोघे इसम धर्मपाल व वेदधर्मच होते हें फोडून सांगण्याची अवश्यकता दिसत नाहीं. सरदार लोकांनीं तंबू खालीं केल्यावर बलभीमानें आपल्या रक्षणकर्त्याकडे पाहिलें. आपलें संकट जाणून आपल्या मदतीस ऐन समयाला धांवून आलेला महात्मा धर्मपाल आहेसें पाहतांच बलभीमास लज्जा व प्रेम यांचा गहिंवर आला. त्यानें कांहींएक विचार न करितां धर्मपालास कडकडून मिठी मारिली. त्या ठिकाणीं मुळींच भाषण न करितां वेदधर्म त्या दोघांना तेथून घेऊन बाहेर गेला. वाट चालण्याच्या प्रसंगीं बलभीम मिठी सोडून धर्मपालाला कांहीं विचारण्याच्या झोकांत होता. तोंडावाटें कांहीं ओठांतल्या ओठांत तो पुटपुटे; स्पष्ट अक्षरांचा उच्चार करण्याचा त्यानें प्रयत्न केला कीं, त्याला आंतून हुंदका येऊन त्याचें तें पुटपुटणेंही ओठांतल्या ओठांतच नाहींसें होई. ही त्याची सद्गद अवस्था पाहून धर्मपाल व वेदधर्म हे त्याला संभाळून घरां घेऊन गेले.

बंगल्यावर जातांत तों त्या ठिकाणीं सुदेव नाहीं असें पाहून ते जरा भयभीत झाले. भामिनीस विचारतां तिनें असें सांगितलें कीं, “ बलभीमाच्या मागोमागच सुदेव बाहेर पडले ते अद्याप परत आले नाहींत. ”

मध्यंतरी ही नसतीच चिंता उपस्थित झाल्यानें बलभीमाचें व धर्मपालाचें भाषण होण्याचें बाजूला राहून ते त्रिवर्ग त्याच पावलीं सुदेवाच्या शोधाकरितां बाहेर पडले.

बलभीमाच्या संरक्षणाकरितां कोणीतरी गुप्ततेनें येईल अशा अनुमानानें वृषसेन पाळतीवर होता. पांचचार शिपायांसह सुदेवही सरदाराच्या मागोमाग छपून बाहेर पडला आहे अशी वृषसेनाला चित्तंबातमी होती. बलभीमास तंबूंत नेल्यावर सुदेवाला मध्यंतरीच गांठून पळवून लावण्याची वृषसेनानें तयारी केली होती. वृषसेनाच्या इशाऱ्याप्रमाणें त्याच्या स्वारांनीं सुदेवास गांठलें. त्यांच्यापुढें सुदेवाचें सामर्थ्य लटपटून तो त्यांच्या हातीं

सांपडूं नये ह्मणून पळत सुटला. तो दृष्टिआड झाला तेव्हां वृषसेनाच्या शिपायांनीं त्याचा पाठलाग सोडून ते दबा धरून बसले. वृषसेनाच्या शिपायांच्या भीतीनें सुदेवाबरोबरचे शिपाईही पळ काढून दडून बसले होते. आपल्या मागें लागलेले वृषसेनाचे शिपाई अदृश्य झालेले पाहून सुदेवाचे मदतगार सुदेवाच्या शोधार्थ हिंडूं लागले. पुष्कळ तपास करून, रानावनांतील दडणी शोधूनही सुदेवाचा थांग लागत नाहींसे पाहून ते सर्वजण निरुत्साह—मानस होऊन जनधामाकडे परतले.

सुदेवाला पळता भुई थोडी होऊन तो काट्याकुट्यांतून कपणें तडवीत सैरावैरा पळत असता अगदीं दमून गेला. त्याचा पाठलाग करणारे त्याचा पिच्छा सोडून गेले होते तरी तो मागें न पाहतां पळतच होता. ह्मातार्‍याची ही धांदल चालली असता त्याला एक मराठा शेतकरी भेटला. शेतकर्‍यानें त्यास धीर देऊन आपल्या कोपींत नेलें. याच कोपींत सौमिनी व धर्मपालाचे मुलगे यांनीं मुक्काम केला होता. जांबवान व नाना यांच्या परत येण्याची वाट पाहून कंटाळून ते सर्वजण कांहीं दिवसांनीं देदिकोठाकडे परत चालले होते. सदर शेतकर्‍याची व त्यांची मुलाखत होऊन स्नेह जमल्यामुळें व त्यांनाही उतरण्यास जागेची जरूर असल्यानें ते कांहीं काळ या खोपट्यांत येऊन उतरले होते.

रात्रीं खाणें पिणें आटपल्यावर शेतकर्‍यासह सौमिनी, धर्मपालाचे चिरंजीव व सुदेव हे गप्पा मारीत बसले. सुदेवाच्या पळत येण्यावरून बोलणें निघतां निघतां सौमिनीचें चरित्र सुरू झालें. तिच्या बरोबरच्या मुलांच्या बापाचें नांव धर्मपाल आहे असें ऐकतांच सुदेवानें त्यांना धर्मपालाची हकीगत सांगितली. भामिनीचा इतिहास सुरू होतांच सौमिनीनें भामिनी ही धर्मपालाची सख्खी आई नसून दत्तक आई आहे असें सांगितलें. ओघाओघानें धर्मपालाचें प्रथमपासून चरित्र व कुळकथा निघाली. त्यांत सुदेवास धर्मपाल पारावर सांपडलेला मुलगा असून त्याच्या गळ्यांतील ताइतांतील चिठ्ठीचा मजकूर समजला. सुदेवाला तो सर्वच इतिहास चमत्कारीक वाटला. सुदेवाच्या तोंडून धर्मपालाचा वृत्तांत समजतांच सौमिनी व तिचे सर्व पौत्र यांनीं जनधामाकडे येण्याचा निश्चय सांगितला. उद्याच्या उद्यांच निघावयाचें असें ठरवून ते पहाटेची डुकला घेण्याची

तयारी करतात तों त्या ठिकाणीं दहा वीस शिपायांसह एक गृहस्थ प्राप्त झाला. आपल्यालाच पुन्हां धरणें आलें असें वाटून सुदेव घाबऱ्या घाबऱ्या पहूं लागला. धरणेवाल्या शिपायांनीं कोटींत प्रवेश करतांच ते पहिले लोक नसून दुसरेच लोक आहेत हें पाहून सुदेवाची भीति कांहींशी कमी झाली.

यावेळीं तेथें प्राप्त झालेले लोक विकंठाचे सेवक होते. त्यांचा पुढारी माणिकबोवा हा होता. सुनीतीला जादूनें उडविल्यानंतर धर्मपालाच्या कुटुंबाचा हवाल काय आहे, तो पुढें काय विचारांत आहे हें पाहण्याकरितां व आपल्या स्वतःच्या मुलामाणसांचा समाचार घेण्याकरितां आणि भोगावतीस विकंठाच्या क्रीडास्थानाप्रत भारतीकडे नेण्याकरितां माणिकबोवा विकंठाचे दूत बरोबर घेऊन देदिकोठास आला होता. भोगावती देदिकोठाहून अशीच कोठें भटकली आहे अशी बातमी लागून तिच्या सुगाव्याच्या धोरणानें माणिकबोवा फिरतां फिरतां या खोपटांत प्राप्त झाला. सौमिनीनें माणिकबोवास ओळखलें. आपल्यावरच्या प्रसंगामुळें जेरीस आलेल्या त्या सौमिनीनें माणिकबोवाजवळ भोळयाभावानें धर्मपाळ व सुनीति यांच्याबद्दल रडकथा गाऊन दाखविली. सुदेवाकडून धर्मपालाचें वास्तव्य कळल्यावरून आह्मी आतां तिकडेच पुन्हां जाणार असें सांगून तिनें माणिकबोवास सुदेवाची माहिती करून दिली. माणिकबोवानें आजपर्यंत सुदेवास प्रत्यक्ष पाहिलें नव्हतें तरी त्याची त्याला ऐकून चांगली माहिती होती. इतकेंच नव्हे तर भारती व विकंठ यांचा शत्रु जो लोहपात याच्या प्रधानमंडळांतील मुख्य मुत्सद्दी सुदेव हा आपल्या टोळक्याचा घातक दुस्मान आहे अशा नात्यानें माणिकबोवाला सुदेव हा रात्रंदिवस पीडा देत होता हें स्पष्टच आहे. सौमिनीकडून सुदेवाचें वर्तमान समजतांच बोवानें आपलें भयंकर रूप व्यक्त केलें. तो सौमिनीस मागील सर्व ओळख देऊन व धर्मपालाची व त्याच्या पुत्रांची बहुत नालस्ती करून त्यांना व सुदेवास गर्वानें ह्मणाला "आतां सुनीतिबद्दल खुशाल शंख करीत बसा. धर्मपालाचे प्रपितामह उतरून आले तरी विकंठाच्या ताब्यांतून सुनीतीची नीटपणें मुक्तता होणें अशक्य आहे. धर्मपाळाची व तुझ्या सर्वांची दशा उडवून तुह्मांला दारोदारी हिंडा-

वयास लावण्याचा काळ जवळच आला आहे. सुदेव महाराज; लोहपाताच्या पदरीं राहून तुह्मी त्यास भारती, माणिकबोवा यांचा निःपात करण्याची फसालत दिली आहे. तुमच्या राजाकडून आमचा नाश होण्यापूर्वी तुह्माला तर आधीं आतांच्या आतां विकंठाच्या क्रीडास्थानांतील अंधार कोठडीचा उपभोग घेण्यास आह्मीच नेतो. अंबालया व बलभीम यांचीही थोडक्यांत तीच वाट लागणार आहे. "

अशी गर्वोक्ती करून माणिकबोवानें सुदेवास पकडलें. त्याला प्रतिकार करण्याकरितां धर्मपालाच्या पुत्रांनीं व खोपटाच्या शेतकऱ्यानें बरीच आडकाठी केली; पण सशस्त्र शिपायांपुढें त्यांना हार खावी लागून माणिकबोवा सुदेवास कैद करून घेऊन आपल्या मार्गी निघून गेलेला निमुटपणें पहावा लागला.

सुदेवाशीं वियोग झाला तरी धर्मपालाकडे जाण्याचा सौमिनीचा निश्चय अधिकच दृढ झाला. त्यांना त्याचें मकाण कळलें होतें. भामिनीही धर्मपालासमवेत आहे हेंही त्यांना ठाऊक झालें होतें. माणिकबोवाच्या घमेंडीच्या बोलण्यामुळें त्यांना सुनीति कोठें असावी याचा कल्पना आली होती. या सर्व गोष्टी मनांत वागवून सौमिनी सर्व पौत्रांसह पुन्हां जनधामाकडे निघून गेली.

---

## प्रकरण ३८ वें.

सुदेवाचा तपास करीत हिंडतां हिंडतां धर्मपाल, वेदधर्म व बलभीम हे अगदीं कंटाळून गेले. अरण्यामध्यें एका ओहोळाच्या कांठीं स्नानादि कर्मे सारून बलभीम आपला पश्चात्ताप व्यक्त करून दाखवीत होता. धर्मपालानें अकस्मात प्राप्त होऊन आपणाला साहाय्य कसें केलें व त्या मुद्रिकेच्या प्रभावानें वृषसेनाच्या सरदारांनीं शस्त्रें कां फेंकून दिलीं याबद्दल बलभीमाचें समाधान करण्याकरितां धर्मपाल बोलला " या सद्गुरु वेदधर्माचा हा प्रभाव आहे. ही प्रत्यक्ष अजितमूर्ति असून भक्तानुग्रहाकरतांच या विभूतीचा भूलोकीं संचार आहे. यांच्या कृपेमुळें आह्मांला अंबालयेसारख्या राणीचें

प्राप्ति देखील तुच्छ वाटतें. सर्व सौख्याचा गड्डा यांच्या चरणाच्या सहवासांत वास्तव्य करतो असें स्वानुभव सांगत आहे. ”

असें बोलून धर्मपालानें अंबालयेच्या दरबारांत घडलेला सर्व प्रकार बलभीमास निवेदन केला. धर्मपालाचें वृत्त श्रवण करितांच बलभीमास सुदेवाच्या भाषणाची आठवण झाली. वेदधर्माच्या पायांवर लोटांगण घालून बलभीम ह्मणाला “ लोहपाताची सरदारी भोगण्यास बलभीम जर योग्य आहे तर धर्मपालास लोहपाताच्या सिंहासनावर स्थापिलें; अंबालयेला जिंकून तिच्या गादीचा धर्मपालास मालक केलें; विकंठास निरयपुरीं पाठवून त्याचा किरीट धर्मपालाच्या मस्तकावर चढविला तरी देखील सात्विकवृत्तितत्पर या धर्मपालाचा योग्य सन्मान झालासें ह्मणता येणार नाहीं. एकंदरींत जयेसारख्या सौंदर्यसंपन्न स्त्रियांच्या मोहानें या बलभीमाची माती झाली. भारती व कुंदिनी यांच्या प्रकरणावरून स्त्रीजातीवर रोष करतां करतां अखेर मी स्त्रीपाशानें बद्ध होऊनच बिनमोल झालों. मला काय भूल पडली पहा; मी सुदेवाशीं बेपर्वा झालों; त्या धुंदीनें मला धर्मपालाचा सहवास जाचक झाला. मी लोहपाताशीं कपट करून त्याच्या सहीचें अजिंक्यपत्रही अंबालयेला देऊन टाकलें. या सर्व अनाचारास एक स्त्रीमोह कारण. मला या पापापासून मुक्तता मिळणें दुरापास्त दिसते. ”

बलभीमाचें अनुतापयुक्त बोलणें थांबविण्याकरितां वेदधर्म मध्येंच बोलला “ आणि तो स्त्रीमोह तरी एका अर्धनारी सुंदरीचा होता हें केवढें आश्चर्य ! असो; याचा उलगडा कालेकरून होईल. पातकाची निष्कृति करण्याकरितां तशीच जबर पुण्याई जोडण्यांत जीवितावरही पाणी सोडलें तर दुरिताचें पर्वतही उलथून पडतील. तात्पर्य, महत्पुण्याईनें पातकाची शुद्धि होणें दुरापास्त नाहीं. मनाची हुरहुर, पश्चात्ताप व सत्वगुणनिष्ठा कायम पाहिजे. ”

वेदधर्माच्या एवढ्या चार वाक्यांनींच बलभीम सावध झाला. सुदेवाची भेट होण्याबद्दल त्याला आतुरता उत्पन्न झाली. वेदधर्माच्या उपदेशाप्रमाणें आपल्या हातून शुद्ध व परोपकारी क्रिया घडून पापक्षालन होण्याचा प्रसंग प्राप्त होण्याबद्दलही त्याला फार उत्कंठा लागली. तें

ठिकाण सोडून ते तिथे पुढें चालले तों त्यांना वाटेनें एक सुंदर स्त्री भेटली. ती स्त्री बावरलेली दिसत होती. त्या स्त्रीनें आपण होऊन बलभीमाचा आश्रय मागितला. ती स्त्री दिसण्यांत सुंदर असून तिच्या चेहऱ्यावर मदनविलास खेळत होतासें दिसे. तिच्या म्हणण्यास रुकार द्यावा किंवा काय करावें या विचारांत बलभीम पडला आहे तों तो सरदार आपल्याला वश व्हावा या हेतूनें तिनें बलभीमास नेत्र फेंकला. स्त्रीमोहाच्या पाशानें ती सुंदरी आपणास भुलवूं पहात आहेसें ध्यानांत येतांच बलभीमानें एकदम आपली तरवार उपसली व त्या स्त्रीचें गर्दन छाटून टाकलें. हें खुनी धाडस पाहतांच धर्मपालानें त्यास ओढून बाजूस आणलें; पण उपयोग काय ? ती अबला मृत होऊन पडली होती. त्या अमानुष कृतीबद्दल वेदधर्म बलभीमास दूषण देऊं लागला. तेव्हां बलभीमानें रागानें सांगितलें " स्त्रीजातीच्या कपटाचरणानेंच संपदा मातोश्रीस अत्यंत जाच केला आहे. कालेंकरून मला स्त्रीवैषम्याची विस्मृति पडली होती. जयेच्या कपटानें मी जागा झालों आहे. स्त्रीजात—त्यांतल्यात्यांत, कपटी, साहसी, बदकर्मी व उणग्या स्त्रिया–नष्ट करण्याचा माझा पुन्हां संकल्प झाला आहे. ही स्त्री तशा वावग्या चालीची आहे असें माझ्या ध्यानांत येतांच मीं तिला छाटून टाकली यांत वाउगें काय झालें ? "

यावर धर्मपालानें सांगितलें " या एका स्त्रीची गोष्ट असो. ही त्याच किंमतीची होती. हिचें नांव भोगावती असें आहे. तिच्या एकंदर कौटिल्यपूर्ण आचारास तिला असेंच प्रायश्चित्त पाहिजे होतें. " इतकें बोलून धर्मपालानें त्या दोघांना भोगावतीची सर्व मूळ पीठिका सांगितली. ती ऐकून घेतल्यावर वेदधर्मानें प्रतिपादन केलें कीं, " तरी पण बलभीमास कोणातरी स्त्रीशीं विवाह हा केलाच पाहिजे. अनृत, साहसादि दुर्गुणांनीं स्त्रीजात दोषास्पद असली तरी तो त्यांचा सामान्य धर्म आहे. सर्वच स्त्रिया तशा नसतात. पतिव्रता धर्म, सदाचार, लज्जा, विनय, मृदुत्व, पावित्र्य, दया, परोपकार इत्यादि गुणांनीं पुरुषांनाही तोंड लपविण्यास लावतील अशा प्रकारच्या स्त्रिया नसतात व नाहींत असें मात्र नाहीं. व्यक्तीच्या अपराधाचा दंड सर्व

जातीला भोगावयास लावणें हें रास्त नव्हे. स्त्रीच्या सामान्य वर्णनानुसार ती जशी मोक्षमार्गांत आडकाठी करणारी ठरेल त्याप्रमाणें ती मोक्षाचा रस्ता सुलभ करण्यासही साधनीभूत होणारी आहे असें सिद्ध झालें आहे. बलभीमा, तुला दारपरिग्रह केलाच पाहिजे. स्त्रीच्या सहवासानें इंद्रिय-तृप्ति न होईल तर तुझ्या आत्मकल्याणांत व्यत्यय येईल. स्त्रियांवर अविचारानें शस्त्र चालविणें हा क्षत्रियाचा धर्म नव्हे. अंबालयेला तुझा पुरुषार्थ दाखवून तिच्याशीं तुझा विवाह होईल तर तुझे हेत सफळ होतील."

वेदधर्माच्या भाषणास धर्मपालानें उत्तर दिलें " अंबालया जरी सर्वस्वी माझ्या हातांत आहे तरी पण ती या सरदारास मिळणें दुर्लभ आहे. तिच्या दरबारांत मी लोहपाताचा वकील या नात्यानें गेलों होतों. बलभीमाचा वकील या नात्यानें मी तेथें गेलों नव्हतों. प्रसंगच पडला तर मी आपल्या अनुज्ञेनें अंबालयेला लोहपाताच्या पदरात टाकीन."

या संवादावर बलभीम कांहींच बोलला नाहीं. धर्मपालाच्या न्याय्य व मुद्देसूद भाषणानें त्याला उलट संतोषच झाला. वेदधर्माच्या सूचनेवरून त्याच्या मनांतील सरास स्त्रीद्वेष दूर झाला. अंबालयेच्या दर्शनाची उत्सुकताही त्याला जांच करूं लागली; पण सुदेवप्राप्ति हेंच सांप्रतचें इतिकर्तव्य समजून तो वेदधर्मास त्यासंबंधीं कांहीं प्रश्न विचारणार तों समोरून सौमिनी व धर्मपालाचे पुत्र त्या स्थळीं येऊन पोहोंचले.

आपल्या घरच्या मंडळीस पाहतांच धर्मपालानें त्यांना गाढ आलिंगन दिलें. त्यानें सौमिनीस नमस्कार घातला. वेदधर्म व बलभीम यास त्याची माहिती करून दिली. इतक्यांत सौमिनी डोळ्यांत अश्रू आणून गहिंवरयुक्त वाणीनें सुनीतिबद्दलची हवाल सांगूं लागली. सुनीति नाहींशी झाल्याचें वृत्त सविस्तर कथून तिनें त्यास जांबवान्, व नाना, सुलोचना व नलिनी यांची हकीगत सांगितली. सुनीती ही धर्मपालाची पत्नी असून तिचें अकस्मात् गुप्त हरण झालें आहे या बातमीनें बलभीम तुरतच विषण्णमानस झाला. त्यानंतर सौमिनीनें सुदेव व माणिकबोवा यांचा वृत्तांत सांगून त्यांच्याशीं संगत असलेला विकंठ व क्रीडास्थान यांचा नामनिर्देश केला. तेव्हां बलभीम संतप्त झाला. सुदेवाला व सुनीतीला पळवून नेणाऱ्या भार्गवी, माणिकबोवा यांना आश्रय देणाऱ्या विकंठाला

तात्काल फाडून खाण्यास बलभीम तयार झाला. तो आवेशानें कापूं लागला. त्याच्या अंगांत वीरश्री संचारून तो सुस्कारे टाकूं लागला. अंतःकरणांत सद्गुणाची प्रेरणा होऊन तो रोमांचित् होऊन वेदधर्म व धर्मपाल यांना ह्मणाला "विकंठाच्या क्रीडास्थानांत प्रवेश करून, भारती, माणिकबाबा यांच्या माना चराचर चिरून, विकंठाचें वक्षस्थळाच्या चिंधड्या करून जर या बलभीमानें सुदेव व सुनीति यांची मुक्तता केली व संपदा मातोश्रीचें समाधान होईल अशी चाकरी बजावली तर माझें पाप निरसन होऊन माझी शुद्धता अढळ होईल काय ?"

बलभीमाच्या भाषणास वेदधर्मानें सांगितलें "तुझ्या ह्मणण्याप्रमाणें होण्यास हरकत नाहीं. पण या कामाला घाई कामाची नाहीं. आपण येथून जनधामास चला. तेथील सर्व शिपाइ बरोबर घ्या. आणखी कांहीं मदत मिळण्यासारखी असल्यास मिळवा. अशा पूर्ण सावधगिरीनें क्रीडास्थानावर चाल करा असा माझा सल्ला आहे."

वेदधर्माच्या मसलतीवर आपणास कांहीं बोलावयाचें नाहीं असें सांगून ते सर्वजण जनधामाकडे गेले.

---

# प्रकरण ३९ वें.

जनधामास दाखल होतांच त्यांना त्या ठिकाणीं अति दुःखदायक वार्ता कळविण्याकरतां चंदनावतीहून दहा वीस शिलेदारांसह वृषसेन आधींच तेथें येऊन धर्मपालाची वाट पाहत होता. वृषसेनानें धर्मपालास सांगितलें कीं "राणी अंबालया ऋतुमती असतांना एके दिवशीं निजल्या ठिकाणाहून अकस्मात गुप्त झाली आहे. चोहोंकडे स्वार पाठवून शोध केला; पण कांहींच पत्ता नाहीं. सर्व सरदारांचीं तोंडें उतरून गेलीं आहेत. राणीनें आपण होऊन अज्ञातवास केला आहे किंवा कोणी सामर्थ्यसंपन्न दुष्टांनीं राणीचें हरण केलें आहे हें कांहींच समजत नाहीं." वृषसेनाचें भाषण ऐकतांच वेदधर्मानें सांगितलें "याबद्दल चिंता करण्याचें कारण नाहीं. राणीचा अभिलाष करणारा राजा विकंठ

ह्याच तिचा हरणकर्ता असला पाहिजे. आयताच उत्तम समय प्राप्त झाला आहे. तुह्मी सर्व सेना सिद्ध करून सरदार बलभीमाच्या हाताखालीं द्या. सरदार बलभीम पुरुषार्थ करून विकंठावर चाल करून अंबालयेस सोडवून आणील. ”

वेदधर्माच्या अप्रत्यक्ष आज्ञेस शिरसा वंद्य मानून बलभीम बोलला “ हा एक दैवयोगच आहे म्हणावयाचा. माझ्या हातून राणीचें बंधविमोचन झालें तर तिला माझी वीर्यसंपन्नता तरी आयतीच बघावयास सांपडेल. सरदार वृषसेन; तुह्मी तयारी करा; फारसें लष्कर बरोबर नको. पराक्रमी, शूर, विश्वासू व धीरोदत्त असे पांचपन्नास वीर बरोबर असूंद्या. माझ्या अंगांत जें स्फुरण चढलें आहे, माझ्या अंतःकरणांत जो सात्विक त्वेष भरला आहे; वेदधर्माच्या कृपादृष्टीनें माझ्या मनाला जें सामर्थ्य भासमान होऊं लागलें आहे त्याच्या योगानें मी एकटा शतशः विकंठ, सहस्रावधी भारती, लाखो माणिकबोवा यांचा निःपात करून सुदेव, सुनीति व अंबालया यांना सोडवून आणून मी आपल्या पापाचें क्षालन करून वेदधर्म व धर्मपाल यांचें शिष्यत्व करण्याची मी आपल्या अंगांत पात्रता आणीन. ”

बलभीमाच्या मसलतीप्रमाणें वृषसेन तयारीस लागला. वृषसेन चंद्रनावतीहून शूर वीरांसह परत आला ह्मणजे बलभीमानें विकंठाच्या क्रीडास्थानावर निघावयाचे असा मनसुबा कायम ठरला.

माणिकबोवा सुदेवास कैद करून घेऊन गेल्यानंतर भारती व विकंठ यांनीं आपल्या मंत्रसामर्थ्यानें अंबालयेस खेंचून आपल्या क्रीडास्थानांत आणलें. अंबालया प्राप्त होईपर्यंत विकंठानें व भारतीनें सुदेवाचे हाल चालविले होते. सुदेवावर विकंठाचा मोठासा रोष नव्हता; खेरीज तो पुरुष असल्यामुळें विकंठाला त्याला कारागृहांत ठेवण्याची सुद्धा मोठीशी जरूर नव्हती. लोहपाताच्या दोषास आपण पात्र होण्याला मात्र सुदेवच कारण आहे असें समजून भारती सुदेवाचा छळ करीत होता. अंबालया क्रीडास्थानांत येतांच सर्वांचें लक्ष तिच्याकडे वेधल्यानें सुदेवाचा जाच कमी झाला. तेथल्यातेथें स्वैर संचार करण्याची त्याला मुभा झाली.

सुदेवाची सुनीतीशीं व नलिनीशीं गांठ पडतांच नलिनीला आपला पिता पाहून हर्षाचा गहिंवर दाटला. बापाचें व कन्येचें प्रेमाचें भाषण होऊन दोघांच्याही मनांत वात्सल्य उत्पन्न झालें. नलिनीनें आपली कहाणी सांगून सुदेवाची क्षमा मागितली. आपली पोरगी शेवटीं फसल्यानंतर तरी जागी होऊन सद्वर्तनी झाली याबद्दल सुदेवास ज्ञातारषणीं आनंद झाला. पण तो फारच थोडावेळ टिकला. त्याच बंदिवासांत महान पतिव्रता सुशिला अपरिमित व अनिर्वाच्य यातना सोशीत आहे असें समजतांच त्या वृद्ध सुदेवाला दुःखाच्या समुद्रांत पडल्यासारखें वाटलें. सुशिलेनें घर सोडल्यापासूनची सर्व हकीगत नलिनीच्या तोंडांतून बाहेर पडत असतांना त्या जरठ सुदेवाच्या नेत्रांवाट पाण्याच्या धारा वहात होत्या. आपण पति जिवंत असतां पति व पातिव्रत्य यांच्या प्रेमानें मरणप्राय नर्कयातना सोशीत पडलेल्या सुशिलेची मुक्तता करण्यास आपण असमर्थ आहों असें पाहून सुदेवाच्या अंतःकरणाचा धर सुटला. त्याची विचारशक्ति स्तब्ध झाली. सरदार बलभीमास ही बातमी कळेल तर तो आपल्या प्राणाची किंमत देऊनही आपल्या कुटुंबाची मुक्तता करील असें त्यास वाटलें पण तसें होणें अशक्य जाणून सुदेवास निराशेनें पुन्हा ग्रासून टाकलें. तशा विपन्न स्थितींत तरी आपली व सुशिलेची गांठ पडावी अशी त्याला फारच उत्कंठा व तळमळ लागली; पण सर्व व्यर्थ. स्वतःच्या कर्माला हात लावण्यावांचून व आपल्या आतांपर्यंतच्या सद्वर्तनाच्या विश्वासावर हवाला देऊन समाधान मानून घेण्यावांचून त्याला कांहीं करण्याची सोयच राहिली नव्हती.

अंबालया आतां आपल्या कैदेंत आहे; आपलें निवारण करण्यास कोणीही समर्थ नाहीं; आपण आपल्या स्वतःच्या दरींत आहों अशा गर्वमदानें विकंठानें जेव्हां अंबालयेच्या सामनें येऊन तिला आलिंगन देण्याचा यत्न केला तेव्हां ती कोपायमान झालेली वीर्यशाली राणी खडकावून बोलली " या भारतीसारख्या राक्षसी मनुष्याच्या सहाय्यानें तूं मला आपल्या कबजांत आणलें आहेस तरी देखील मी तुला तृणासमान लेखतें. तुझ्याला मला येथें आणतां आलें; पण या ठिकाणीं माझी समशेर जो आतां प्रळय करील तो थांबविण्याचें तुमच्या अंगांत

अवसान आहे काय ? मी नाहींशी झाल्यें आहे याचें ज्ञान होतांच माझ्या पदरचे हजारों सेवक माझा तपास करीत येथें येतील. त्या सर्वांनाहीं तूं अजिंक्य झालास असें धरून चाललें तरी सरदार वृषसेन, सरदार बलभीम व ज्याला मी आपलें सर्वस्व अर्पण केलें आहे तो महात्मा धर्मपाल व त्याचा गुरू वेदधर्म हे सर्व येथं प्राप्त होऊन तुझ्यां सर्वांची रक्षा करतील यांत चूक पडणार नाहीं. माझ्या आलिंगनाची तूं इच्छा करीत आहेस. प्रथम या माझ्या तरवारीस गाढ आलिंगन दे. त्यांतून तूं बचावलास तर मग पुढें काय तो विचार करूं."

असें बोलून अंबालयेनें समशेर उपसली. तिच्या समशेरीस समशेर न भिडवितां नुसता म्यानाच्या मुठीवर हात ठेवून विकंठ बोलला "अंबालये ! तूं युद्ध चातुर्यांत कुशल दिसतेस खरी. पण तुझें हें असलें तरवारी उपसण्याचें युद्ध नव्हे. तूं या विकंठाबरोबर सुरतयुद्ध करण्यास योग्य आहेस. तुझा आजपर्यंतचा तारुण्याचा बहर तूं फुकट घालविला आहेस. आतां तरी तूं आपल्या यौवनाचा व सौंदर्याचा उपयोग कर. तूं कांहीं निर्जन वनांतील कुसुम नाहींस. झाडावरच्या झाडावरच सुकून गळून पडणाऱ्या पुष्पाप्रमाणें तुझी गति होण्याकरितां तुला परमेश्वरानें खास उत्पन्न केलें नसलें पाहिजे."

विकंठाचें श्रृंगारिक बोलणें जमेस न धरून अंबालया ह्मणाली "कामकौतुकाच्या श्रृंगारोक्तीनें ही अंबालया भुलणारी नव्हे. पुरुषांप्रमाणें ही अंबालया स्वरूपावर भाळणारी नव्हे. अलंकारिक कल्पनेनें ही अंबालया वळणारी नव्हे. अंबालया पुरुषाच्या अस्सल गुणाला वश होणारी आहे. अंबालयेचा तसा पणच होता आणि धर्मपालानें तो पण जिंकला ! तुझ्या अंगांत पौरुषत्वास अवश्य अशी वीर्यसंपन्नता खास नाहीं ही गोष्ट तुझें हें क्रीडास्थानच स्पष्टपणें सांगत आहे. तुझ्या ठिकाणीं नुसता तमोगुणी पराक्रम जरी वास्तव्य करीत असेल तरी तूं समशेर सज्ज करून संग्राम कर. मी अबला आहें. मी आतां या ठिकाणीं एकटी आहें. तरी मी तुला युद्धांत फजीत करीन. या अंबालयेनें लोहपातास जिंकून त्याच्याकडून द्वंद्वसंग्रामाबद्दल जयपत्र मिळविलें आहे मग तुझी काय कथा आहे." असें सांगून तिनें विकंठास बलभीमाचें लिखितपत्र दाखविलें. विकंठानें तें

पत्राक्षर ओळखलें. लोहपाताच्या सही शिक्क्याचें तें पत्र पाहतांच विकंठ किंचित् चरकला. जिनें लोहपाताला जर्जर केलें त्या अंबालयेशीं सामना करण्यास तो कचरूं लागला. त्याला कोणीकडून तरी अंबालयेशीं भोगसौख्य पाहिजे होतें. अंबालयेचा कैवार घेऊन तिच्या शोधार्थ धावून येणारांच्या भरंवशावरच अंबालयेची बरीचशी वल्गना असावी असें कल्पून तो तिला ह्मणाला " लोहपात तुला बलाढ्य वाटला असेल. हा विकंठ त्यालाही क्षुद्रच समजत आहे. मी तुझ्याशीं दोन हात करण्यास समर्थ आहे. परंतु, तुला युद्धांत जिंकल्यानें मला प्राप्ति काय होणार ? मला तुझें सुरतसौख्य पाहिजे आहे. तुला सोडविण्याकरितां जीं माणसें येण्याची शक्यता वाटते. त्या धर्मपाल, बलभीमादिकांना मीच येथें पकडून आणवितों. नंतर तुझा समाचार पाहीन. तों पावेतों एखाद्या क्षुद्र कैद्याप्रमाणें तुला बंदिवान ह्मणून राहणें प्राप्त आहे. तूं पूर्ण विचार करून आपल्या मनाचा संकल्प ठरीव. "

इतकें सांगून विकंठ भारतीस घेऊन चालता झाला. विकंठ व भारतीं माणिकबोवासह भुयारांत शिरले. धर्मपालावर प्रयोग करून त्याला क्रीडास्थानांत बांधून आणण्याकरितां भारतीनें माणिकाकरवीं अंजनविधी सुरू केला. पण चमत्कार असा झाला कीं, तो प्रयोग धर्मपालावर लागूं होईना. त्यांच्या प्रयोगाच्या सामर्थ्यास निःसत्व करून टाकणाऱ्या सामर्थ्यानें संपन्न अशा वेदधर्माच्या संन्निध वास्तव्य करणाऱ्या धर्मपालावर तो प्रयोग चालू होईना. कांहीं चुकत असेल अशा भावनेनें त्यांनीं पुन्हा पुन्हा प्रयोग करून पाहिला. माणिकबोवास अंजनामुळें धर्मपालाचें वसतिस्थान दिसे; धर्मपाल दिसे; पण इच्छित कार्य होईना. आपला मंत्र सामर्थ्यरहित झाला आहेसें पाहून भारती, बोवा व विकंठ हे सर्वजण घाबरून गेले. त्यांनीं पुन्हा विकंठास अंजन लावून आपल्या दैवतास पाचारण करून प्रयोगहानीचें कारण विचारलें; तों विकंठाच्या पुढें कोणी भयंकर दैवत दिसावयास लागून त्यानें विकंठास असें समजावून दिलें कीं " कोणी वेदधर्म या नांवाचा सत्वगुणैकनिष्ठ, महान् भगवद्भक्त धर्मपालाजवळ अज्ञात वास करीत आहे. तो ब्रह्मज्ञानी असून त्यानें भक्तियोग साधलेला आहे. त्या महात्म्याच्या

सामर्थ्यापुढें कोणत्याही सिद्धीचें, कोणत्याही मंत्रतंत्राचें, जादु टोण्याचें, जपातपाचें, व साधन संभाराचें कांहींएक चालावयाचें नाहीं. त्याच्या पुढें सर्व सिद्धींनीं, दैवतांनीं, योग्यांनीं, तपींनीं प्रणिपातच घातला पाहिजे."

दैवतानें समजावून दिलेला हा अर्थ ध्यानांत येतांच भारती व विकंठ यांची पांचावर धारण बसली. हा वेदधर्म नांवाचा महान् भगवद्भक्त धर्मपाल व बलभीम यांना अनुकूळ असेल तर आपल्या गच्छंतीची वेळ जवळच आली असें भावून ते तिघे घाबरून लटलट कांपूं लागले. आपल्या पापाचा घडा भरला असें त्यांना वाटलें. आतां पुढें काय करावें याचा विचार करण्याकरितां ते त्या भुयारांत आपल्या इच्छेनेंच स्वतःला कोंडून घेऊन बसले.

ते दुष्ट काय विचार करणार ? ते नष्ट, पापी कसली मसलत ठरविणार ? अभिचारमंत्र साधनांच्या योगानें दैवतें ताब्यांत आणून त्यांच्याकडून अनाचार करविण्यानें ज्यांनीं सत्वगुणी परमेश्वरास शिणविलें त्यांच्या अकर्मांचा गौरव कोठवर होणार ? क्षुद्र सिद्धींच्या जोरावर ज्यांनीं सुशीला, सुलोचना, सुनीती यांच्यासारख्या जगद्वंद्य पतिव्रतांचा छल केला, सुदेवासारख्या साधुपुरुषास यातना दिल्या; परमेश्वराचें प्रीतिपात्र बनलेल्या वेदधर्माच्या पट्ट शिष्यास जिनें आपलें सर्वस्व अर्पण केलें अशा अंबालयेस अचानक उचलून आणून ज्यांनीं तिला तापत्रयांत टाकलें व धर्मपालाच्या मातोश्रीच्या सांभाळकर्त्या व धर्मपालाच्या पत्नीप्रीत्यर्थ शस्त्र उपसणाऱ्या बलभीमास पेंचात आणण्याची ज्यांनीं खटपट चालविली, निव्वळ पोटाच्या आगीसाठीं व असुरी मनाच्या समाधानाकरितां ज्यांनीं परकांता, परधन, परलौकिक यांचा अपहार करून स्वतःला भारभूत करून घेतलें त्यांचें ओझें धरणीदेवी कोठवर सहन करणार ? त्यांच्या सद्दीचा जार कोठपर्यंत टिकाव धरणार ? त्यांनीं कसलाही विचार चालविला, आपल्या मातंगकर्मांनीं प्रत्यक्ष कृतांतास आपल्या साहाय्यास आणलें तरी भगवत्पदावर आरूढ झालेल्या, परमात्म्याचें प्रीतिपात्र बनलेल्या, सत्वगुणाचें दास्यत्व स्वीकारलेल्या, परोपकारास प्राणासमान लेखणाऱ्या

वेदधर्माच्या रक्षणाखालीं असलेल्या स्वाभाविक सत्यपर, सात्विक, शुद्ध, पवित्र व सारासार विचारी दीन दासांपुढें अखेर त्या कुटिल मंत्रशास्त्रविशारदांचा पाडावच व्हावयाचा हें निश्चित होय.

---

# प्रकरण ४० वें.

अंबालयेस क्रीडास्थानांत कोंडून ठेवून विकंठ व भारती भुयारांत शिरले; पण एवढ्यानें अंबालया शांत बसणारी नव्हती. नुसत्या पातिव्रत्यास कवटाळून, प्राणाची पर्वा सोडण्यास तयार होऊन, दुष्टांकडून होणारा छळ सहन करण्यांत धैर्य दाखवून, नशिबाला दूषण देण्यांतच धन्यता मानणाऱ्या सुनीति, सुलोचना, सुशिला यांच्याप्रमाणें अंबालया ही शांतताप्रिय नव्हती. तें क्षात्रतेज होतें. वीर्यसंपन्न क्षेत्रवानाच्या वीर्यापासून तिचें जन्म झालें होतें. तिच्या अंगांत क्षत्रियाचें पराक्रमी रक्त खेळत होतें. ती समाधानानें स्वस्थ कशी बसणार ? तिनें आपली उपसलेली तरवार पुन्हा म्यानांत घातली नाहीं. तिनें प्रलय मांडला. क्रीडास्थानाच्या रक्षणार्थ ठेवलेल्या विकंठाच्या भृत्यगणांना ती कंठस्नान घालूं लागली. कित्येक शूर शिपायांचे देह तिनें धारातीर्थांत पवित्र केले. तिला निःशस्त्र करून बांधून ठेवावी ह्मणून तेथल्या पुष्कळ वीरांनीं आपली शर्थ केली; पण त्या सर्वांचीं शिरें अंबालयेनें कंदुकाप्रमाणें आकाशांत उडविलीं. आपल्या शस्त्रसामर्थ्यानें सर्वांचा पाडाव झाला असून आपणच आतां या क्रीडास्थानाचे धनी आहों असें तिला वाटलें. क्रीडास्थानांतील बंदिवानांसह तेथून पलायन करावें या हेतूनें अंबालयेनें तेथील कोठड्यांचीं दारें फोडलीं. अंबालया विजयी झाली असल्यानें सुदेव, नालिनी व सुनीति यांनीं तिचा आश्रय केला. त्यांचें वृत्त ऐकून घेऊन व त्यांचा धर्मपालाशीं असलेला संबंध समजून राणी अंबालयेस ते सर्वजण स्वजनच वाटूं लागले. त्या तिघांनीं राणीला सुलोचना व सुशीला यांची हवाल कळविली. तेव्हां राणी त्या सर्वांस घेऊन सुलोचनेस मुक्त करण्याकरितां

धावली. सुलोचना मोकळी होतांच ते सर्वजण सुशिलेच्या कोठडीशीं गेले. राणीनें कोठडीचें दार फोडून सुशिलेस आपल्या हातांना धरून बाहेर आणलें. सुदेव व नलिनी यांना सुशिलेच्या दर्शनानें मोठा गहिंवर आला. त्यांतल्या त्यांत शक्य त्या रीतीनें सुशिलेस धीर देऊन राणीनें तिला निर्भय होण्यास सांगितलें विकंठाचा पाडाव झाला असून आपल्याला सोडविण्याकरितां आपला भ्रतार सुदेव, कन्या नलिनी व राणी अंबालया हीं प्राप्त झालीं आहेत असें कळतांच सुशिलेचा कंठ दाटून आला. ती फारच क्षीण झालेली होती. तिच्या कुडींत प्राण कायम होता इतकेंच काय तें. तरी पण तिच्याठायीं कांहींएक रोगराई नसल्यानें व फार दिवस अंतरलेल्या आपल्या भ्रताराच्या अचानक प्राप्तीमुळें तिला अवसान आलें. सुशिलेस राणीनें तिचें इत्थंभूत वर्तमान पुशिलें. तेव्हां तिनें आपण घराचा त्याग केल्यापासूनचा सर्व वृत्तांत संक्षेपानें थोडक्यांत सांगितला. ‘ नलिनी व सुदेव यांवांचून आणखी तुमचा वंशविस्तार आहे काय ? ’ असा राणीनें प्रश्न विचारतांच तिनें आपल्या पारावर टाकून दिलेल्या दीड वर्षांच्या पोराची हकीकत सांगितली. ही हकीकत सांगतांना तिच्या डोळ्यांतून अश्रु आपण होऊन स्वभावतःच बाहेर पडूं लागले. दुष्काळच्या उग्रतम स्वरूपामुळें, कन्येच्या छांदिष्ट वर्तनाच्या उदासीनतेमुळें, सुदेवाच्या दुःसह विरहामुळें गांजून जाऊन जिवावर उदार झालेल्या तिच्या हातून दीडवर्षांच्या अर्भकाचा त्याग करण्याचें क्रौर्य घडलें याबद्दल ती सुशीला विलाप करूं लागली. आपल्या अर्भकाची जात न बाटतां त्याचें रक्षण व्हावें या हेतूनें त्याच्या जातीचा उलगडा होईल अशा मजकुराची एक चिठ्ठी एका तायतांत घालून तो ताईत पोर पारावर ठेवतेसमयीं त्याच्या गळ्यांत आपण घातला असल्याचा मजकूर सांगून ती त्या पोराच्या जिवंतपणाबद्दल व भेटीबद्दल आशा व निराशा दाखवून शोकाकुल झाली.

सुशिलेची हकीगत ऐकून व तिची दुःखमय वाणी श्रवण करून सुदेवास धर्मपालाबद्दल निराळेच तर्क येऊं लागले. सुदेव कांहीं विचारांत घुटमळला आहेसें पाहतांच सुनीति एकदम पुढें झाली व राणीच्या लगत उभी राहून बोलली “ आईसाहेब ! हा सुदेव माझा स्वशुर असून

साध्वी सुशीला ही माझी स्वसा आहे. ही नलिनी माझी नणंद असून मी त्याची स्नुषा व भावजय आहे. सासूबाईच्या मुखांतून तायताबद्दलचा जो मजकूर बाहेर आला तो अक्षरशः खरा आहे. ”

सुनीतीच्या भाषणास पुष्टी देऊन ते मान्य झाल्याचा आनंद दर्शविण्याकरितां सुदेव ह्मणाला “ सरदार बळभीमाच्या स्वारींत धर्मपालानें आपली जी हकीगत सांगितली व भामिनीनें धर्मपालाचें जें वर्णन केलें तें माझ्या कानांत सारखें गुणगुणत आहे. मीं गृहाचा त्याग केला ते समयीं माझी प्रिय व महान पवित्र भार्या सुशिला ही गरोदर होती. त्यावेळचा जो पुत्र सुशिलेनें दुष्काळांत पारावर टाकला तोच हा धर्मपाल होय याची सुनीतीच्या सांगण्यावरून आतां शंकाच राहिली नाहीं. ”

सुदेवाचें भाषण श्रवण करितांच अंबालयेस बहुत संतोष झाला. सर्वांच्या हृदयांत धर्मपालाच्या दर्शनाची उत्कंठा प्रादुर्भूत झाली. विकंठानें दुष्ट हेतूनें क्रीडास्थानांत सर्वांना पळवून आणून आपल्यावर उपकारच केले असें त्यांना वाटलें. अंबालयेकरवीं सर्वांचें संरक्षण झालें अशी सर्वांची भावना झाली. अंबालयेनें जसा क्रीडास्थानाचा कबजा घेतला त्याप्रमाणें त्याच्या बाहेर पडून धर्मपाळाशीं भेट करविण्यास ही अंबालया समर्थ आहे असा सर्वांना धीर आला. खुद्द अंबालयेसही ती गोष्ट सहज दिसली. पण प्रत्यक्ष अनुभव घेण्याच्यावेळीं सर्वांच्या कल्पना चुकीच्या ठरल्या.

अंबालया सर्वांना बरोबर घेऊन क्रीडास्थानाच्या कोटाबाहेर पडण्याच्या खटपटीस लागली तों तो कोट बाहेरून विकंठाच्या शिबंदीनें निरोधून टाकला आहे असें तिच्या नजरेस आलें. अंबालयेनें क्रीडास्थानांत प्रलय मांडला आहे अशी वदंता विकंठास भुयारांत समजतांच तो आपल्या साथीदारांसह गुप्त द्वारानें बाहेर पडला. देविकोटच्या सरहद्दीवरील झाडून सैन्य बरोबर घेऊन विकंठानें क्रीडास्थानास वेढा दिला. कोटावर तोफा लागू करून आंतील माणसें जिवंत अगर मेलेलीं कशींही बाहेर काढावीं असा त्यानें आपल्या सेनानीस हुकूम केला. तोफांचा भडिमार होऊं लागला. अंबालया सर्वांसह भयानें व्याप्त झाली. वारूळाच्या छिद्रावर दगड ठेवल्यामुळें आंतल्याआंत कोंडून मर-

णाऱ्या सर्पिणीप्रमाणें ती राणी अंबालया क्रीडास्थानांत आपणा सर्वांचा अंतसमय भावूं लागली. धर्मपालाची भेट न होतांच आपण सर्वजण गोळ्या लागून मरणार अशा भावनेनें सर्वांच्या अंतःकरणानें ठाव सोडला. सर्वजण परमेश्वराचा धावा करूं लागले. सर्वजण विकंठास शाप देऊं लागले. सर्वांच्या अंतर्यामाचा तळतळाट उडून सर्वांचें चित्त क्षोभ पावलें आणि ते निर्वाणमनानें धर्मपालाच्या चिंतनांत गर्क झाले.

त्यांच्या भाविक श्रद्धेचें फळ देण्याकरितांच कीं काय कोणास कळे; तशा ऐन प्रसंगीं विकंठाच्या सैन्यावर बलभीमाच्या शिलेदारांकडून मारा होऊं लागला. तटाच्या भोंवतीं आपण वेढा दिला आहे पण आपल्याही सभोंवतीं बलभीमाच्या चमूचा घेरा पडला आहे असें समजतांच विकंठाची दाणादाण झाली. बलभीम खड्ग धारण करून विकंठाच्या सैन्यांत मिसळला. वृषसेन आणखी पांच पंचवीस रणमस्त सरदारांसह बलभीमाची पाठ राखण्यास सरसावला. तरवारीवर तरवारी खडकूं लागल्या. शस्त्रघातानें अग्नीच्या ठिणग्या उत्पन्न होऊं लागल्या. शेंकडों वीरांचीं मुंडें हवेंत संचार करावयास लागून ती रणभूमी शिररहित कबंधांनीं रिचून गेली. बलभीमाच्या अंगास कित्येक वार लागून तो रक्तानें न्हाऊन गेला. तरी तो महारणपंडित आपल्या समशेरीनें विकंठाच्या वीरांना सपासप छाटीतच होता. खवळलेल्या कृतांताप्रमाणें बलभीमाचें घोर रूप पाहून विकंठाचे राहिलेले शिपाई सैरावैरा पळत सुटले. चंडकिरणांना आटवूनच बलभीमाच्या हातांतील दिव्य शस्त्र घडविलें; असावें तो बलभीम ह्मणजे साक्षात् अकरावा रुद्रच कोपायमान होऊन त्यानें हा निकर माजविला असावा असें भासून विकंठ भेदरून गेला. तो हतवीर्य झाला. बलभीमापढें टिकाव धरणें मुष्किलीचें जाणून तो जातिवंत दुर्जन अंतकाळीं सुद्धां सुविचारास हार गेला नाहीं. आपण आतां मरणारच तेव्हां त्यापूर्वीं सुलोचना, सुनीति, सुशिला, अंबालया यांना जुलमानें भ्रष्ट करून आपली इच्छा तरी पूर्ण करून घ्यावी या हेतूनें तो कांहीं शूर पठ्ठे बरोबर घेऊन क्रीडास्थानांत घुसला. आंत जातांच पहिल्याप्रथम त्याच्या दृष्टीस सुदैव

पडला. त्यानें सुदेवापुढें तरवार पडताळून त्यास कंठस्नान घालण्याचें भय दाखविलें. क्रीडास्थानांतील स्त्रियांना समजुतीच्या गोष्टी सांगून त्या स्वमनानें वश होतील असें सुदेव करीत असेल तरच आपण त्यास जीवंत ठेवूं अशी त्यानें सुदेवास धमकी घातली. सुदेव त्याच्या बोलण्याचें आश्चर्य करीत धर्मपाल व बलभीम यांचा मानसिक हांकांनीं धावा करूं लागला. म्हातारा अडेल असून महा नष्ट आहे असें जाणून विकंठानें शस्त्रप्रहार करण्याकरतां हस्त उचलला तों मागल्यामागेंच त्याच्या शस्त्रधारी मनगटावर वार होऊन तें गळून पडलें. भयंकर आरोळी ठोकून बलभीम पढें सरसावून ह्मणाला " धर्मपाल आणि वेदधर्म यांच्या प्रसादरूपीं वस्त्रानें ज्यांचीं शरीरें झांकलेलीं आहेत त्यांना उघडे करण्याचा जे जे दुष्ट यत्न करतील त्यांच्या नरडीचा घोट घेण्यास हा बलभीम जिवावर उदार होऊन तयार झाला आहे. सुनीती-सारख्या जाज्वल्य पतिव्रतांचा अनन्वीत छळ करून, पातिव्रत्य देवतेस त्रस्त करण्याचा ज्यांनीं विडाच उचलला असेल त्या सर्वांचा भूदवीस बलि अर्पण करण्याकरितां या बळभीमाची असिलता सज्ज होऊन बसली आहे. सुदेवासारख्या धर्मशील, भोळसर, एकनिष्ठ सात्विकास ज्यांनीं सतावून सोडलें असेल; धर्मपालासारख्या भूदेवास देशोधडी लावण्या-करितां ज्यांनीं जारणमारणाचे प्रयोग करून राणी अंबालयेस पळवून आणली असेल, संपदेचा गर्भ बाहेर पडूं नये या दुष्ट हेतूनें वोडंबरीच्या सहाय्यानें ज्यांनीं शतधन्व्याच्या भार्येला तडफड करण्यास लाविली असेल त्या सर्वांच्या आहुती देण्याकरितां या बलभीमानें होम-कुंड प्रज्वलीत करून ठेविलें आहे. माणिकबोवा, रमलभारती आणि राजा विकंठ यांतून कोणीही या बलभीमाचें निवारण करण्यास पुढें चालून यावें. "

सरदाराचें हें त्वेषयुक्त भाषण संपत आहे तोंच वृषसेन भारती व माणिक यांना धरून घेऊन आला. विकंठ वार लागून तेथेंच पडला होता. त्या तिघा दुष्टांना अवलोकन करतांच बलभीम शांत झाला. बल-भीमाच्या भाषणानें निर्भय होऊन सुलोचनादि सर्व स्त्रिया सुदेवाभोंवतीं जमल्या. राणी अंबालया देखील बलभीमाच्या शेजारी तटस्थ उभी

राहिली. त्या स्त्रियांना पाहतांच बलभीमानें शस्त्र फेंकून देऊन त्यांच्यापुढें अश्रुपूर्ण नयन करून साष्टांग प्रणिपात घातला. त्याच्या हृदयांत सात्विक गहिंवर दाटून येऊन तो सद्गद होऊन बोलला " हे मानी, पवित्र, सत्वस्थ, देवांगनातुल्य महान् पतिव्रतांनो ! तुम्हांला अत्यंत क्लेश झाले; तुमच्या तेजोमय सदाचारावरच या अखिल विश्वाचें अस्तित्व अवलंबून आहे ही गोष्ट ध्यानांत आणून तुम्ही आपलें सांत्वन करून घ्या. माझ्या हस्तें तुमची मुक्तता करण्याची तुम्ही मला सवड दिली हा तुमचा माझ्यावर अनुग्रहच झाला. तुमच्या मोचनानें माझ्या पापाचें निरसन होऊन तुम्हींच मला वेदधर्माचे शिष्य होण्याची योग्यता आणली हे तुमचे मजवर महदुपकार आहेत. "

बलभीमाचें नम्र भाषण ऐकून सुदेवास फार समाधान झालें. आपला नाइलाज होऊन आपण अडकून पडलों असतां आपल्या रक्षणार्थ बलभीम धावून आला हें पाहून अंबालयेस बलभीमाच्या वीर्यशालीपणाबद्दल आदर व लोभ वाटूं लागला. क्रीडास्थान उध्वस्त करून भारती, विकंठ व माणिकबोवा यांना कैद करून बलभीम सर्वांना बरोबर घेऊन जनधामाकडे धर्मपाल व वेदधर्म यांच्या दर्शनार्थ चालता झाला.

---

# प्रकरण ४१ वें.

जनधामास येऊन पोंचल्यावर सर्वांच्या भेटी झाल्या. सुदेवानें धर्मपालास आपला पुत्र म्हणून पोटाशीं धरलें. वेदधर्माच्या अमृतमय दृष्टीनेंच सुशीला खडखडीत बरी होऊन ती आपल्या वयाच्या मानानें शक्य तेवढी तेजःपुंज दिसूं लागली. सुशिलेनें धर्मपालास मिठी मारिली. सुनीतीनें वेदधर्माच्या चरणावर मस्तक ठेवून भामिनीस वंदन केलें. सुशिला व सुदेव यांचा वृत्तांत समजून ते आपले जन्मदाते आईबाप आहेत याची जाणीव पटतांच धर्मपालानें सुदेव व सुशिला यांच्या चरणधुळांत लोळण मारिली. नलिनीनें धर्मपालास आलिंगन दिलें. धर्मपालानें नलिनीस कडकडून भेट दिली. मातृप्रेम, पितृवात्सल्य, पुत्रलोभ, भगिनीप्रीति, यांचा समरस

होतांच वेदधर्म आनंदातिशयानें डुलावयास लागला. त्यांच्याबद्दल सर्वांचें हृदय गर्हिवानें दाटून सर्वजण हर्षवातानें कंपित झाले. अंबालया जनधामास आल्याचें समजतांच चंद्रनावतीहून कित्येक सरदार, प्रधान, मंत्री, पुरोहित, मुत्सद्दी व सेनाधिपति मोठ्या थाटानें राणीच्या अभिनंदाप्रीत्यर्थ तेथें प्राप्त झाले. वेदधर्माच्या अनुज्ञेनें ही सर्व मंडळीं वाजत गाजत, मोठ्या समारंभानें चंद्रनावतीप्रत गमन करती झाली.

चंद्रनावतीस पांचल्यानंतर सुनीति प्रसूत होऊन तिला एक कन्या व एक पुत्र असें जुळें झालें. त्यांच्या जन्माप्रीत्यर्थ सर्वत्र आनंद प्रदर्शित करण्यांत आला.

अंबालयेच्या राजमंदिरांत दरबार भरवून अंबालयेच्या विवाहाबद्दल काय तजवीज करावयाची याचा विचार चालू झाला. अंबालया बलभीमाचा पराक्रम वरचेवर वर्णन करूं लागली. आपल्या पणास अनुसरून धर्मपालानें अंबालयेचा स्वीकार करणें इष्ट आहे असें प्रतिपादन करून राणी आपला सत्यपणा व्यक्त करी; पण धर्मपाल द्विज, एकपत्नीव्रती असून अंबालयेचा धिःकार करीत असल्यामुळें आपणास अत्यंत दिलगिरी वाटते असें अंबालया दर्शवी आणि त्याचक्षणीं भरूभीम अविवाहित, भूपजनवर, क्षत्रिय आहे असा उल्लेख करून त्याच्या धीरोदत्त शौर्याचें स्तोत्र गाऊन दाखवी. अंबालयेच्या मनांत बलभीम भरला आहेसें जाणून धर्मपाल ह्मणाला, "राणीचा विवाह करणें ही गोष्ट माझ्या स्वाधीन आहे. लोहपाताचा वकील या नात्यानें मी राणीस जिंकलें आहे. मी आपल्या शौर्यानें जिंकलेली अंबालया मी आपल्या यजमानास- लोहपातास— अर्पण करणेंच इष्ट व न्याय्य आहे."

धर्मपालाचा निश्चय कळतांच अंबालयेनें आपल्या जवळचें लिखितपत्र बाहेर काढून तें भरदरबारांत उघडून फेंकून दिलें आणि असें भाषण केलें कीं, "लोहपात अंबालयेचा गुलाम बनला आहे. लोहपातास अंबालयेनें जिंकिलें आहे. दास होऊन राहिलेल्या लोहपाताच्याच पदरांत धर्मपाल अंबालयेला टाकतील तर वेदधर्म—"

राणी पुढें काय बोलणार होती तें कोणास ठाऊक. तिनें वेदधर्माचा नामनिर्देश केला तेव्हां वेदधर्म ह्मणाला "या गोष्टीचा निकाल लावणें

सुदेवांवर सोपवावें असें मला वाटतें. सुदेवाच्या शब्दांस धर्मपाल सन्मान देईलच यांत संशय नाहीं."

वेदधर्माच्या सूचनेप्रमाणें सुदेवानें भाषण केलें" आज आपणा सर्वांच्या इच्छा परिपूर्ण झाल्या आहेत. धर्मपालाच्या मनांत कांहीं असलें तरी अंबालया बलभीमास द्यावी असेंच माझें मन ओढ घेणार हें खास. बलभीम हा मध्यंतरी शुद्ध आचारापासून थोडा ढळला असला तरी त्यानें त्याबद्दलचा दंड भोगला आहे. त्याच्या मलिन विचाराचें निरसन झालें आहे. धर्मपाल व अंबालया यांना त्याचें शूरत्व कबूल आहे. खेरीज सर्वांनाच आनंद व विस्मय वाटण्यासारखी गोष्ट ह्मणजे ही होय कीं, बलभीम व लोहपात यांत कांहींच तफावत नाहीं. रुद्रवंशीय महाबलाढ्य राजा शतधन्वा व संपदा यांच्या पोटीं जन्म पावून पुरुषार्थ साधणारा वीर लोहपात तोच हा बलभीम या रूपानें येथें उभा आहे. बलभीम हें कृत्रिम नांव धारण करून प्रत्यक्ष लोहपातानेंच क्रीडास्थानांतून सर्वांची मुक्तता केली आहे. मग आतां ही अंबालया लोहपातास वरो किंवा बलभीमास माळ घालो. इत्यर्थ एकच आहे."

सुदेवाच्या भाषणानें सर्वच प्रश्न उलगडला. वेदधर्म व धर्मपाल यांच्या अनुज्ञेनें अंबालयेनें लोहपातास—बलभीमास माळ घातली. चार आठ दिवस अद्भुत सुख सोहळा झाला. लोहपातानें स्वार पाठवून संपदेला गिरिकन्येहून चंदनावतीस आणविलें. अंबालयेनें संपदेच्या पायावर मस्तक ठेविलें. राजभांडार उघडें ठेवून तें गरीब, दरिद्री याचकांकडून लुटाविलें. राज्यांतील सर्व प्रजाजनांना भोजन घालून पुष्कळ देणग्या वाटण्यांत आल्या. सर्वत्र आनंदी आनंद झाला. शूरसेन व आंध्र हे दोन्ही देश एकमेकांत सामील करून दोहोंचें राजधानीचें शहर चंदनावतीच कायम केलें. लग्नसमारंभाचा धुमाकूळ आटपून पाहुणे मंडळी जिकडल्या तिकडे जाईपर्यंत विकुंठ व भारती यांची चौकशी चार दिवस लांबणीवर पडली

———————

# प्रकरण ४२ वें.

गुन्हेगारांची चौकशी करण्याकरितां मोठा दरबार भरविण्यात आला. या दरबारास सुलोचना, सुशिला, सुनीति, नलिनी या स्त्रियांनाही हजर ठेवण्याची व्यवस्था केली होती. विकंठ, भारती, माणिकबोवा यांची वाट काय करावी असा लोहपातानें धर्मपालास प्रश्न करितांच धर्मपालानें सांगितलें “ ज्याचें कर्म त्याच्यापाशीं. अपकारी आणि अपकृष्ट यांचा पूर्वजन्मानुसार कोणता संबंध असतो हें आपणास कांहींच समजणारे नसतें. स्वतःचें वर्तन पायाशुद्ध राखून जर कांहीं उपाधी लागेल तर त्या उपाधी हरणाची जबाबदारी परमेश्वरावर हवालून आपण आपली वृत्ति शांत व स्वस्थच ठेविली पाहिजे. आपण क्षमेचाच अवलंब केला पाहिजे. भारती व माणिकबोबा यांनीं मला आणखी अनंत यातना देण्याचा उपक्रम केला तरी देखील मी त्यांच्यापुढें नम्रतेनें नमस्कार घालून ईश्वराजवळ त्यांचें कल्याणच चिंतीन. त्यांच्या नीचकर्मास शासन करण्याकरितां परमेश्वर समर्थ आहे. त्याकरितां आपण जर नीच, दुष्ट व क्रूर कर्मास प्रवृत्त झालों तर आपली सम व शांतवृत्ति कोठें राहिली ? भारती, विकंठ व माणिक या सर्वांना सदुपदेश करून आपापल्या स्थानाप्रत गमन करण्याची मुभा द्यावी असें माझें मत आहे. ”

धर्मपालासारख्या भोळ्या साभाचें भाषण ऐकून लोहपात तटस्थ झाला. त्याच्या मनाची थोरवी, अंतःकरणाचें औदार्य, मेंदुची शांति हीं अवलोकन करून अंबालयेस कौतुक वाटलें. वेदधर्मास आपल्या शिष्याची अभेद वृत्ति पाहून प्रेमाचें भरतें आलें. सुदेवाला आपल्या पुत्राच्या तोंडचे सत्वगुणी उद्गार ऐकून आपला जन्म धन्य वाटला. धर्मपालाच्या सल्ल्याप्रमाणें चालावयास मात्र लोहपात बराचसा नाखुष दिसून तो वेदधर्माच्या तोंडाकडे पहात राहिला. वेदधर्मानें लोहपाताचें अंतर्गत मानस जाणून धर्मपालाच्या बोलण्यास उद्देशून भाषण केलें “ सत्वगुणास चिकटून राहणें अति श्रेयस्कर आहे. शत्रूला उपकारानें मारण्यांतच पराकाष्ठेचें पुण्य आहे. क्षमा हेंच स्वर्गाचें द्वार आहे; समता व अभेद-

बुद्धि हीच मोक्षाचा सोपान आहे. अहिंसा हाच परमधर्म आहे; तरी पण सत्वगुणाच्या परिपालनार्थ कोण्या अपकारी दुर्जनांना शासन केलें तरी त्यांत पातक घडत नाहीं. भगवद्धामोच्चारामध्यें व्यत्यय आणूं पाहणाऱ्या हिरण्यकशिपूचें वक्षस्थळ समदृष्टि नारसिंहानें विदीर्ण केलें. भेदभावरहित अशा श्रीकृष्णानें द्रौपदीचें लज्जावस्त्र हरण करणाऱ्या दुःशासनास आपल्या सुदर्शनानें दग्ध केलें. सत्वगुणवल्लीचा मूळकंद असा जो धर्मपुत्र धर्मात्मा धर्मराजा त्यानेंही समरांगणावर आपल्या मामाचा प्राण घेतला. या सर्व गोष्टींचें खरें तात्पर्य असें आहे कीं, सात्विक जीवांचें संरक्षण करणें हेंच अहिंसेच्या धर्मातील परमतत्व आहे. जोंपर्यंत सर्व विश्व सात्विकी वृत्तीनें व्याप्त झालें नाहीं तोंपावेतों सर्प, विंचू, व्याघ्र, सिंह इत्यादि क्रूर व नीच प्राण्यांना ठेंचूनच टाकलें पाहिजे. याकरितां लोहपातानें आपल्या इच्छेनुसार विकंठप्रभृतींची वाटेल ती व्यवस्था करावी अशी आम्हीं त्याला परवानगी देतों."

वेदधर्माच्या परवानगीप्रमाणें लोहपातानें विकंठाचें राज्य आपल्या ताब्यांत घेऊन विकंठास जन्मभर कारागृहांत खिळ्यांच्या शय्येवर शयन करविण्याचा हुकूम केला. भारती व माणिकबोवा यांना तप्त तेलांत दररोज थोडें थोडें तळून ठार मारावें अशी लोहपातानें शिक्षा सांगितली. आपल्या जन्माबद्दल आपण ज्याचें ऋणी आहों त्या सुदेवास लोहपातानें विकंठाचें राज्य अर्पण केलें. सुदेव त्याचा स्वीकार करीना. तेव्हां तें राज्य धर्मपालाच्या तान्ह्या मुलाच्या नांवानें करून दिलें; इतक्यात त्याठिकाणीं अंबालयेच्या अनुज्ञेनें सरदार वृषसेन जया व विजया यांना घेऊन आला. त्यांना पाहतांच लोहपात क्रुद्ध झाला. लोहपाताचा आरक्त चेहरा पाहून वेदधर्म बोलला " या मंदभागी प्राण्यांवर वृथा कोप करण्यांत अर्थ काय ? त्यांना त्यांच्या पातकानुसार विधात्यानें कशाही बनविल्या असल्या तरी त्यांच्या मोहांत पडून अखेर पश्चात्तापांत पडणाऱ्या सूज्ञ जनानीं आपल्या मूर्खपणास बोल लावून स्वतः प्रायश्चित्त भोगणेंच उचित आहे. राजा लोहपात ! तुझ्याप्रमाणें आणखी कित्येक मूर्ख व अशुद्धकर्मी प्राणी या मंदिराच्या तळघरांत वास्तव्य करीत आहेत. त्यांना मुक्त करून आतां येथें आणीव."

या आज्ञेनुसार तळघरातून सर्व कैदी दरबारांत आणून उभे करण्यांत आले. त्यांत कित्येक राजपुत्र होते; कांहींजण गर्भश्रीमंत होते; कांहीं सधन व्यापारी होते व कांहीं इतर लोक होते. त्या टोळक्यांत नानासाहेब, प्रवीर, जांबवान यांना पाहतांच धर्मपाल आश्चर्यभरीत झाला. धर्मपालानें त्या सर्वांची मुक्तता करण्यास सांगून त्यांतील नानासाहेब हा साध्वी सुलोचना हिचा पति असल्याची लोहपातास माहिती करून दिली. राणी अंबालया हिच्या लहरीस जपणामुळेंच ती लागलेली दावण पाहून राजा लोहपात राणीच्या विक्षिप्तपणास कांहींसा दोष देऊं लागला. तेव्हां धर्मपाल बोलला "ज्या तऱ्हेचें मोहपटल दूर सारण्यास प्रत्यक्ष राजा लोहपातही समर्थ झाला नाहीं. इतकेंच नव्हे तर ज्या मोहानें लुब्ध होऊन राजा लोहपातानें अंबालयेची गुलामगिरी पतकरली, त्याच मोहास बळी पडलेल्या या मूढ व अज्ञ जनांची मालिका पाहून लोहपातानें आश्चर्यभरीत कां व्हावें बरें ? यांत राणीच्या मुळींच विक्षिप्तपणा नाहीं. राणीच्या या कृत्यामुळें पुरुषांच्या भोगकामेच्छेची छीःथू होत आहे. रूपगुणसंपन्न स्त्रियांवरच पुरुषजात भाळणारी आहे असें ह्मणावें तर जया आणि विजया यांच्यासारख्या लावण्यमयींचा अंगिकार करण्यास कोणीही पुरुष तयार होणार नाहीं. रतिसौख्यापासून उत्पन्न होणाऱ्या समाधानांत कांहींएक बाण पडणार नाहीं अशी कुरूप किंवा साधारण सुस्वरूप अशा प्राप्त झालेल्या स्त्रियां समवेत आनंदानें व स्वधर्मानें कालक्षेप करण्यास पुरुषजात सुखी नाहीं. ह्मणजे पुरुषजातीच्या विषयेच्छेंत पहिल्याप्रतीचा भ्रष्टपणा, महामूर्खत्व, बेपर्वाई व नीचतम छांदिष्टपणा भरला आहे. याबद्दल पुरुष ह्मणविणारानीं शरम बाळगली पाहिजे. इहलोकीं जन्म पावलेली सर्व मनुष्यजात सुखाभिलाषी आहे. परंतु, आचारक्रमावर नजर देऊन खऱ्या सौख्याचा उपभोग घेणारा मनुष्य फारच विरळा; याबद्दल विचार करून खऱ्या व अवश्य सौख्या पुरतीच विषयांवर नजर देऊन सदा कर्तव्यतत्पर राहण्याचा निश्चय ठरविण्याकडे जोंपर्यंत नरजात दुर्लक्ष करील तोंपर्यंत अनाचार, भ्रष्टाचार, अनीति, अधर्म यांना आळा बसून सदाचार, पुण्यक्रिया, नीति आणि धर्म यांचा बस बसणार नाहीं. अवाढव्य राज्यावर स्वामित्व गाजविणाऱ्या नृपतानें मर्गजाचें गृह बांधिलें व दारिद्र्यानें गांजलेल्या एखाद्या

निर्धनानें मातीचें रचलें तरी दोघांना सावलीचें सुख समसमानच प्राप्त होणार हें सर्वव्यापक तत्व ध्यानांत आणूनच सर्वांनीं आपापल्या वर्तनाचा क्रम निश्चित करून सत्वपर व्हावयास पाहिजे."

धर्मपालाचें भाषण आटपतांच त्या सर्व बंदिवानांना आपापल्या इच्छेनुसार निघून जाण्याचा हुकूम देण्यांत आला. सर्वजण निघून गेले. जांबवानानें धर्मपालास नमस्कार घालतांच धर्मपालानें त्याची व सुलोचनेची भेट करविली. वेदधर्म व धर्मपाल यांनीं सुलोचनेचा महिमा गाऊन तिला नानासाहेबाच्या स्वाधीन केली. नानासाहेबानें प्रेमपूर्वक त्या साध्वीचा स्वीकार केला. सुलोचनेच्या अनुपम गुणावर खुष होऊन लोहपातानें तिला कांहीं गांव बक्षीस दिलें आणि त्यांना रवाना केलें. जांबवानाचा वृत्तांत जाणून त्याला आपल्या हाताखालील कारखान्यांत बरीच मोठी जागा देऊन लोहपातानें धर्मपालाच्या दोस्तास खुषी केलें. प्रवीर हात जोडून धर्मपालापुढें पदर पसरून क्षमा मागूं लागला. धर्मपालानें त्यास सांगितलें "तूं माझें कांहींएक देणें नाहींस. तूं ऋणमुक्त आहेस. मी आपलें सर्व कर्ज देऊन टाकलें आहे. तुझ्यावर माझा रोष नाहीं. तुझ्यापासून मला थोडा फार आधारच मिळालेला आहे. आपापल्या कर्मांचीं फळें ज्याचा तो भोगतो. तुझ्याशीं माझा पूर्वीप्रमाणेंच स्नेह व लोभ आहे. जा; तूं आपल्या घरीं जाऊन सुखानें रहा." धर्मपालाच्या या क्षमाशील बोलण्यानें प्रवीर ओशाळला सुशर्मा समंध झाला असल्याचें सांगून प्रवीरानें घरीं जाऊन राहण्याचें आपल्याला भय वाटत असल्याचें सांगितलें. तें ऐकून वेदधर्मानें त्यास सुशर्म्याचा उद्धार करण्याचें अश्वासन देऊन चतुर्थाश्रम घेण्यास सांगितला. त्याप्रमाणें सुशर्मा उद्धरून गेला. प्रवीरानें संन्यासदीक्षा स्वीकारून देहाचें सार्थक केलें. सुलोचना आपल्या पतीसह द्विचक्र नगरास जाऊन सुखानें संसार करीत राहिली. जांबवान सोनगडास आपल्या घरीं जाऊन आपल्या आईबापांस सरलेचें आनंदवृत्त सांगता झाला. लोहपातानें आपल्या सर्व राज्याचें उदक धर्मपालाच्या हातावर सोडण्याकरितां सुवर्णाची झारी भरून आणविली. धर्मपालानें त्याचा आदरपूर्ण त्याग केला. धर्मपालास कोणत्याही गोष्टीचा मोह पडत नाहीं;

कोणत्याही कारणानें क्रोध उत्पन्न होत नाहीं, कामाची मात्रा त्याच्यापुढें चालत नाहीं, लोभाला तो जुमानीत नाहीं, क्षमाभूषणामुळें त्याच्या हृदयांत मत्सराचा शिरकाव होत नाहीं, परमेश्वराच्या विभुत्वाबद्दल खात्री झाली असल्यानें त्याच्याठिकाणीं मदाचा गंधही दिसत नाहीं, हव्यासाचेंच निरसन झालें असल्यानें त्याच्याजवळ दंभाचें वास्तव्य असणें संभवनीयच नाहीं असें पाहून लोहगात व अंबालया सिंहासनावरून उठून खालीं आले. त्यांनीं वेदधर्म व धर्मपालास प्रणाम केला व त्यांच्या उपदेशरूपीं प्रसादप्राप्तीची इच्छा दर्शविली.

राजा व राणी यांची इच्छा जाणून वेदधर्म बोलला " राजा; तूं आतां सुखानें राज्य कर. सौख्याचें वास्तव्य जगतांमध्यें जर कोठें सांपडत असेल तर ते सद्गुण, सदाचार, सत्समागम, सत्य, सद्धर्म आणि सद्विद्या यांतच दिसून येणारें आहे. मर्त्य जगाचा विचार केला ह्मणजे या संसारांतील कोणत्याही दरजाची स्थिति दुःखप्रदच आहे. हें संसारदुःख वितळून जाण्याचें खरें साधन ह्मटलें ह्मणजे एक सद्विवेकप्राप्ति हेंच होय. ज्याच्यावर जगाचें जीवन अवलंबून आहे अशा हरी वांचून जगतांमध्यें कांहींच सत्यपणा नाहीं असें जाणणें यासच सद्विवेक ह्मणावयाचें. त्या परब्रह्म हरीला आपलासा करणें हेंच काय तें आपलें कर्तव्य असून त्याच्यापासूनच इहपरलोकीं कल्याण होणारें आहे. त्याच्या प्राप्तीकारितां भलतेंच सायास करून अंतीं पुन्हा दुःखांत पडण्याचें कारण नाहीं. अखिल जग भुलून गेलेलें असल्यामुळें नाना साधनें उत्पन्न झालीं आहेत. दिगंबर वृत्ति ठेवणें, वायुआहार करणें, मौनी असणें, जटा धारण करणें, व्रतें, उद्यापनें, तीर्थाटणें करणें, शमदमादि साधनें, यज्ञयागादि क्रिया, वेदाभ्यास, शास्त्रनिपुणता यांच्या योगानें परब्रह्मरूपीं निधान सांपडणार नाहीं. ब्रह्मचर्य, गृहस्थ, वानप्रस्थ आणि संन्यास या आश्रमांचे सायास ह्मणजे फुकट काबाडकष्ट आहेत. त्याच्या योगानें मेघश्यामाची प्राप्ती होणार नाहीं. वृक्षाला टांगून घेऊन, धूर खाऊन, गिरिकंदर सेवून, कलाकौशल्य, नानाविद्या यांचा अभ्यास करून लौकिकीं ज्ञान, लौकिकी पंडितपणा, लौकिकी धर्म, लौकिकी श्रेष्ठपणा यांच्या प्राप्तीनें परमात्मा गवसणार नाहीं. हरिरूप दृष्टीस पडण्याला संतांच्या चरणाचाच आश्रय

करून एका शुद्ध, विमल व अनन्य भावनेनेंच भगवंतास सतत हाका मारली पाहिजे. राजा; यापेक्षां तुला आणखी जास्त काय सांगावें. येवढ्यानें तुझें समाधान होईल."

वेदधर्माचें भाषण पुरें होतांच लोहपातानें धर्मपाल व वेदधर्म यांच्या पायांवर पुन्हा लोळण मारली आणि नंतर दोन्ही हात जोडून तो ह्मणाला "धर्मपाल व आपण स्वतः यांतून कोणी तरी येथें सतत वास करावा अशी माझी इच्छा होती. आपण ती इच्छा सफल करीत नाहीं; व धर्मपाल देदिकोठा खरीज कोठें राहूं इच्छित नाहीं. जशी आपली मर्जी. आपण कोठेंही असला तरी आपली मजवर पूर्ण कृपा मात्र असावी. मी हें सर्व राज्य धर्मपालास अर्पण केलें आहे. माझा धनी देदिकोठास वास्तव्य करीत आहे अशा समजुतीनेंच मी शूरसेन व आंध्र या देशांचा कारभार चालवीन. मी आपला दास आहे अशी माझी सर्वत्र ख्याती व्हावी ह्मणजे मला सर्व सौख्य लाभलें."

ही विनंति ऐकून वेदधर्म व धर्मपाल यांनीं लोहपात व अंबालया यांना शुभप्रद आशिर्वाद दिला आणि आपल्या सर्व परिवारासह धर्मपाळ देदिकोठास चालता झाला.

# उपसंहार.

धर्मपालाच्या धाकट्या पुत्राच्या नांवाची द्वाही फिरवून सुदेव आपल्या पौत्रांसह आनर्त देशाचा राज्य कारभार चालवूं लागला. त्याच्या तीन्हीं पुत्रांचीं लग्नें होऊन ते सर्वजण आंध्र व शूरसेन या देशांत हुद्यांचीं कामें वहिवाटींत हरिध्यान करीत राहिले. नलिनी शोणितापुरास जाऊन आपल्या पुत्रांसमवेत आनंदानें राहिली. धर्मपालानें वैराटीनदीमध्यें काकासाहेबास गति देऊन वेदधर्माच्या दर्शनानें पित्याचा उद्धार करविला. आपल्या दोन्ही माता, उपमाता सौमिनी, पत्नी सुशीला यांना घेऊन धर्मपाल देदिकोठामध्यें भगवंताच्या नामघोषांत रंगून राहिला. स्वतःची वृत्ति शुद्ध झालेली; इंद्रियजयामुळें मन स्वाधीन झालेलें, चित्तास अचित्तपण प्राप्त होऊन ब्रह्मविद्येचें ज्ञान मनांत ठसलेलें;

भेदभावाचें निरसन होऊन अंतःकरणांत समता व्यापून राहिलेली; हरिचिंतनांत चित्तचतुष्टय गढून गेलेलें; कामादि बलवत्तर रिपूंस जेरीस आणून सोडलेले; सुशिलेसारखी सावित्रीतुल्य पवित्र माता, उपमाता, दत्तकमाता, सुदेवासारखा सुगुणसामर पिता यांच्या सेवेची अनुकूळता; सुनीतिसारख्या महान जाज्वल्य पतिव्रता कांतेचा नित्य सहवास; पुत्र, पौत्र, कन्या, स्नुषा याची संपन्नता; धनधान्य समृद्धि; आधिव्याधिराहित्य; लोहपात आणि अंबालया यांच्या सारख्यांची सेवावृत्तीपर तत्परता; धर्म, अर्थ, काम व मोक्ष या चारी पुरुषार्थांच्या लाभाची सुसाध्यता आणि वेदधर्मांप्रमाणें अचिंत्यसामर्थ्यसंपन्न, महाभाग्यवान, वैराग्यवल्लीचा मूल कंद, ज्ञानारविंदमकरंद, विवेकोदधीचा पूर्ण चंद्र अशा परब्रह्मस्वरूप साधूचा नित्य समागम व त्याची पूर्ण कृपा— अशाप्रकारच्या परिस्थितींत देदिकोठांत वास्तव्य करणाऱ्या धर्मपालाकडे कोणाचें चित्त वेधणार नाहीं बरें ? त्याच्या स्थितीचें चिंतन करून कोणाचा आत्मा प्रसन्न झाल्यावांचून राहील काय ? धर्मपाळाचें एकदां नुसतें दर्शन तरी घडावें अशी इच्छा होणार नाहीं असा कोणी तरी सुविचारी जन सांपडणें शक्य आहे काय ? सारासार विचारसंपन्न समाजांत धर्मपालाचा हेवा उत्पन्न न होणें संभवनीय आहे काय ? त्याचें जन्मादारभ्य चरित्र श्रवण करून त्याच्या प्रस्तुत स्थितीबद्दल विचार करणाऱ्यांतून तो हल्लीं भोगींत असलेली स्थिति ह्मणजेच भूवरील स्वर्ग होय असें कबूल करण्यास कोण तयार असणार नाहीं ?

समाप्त

# सांसारिक गूढ.

या नांवाची कादंबरी मार्चमध्यें ग्राहकांच्या हातीं पडेल. आगाऊ नांवें नोंदवा. किं. रु. ८. ह. व्ही. पी. सह १।८ मागाहून किंमत जास्त पडेल.

पत्ता:—दत्तात्रय मोरेश्वर देव
पोष्ट वांई. जि० सातारा.

---

# छापत आहे.

“लज्जासंरक्षण” म्हणजेच द्रौपदीवस्त्रहरण या नांवाचें मंज चार अंकी नाटक छापत आहे किं० १२ ठेविली आहे. आगाऊ नांवें नोंदवा. मागाहून किंमत जास्त पडेल.

पत्ता:—दामोदर लक्ष्मण लेले.
मोदवृत्त छापखाना
पो० वांई जि० सातारा.